
# स्टॅलिन



म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १२०२
REFBK-0006504

वि. म. भुस्कुटे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# स्टॅलिन

## ( चरित्र आणि विचार )

दा. क. ६५०२

लेखक :

वि. म. भुस्कुटे

REFBK-0006504

किंमत ३॥ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
१९१ शनवार, पुणें २.

संचालक
भ. व्यं. देशमुख,
बी. ए., एल्‌एल्‌., बी.

( १ ) पुढील आवृत्तीचे हक्क लेखकाकडे आहेत.

( २ ) मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.

क्रमांकः—५२
१९ जानेवारी १९४४

मुद्रक
श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण, पुणें २.

# प्रस्तावना

कार्ल मार्क्स व लेनिन यांचीं चरित्रें प्रसिद्ध केल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं स्टॅलिनचें चरित्र मराठी वाचकांस सादर करतांना मला आनंद होत आहे. लेनिनच्या चरित्रानंतर स्टॅलिनचें चरित्र प्रसिद्ध होण्यास मध्यंतरीं बराच काल गेला असला तरी आज ज्या कालांत तें प्रसिद्ध होत आहे तोच काल स्टॅलिनचें चरित्र साद्यंत पुढें येण्यास अत्यंत अनुकूल आहे यांत शंका नाहीं.

कार्ल मार्क्सनें साम्यवादाची (शास्त्रीय समाजवादाची) प्रस्थापना केली. त्याचा शिष्य लेनिन यानें त्या तत्त्वदर्शनानें घालून दिलेल्या मार्गाचाच मागोवा घेऊन युरोपांतील एका मोठ्या देशांत कामगार-क्रांति घडवून आणली व जनतेचें खरेंखुरें पूर्ण व शुद्ध लोकशाही स्वराज्य प्रस्थापित केलें.

लेनिनच्या या कार्यांत त्याचा दोस्त व एकनिष्ठ शिष्य स्टॅलिन यानें त्याला मदत केली. क्रांति करणें जितकें कठीण त्यापेक्षांही ती टिकवून धरणें व तिचें दृढीकरण करणें अत्यंत कठिण. स्टॅलिनचें जीवितकार्य मुख्यत्वानें हेंच होय. १९१८ च्या क्रांतीनंतर सगळा युरोप व अमेरिकासुद्धांही कामगार-क्रांति हाणून पाडण्याकरतां रशियावर उठली त्या वेळीं स्टॅलिननें त्यांच्या विरोधास यशस्वी रीतीनें तोंड देऊन ती टिकवून धरली. लेनिनच्या मरणानंतर आर्थिक व औद्योगिक सुधारणांच्या दोन पंच वार्षिक योजना मुदतीच्या आंतच यशस्वी करून दाखवून तिचें दृढीकरण केलें.

यानंतर पुन्हा आजही हस्तगत युरोपचें सर्व मनुष्यबळ व युद्धसामुग्री आपल्या पाठीशीं घेऊन सोव्हिएट यूनियनवर हल्ला करणाऱ्या प्रचंड नाझी शक्तीलाही थोपवून धरून या क्रांतीवरचें आणखी एक मोठें संकट स्टॅलिननें निवारण केलें आहे. सोव्हिएट यूनियनवरचें आजचें नाझी संकट हें अखिल जगांतील लोकशाहीवर आलेलें व्यापक व बलिष्ठ असें संकट आहे. या संकटाचें आज समूळ निर्दालन झालेलें नसलें तरी तें आता आपल्या विनाशाच्या मार्गाला झपाट्यानें लागलें आहे व त्याचें सर्व श्रेय स्टॅलिनच्या कर्तबगारीला, कारस्थानाला व युद्धकौशल्यालाच आहे.

स्टॅलिनचें हें युद्धकौशल्य आज जगमान्य झालें आहे व त्याचें द्योतक म्हणूनच कीं काय, जगांतील एकषष्ठांश भागावर साम्राज्य चालविणाऱ्या एका प्रबल साम्राज्यवादी राष्ट्राच्या राजानें स्टॅलिनला नुकतीच एक तरवार अर्पण केली आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या व हिंदुस्थानच्या बादशहानें स्टॅलिनला तरवार अर्पण करून त्याचें युद्धकौशल्य तर मान्य केलेंच आहे, पण त्या-बरोबरच यापुढचें जगद्रक्षणाचें व जगच्छांतिप्रस्थापनेचें कार्य स्टॅलिनकडे व त्याच्या कम्यूनिस्ट लाल फौजेकडे सोंपविलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

भांडवलशाही युगानंतर जगद्रक्षणाचें व जगच्छांतीचें कार्य कम्यूनिझमच काय तो करूं शकतो. निर्भेळ मार्क्सवादाचें अनुसरण करणाऱ्या व्यक्ति व त्यांचा पक्ष केवढीं प्रचंड कार्यें करूं शकतात हें स्टॅलिननें आपल्या चरित्रा-वरून अखिल जगाला सिद्ध करून दाखविलें असून युद्धोत्तरकालीन जगाच्या निरनिराळ्या राष्ट्रांतील राज्यघटना ठरविण्याच्या कामीं पूर्ण लोकराज्याचें—स्वयंनिर्णयाचें आपलें मतच तो सर्व दोस्तराष्ट्रांच्या गळीं उतरविल्याशिवाय राहणार नाहीं.

आज ज्या पुरुषाचें चरित्र प्रकाशित होत आहे तें एका जिवंत थोर पुरुषाचें चरित्र आहे; आणि हा थोर पुरुष असा आहे कीं, याच्या पुढच्या जीवनांत पूर्वींपेक्षांही अत्यंत महत्त्वाचीं व जगन्मान्य कार्यें घडून यावयाचीं आहेत. स्टॅलिनचें आजवरचें चरित्रसुद्धां इतकें गहन, व्यापक व बोधप्रद आहे कीं, त्यावर व्हॉल्यूमच्या व्हॉल्यूम प्रसिद्ध व्हावयास पाहिजेत. एवढी प्रचंड गंगा आपण हिंदुस्थानांत आज अवतरवूं शकत नसलों तरी, स्टॅलिनच्या चरित्राची ही पावणे दोनशें पानांची छोटीशी मणिकर्णिका मराठी वाचकांकडे पोंचतीं होत आहे, हें काम देखील आजच्या सर्वतोपरी अडचणीच्या झालेल्या कालांत कमी कष्टाचें नाहीं. माझे परम स्नेही व ऋणानुबंधी श्री. भगवानराव देशमुख यांनीं हें कार्य मोठ्या हौसेनें हातीं घेतलें नसतें तर स्टॅलिन-चरित्र प्रसिद्ध होण्याची फार दिवसांची माझी मनीषा कोठच्या कोठें जिरून गेली असती.

मीं ज्या वेळीं पुस्तक लिहिण्याचें काम हातीं घेतलें त्या वेळीं स्टॅलिनचीं चरित्रविषयक अशीं मला पाहिजे असलेलीं पुस्तकेंही मिळालीं नाहींत. तथापि मीं वेळोवेळीं करून ठेवलेल्या टिपणांवरून व प्रत्यक्ष अशीं जीं काय थोडीं

पुस्तकें मिळालीं त्यावरून मीं हें चरित्र लिहिलें आहे व या थोड्याशा संदर्भ-पुस्तकांची यादीही या पुस्तकांत दिली आहे.

स्टॅलिनचें चरित्र अनेकविध गुप्त-प्रकट कारवायांनीं व कारस्थानांनीं भरलेलें आहे. खरें स्टॅलिनचें चरित्र खुद्द स्टॅलिननेंच लिहिलें पाहिजे तरच त्याच्या-संबंधानें जे पुष्कळ प्रकारचे गैरसमज पसरले आहेत ते खात्रीनें दूर होतील व त्याचें तेजस्वी व्यक्तिमत्व नजरेस येईल.

कोणतेंही तत्त्वज्ञान, त्याचे अनुयायी व त्यांनीं तदनुसार केलेलीं कार्यें भूतहितकारक म्हणजेच खरीं व यशस्वी केव्हां ठरतात, तर तीं प्रत्यक्ष अमलांत येऊन विजयी होतात त्या वेळीं. लेनिननें व त्यानंतर स्टॅलिननें मार्क्सचें कम्यूनिझमचें लोण जगांतील २० कोटी लोकांच्या एका मोठ्या देशांतील जनतेपर्यंत यशस्वी रीतीनें पोंचविलें आहे. आणि फॅसिझमचा म्हणजे कट्टर भांडवलदारी लष्करशाहीचा पाडाव करून हें लोण जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोंचविण्याचा काल स्टॅलिन आपल्या चरित्रानें जवळ आणीत आहे, ही गोष्ट त्याच्या उज्ज्वल जीवनावरून आज प्रत्यक्ष सिद्ध झाली आहे.

या प्रत्यक्ष प्रतीतीवरून स्टॅलिनच्या टीकाकारांचीं तोंडें आज बंद पडलीं आहेत व तीं बंद पडावयासही पाहिजेत. पण तसें न होतां ज्यांना आपला हट्टच चालवायचा आहे त्यांच्या टीकांची कोणी काय म्हणून पर्वा करावी? स्टॅलिनचें रोज घडून येत असलेलें यशस्वी चरित्रच असल्या टीकाकारांना चोख प्रत्युत्तर आहे.

पुणें, ७-१-१९४४. वि. म. भुस्कुटे

# संदर्भ-पुस्तकें

Life of Stalin— David M. Cole

" Henry Barabusse

" Kalinin

" Stephen Graham

" Issac Don Levine

History of the Communist Party of Soviet Union (Bolshevik)

Soviet Communism— Mr. and Mrs. Webb

Stalingrad— People's Publishing House, Bombay

Stalin— Friends of the Soviet Union (Punjab Branch)

Stalin— Foreign Publication, Moscow

# आमचीं प्रकाशनें

**वि. स. खांडेकर**

१ फुलें आणि दगड १।।।
२ घरट्याबाहेर १।।।
३ पहिलें प्रेम (आ. २ री.) ३
४ जळलेला मोहर ३
५ क्रौंचवध ४
६ सायंकाल (आ. २ री.) १।।
७ अविनाश १।।।
८ मंदाकिनी १।।।
९ सहा भाषणें १।।।
१० कलिका २।
११ स्त्री आणि पुरुष २

**ग. त्र्यं. माडखोलकर**

१ अवशेष २
२ नागकन्या २
३ माझी नभोवाणी २
४ नवे संसार (जप्त) ४
५ चंदनवाडी ६।।
६ व्यक्तिरेखा २।

**ना. धों. ताम्हनकर**

१ तात्या भा. १ ला २।।
२ तात्या भा. २ रा ३
३ निवाडे भा. १ ला २।।
४ चकमकी १।।
५ बच्चा नवरा १।।

**चिं. वि. जोशी**

१ आणखी चिमणराव (आ.२) ४
२ नवें भारूड २
३ स्टेशनमास्तर २

**साने गुरुजी**

१ पुनर्जन्म २।।
२ आस्तिक २।।

**दत्तु बांदेकर**

१ सख्याहरी १।।।
२ नवी आघाडी १।।

**द. र. कवठेकर**

१ अपुरा डाव ३-
२ रेशमाच्या गांठी ३
३ आभाळाची सांवली ४

**वा. म. जोशी**

१ स्मृति-लहरी २
२ विचार-लहरी २।
१ नवें जग ?—**पु. य. देशपांडे** २।।
१ रॉयचरित्र—**भाई बेके** १।।
१ काव्यज्योति
प. ले. **वि. स. खांडेकर** १

**आनंदीबाई जयवंत**

१ पारंब्या १।।

**लक्ष्मणराव सरदेसाई**

१ ढासळलेले बुरूज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

१ व्यक्तिचित्रें २।।
१ फसगत—**ना. ह. आपटे** १।।
१ साखरपुडा—**प्र. के. अत्रे** १।।

**कृष्णाबाई मोटे**

१ मीनाक्षीचें जीवन २।

**र. गो. सरदेसाई**

१ चलतीं नाणीं २

**रा. श्री. जोग**

१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८
१ हितपत्रें—**ना. म. पटवर्धन** ३

**वि. वि. बोकील**

१ बेबीची बहीण ३
३ ग्रह आणि तारे—**सत्याग्रही** ४।।

**अनंत काणेकर**

१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३

**काकासाहेब कालेलकर**

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १।।
१ प्रापंचिक पत्रें **य. दि. पेंढारकर** ३
१ स्टॅलिन—**वि. म. भुस्कुटे** ३।।

# आगामी प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ चल ये राणी
४ विसावें शतक
५ तिसरी भूक
६ वर्षाकाल
७ छाया भाग १-२
८ वालुका
९ कालचीं स्वप्नें
१० चार भिंती
११ मंजिऱ्या
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ वा.म.जोशी(व्यक्ति आणि वाङ्मय)
१४ फुलें आणि काटे
१५ पांढरे ढग
१६ पहिली लाट
१७ कल्पलता

### ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ती उदयन
५ उर्वशी

### द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी

### ना. धों. ताम्हनकर

१ निवाडे भा. २ रा.
२ गुजाताई
३ अनेक आशीर्वाद
४ दाजी भा. १ ला
५ शेजारी

### कृष्णाबाई मोटे

१ मवाली
२ कलाक्षेत्रांत

### काकासाहेब कालेलकर

१ स्मरणयात्रा

### अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे
३ पिकलीं पानें (दुसरी आवृत्ति)

### दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी

### चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार-कथा

### ना. ह. आपटे

१ संचित याचं नांव ?

### शकुंतला परांजपे

१ भिल्लिणीचीं बोरें

# क्रांतीचा रंगरूट

ठाणे
दा. क्र. ६२४६८
ग्रंथ शाखा (स्वतंत्र प्रत)

बर्फाच्छादित कॉकेशस पर्वताच्या एका मोठ्या दरीतून कुरा नदी वाहत आहे. या नदीचें पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ असल्यामुळें 'मोत्याची नदी' असें तिचें नांव पडलें आहे. या नदीच्या डाव्या तीरावर एक टेकडी असून तिच्या-वर जुन्या किल्ल्याचे अवशेष आहेत. या टेकडीच्या पायथ्याशीं गोरी नांवाचें गांव आहे. स्टॅलिनचें हें जन्मस्थान होय.

ही दरी अत्यंत सुपीक होती. खाद्यपेयांच्या भरपूर सामुग्रीनें ती भरलेली होती. या ठिकाणचे रहिवासी शांततेचें जीवन व्यतीत करीत होते. या सुपीक दरींत ते जुन्यापुराण्या पद्धतीनें इतक्या सुखासमाधानांत राहत होते कीं, आपल्याभोंवतालच्या टेकड्या ओलांडून बाहेरच्या जगांत प्रवेश करण्याची कल्पना देखील त्यांच्या मनाला शिवली नाहीं.

कॉकेशस पर्वतांच्या टेकड्यांच्या रांगांतून अशा बऱ्याच सुपीक दऱ्या होत्या. पण मुलूखगिरी व लूटमार करणाऱ्या जंगली टोळ्यांपासून या दऱ्यांचें संरक्षण करण्याइतक्या त्या उंच नव्हत्या. यामुळें ग्रीक, यहुदी, रोमन, इराणी, तुर्क, रशियन वगैरे अनेक परकीय लुटारूंनीं एकामागून एक या दऱ्यांतील रहि-वाश्यांवर स्वाऱ्या केल्या व हा सर्व प्रदेश कित्येक वेळां ओसाड करून सोडला. शिकंदर व चेंगीझखान यांनीं आपल्या लष्करी टोळ्यांसह या पर्वतराजींतील प्रदेशांत प्रवेश केला व तैमूरच्या मोंगली टोळ्यांनीं तर सबंध जॉर्जिया प्रांतांत धुमाकूळ घातला. इराण्यांनीं व तुर्कांनीं या प्रदेशावर वारंवार हल्ले केले व अखिल जगांत सौंदर्याबद्दल नांवाजलेल्या तेथील सुंदरींचें जबरदस्तीनें हरण करून आपले जनानखाने शोभिवंत केले. यानंतर रशियन लोक या प्रदेशांत शिरले. त्यांनीं तेथल्या सुपीक जमिनी ताब्यांत घेतल्या, तेथील शेतकऱ्यांना आपले गुलाम बनविले व त्या प्रदेशांतील सर्व नैसर्गिक संपत्तीवर आपला ताबा बसविला.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जॉर्जियामध्यें युरोप व आशियामधील

अनेक राष्ट्रांच्या व जातींच्या लोकांची भरपूर वस्ती होती. रशियन साम्राज्यशाहीच्या सत्तेमुळें या प्रांतांतील रहिवाश्यांच्या परिस्थितींत अनेक स्थित्यंतरें घडून आलीं. या प्रदेशांतील खाणींतून रॉकेल, मँगानीझ, पेट्रोल नेण्याकरतां रेलवे रस्ते बांधण्यांत आल्यामुळें या प्रांताचें जगाच्या इतर भागाशीं दळणवळण सुरू झालें. तेथल्या सामाजिक चालीरीतींवर याचा साहजिकच परिणाम झाला. जॉर्जियाचा एकलकोंडेपणा त्यामुळें नष्ट झाला. त्याचें राष्ट्रीयत्व व्यापक बनलें. जॉर्जियांतील ग्रामीण संस्कृतीला यामुळें एक मोठा धक्का बसला. रेलवे रस्त्याबरोबरच देशांत अनेक कारखाने निघाले. खाणीचीं कामें सुरू झालीं. हजारों मजूर या कारखान्यांतून व खाणींतून राबूं लागले. त्यांच्यावर साहजिकच भांडवलशाहीचे जुल्म होऊं लागले. मोठ्या प्रमाणावर त्यांची पिळणूक होऊं लागली. खेडेगांवें ओस पडत चाललीं. शहरांतून कामगारांची वस्ती वाढली व कामगारांचा एक स्वतंत्र क्रांतिकारी वर्ग निर्माण झाला.

एकोणिसाव्या शतकांतील उत्तरार्धाचा हा काल होता. आर्मीनियन, तार्तार, तुर्क, रशियन, यहुदी वगैरे अनेक वंशांच्या लोकांनीं हा देश गजबजला होता. झारच्या साम्राज्यशाहीच्या चढाईबरोबर या देशावर रशियन संस्कृतीचीही सत्तीची चढाई चालू झाली होती. देशांतील पुराणी खेडूत संस्कृति नष्ट होत चालली होती व उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर एका नव्याच संस्कृतीचें पाऊल देशांत पडत चाललें होतें. औद्योगिक क्रांतीबरोबरच वाढीस लागलेल्या साम्यवादाचा युरोपांत जोरानें प्रसार होत चालला होता. थोडे दिवसच कां होईना, फ्रान्ससारख्या एका मोठ्या राष्ट्रामध्यें कामगारक्रांति होऊन कामगारांचें राज्य प्रस्थापित झालें होतें. यामुळें जॉर्जियामधील तरुण कामगारवर्गांत मार्क्सची जळजळीत शिकवणूक झपाट्यानें पेट घेत होती.

अशा वातावरणांत १८७९ च्या डिसेंबर २१ तारखेस गोरी येथें जोसेफ विसारियोनोव्हिच उजुगाशव्हिली ऊर्फ स्टॅलिन याचा जन्म झाला. त्याचा बाप धंद्यानें चांभार होता. आपल्या गांवीं धंदा चालेनासा पाहून जॉर्जियाची राजधानी टिफ्लिस येथील अधेलकेनॉफ बूट फॅक्टरींत तो नोकरीस राहिला. स्टॅलिनची आई कॅथराइन उजुगाशविली फार सुंदर होती. स्टॅलिनशिवाय तिचीं दुसरीं कोणतींच मुलें जगलीं नाहींत. तीं सर्व लहानपणींच वारलीं. टिफ्लिस येथें आल्यावर स्टॅलिनचा बाप वारला. त्या वेळीं स्टॅलिनचें वय अवघें दहा

वर्षांचें होतें. त्याच्या पालनपोषणाचा व शिक्षणाचा सर्व भार अर्थात् त्याच्या आईवरच पडला. बापजाद्यांचा धंदा मुलांनीं चालवावा व म्हातारपणीं आपल्या उपयोगीं पडावें अशी सर्व आईबापांची साहजिक इच्छा असते. पण कॅथराइनला आपला मुलगा बापाचा चांभाराचा धंदा शिकेल असें वाटलें नाहीं. तो शेती करील असेंही तिला वाटलें नाहीं. स्टॅलिनच्या डोळ्यांत कांहीं निराळेंच तेज तिला दिसलें.

टिफ्लिसला येण्यापूर्वीं गोरी येथें ग्रामर स्कूलमध्यें तो जात असे. या वेळीं त्याचें वय आठ वर्षांचें होतें. या ठिकाणीं तो लिहायला वाचायला शिकला. गोरी हें पांच हजार लोकवस्तीचें गांव होतें. हे सर्व लोक धंद्यानें शेतकरी होते पण टिफ्लिससारख्या शहरांतून मोठमोठे कारखाने निघूं लागल्याबरोबर या शेतकऱ्यांची ओढ तिकडे लागणें स्वाभाविक होतें. मुलांनीं पुढें आपलें नशीब काढावें असें ज्या आईबापांना वाटतें त्यांना हें खेडेगांवांतलें शिक्षण पुरेसें वाटणें शक्यच नव्हतें. यामुळें येथील मुलें टिफ्लिस येथें पुढील शिक्षणाकरतां जात. आपला मुलगा चार सामान्य मुलांसारखा नाहीं. तो कोणी तरी मोठा प्रसिद्ध पुरुष होणार असें कॅथेराइनला वाटे. इतर मुलें थोडीं मोठीं झालीं कीं, तीं शहरांतून जात. त्या ठिकाणीं कोणी तेथील दुय्यम व उच्च शिक्षणसंस्थांतून शिकत तर कोणी कारखान्यांतून उमेदवारी करून कुशल कारागीर बनत. आपल्या एकुलत्या एक राहिलेल्या मुलाला ही अशी संधि मिळाली पाहिजे. कॅथराइनची ही इच्छा तिच्या नवऱ्यानें गोरी गांव सोडून टिफ्लिसमध्यें एका कारखान्यांत नोकरी पतकरल्यामुळें साहजिकच पूर्ण झाली. टिफ्लिस येथें कारखान्यांत काम करूं लागल्यानंतर स्टॅलिनचा बाप व्हिसारियॉन याची कौटुंबिक स्थिति जास्तच खालावली. आणि या हालाच्या परिस्थितीलाच तो अकालीं बळी पडला. आपल्या बायकोला व लहान मुलाला दारिद्र्यावस्थेंत टाकूनच त्यानें इहलोकची यात्रा संपविली. "आपला बाप एक साधा प्रामाणिक कामगार होता व त्याची मिळकत फार नव्हती तरी तो मायाळू व प्रेमळ बाप होता" असें आपल्या बापासंबंधानें स्टॅलिन नेहमीं उद्गार काढीत असे.

स्टॅलिनच्या लहानपणांतील आख्यायिका व आठवणी फारशा प्रसिद्ध नाहींत. तो स्वभावानें हूड व धाडसी होता. वर्गांत व खेळण्याच्या मैदानांत त्याच्या शाळासोबत्यांवर त्याचा वचक असे. गरीब, भोळ्याभापड्या मुलांना तो

नेहमीं आपल्या पाठीशीं घाली. या त्याच्या गुणामुळें तो आपल्या सोबत्यांना प्रिय झाला होता व त्यांनीं सर्वांनीं मिळून प्रेमानें त्याचें नांव 'सो सो' असें ठेवलें होतें. त्याचे शाळासोबती या नांवानेंच त्याला हांका मारीत, त्याच्याबरोबर खेळण्यांत, गांवांतून फिरतांना द्वाडपणाचीं कृत्यें करण्यांत व त्याच्या आज्ञा पाळण्यांत त्यांना आनंद वाटत असे.

वयाच्या चौदाव्या वर्षी, १८९३ सालीं, स्टॅलिनला टिफ्लिस येथील सनातन धर्म विद्यालयांत घालण्यांत आलें. पतीच्या निधनानंतर कॅथेराइनची प्रापंचिक स्थिति अधिकच खालावली होती. दारिद्र्यावस्थेंत अशा रीतीनें दिवस काढणारी बाई आपल्या मुलाला कारखान्यांतील एकादें लहानमोठें काम शिकतां येईल व पुढें तो कारखान्यांतच कामाला लागेल अशी सोय करण्याच्या विचारांत पडली असती. पण मागें सांगितल्याप्रमाणें आपला मुलगा विद्वान व्हावा, ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चमधील पाद्री व्हावा अशी आकांक्षा तिनें आपल्या मनाशीं बाळगली होती. यामुळें स्टॅलिनला तिनें या शिक्षणसंस्थेंत घातलें व मुलाच्या धार्मिक उज्ज्वल भवितव्यासंबंधाच्या स्वप्नतरंगांत ती रंगून गेली. ख्रिश्चन धर्माचा त्यानें कसून अभ्यास करावा, ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चचा एक धर्मप्रचारक या नात्यानें काम करावें व जगाला सन्मार्ग दाखवावा, अशी कॅथराइनची इच्छा. ग्रीक चर्चचे आचार्य व धर्मप्रचारक निर्माण करण्याकरतांच हें विद्यालय उघडण्यांत आलें होतें. स्टॅलिन हुशार होता. अभ्यासू होता. थोड्याच दिवसांत विद्यालयांतील अध्यापकांची त्यानें मर्जी संपादली होती. पण स्टॅलिन पाद्री किंवा धर्मप्रचारक होणार नव्हता, तो क्रांतीचा प्रचारक होणार होता. या विद्यालयांत आल्यानंतर जे विद्यार्थी त्याचे सोबती झाले व ज्या वातावरणांत तो वावरूं लागला तें त्याच्या आईच्या इच्छेला पूरक असें नव्हतें. यामुळें वयाच्या चौदाव्या वर्षी या विद्यालयांत आलेल्या स्टॅलिनवर धर्मग्रंथांची व धर्मोपदेशाची छाप बसली नाहीं; तर रशियांतील त्या कालाला अनुकूल अशा समाजवादी क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचीच छाप त्याच्या मनावर बसली.

क्रांतीच्या पूर्वीच्या जमान्याचें असेंच आहे. या कालांत अगदीं अनपेक्षित स्थळीं या क्रांतीचीं बीजें रुजूं होत असलेलीं दिसून येतात. वास्तविक टिफ्लिस-मधील ही शाळा म्हणजे ख्रिश्चन धर्माचें शिक्षण देणारी पाठशाळा होती. ही

धर्मशिक्षणसंस्था म्हणजे पुराणमतवादी लोकांचा एक अड्डा होता. वरून दिसायला या सर्व गोष्टी तेथें होत्या. पण ऐन तारुण्यांत शिरूं पाहणाऱ्या स्टॅलिनला तेथें काय आढळलें? तेथील तरुण विद्यार्थ्यांशीं त्याचा जसजसा परिचय वाढूं लागला, तसतसें प्रगमनशील क्रांतीच्या विचारांनीं या तरुण विद्यार्थ्यांच्या मनांत घर केलें आहे असें त्याला आढळून आलें. या विद्यार्थ्यांचीं तेथें गुप्तमंडळें होतीं. यांतून रशियन राजकारणावर व मार्क्सवादावर जोर-जोराच्या चर्चा चालावयाच्या. नेमून दिलेला अभ्यास काळजीपूर्वक नियमितपणें करणाऱ्या व अध्यापकांच्या मर्जींतल्या स्टॅलिनवर या गुप्तमंडळांतील विद्यार्थ्यांचा साहजिकच विश्वास बसला नाहीं. पण या मंडळाकडे प्रचाराकरतां बाहेरून आलेलीं व या मंडळातर्फे प्रसिद्ध होत असलेलीं जीं गुप्त पत्रकें स्टॅलिनला वाचायला मिळत त्यांनीं त्याचें मन वेधून घेतलें. विचारांत होत असलेली क्रांति आचरणांतही दिसूं लागते. अर्थात् स्टॅलिनच्या विचारांत इष्ट तो बदल झालेला पाहून गुप्तमंडळांतील विद्यार्थ्यांचा स्टॅलिनवर हळूहळू विश्वास बसूं लागला व त्याच्या सहकार्याची ते अपेक्षा करूं लागले. स्टॅलिनला सुद्धां तेंच पाहिजे होतें. या प्रसंगासंबंधानें पुढें कित्येक वर्षांनीं हेन्री बारबूसीजवळ बोलतांना स्टॅलिननें सांगितलें कीं, “मी क्रांतिकारक चळवळींत माझ्या वयाच्या पंधराव्या वर्षीं सामील झालों. ट्रान्सकॉकेशियामधील रशियन मार्क्सवाद्यांच्या गुप्त-मंडळांतील सभासदांसंबंधानें आपलेपणाच्या व प्रेमाच्या भावना माझ्या मनांत वावरत होत्या. या मंडळांनीं माझ्यावर चांगलीच छाप बसविली होती व गुप्त वाङ्मयाबद्दल माझ्या मनांत अभिरुचि उत्पन्न केली होती.”

ट्रान्सकॉकेशियांतील गुप्त मंडळाचे धागेदोरे अर्थात् या टिफ्लिसमधील विद्यार्थिवर्गापर्यंत पोंचले होते. आणि या गुप्त हालचालीमुळें हें विद्यालय पोलिसांच्या डोळ्यांवर आलें होतें. झारच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनीं या विद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या हालचालींवर कडक देखरेख ठेवण्याचेही हुकूम दिले होते. गुप्त मंडळांतर्फे गुप्तपणें क्रांतिकारक विचारांचा फैलाव या भागांत चालू होता; आणि कांहीं प्रसंगीं तर उघडपणेंही आपल्या झारविरोधी भावना हे विद्यार्थी व्यक्त करीत असत. या झारविरोधी भावना इतक्या तीव्रतेला पोंचल्या होत्या कीं, विद्यालयाचे रेक्टर चुडणीयस्की यांनीं आपल्या एका व्याख्यानांत जॉर्जियांतील संस्कृतीसंबंधानें कांहीं तिरस्कारदर्शक टोमणे-

वंजा उद्‌गार काढले त्याबद्दल एका संतप्त झालेल्या विद्यार्थ्यानें त्या रेक्टरच्या काळजांत सुरा खुपसला. टिफ्लिस व त्याच्या आसपासच्या भागांतून कारखाने वाढत होते, कामगार वर्गाची वाढ होत होती आणि त्याबरोबर शहरांतील बुद्धिमान वर्गांत नव्यानव्या कल्पनांचा उदय होत होता. झारशाहीबद्दलच्या राजनिष्ठेऐवजीं व जुन्यापुराण्या जातीय अभिमानाऐवजीं, भौतिकवादी युरोपियन विचारवंतांच्या तत्त्वज्ञानविषयक विचारांचा पगडा त्यांच्या मनावर बसत चालला होता. या भागांतील उद्योगधंद्यांची वाढ इतकी झपाट्यानें चालू होती कीं, टिफ्लिसची रेल्वे लाइन कास्पियन समुद्रापर्यंत व तेथून बाटुमपर्यंत वाढविण्यांत आल्याबरोबर अवघ्या सहा महिन्यांत टिफ्लिसचा हा भाग विविध प्रकारच्या कारखान्यांनीं फुलून गेला. अशा या सर्व बाजूंनीं क्रांति घडून येत असलेल्या वातावरणांत स्टॅलिनचें शिक्षण चालू होतें. विद्यालयांतील शिक्षणाच्या या दोन वर्षांत स्टॅलिनच्या वृत्तींत ही क्रांति घडून आली. तो शाळेंत आल्यानंतर अध्यापकवर्गाची त्याच्यावर मर्जी होती. आतां तो त्यांच्या मर्जीतून पुरा उतरला. शाळेंतल्या धार्मिक धड्यावरील त्याचें लक्ष कमी झालें. राजकारण व अर्थशास्त्रविषयक पुस्तकें तो वाचूं लागला. गुप्तपणें चालू असलेल्या मार्क्सवादाच्या अभ्यासाकडे त्याचें लक्ष लागलें. भोंवतालीं वाढत असलेल्या उद्योगधंद्यांच्या वातावरणांत मार्क्सवादांतील विचारसरणीचा प्रत्यक्ष पडताळा त्याला पाहावयास मिळत असे. स्टॅलिनचें वय आतां सतरा वर्षांचें होतें. निरनिराळ्या भावनांनीं हृदय उचंबळून जावें. असें हें वय असतें. ऐन उमेदीचें हें वय असतें. मार्क्सवाद केवळ तत्त्वज्ञान सांगत नाहीं; तर ज्या प्रत्यक्ष अनुभवावरून याची उभारणी झालेली असते त्याचा समाजांत पडताळा पाहण्यास व त्यावरून काढलेले सिद्धांत प्रत्यक्ष अमलांत आणण्यास सांगत असतो. विचार व आचार यांची सांगड हा मार्क्सवादाचा मुख्य दंडक आहे. या दंडकाप्रमाणें स्टॅलिन नुसतीं पुस्तकें वाचूनच गप्प बसला नाहीं तर तो प्रत्यक्ष कामाला लागला. दजी व्लाडझे बंधू व जोर्डानिया या विद्यालयांतील माजी विद्यार्थ्यांच्या पुढारीपणाखालीं स्थापन झालेल्या जॉर्जियन सोशल डेमोक्रॅटिक पार्टीतर्फें तो कम्यूनिस्ट संघटनेच्या कामाला लागला. समाजवादाचा अभ्यास व चर्चा करण्याकरतां या मंडळींनीं विद्यार्थ्यांचीं अभ्यासमंडळें संघटित केलीं. मार्क्स व एंगल्स यांच्या लहान पुस्तकांचें भाषांतर करण्याचें

काम त्यांनीं हातीं घेतलें. पार्टीतर्फे त्यांनीं सुरू केलेलें हें पहिलें काम होय. स्टॅलिनला आज जी योग्यता प्राप्त झाली आहे त्यापूर्वीच त्याच्या कांहीं सोबत्यांनीं ज्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत त्यावरून त्याची दृढनिश्चयी वृत्ति, काम करण्याची त्याच्या अंगची तडफ व एकाद्या बिकट प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून तावडतोब निर्णयाला येण्याची त्याची प्रशंसनीय हातोटी इत्यादि गुणांचीं बीजें या वयांतच त्याच्या स्वभावांत वसत होतीं असें आढळून येतें. १९२४ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्याच्या आठवणीच्या पुस्तकांत त्याच्या एका शालेय सोबत्यानें पुढील आठवण नमूद केली आहे. स्टॅलिन एकदां आपल्या एका सोबत्याच्या खांद्यावर बसून कर्कश आवाजांत "झा स्टॉल" "झा स्टॉल" "मी पोलाद आहे" असें म्हणत त्याला पुढें चालण्याचा हुकूम देत होता. स्टॅलिनचा हा मित्र व त्याच्या खांद्यावर बसलेला स्टॅलिन हा देखावा माझ्या डोळ्यांपुढें अद्याप दिसतो असें त्यानें या आठवणींत म्हटलें आहे. यावरून एवढ्या लहान वयांतसुद्धां स्टॅलिनला आपल्या अंगच्या सामर्थ्याबद्दल आत्मविश्वास वाटत होता व पुढल्या आयुष्यांत जें कार्य आपण हातीं घेणार त्याबद्दल त्याच्या मनांत दृढ श्रद्धा वाढत होती असें अनुमान काढल्यास त्यांत कांहींच वावगें नाहीं.

हायस्कूलच्या विद्यार्थिवर्गांत स्टॅलिननें व त्याच्या दोस्तांनीं चालविलेल्या चळवळी तेथल्या प्रतिगामी वृत्तीच्या अध्यापकांना व शिक्षकांना आवडणें शक्य नव्हतें. ऑर्थोडॉक्स चर्चच्या विद्यमानें चाललेल्या या विद्यालयांत अशा प्रकारच्या चळवळीं चालू देणें शक्य तरी कसें असणार? विद्यालयाच्या रेक्टरनें स्टॅलिनला याबद्दल शांतपणें सावधगिरीची सूचना देऊन पाहिलें. स्टॅलिनची ही वागणूक अत्यंत असमाधानकारक आहे, यामुळें शाळेवरही संकट आल्याशिवाय राहणार नाहीं असेंही त्यांनीं सांगून पाहिलें. स्टॅलिननें ही सूचना शांतपणें ऐकून घेतली. या सूचनेवर त्यानें आपलें कोणत्याही प्रकारचें मत व्यक्त केलें नाहीं; पण त्याबरोबरच आपलें गुप्त पत्रकांचा प्रसार करण्याचें व विद्यार्थी व कामगार संघटित करण्याचें काम तसेंच चालू ठेवण्याचें कामीं त्यानें हयगयही केली नाहीं. टिफ्लिसमधील कारखान्यांतील कामगारांत व रेल्वेवरील कामगारांत तो जाऊं येऊं लागला. त्यांना वर्गजागृत करण्याचा तो प्रयत्न करूं लागला. संघटनेचें व ऐक्याचें महत्त्व त्यांना तो समजावून

देऊं लागला. कामगार-चळवळीसंबंधाचीं गुप्त पत्रकें तो त्यांना वाचून दाखवूं लागला. त्यांचीं रोजचीं गाऱ्हाणीं समजून घेऊन तीं दूर करण्याचा मार्ग तो त्यांना सांगूं लागला. आणि या कारखान्यांतून व रेल्वेवर होणाऱ्या कामगारांच्या संपांतून तो भाग घेऊं लागला. कामगारांच्या सुखदुःखांशीं तो समरस झाला. कामगारांना तो आपलासा वाटूं लागला. कामगारवर्गासंबंधानें त्याला वाटणारी कळकळ, संघटनेच्या कामीं दिसून आलेली त्याच्या अंगची तडफ, अडचणींतून धीमेपणानें अचूक मार्ग काढण्याची त्याची हातोटी यामुळें कामगारवर्गांत तो लोकप्रिय झाला व त्यांचा आवडता पुढारी बनला. स्टॅलिन-च्या या सर्व हालचाली अर्थातच पोलिसच्या डोळ्यांत खुपूं लागल्या. ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चच्या धार्मिक विद्यालयांत शिकणारे स्टॅलिन व त्याचे दोस्त विद्यार्थी यांनीं असल्या चळवळी चालवाव्या ही गोष्ट पोलिसला मुळींच खपणारी नव्हती. त्यांनीं या सर्व हालचालींचा सविस्तर रिपोर्ट विद्यालयाच्या अधिकाऱ्यांकडे पाठविला. या रिपोर्टामागून लवकरच झडतीचें वारंट घेऊन पोलीस स्टॅलिनच्या राहत्या खोलींत शिरले. ताबडतोब झटापटीनें केलेल्या झडतीच्या हल्ल्यांत पोलिसला हवें होतें तें सर्व त्याच्या खोलींत सांपडलें. नॅचरल सायन्स, समाजशास्त्र, कामगारवर्गांची चळवळ या विषयांवरील पुस्तकें, खूप पत्रकें व दुसरी प्रचाराची बरीच साधनसामुग्री पोलिसला सांपडली.

विद्यालयांतील प्रोफेसरांनीं व शिक्षकांनीं स्टॅलिनला वेळोवेळीं दिलेल्या वॉर्निंगचा कांहीं उपयोग झाला नाहीं. स्टॅलिननें जो राजकीय चळवळीचा मार्ग आपल्या जीवनाकरतां आंखून ठेवला होता, त्यापासून त्याला परावृत्त करण्यांत अर्थ नाहीं, हें त्यांना कळून चुकलें होतें. आतां ते त्या भानगडींत पडले नाहींत. स्टॅलिनचा दृढनिश्चयी स्वभाव, हातीं घेतलेल्या कार्याबद्दल त्याला वाटणारी श्रद्धा, संकटांना तोंड देण्याची त्याची तयारी, त्याची चिकाटी इत्यादि त्याच्या अंगांतले गुण त्यांच्या नजरेस आले होते. स्टॅलिननें पतकरलेला मार्ग त्यांना मुळींसुद्धां पसंत नव्हता तरी त्याच्या अंगच्या गुणांची त्यांना पूर्ण जाणीव झालेली होती. तेव्हां त्याला त्याच्या नियोजित कार्यापासून परावृत्त करण्याच्या खटपटींत न पडतां त्यांनीं त्याला शाळा सोडण्यास सांगितलें. स्टॅलिनला शाळेंतून हाकून लावण्यांत आलें यासंबंधानें खात्रीलायक पुरावा कोठें मिळत नाहीं. पण ज्या प्रकारच्या शिक्षणसंस्थेंत तो शिकत

होता त्या संस्थेला कधींही मान्य होणार नाहींत अशा ज्या चळवळी तो करीत होता त्या सर्व लक्षांत घेतल्या म्हणजे, त्या संस्थेच्या चालकांनीं त्याच्या बाबतींत जो मार्ग पत्करला तो साहजिक होता असें म्हणतां येईल. पण त्याची आई कॅथेराइन इला मात्र आपल्या आवडत्या मुलाला शाळेंतून हाकून लावण्यांत आलें, असें लोकांनीं म्हटलेलें खपलें नाहीं, असें दिसतें. १९३७ सालीं तिच्या मरण्यापूर्वी एका अमेरिकन पत्रकार प्रतिनिधीपाशीं यासंबंधानें बोलतांना तिनें सांगितलें कीं, माझ्या मुलाला शाळेंतून मुळींच हांकून दिलें नाहीं. मीं स्वतः होऊन त्याला शाळा सोडून देण्यास सांगितलें. तो नेहमींच एक सुधा मुलगा होता. तो कधीं कोणाच्या खोड्या काढीत नसे. वयाच्या आठव्या वर्षीं तो शाळेंत गेला. तो कसोशीनें अभ्यास करी. सतत कांहीं तरी वाचावें व बोलत राहावें असा त्याचा स्वभाव होता. त्याला मीं शिक्षा केलेली कधीं आठवत नाहीं. त्याला शाळेंतून हांकून लावण्यांत आलें नाहीं. त्याची प्रकृति बिघडल्यामुळें मीं त्याला शाळेंतून काढून घरीं आणलें. त्याच्या मनांत शाळा सोडायचें नव्हतें. मींच त्याला शाळेंतून काढलें; कारण तो माझा एकुलता एक मुलगा होता.” त्याच्या आईला त्याच्यासंबंधानें खरोखरीच भय वाटत होतें. तो कोठें तरी नेहमीं बाहेर जावयाचा; पण तो कोठें गेला हें तिला कळायचें नाहीं. त्याच्या गुप्त हालचाली, त्याचे विचित्र सोबती, बेकायदा वाङ्मय लपवून ठेवण्याची त्याची खटपट, या सर्व गोष्टी कांहीं बऱ्या नाहींत, आपल्या मुलावर यामुळें कांहीं तरी संकट कोसळेल, असें तिला वाटे. घरीं असतांना मात्र तो कधींही राजकारणावर बोलत नसे.

कांहीं का असेना, १८९९ सालीं म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षीं स्टॅलिनला शाळेला रामराम ठोकावा लागला. शाळेंतून बाहेर पडल्यानंतर एका क्षणाचाही विलंब न लावतां तो आपल्या कामगारसोबत्यांकडे गेला व त्यांच्या संघटनेच्या कार्याला त्यानें वाहून घतलें. याप्रमाणें रशियांतील कामगारचळवळीला लेनिननंतर एक अत्यंत लायक व कर्तृत्ववान् रंगरूट मिळाला. शाळा सोडल्यानंतर त्या वेळच्या पुष्कळ तरुणांप्रमाणें त्यानें कांहीं शिकवण्या धरल्या. दुकानांतून जमाखर्च लिहून देण्याचें कामही त्यानें केलें. दिवसांतील कांहीं तास तो हीं कामें करी व बाकीचा सर्व वेळ नवीन पत्करलेल्या आपल्या क्रांतिसंघटनेच्या कामांत तो घालवूं लागला. या दिवसापासून स्टॅलिन जॉर्जियन

राहिला नाहीं; तर तो रशियन बनला. एका व्यापक दृष्टीनें स्टॅलिन रशियाचा व जगाचा झाला तरी आपल्या प्रांतिक गुणांशीं तो पारखा झाला नाहीं. जॉर्जियानें स्टॅलिनच्या स्वभावांत पोलादी कणखरपणा निर्माण केला होता. त्याच्या देशाचा धीमेपणा स्टॅलिनच्या स्वभावांत होता. आपल्यावर होणारे जुलूम व अन्याय शांतपणें सहन करायचे पण त्याचा आपल्याला कधींही विसर पडूं द्यावयाचा नाहीं. शत्रूचा प्रतिकार तर करायचा; पण उघड उघड त्याच्याशीं प्रत्यक्ष लढायचें नाहीं, प्रसंगीं माघार घ्यावयाची, स्वस्थ बसूनही राहावयाचें पण शत्रूवर तडाखा मारण्याची योग्य संधि जाणून त्याला झोडपून काढायचें, हा जॉर्जियांतील लोकांचा स्वभाव स्टॅलिनच्या अंगींही भिनला होता.

# अजब जॉर्जियन २

१८९८ सालीं टिफ्लिस सोशल डेमोक्रॅटिक मंडळाचा स्टॅलिन सभासद झाला व त्याच्यातर्फे चालू असलेल्या प्रचारकार्यांत अगदीं नियमितपणें भाग घेऊं लागला. देशाच्या मुख्य मुख्य शहरांतून अशा प्रकारचीं मंडळें निघालीं होतीं. याच वर्षीं मार्क्सवादी गुप्त मंडळाचे नऊ प्रतिनिधि मिन्स्क येथें जमा झाले व त्यांनीं एक गुप्त परिषद् भरविली. हीच रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीची पहिली कॉंग्रेस होय. या कॉंग्रेसला बोल्शेव्हिक चळवळीच्या मातृस्थानीं मानण्यांत येतें. या कॉंग्रेसतर्फे एक मॅनिफेस्टो प्रसिद्ध करण्यांत आला. "पन्नास वर्षांपूर्वीं १८४८ च्या क्रांतीचें वादळ युरोपभर पसरलें होतें" या शब्दांनीं या मॅनिफेस्टोचा आरंभ करण्यांत आला होता. या मॅनिफेस्टोनें एक नवा व रशियांतील त्या वेळच्या परिस्थितीला अनुलक्षून इशारा दिला होता. क्रांतिकारक चळवळे व कामगार यांच्यांतील दुवा जोडण्याचें काम या मॅनिफेस्टोनें केलें. वर्गजागृतीचें रहस्य सांगणारा व कामगारांना संघटित होण्यास स्फूर्ति देणारा असा हा संदेश होता. रेल्वेवरील कामगारांना व तंबाखू-च्या व कातड्याच्या कारखान्यांतील कामगारांना स्टॅलिननें हा संदेश पोंच-विला. १९०० सालीं 'मे-दिन' साजरा करण्याकरतां टिफ्लिस रेल्वेवरील काम-गारांनीं संप केला. एक वर्षानंतर याच दिवसाच्या मिरवणुकीला पोलिसनें अडथळा केला व कोसॅक घोडेस्वारांनीं ती उधळून लावली. पोलिसनें सोसोच्या खोलीची झडती घेतली. कामगारांतील समाजवादी चळवळ ज्याप्रमाणें वाढूं लागली त्याबरोबर झारशाहीचा तिला होणारा विरोधहि वाढूं लागला. चळ-वळीच्या वाढत्या कामामुळें स्टॅलिनला कारकुनीची नोकरी सोडावी लागली व तो चोवीस तास चळवळीचें काम करणारा धंदेवाईक क्रांतिकारी बनला. टिफ्लिस येथील समाजवादी चळवळीमुळें संघटित क्रांतिकारी कामगारचळ-वळींशीं स्टॅलिनचा संबंध घडून आला होता. या क्रांतिकारी कार्यासंबंधानें १९२६ सालीं टिफ्लिस येथें झालेल्या एका भाषणांत स्टॅलिन म्हणाला कीं,

"याच ठिकाणीं मला क्रांतिमंत्राची पहिली दीक्षा मिळाली. या माझ्या दोस्तांमध्येंच मी क्रांतीचा उमेदवार झालों. टिफ्लिसचे कामगार हेच माझे या कामांतील पहिले गुरु होते. टिफ्लिस वर्कशॉपच्या पायोनियर कामगारांचा मी विद्यार्थी होतों व अद्यापिही आहे." या उमेदवारीच्या काळांतच सोसोनें क्रांतीच्या कामगारसंघटनेची व केवळ एक कला म्हणून रिव्हॉल्व्हर चालविण्याची व बॉंब हाताळण्याची कलाही त्यानें साध्य केली. याप्रमाणें क्रांति हा आपला धंदा बनवून स्टॅलिन आपल्या दोस्तांसह कामगारसंघटनेच्या कामाला लागला.

कामगारांच्या राजकीय चळवळी औद्योगिक क्रांतीनंतर युरोपांत जोरानें सुरू झाल्या होत्या. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या सालांतून या क्रांतिकारी चळवळीचें स्वरूप रशियांत जितकें स्पष्टपणें उघडकीस आलें तितकें कोठेंच आलें नाहीं. औद्योगिक क्रांतीनंतर रशियांत झपाट्यानें कारखान्यांची वाढ झाली. या कारखान्यांतून काम करणाऱ्या अडीच लाख कामगारांपैकीं निम्याहून अधिक भूदास होते. भूदास जसे जमिनीला बिलगलेले असतात त्याप्रमाणें हे भूदास कारखान्यांना बिलगलेले होते. हे कामगार १६ तास कारखान्यांत काम करीत. त्यांना कोणतेही कायदेशीर व सामाजिक हक्क नसत; यामुळे कामगारांच्या या निकृष्ट स्थितीचे परिणाम साहजिकच दिसून आले. इतर देशांतल्याप्रमाणें रशियांतही या क्रांतीच्या प्रारंभीच्या दिवसांत भराभर संप झाले व यंत्रांची मोडतोड करण्याचेही प्रकार झाले. झारच्या पोलिसांनीं व कोसॅक स्वारांनीं हे सर्व संप व दंगे भयंकर अत्याचार करून मोडून टाकले. मॉस्को, काझान, बाटुम, व्होरोनेझ हीं शहरें तर झारच्या दडपशाहीचीं केंद्रस्थानें बनलीं होतीं. रशियन कामगारवर्गाच्या भवितव्यावर परिणाम घडवून आणणारी एक महत्त्वाची घटना १८६१ सालीं घडून आली. ती घटना म्हणजे झारनें भूदास पद्धति नष्ट केली. याचा ताबडतोबीचा परिणाम हा झाला कीं, पूर्वी कधींही झाली नव्हती इतकी गर्दी कामगारांनीं शहरांतून व कारखान्यांतून केली. हे सर्व कामगार खेड्यापाड्यांतून आले होते. या वेळच्या अवघ्या एका पिढींत कामगारांची ही संख्या सातपटीनें वाढली. खेड्यांतील लोकसंख्या कमी झाली. हजारों एकर जमीन पड पडली आणि या जमिनीचे मालक असलेल्या सरदारांनीं मेंढ्या व घोडे यांना चारण्याकरतां त्यांचीं गवतांचीं कुरणें बनविलीं.

एका रात्रींत सर्वत्र उलथापालथ होऊन जावी त्याप्रमाणें रशियामध्यें कामगारवर्ग मोठ्या प्रमाणांत अस्तित्वांत आला व त्यानें आपल्याबरोबर रशियन शेतकऱ्यांत वसत असलेले तडफ, आवेश, प्रतिकारवृत्ति, चिकाटी, सोशिकपणा हे गुण बरोबर आणले. १८६१ ते १९०५ पर्यंतच्या चव्वेचाळीस वर्षांत रशियन कामगारांनीं दोन हजारांवर संप, दंगे, बंडाचे उठाव ठिकठिकाणीं केले असें पोक्रोव्हस्कीनें म्हटलें आहे. रशियन कामगारवर्गाची वृत्ति स्टॅलिनला अर्थातच पसंत होती. झारच्या सत्तेविरुद्ध स्टॅंकारेझिन व पुगाचेव्ह यांनीं शेतकऱ्यांच्या बंडांचे उठाव केले. हीं बंडें पुढें अयशस्वी ठरलीं. हा सर्व इतिहास स्टॅलिननें आपल्या विद्यार्थिदशेंत वाचला होता व त्या वेळीं या बंडांबद्दल आपली मनापासूनची पसंती आपल्या सोबत्यांपाशीं त्यानें व्यक्त केली होती. समाजाच्या खालच्या वर्गांत स्टॅलिनचा जन्म झाला होता, त्यामुळें झारशाहीच्या जुलमाखालीं रखडणाऱ्या रशियांतील सामान्य जनतेच्या मनोभावनांची जाणीव त्याला साहजिकपणेंच झाली होती. आणि या जाणिवेमुळेंच स्टॅलिन इतरांपेक्षां जास्त कट्टर समाजवादी बनला होता. पुढें तीस वर्षांनंतर एका प्रसंगीं आपण सोशालिस्ट कसें झालों हें आपल्या मित्रांपाशीं सांगत असतांना स्टॅलिन म्हणाला, “कोणत्या क्रमानें मी समाजवादी झालों हें सांगणें कठीण आहे. चालू परिस्थिति विपरीत, सदोष व अन्यायाची आहे अशी प्रथम माणसाची खात्री होते. ही परिस्थिति सुधारण्याकरितां आपल्या हातून होईल तितकी कसोशी करण्याचा माणूस निश्चय करतो... रशियन भांडवलशाही सर्व जगांतील भांडवलशाह्यांपेक्षां अत्यंत राक्षसी व क्रूर आहे. झारचें सरकारसुद्धां अत्यंत लाचखाऊ, दुष्ट व नालायक आहे... मी मार्क्सवादी झालों याला कारण माझी सामाजिक परिस्थिति. माझा बाप एका बुटाच्या कारखान्यांत मजूर होता. आणि आईसुद्धां मजुरीचें काम करीत असे आणि माझ्या भोंवतालच्या वातावरणांत तर बंडाचें तुफान उठलें होतें. माझ्या भोंवतालचे हे लोक समाजदृष्ट्या माझ्या आईबापाच्याच वर्गांतले होते.” समाजांत चालू असलेल्या बेबंदशाहीमुळें व झारच्या अधिकाऱ्यांनीं चालविलेल्या दडपशाहीमुळें देशांतील पुरोगामी मताचे लोक या परिस्थितीविरुद्ध टाहो फोडीत उठले. एकोणिसाव्या शतकांतील रशियांतील प्रथितनाम साहित्यिक पुष्किन, टॉलस्टॉय, गोगोल, दोस्तोव्हस्की वगैरेनीं झारच्या सरकारचीं दुष्कृत्यें जगाच्या

चव्हाट्यावर मांडलीं व आपल्याला तिरस्करणीय वाटलेल्या समाजपद्धतीचा नाश करण्याकरतां त्यांनीं आपल्या सर्व ग्रंथांतून गुप्त प्रचार केला.

झारशाहीच्या जुलमाला लोक कंटाळले होते. एकतंत्री झारशाहींत भांडवलशाहीची भर पडली होती. रशियांत उद्योगधंद्यांची व कारखान्यांची वाढ झाली. पण या औद्योगिक वाढीचीं सर्व सूत्रें झारच्या व त्याच्या सरदारांच्या हातांत होतीं. कोणताही कारखाना काढायचा तर प्रत्यक्ष झारचा हुकूम लागत होता. रशियांतील भांडवलशाही व झारशाही एकरूप होती. समाजांतील दलित वर्गावर जुलूम झाला तर नांवाला का होईना, पण तिऱ्हाइताची भूमिका घेऊन या जुलमाची चौकशी करणारें सरकारसुद्धां रशियांत नव्हतें. प्रत्यक्ष झार व त्याचे सरदार हेच भांडवलवाले बनले होते; त्यामुळें दाद घेणारी अशी वरिष्ठ संस्थाच अस्तित्वांत न राहिल्यामुळें कामगार व शेतकरी जनतेवरील जुलूम पराकाष्ठेला पोंचला होता. या जुलमाला तोंड फोडण्याची सोय नव्हती. देशभर गुप्त पोलिसांचें जाळें पसरून ठेवलेलें असल्यामुळें थोडेंसें कोठें खुट्ट झालें कीं, त्याची मुस्कटदाबी करण्यांत येत होती. रशियांत युरोपांतील इतर देशांप्रमाणें भांडवलशाहीचा प्रसार झाला व त्याबरोबरच एक स्वतंत्र कामगारवर्गही निर्माण झाला. दलित जनतेनें आपल्यावर होणाऱ्या अत्याचारांचा व जुलमांचा प्रतिकार करण्यास सुरुवात केली. विद्यार्थिवर्गाचा या चळवळीला अर्थातच पाठिंबा मिळाला. सनदशीर चळवळ अशी कांहीं चीजच रशियांत अस्तित्वांत नव्हती. जनतेच्या सर्व चळवळी तिच्या पुढाऱ्यांना अत्यंत गुप्त रीतीनें चालवाव्या लागत. या चळवळी चालविणारे अनेक पक्ष व गट देशांत निर्माण झाले. हे पक्ष आपापल्या मागण्या सरकारला कळवीत व आपले स्वतंत्र कार्यक्रमही लोकांपुढें मांडीत. विद्यार्थ्यांचे स्वतंत्र गटही या चळवळींत सामील झालेले होते. शक्तीचा प्रतिकार शक्तीनें करावयाचा, जबरदस्तीला जबरदस्तीनें तोंड द्यावयाचें असेंही यांपैकीं कांहीं पक्षांचें ध्येय होतें. फटके देण्याऱ्या व फांसावर लटकावणाऱ्या पोलिसांचा समाचार विद्यार्थी घरगुती तयार केलेल्या बॉंबनीं व सुऱ्यांनीं घेत होते. स्टॅलिन बाकू व टिफ्लिस येथें कामगारसंघटनेचें काम करीत असतां रशियांत अनेक पक्षोपपक्षांचे कार्यक्रम व जाहीरनामे प्रसिद्ध होत होते. कित्येक नवीन पक्ष निघत होते व कित्येक नामशेष होत होते. या सर्व घोटाळ्यांत दोन

मुख्य विचारप्रवाह प्रकटपणें दिसून येत होते; आणि रशियांतील या वेळच्या क्रांतिकारकांना या ना त्या विचारसरणींत सामील झाल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. यांपैकीं नारोदनाया व्होलया "लोकेच्छा" हा पक्ष किसानांच्या अराजक चळवळींतून उदयास आला होता. भांडवलशाहीच्या प्रसारानें देशाची झालेली दुःस्थिति पुन्हा आपण खेड्यांकडे वळल्याशिवाय सुधारणार नाहीं. प्राचीन काळची पंचाइतपद्धति पुन्हा अस्तित्वांत आणावी, शेतकरीवर्गाला जमिनी वांटून देण्यांत याव्या, जमिनी हातच्या गेल्यामुळें शहरांतून गेलेल्या कामगारांना पुन्हा जमिनी मिळतील तर ते खेड्यांतून पहिल्याप्रमाणें वस्ती करून राहण्यास तयार होतील. समाजांत सुख व शांति प्रस्थापित करण्याचा हाच एक मार्ग आहे, अशी या पक्षाची विचारसरणी होती आणि सरकारी अधिकारीवर्गांत दहशत उत्पन्न करून आपला हा कार्यक्रम पार पाडण्याचा त्याचा मार्ग होता. पक्षांतील सभासदांचे व विद्यार्थ्यांचे गट बनवायचे, कडक शिस्तीखालीं त्यांना लढाऊ कामाचें शिक्षण द्यावयाचें, आणि एखादा पोलिस अधिकारी बेफामपणें वागूं लागला, कीं त्याची कत्तल करण्याचा शांतपणें हुकूम द्यावयाचा, अशी या पक्षाची कामाची पद्धति होती. नुसते पोलिस अधिकारीच काय, तर वेळोवेळीं प्रत्यक्ष झारही या पक्षाच्या रोषास बळी म्हणून ठरविले जात. या ठरविलेल्या बळींना कंठस्नान घालण्याकरतां अपयशाची पर्वा न करतां प्रयत्न होत. थिएटरें, सार्वजनिक जागा असल्या ठिकाणीं त्यांच्यावर हल्ले करण्यांत येत. प्रांतिक गव्हर्नरांच्या गाड्यांवर बॉंब टाकण्यांत येत आणि या सर्व कृत्यांबद्दल आपण जबाबदार आहों असें हा "लोकेच्छा" पक्ष धीटपणें जाहीर करीत असे. अशा प्रकारचे प्रयत्न झाले म्हणजे प्रतिक्रिया म्हणून सरकारतर्फेंही जनतेवर आणखी भयंकर अत्याचार होत. या पक्षांतील लोकांनीं लहान मोठ्या अधिकाऱ्यांच्या याप्रमाणें कत्तली केल्या व एकदां तर शाही रथावर बॉंब टाकून दुसरा अलेक्झांडर व त्याचे मंत्री यांचेही खून केले. याचा सूड म्हणून सरकारतर्फें शेंकडों लोकांना फासांवर चढविण्यांत आलें व कडक देखरेखीखालीं हजारोंना सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें. पण दडपशाहीमुळें ही चळवळ थांबली नाहीं. १८८७ सालीं तिसऱ्या झार अलेक्झांडरला ठार करण्याचा पुन्हा प्रयत्न झाला पण तो अयशस्वी ठरला. यानंतर झालेल्या दडपशाहींत लेनिनचा वडील भाऊ फांशी दिला गेला. या प्रसंगानंतर "हा

आपला मार्ग नव्हे" असें आपल्या सोबत्यांना लेनिननें सांगितलें त्याचप्रमाणें नोहा, जॉर्डानिया व कॉरनाटोव्हस्की यांच्यासारख्या मार्क्सवादी नेत्यांच्या देखरेखीखालीं बाकूच्या रेल्वे शेडमध्यें व बाटुमच्या तेलाच्या खाणींवर कामगारसंघटनेचें व जागृतीचें कार्य करीत असलेल्या स्टॅलिननेंही हा मार्ग कुचकामाचा ठरविला. मार्क्सवादी क्रांतिकारकांतील नवशिक्या उमेदवारांप्रमाणें गुप्त वाङ्मयाचा प्रसार करणें, संपाच्या मिरवणुकांची व्यवस्था करणें, त्यांतून भाग घेणें, पिकेटिंग करणें, गुप्त पोलिसांच्या हालचालीवर नजर ठेवणें इत्यादि एक ना दोन अनेक कामें तो करीत होता. म्हणूनच या दिवसांसंबंधानें बोलतांना "क्रांतीच्या दिवाणखान्याचा मी झाडूवाला होतों" असें त्यानें म्हटलें आहे. १८९३ सालीं जॉर्जियामध्यें प्रस्थापित झालेल्या मार्क्सिस्ट सोशल डेमोक्रॅटिक संस्थेचे सभासद मार्क्सवादाला आर्थिक सुधारणावादाचें (economism) स्वरूप देऊन वर्गकलहाच्या तत्त्वाला बाजूला ठेवूं पाहत होते. किरकोळ मागण्या मिळाल्या कीं, तोच आपला विजय मानीत होते. संकुचित "जॉर्जियन" राष्ट्रवादाचा ते पुरस्कार करूं लागले होते. आपल्या संस्थेला कामगारवर्गाची लढाऊ संघटना बनविण्याचा त्यांचा विचार नव्हता. क्रांतिकार्याची तयारी या दृष्टीनें कामगारांना शिक्षण देण्याचें व त्यांच्यांत जागृति करण्याचें काम ते करीत नव्हते. किंवा कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीय भावना कामगारांच्या मनांत निर्माण व्हावी व त्यांना तशी शिकवण द्यावी असेंहि त्यांना वाटत नव्हतें. पण स्टॅलिननें आपला मार्ग निश्चित केल्यानंतर तो नव्या जोमानें या संघटनेच्या कार्यास लागला. त्यानें या संस्थेंत एक मार्क्सवादी गट तयार केला. या कालांत झाडूवाल्याप्रमाणें या संस्थेंत आपण राबत होतों किंवा आपण कामगारसंघटनेंत उमेदवारी करीत होतों असें स्टॅलिननें आपल्या स्वतःविषयीं म्हटलें असलें तरी वस्तुस्थिति अशी होती कीं, या इतक्या थोड्या दिवसांच्या कामानें तो कामगारांना प्रिय झाला होता व त्याच्या पुढारीपणाखालीं चळवळ करण्यास त्या भागांतील कामगार तयार झाले होते.

१९०० सालच्या डिसेंबरमध्यें 'इस्क्रा' पत्राचा पहिला अंक बाहेर पडला. लेनिनच्या या पत्रांतून कामगारवर्गाच्या चळवळीचे हेतु व ध्येयें यासंबंधानें चर्चा होऊं लागली. इस्क्राच्या लेखांतील विचारसरणी स्टॅलिनला नवीन नव्हती. मार्क्स-वाङ्मयाच्या वाचनानें व प्रत्यक्ष कामाच्या अनुभवानें स्टॅलिननें

आपलीं जीं मतें ठरविलीं होतीं त्यालाच या विचारसरणीनें पुष्टि मिळाली होती. यामुळें टिफ्लिसमध्यें स्टॅलिननें जो एक लढाऊ कामगारांचा गट तयार केला होता ते लोक लेनिनच्या इस्क्राच्या निशाणाखालीं जमून काम करण्यास तेव्हांच तयार झाले व त्यांच्यांत वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या धोरणाप्रमाणें तें आपापलीं कामें करूं लागले. याप्रमाणें या दिवसांतच लेनिनच्या **धूम-धडाक्याच्या गाड्याला** स्टॅलिननें आपला गाडा जोडून दिला.

स्टॅलिन-लेनिन भेट प्रत्यक्षपणें १९०५ च्या अखेरीस झाली. पण त्यापूर्वीं १९०३ मध्यें पत्रद्वारा स्टॅलिननें लेनिनशीं आपला परिचय करून घेतला होता. स्टॅलिन व लेनिनमधील हा पत्रव्यवहार १९०३ अखेरीस झाला. पण या प्रसंगाची हकीकत देण्यापूर्वीं जॉर्जियांतील कामगारचळवळ, या चळवळी हाणून पाडण्याचें झारच्या पोलिसांचें दडपशाहीचें धोरण, रशियन गुप्त पोलिसांचा कामगार-कार्यकर्त्यांच्या मागें लागलेला ससेमिरा आणि या सर्वांवर ताण करून आपलें काम चालविण्याची स्टॅलिनची हातोटी व त्याचें स्वभाववैशिष्ट्य याची हकीकत सांगणें जरूर आहे.

१९०० व १९०१ या दोन सालांत टिफ्लिसच्या सर्व भागांतून आर्थिक संपाची लाट उसळली होती. मे-दिनाच्या समारंभानिमित्त टिफ्लिस येथें कामगारांच्या प्रचंड मिरवणुकी निघत असत; व तो दिन थाटानें साजरा करण्यांत येत असे. पण १९०१ सालीं या दिवशीं निघालेली ही मिरवणूक पोलिसांनीं उधळून लावली इतकेंच नव्हे, तर कांहीं प्रमुख कार्यकर्त्यांना पोलिसनें गिरफदार केलें. याच सालीं स्टॅलिनच्या पुढाकारानें 'ब्रॅडझोला' (लढा) पत्र काढण्यांत आलें. हें पत्र बाकू येथें गुप्त रीतीनें छापलें जात असे. 'इस्क्रा' पत्राच्या धोरणाचा पुरस्कार करण्याकरतां व जॉर्जियामधील संधिसाधूंचें धोरण हाणून पाडण्याकरतांच हें पत्र काढण्यांत आलें होतें. मार्क्सवादाच्या प्रचाराचें कार्य या पत्रामार्फत करण्यांत येत होतें. टिफ्लिसमधील सर्व कामगारचळवळींत स्टॅलिनच प्रमुखपणें काम करतो असें पोलिसला आढळून आल्यामुळें, त्याच्या खोलीवर एकाएकीं छापा घालून तिची झडती घेण्यांत आली. या झडतींत पोलिसला कांहीं सांपडलें नाहीं; पण या वेळेपासून स्टॅलिननें आपलीं सर्व कामे गुप्त रीतीनें करण्याचें ठरविलें. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, या वेळेपासून तों तहत् १९१७ च्या रशियांतील क्रांतीपर्यंत आरंभीचे कांहीं विशिष्ट प्रसंग सोडले तर

त्याला गुप्त रीतीनेंच राहावें लागलें. एवढ्या कालांत त्याला अनेकदां पकडण्यांत आलें, कैदेंत टाकण्यांत आलें, हद्दपार करण्यांत आलें. पण कोणतीच कैदेची किंवा हद्दपारीची मुदत त्यानें जेलमध्यें किंवा सैबेरियामध्यें पूर्ण केली नाहीं. कैदेंतून व हद्दपारीच्या भागांतून पहारेकऱ्यांच्या व पोलिसांच्या हातांवर तुरी देऊन निसटून जाण्यांत त्याचा हातखंडा होता. प्रमुख रशियन क्रांतिकारकांपैकीं कोणालाहि स्टॅलिनची ही कला साधली नव्हती. या कालांत डेव्हिड, कोबा, निझेराडझे, चिझीकोव्ह, इव्हॅनोव्हिच, वासिलीएव्ह, स्टॅलिन अशीं अनेक नवीन नवीन नांवें त्यानें धारण केलीं. वेषांतर करणें व चेहऱ्याची ठेवण व रेषा बदलून धंद्याचा, वयाचा व जातीचा पोलिसाला पत्ता लागूं न देणें, या कामांत त्याचा हात कोणीच धरूं शकला नाहीं. गुप्त रीतीनें कार्य करण्यांत एक असा विशेष असतो कीं, त्या माणसाला आपले विचार केव्हांच जाहीर रीतीनें मांडतां येत नाहींत. कायदेशीर रीतीनें चाललेल्या वर्तमानपत्रांतून तर त्याला वाव मिळणें कधींच शक्य नसतें. यामुळें असल्या माणसाचें खरें चरित्र जगापुढें येणें अत्यंत कठिण असतें. त्याच्या मित्रांकडून, सहकाऱ्यांकडून जेवढी माहिती मिळते त्यावरूनच त्याच्या चरित्राचा व स्वभाववैशिष्ट्याचा अंदाज करावा लागतो. स्टॅलिनच्या बाबतींत अगदीं असेंच झालें आहे.

गुप्त असो अगर उघड असो, वर्गकलहाच्या अधिष्ठानावर क्रांतीची संघटना करायची, हें स्टॅलिनचें जीवनसूत्र होतें. अगदीं किरकोळ बाबतींत सुद्धां या धोरणापासून तो ढळत नसे. अगदीं साधी गोष्ट. टिफ्लिस सोशल डेमोक्रॅटच्या विद्यमानें चालविलेल्या एका रविवारच्या शाळेंत तो एकदां गेला असतां त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना त्यानें गटागटानें जमा करून वर्गकलहाची कल्पना त्यांना सांगितली. नंतर तेथल्या एका कामगाराला तेथें काय शिकवितात याबद्दल प्रश्न विचारला. आकाशांतून सूर्य कसकसा जातो, त्याची गति कशा प्रकारची असते, हें आपल्याला सांगण्यांत येतें. असें त्यानें सांगितल्यावर स्टॅलिन हंसला व म्हणाला, "हें पहा दोस्त, सूर्य कसकसा फिरतो याची फिकीर करण्याचें कारण नाहीं. आपली कक्षा तो कधींही सोडून जात नाहीं. यापेक्षां क्रांतीच्या चळवळीची गति कशा प्रकारची असते हें तूं समजून घेतलेंस तर फार बरें होईल. ही गोष्ट तूं शीक आणि बेकायदा छापखान्याची उभारणी करण्याच्या कामांत तूं मला मदत कर."

टिफ्लिस येथील समाजवादी गटाला 'ब्रॅडझोला' (लढा) पत्र गुप्त रीतीनें काढावें लागत होतें. आणि स्टॅलिन अशा प्रकारें कामगारांच्या पोटांत शिरून, त्यांना ज्या विचारांची खरोखरी भूक होती ते पुरवून त्यांना तो आपलेसे करीत असे.

१९०१ च्या नोव्हेंबरमध्यें टिफ्लिस कमिटीनें स्टॅलिनला बाटुम येथें गुप्त चळवळीच्या कामावर पाठविलें. बाटूम हें तेल स्वच्छ करण्याच्या कारखान्यांचें केंद्र होतें. अत्यंत निर्दयपणें येथील कामगारांची पिळणूक करण्यांत येत होती. स्टॅलिननें या ठिकाणीं गेल्यानंतर आपल्या कामाला जोरानें सुरुवात केली. रॉथशील्ड, मॅंटेशेव्ह, सिडेरिडीस येथील कारखान्यांतील कामगारांत अनेक मंडळें त्यानें निर्माण केलीं. या मंडळांत सर्व प्रांतांचे व राष्ट्रांचे प्रतिनिधि घेण्याकडे स्टॅलिनचा कटाक्ष होता. कामगारांत आंतरराष्ट्रीय भावना दृढतर करण्याकरतां तो या गोष्टीवर भर देत असे. डिसेंबर ३१ तारखेस या मंडळांच्या प्रतिनिधींच्या सभेंत त्यानें सोशल डेमोक्रॅटांची बाटुमची शाखा प्रस्थापित केली. आणि त्याच वेळीं रॅाथशील्ड व मॅंटेशेव्ह या कारखान्यांत झालेल्या संपांचीं सूत्रें त्यानें गुप्तपणें मागें राहून यशस्वी रीतीनें चालविलीं. मोठ्या प्रमाणावर झालेला बाटुम येथील हा पहिलाच प्रचंड संप होता. या संपांत कामगार विजयी झाले. कामगारांची अभेद्य संघटना, आपल्या मागण्यांकरतां चिकाटीनें व स्वार्थत्यागानें लढत राहण्याची त्यांची तयारी पाहून झार सरकार घाबरून गेलें. यापूर्वीं थोडेच दिवस बाटुमच्या गुप्त पोलिसांनीं सरकारकडे असें कळविलें होतें कीं, टिफ्लिसमधील रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीनें १९०१ च्या पावसाळ्यांत पाठविलेला जोसेफ झुगाशविली नांवाचा विद्यार्थी येथें आल्यापासून ही सर्व गडबड सुरू झाली आहे. हा विद्यार्थी पूर्वी टिफ्लिस येथील सनातन धर्मविद्यालयांत शिकत होता. या विद्यार्थ्याच्या खटपटीमुळें बाटूममधील कारखान्यांतून सर्वत्र सोशल डेमोक्रॅटांच्या संस्था निर्माण झाल्या आहेत.

गुप्त पोलिसच्या या रिपोर्टावरून कुटेचा लष्करी गव्हर्नर कडक उपाय योजून कामगारांची ही चळवळ हाणून पाडण्याकरितां बाटूम येथें आला व त्यानें संपवाल्यांपैकीं बत्तीस पुढारी कामगार पकडले. या अटकेबद्दल नापसंती दर्शविण्याकरतां मार्च ८ रोजीं स्टॅलिननें एक प्रचंड मोर्चा संघटित केला. हा मोर्चा पोलीसठाण्याकडे गेला व त्यानें तेथें अटक करून ठेवलेल्या

कामगारांची मुक्तता करण्याबद्दलची मागणी केली. पोलिसनें या कामगारांपैकीं तीनशेंवर कामगार गिरफ्तार केले. दुसरे दिवशीं पुन्हा अशीच मिरवणूक निघाली. पोलिसांनीं कामगारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून पुन्हा तितकेच कामगार पकडून अटकेंत ठेवले. या धरपकडीमुळें कामगार मुळींच घाबरले नाहींत. पुन्हा त्याच्या दुसरे दिवशीं निघालेल्या मोर्चांत सहा हजार कामगार सामील झाले. या मोर्चाची हकीकत पुढीलप्रमाणें एका कॉम्रेडनें फारच मार्मिकपणें दिली आहे,

"कॉ. स्टॅलिननें या मोर्चाची तयारी केली असेल असें आम्हांला त्या वेळीं माहीत नव्हतें. पण ज्या तत्परतेनें व झपाट्यानें या मोर्चाची जाहिरात देण्यांत आली व ज्या पद्धतीनें या मोर्चाची संघटना व तयारी करण्यांत आली त्यावरून, आम्हांला पक्कें कळून चुकलें कीं, या वेळीं काय करावें हें आमच्यापेक्षां जास्त चांगल्या प्रकारें समजणाऱ्या अत्यंत लायक व अनुभवी इसमानेंच ही तयारी केली असली पाहिजे. मार्च ९, १९०२ चा हा मोर्चा माझ्या आठवणींतून कधींच जाणार नाहीं. रांगांतून शिस्तीनें चालणाऱ्या कामगारांनीं रस्ते गच्च भरून गेले होते. हद्दपारी कैद्यांच्या बराकीकडे हा मोर्चा चालला होता. या बराकींतूनच अटक झालेले कामगार ठेवण्यांत आले होते. कॉ. स्टॅलिन अगदीं पहिल्या रांगेपुढें निवडक कामगारांच्या गोटांतून चालला होता. आम्ही सर्व-जण सोल्जरांच्या एका तुकडीवर चालून गेलों. या सोल्जरांनीं आपल्या रायफली, आमच्यावर रोखल्यां होत्या. त्यांचा कमांडर अंटांडझे यानें गर्दी मोडण्याचा हुकूम केला व गोळीबाराचा धाक घातला. एक क्षणभर आमचें चित्त चलबिचल झालें. या वेळीं एक ठोसदार आवाज आम्हांला ऐकूं आला.

"आपापल्या जागीं डटून रहा. रांगेंतून बाहेर पडूं नका. आणि अटक झालेल्यांची सुटका करण्याच्या घोषणा जोरानें सारख्या चालू ठेवा."

कॉ. स्टॅलिनचा हा आवाज होता. अंतःकरणाची खळबळ उडवून देणाऱ्या त्याच्या आव्हानानें सर्व कामगार एकमेकांशीं बिलगून राहिले व आपापल्या रांगांतून एकही कामगार इकडचा तिकडे झाला नाहीं. स्टॅलिनच्या नेतृत्वा-खालीं संघटित झालेल्या या मोर्चानें एक गोष्ट सिद्ध केली कीं, "दृढनिश्चयानें सशस्त्र लढा लढवूनच एकतंत्री राज्यसत्तेविरुद्ध कामगारांना विजय संपादन करतां येईल."

बाटुममध्यें घडून आलेल्या या घडामोडींचे प्रतिध्वनि सर्व देशभर उमटले. या प्रसंगानें कामगारवर्गाचीं मनें जशीं उत्तेजित केलीं त्याचप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांचेंही धाबें दणाणून सोडलें. नेहमींप्रमाणें या ठिकाणीं दडपशाहीला सुरुवात झाली व सर्वत्र झडत्यांचेंही सत्र सुरू झालें. गुप्त पोलिसांनीं पसरलेल्या जाळ्यानें स्टॅलिनला गुरफटून घेतलें. त्याला अटक झाली. खरा कटवाला तो कीं, ज्याच्यापाशीं कांहीं पुरावा म्हणून सांपडत नाहीं. स्टॅलिनचें उदाहरण या बाबतींत आदर्श होतें. बाटुमहून कुटे येथें त्याला नेण्यांत आलें. सरकारी वकीलाला त्याच्यावरील आरोप सिद्ध करण्याला पुरावाच सांपडला नाहीं. कोर्टानें त्याचा खटला काढून टाकला व त्याला निर्दोष म्हणून सोडून देण्यांत आलें. तेथून तो टिफ्लिसला आला. रेलवेवर चालू असलेल्या संपांत भाग घेऊन संप-कमिटींत त्यानें काम केलें. पोलिसचा आपल्यावर वहीम आहे, हें त्याला माहीत होतें. तो बाटुमला परत आला त्या वेळीं संधि साधून पोलिसनें त्याला अटक केली. या वेळीं मात्र टिफ्लिस संप-कमिटींत भाग घेतल्याचा आरोप ठेवून त्याला दोन वर्षं कैदेची शिक्षा देण्यांत आली. बाटुमच्या तुरुंगांत असतांनाही गुप्तपणें तेथील कामगारसंघाच्या चळवळीचीं सूत्रें तो हलवीत होता. पोलिसला या गोष्टीचा वास आल्याबरोबर त्याला कुटे येथील जेलमध्यें नेण्यांत आलें. या तुरुंगांत अनेक पक्षांच्या चळवळ्या लोकांशीं त्याचा संबंध आला व लेनिनच्या इस्क्रा पत्राच्या धोरणाचा त्यानें या लोकांत प्रचार केला. १९०३ च्या नोवेंबरमध्यें बाटुमच्या तुरुंगांत त्याची पुन्हा बदली करण्यांत आली आणि येथून त्याला हद्दपारीची तीन वर्षांची शिक्षा पुरी करण्याकरतां, पूर्व सैबेरियांत इर्कुटस्क प्रांतांतील नोव्हायाउडा नांवाच्या एका खेड्यांत ठेवण्यांत आलें. या खेड्यांत येऊन एक महिना झाला नाहीं तोंच त्यानें तेथून पलायन केलें व टिफ्लिस येथें तो दाखल झाला. येथें आल्यावर ट्रान्सकॉकेशियांतील [1]बोलशेविक संघटनेचें काम तो करूं लागला व मेन्शेव्हिकांविरुद्ध त्यानें प्रचंड मोहीम सुरू केली.

---

१ **बोलशेव्हिक**—कामगारांना वर्गजागृत करून त्यांना क्रांतिप्रवण करणारा, शिस्तीचा पुरस्कर्ता. **मेनशेव्हिक**—क्रांति हाच एक मार्ग आहे असें न मानणारा, गुप्त चळवळींना विरोध करणारा, वर्ग-सलोख्यावर विश्वास असलेला.

या हद्दपारीच्या गडबडींत स्टॅलिनचा व लेनिनचा पत्रव्यवहार झाला. सरकारनें ठरविलेल्या हद्दपारीच्या गांवीं पोंचून महिना होतो न होतो तोंच स्टॅलिन तेथून पळून आला, पण एवढ्या अवकाशांतच लेनिनच्या हातचें पहिलें पत्र त्याला मिळालें. या प्रसंगाची हकीकत खुद्द स्टॅलिननेंच लिहून ठेविली आहे:—

"१९०३ पासून मी लेनिनला ओळखूं लागलों. प्रत्यक्ष भेटीअंतीं त्याचा व माझा परिचय झाला त्यापूर्वी तो पत्रद्वारा झाला होता. पण पत्रद्वारा झालेल्या या परिचयानें माझ्या मनावर इतका परिणामकारक ठसा उमटावेला कीं, माझ्या पार्टी-चळवळीच्या सर्व जीवनांत त्याचा मला केव्हांही विसर पडला नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस लेनिननें केलेल्या क्रांतिकारी चळवळीशीं माझा जो संबंध आला आणि विशेषेंकरून १९०१ मध्यें 'इस्क्रा' पत्राच्या प्रसिद्धीकरणानंतर जो संबंध आला, त्यावरून आपण एका असामान्य व्यक्तीबरोबर काम करीत आहों, अशी माझी खात्री झाली. तो पार्टीचा साधा पुढारी नाहीं; तर तो तिचा प्रत्यक्ष संस्थापक आहे, असे गुण मला त्याच्या अंगीं दिसून आले. कारण त्यानेंच पार्टीचें अंतर्गत जीवन व पार्टीच्या तातडतोबीच्या गरजा जाणल्या होत्या. प्लेखानोव्ह, मार्टोव्ह, ॲक्सेलरॉड वगैरे त्याच्या सहकाऱ्यांशीं मी त्याची तुलना करूं लागलों त्या वेळीं हे सर्व लोक त्याच्याहून कमी प्रतीचे आहेत, असें मला आढळून आलें. तुलनाच करावयाची तर इतर पुढाऱ्यांप्रमाणें तो एक पुढारी नव्हता; तर तो श्रेष्ठ दर्जाचा पुढारी होता. पर्वतशिखरावरून भराऱ्या मारणारा तो गरुड होता. क्रांतीचा लढा चालवितांना भय कसें तें त्याला माहीत नव्हतें व रशियन क्रांतीच्या चळवळींतील असंशोधित मार्गांतून तो पार्टीला पुढें नेत होता.

या गोष्टीचा माझ्या मनावर इतका भक्कम ठसा उमटला होता कीं, परदेशांत जाऊन राहिलेल्या माझ्या एका निर्वासित मित्राला या बाबतींत त्याचें मत काय आहे, हें विचारण्याची मला आवश्यकता वाटली नाहीं. कांहीं दिवसांनंतर म्हणजे सैबेरियांत मला अगोदरच हद्दपार केलें असतांना—१९०३ चे हे अखेरचे दिवस होते—लेनिनकडून मला एक उत्तेजनपर पत्र आलें. यावरून माझ्या मित्रानें लेनिनला माझी चिठी दाखविली, असें मला वाटलें. लेनिनचें मला आलेलें पत्र लहानसेंच होतें; परंतु त्यांत आमच्या पार्टीच्या

**प्रत्यक्ष व्यावहारिक धोरणावर** त्यानें निर्भयपणें टीका केली होती; आणि पार्टीच्या सबंध योजनेचें स्पष्ट विवरण केलें होतें. असल्या भानगडीच्या विषयावर इतक्या सोप्या शब्दांत, इतक्या संकलित रीतीनें व इतक्या जोरदार रीतीनें केवळ एकटा लेनिनच लिहूं शकत होता. या चिठ्ठींत लेनिननें योजलेला शब्दप्रयोग बोलत नव्हता तर गोळीसारखा तो अंतःकरण भेदून जात होता. जुन्या गुप्त चळवळयाला लागलेल्या संवयीप्रमाणें मीं लेनिनचें हें पत्र जाळून टाकलें. याबद्दल मी आपल्याला आतां क्षमा करूं शकत नाहीं."

स्टॅलिनला सैबेरियांत लेनिनचें हें पत्र वाचावयास मिळालें. त्या दिवसापासून स्टॅलिन लेनिनचा कायमचा दोस्त झाला व पुढें एक क्षणभरही लेनिनवरची त्याची निष्ठा कमी झाली नाहीं.

स्टॅलिनचें पत्र सैबेरियाची हद्द ओलांडून व कस्टम ऑफिसला गुंगारा देऊन लेनिनला पोंचेपर्यंत ब्रुसेल्स येथें तो रशियन सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची परिषद बेल्जममध्यें भरविण्याच्या खटपटींत होता. रशियन गुप्त पोलिसाला चकवून अठावन्न प्रतिनिधि या परिषदेला जमा झाले होते. पण परिषदेला प्रारंभ होऊन पहिला वक्ता बोलायला उभा राहतो न राहतो इतक्यांत पोलिस परिषदेच्या हॉलमध्यें शिरले. त्यांनीं सर्व प्रतिनिधींची झडती घेतली व परिषदेचें यापुढचें काम बेकायदेशीर होईल, असें जाहीर केलें. लेनिनच्या सूचने प्रमाणें हे सर्व लोक लंडनच्या अधिक सोइस्कर अशा वातावरणांत जमा झाले. या परिषदेंत प्रतिनिधींमधील मतभेद उघडकीला आले. एका बाजूला लेनिन-प्लेखानोव्हचा गट व दुसऱ्या बाजूला मार्टोव्ह, ॲक्सेलरॉड व २४ वर्षें वयाचा ट्रॉट्स्की यांचा गट असे दोन पक्ष झाले. लेनिनच्या कार्यक्रमाचा मसुदा या परिषदेंत फारच थोड्या बहुमतानें मंजूर झाला. या फुटीच्या प्रसंगींच रशियांतील समाजवादी क्रांतिकारकांत बोल्शेव्हिक व मेनशेव्हिक असे दोन पक्ष झाले. कांहीं महिन्यांनंतर स्टॅलिनला ही बातमी समजली. त्यानें लेनिनच्या मताचा पुरस्कार केला. बोल्शेव्हिक शिस्तीची संघटना निर्माण करण्यासंबंधाचीं लेनिनचीं मतें त्याच्या मतासारखींच होतीं. "मतामतांच्या या वादळांत लेनिन अगदीं बरोबर होता" असें त्यानें आपल्या एका दोस्तापाशीं बोलून दाखविलें. स्टॅलिनला लेनिनसंबंधानें जें आकर्षण वाटत होतें त्यामुळेंच या जॉर्जियन क्रांतिकारकाला शोधून काढलें पाहिजे, असें लेनिनलाही

वाटूं लागलें होतें. कोबा इजुगाशविली या नांवानेंच फक्त तो स्टॅलिनला ओळखत होता. येत्या क्रांतिकारक लढ्यांतील कटाच्या योजना पूर्ण करण्यास अत्यंत लायक असा हा इसम आहे, असें लेनिन जाणून होता, लेनिन कोणाची वृथा स्तुति करीत नसे. "अजब जॉर्जियन" असें लेनिननें त्याचें नामाभिधान केलें त्या वेळीं स्टॅलिनलाही त्याचा अभिमान वाटूं लागला.

# राज्यकारभाराचे पहिले धडे ३

५ जानेवारी १९०४ मध्यें स्टॅलिन हद्दपारीच्या गांवांतून पसार झाला आणि मार्चमध्यें परत कॉकेशियामध्यें येऊन कामास लागला. तो निघाला त्या वेळीं एक पैशाचें पाकीट व बनावट सहीचा एक पासपोर्ट त्याला मिळाला होता. रशियांतील कोणत्याही नागरिकाला देशांतल्या देशांत एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जायचें झालें तरी पासपोर्ट दाखवावा लागत असे. त्यामुळें स्टॅलिन-जवळ पासपोर्ट असणें जरूरीचें होतें. सैबेरियांतून निघाल्यापासून सहा आठ वड्यांनीं सेंट पीटर्सबर्गमधील एका दोस्ताच्या घरीं येऊन तो दाखल झाला. या वेळीं इव्हानोव्हिच असें नांव त्यानें धारण केलें होतें. या ठिकाणीं आपल्या गैरहजेरींत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्यासंबंधींची सर्व माहिती त्यानें गोळा केली व नोव्हायाउडा येथें आपल्या हद्दपारीच्या गांवीं त्यानें ज्या योजना मनाशीं आखल्या होत्या त्या पार पाडण्याकरतां लागणारी सामुग्रीही त्यानें मिळविली. यानंतर एक महिन्यानें तो टिफ्लिस येथें आला. येथील परिस्थिति अतिशय गंभीर झाली होती. यापूर्वी स्टॅलिनच्या पुढारीपणाखालीं सगळीं कामें चालू होतीं. तेथील कार्यकर्ते त्याच्यावरच केवळ अवलंबून होते. स्टॅलिननें आपल्या मागें काम करण्याकरतां जो कार्यकर्त्यांचा गट तयार केला होता तो तर त्याला निष्क्रिय बनलेला दिसला. या प्रसंगींच त्याला सोरजो ओर्ट दारोनिकिद्ज नांवाचा एक दोस्त मिळाला. हे दोघेहि एका विचाराचे व एका स्वभावाचे होते, त्यांनीं मोडकळीस आलेल्या टिफ्लिस येथील बोलशे-विक संघटनेंत पुन्हा प्राण घालण्याचें ठरविलें. याकरतां अगदीं पहिली गोष्ट म्हणजे स्टॅलिननें टिफ्लिस येथें "ड्रो" (काळ) नांवाचें पत्र काढलें आणि बाकू येथें चालू असलेल्या "बाकिन्स्की राबोची" (बाकू कामगार) पत्राचें संपादकीय काम त्यानें आपल्या हातांत घेतलें. तो ट्रान्सकॉकेशियांत परत आला त्या वेळीं मेन्शेविकांविरुद्ध बोलशेविकांचा जोराचा लढा चालू होता. वरील पत्रांच्या द्वारें लेनिनच्या मूलभूत धोरणाचा त्यानें इतक्या साध्या, व

वाचकांना पटेल अशा रीतीनें पुरस्कार केला कीं, नॅरॉडनिकी ("People's will") पक्षांतील बरेच लोक नव्हे, तर खुद्द मेनशेव्हिकांपैकींही पुष्कळ लोक त्यानें आपल्या मताचे करून टाकले. बाटुम, चियाटुरी, कुटे व बाकू या कारखान्यांच्या गांवीं वारंवार जाऊन बोलशेविकांना संघटित करण्याचे त्यानें प्रयत्न केले. या ठिकाणीं त्यानें अनेक सभा घेतल्या. त्यांतून मेनशेविकांशीं व नॅरॉडनिकी पक्षाच्या लोकांशीं, अराजकवाद्यांशीं व **राष्ट्रीय पक्षाच्या** लोकांशींही त्यानें जाहीर वादविवाद केले व वर्तमानपत्रांतून लेनिनच्या मताचा जोरानें पुरस्कार केला. १९०४ च्या अखेरीस 'इस्क्रा' पत्राच्या संघटनेच्या द्वारा त्यानें तिसरी पार्टी कॉंग्रेस भरविण्याची चळवळ केली. या वर्षाच्या नोवेंबरमध्यें कॉकेशसमधील बोलशेव्हिक कमिट्यांची टिफ्लिस येथें परिषद भरली व त्यांत ही तिसरी पार्टी कॉंग्रेस भरविण्यासंबंधानें जोरानें चळवळ करण्याचें ठरविण्यांत आलें. पुढें याच सुमारास बाकू येथें त्याच कामाकरितां कॉकेशियन कमिटीनें त्यास पाठविलें असतां तेथील तेलाच्या कारखान्यांत एक मोठा संप त्यानें घडवून आणला. हा संप पूर्णपणें यशस्वी झाला व मालकांनीं कामगारांबरोबर सामुदायिक[1] करार करण्याचें तत्त्व मान्य केलें. मालकांना अशा रीतीनें हें तत्त्व मान्य करण्यास भाग पाडण्याचें रशियाच्या कामगारचळवळींतील हें पहिलें उदाहरण होतें.

रूसो-जपानी युद्ध सुरू असतांना झारच्या सरकाराचा पराभव व्हावा व झारशाही नष्ट करण्याकरतां कामगारांनीं व शेतकऱ्यांनीं क्रांतिकारक चळवळींना तीव्र स्वरूप द्यावें, या लेनिनच्या धोरणाचा ट्रान्सकॉकेशियामधील बोल्शेविकांनीं प्रचार केला. स्टॅलिननें या वेळीं कॉकेशियन फेडरेशन कमिटीमार्फत व बाकू व टिफ्लिस कमिट्यांमार्फत जाहीरनामे प्रसिद्ध केले. या जाहीर पत्रकांतून लष्करी शिपायांनींही कामगारांना व शेतकऱ्यांना येऊन मिळावें, अशी विनंति केली होती. कामगार व शेतकरी यांच्याविरुद्ध आपलीं शस्त्रें न चालवितां झार व जमीनदार यांच्याविरुद्ध तीं चालवावीं, असें त्यांत म्हटलें होतें. "तुम्ही देखील कामगारच आहां. जरी आतां तात्पुरत्या कारणाकरतां तुम्ही लष्करी पोषाख घातला असला तरी दोस्तहो, हें लक्षांत ठेवा कीं, आम्ही जेव्हां स्वातंत्र्य संपादन करूं त्या वेळीं तुम्हांलाही स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय राहणार नाहीं." मांच्यू-

१ कामगारांच्या प्रतिनिधींबरोबर तडजोड करण्यास कारखानदारांनीं दिलेली मान्यता.

रियामध्यें झारच्या सैन्याचे जे एकामागून एक पराभव झाले त्यामुळें देशांत सर्वत्र चालू असलेल्या क्रांतिकारक व युद्धविरोधी चळवळीला उत्तेजनच मिळालें. याच युद्धाच्या कालांत लाल रविवारची भयप्रद घटना घडून आली. त्यांतच कामगारांचे संप, शेतकऱ्यांचीं बंडें, विद्यार्थ्यांचे संप, जनता आणि पोलिस व लष्कर यांच्यांतील अनेक झकाझकीचे प्रसंग यांची भर पडली. क्रांतीच्या शक्ति सर्व देशांत उघडपणें व रस्तोरस्तीं वावरूं लागल्या. ट्रान्सकॉकेशियांतील बोल्शेविक पुढारी या नात्यानें त्यानें या क्रांतीच्या चळवळींत काम केलें. लेनिनच्या ध्येयात्मक, संघटनात्मक व डावपेंचांच्या तत्त्वांचा त्यानें मोठ्या प्रमाणांत प्रचार केला. "पार्टींतील मतभेदांचें दर्शन" या नांवाचें एक पत्रक त्यानें याच सुमारास प्रसिद्ध केलें. कामगारांच्या स्वयंस्फूर्त चळवळीला समाजवादी जागृतीचें अधिष्ठान असलें पाहिजे. क्रांतीचा सिद्धांत व जनतेची वर्गकलहात्मक चळवळ यांचा दुवा जोडण्यांत आला पाहिजे. आणि क्रांतिकारी सोशल डेमोक्रॅटिक पार्टीनें पुढारीपणानें या चळवळींत कामें केलीं पाहिजेत. या लेनिनच्या प्रबंधाचा वरील पत्रकांत स्टॅलिननें पुरस्कार केला.

"कामगारवर्गाची चळवळ समाजवादाशीं एकजीव झालेली असली पाहिजे. प्रत्यक्ष कार्यशक्ति व सिद्धांत हीं दोन्हींही निगडित असलीं पाहिजेत. समाजवादी जागृतीच्या तत्त्वावरच कामगारचळवळी आपण चालविल्या पाहिजेत. कामगारवर्गांतील पुरोगामी शक्तींचें आपण आपल्या पार्टीमध्यें केंद्रीकरण केलें पाहिजे. सर्वकाळीं व सर्व ठिकाणीं चळवळींत पुढाकार घेणें हें आपलें कर्तव्य आपण मानलें पाहिजे. आणि आपले पवित्र हेतु साध्य करण्याच्या कामांत जो कोणी अडथळा आणील—मग तो मित्र असो वा शत्रु असो—त्याच्याशीं निकरानें दोन हात केले पाहिजेत." असें या वेळीं स्टॅलिननें लिहून ठेवलें आहे.

आकस्मिक **स्वयंस्फूर्त** घटना व जागृति यासंबंधानें "सोशल डेमोक्रॅटांना उत्तर" या लेखांतही स्टॅलिननें पुढील महत्त्वाचे विचार प्रकट केले आहेत. "आजचें जीवन भांडवलशाही पद्धतीवर उभारलेलें आहे. भांडवलदार व कामगार असे दोन पक्ष आज अस्तित्वांत आहेत. आणि या दोघांत जीवन्मरणाचा लढा चालू आहे. पहिला वर्ग आपल्या जीवनाच्या ज्या परिस्थितींत असतो तींत भांडवली समाजरचना मजबूत राखणें त्याला भाग पडत असतें.

आणि दुसऱ्या वर्गाला त्याच्या परिस्थितीप्रमाणें ही रचना ढांसळून पाडून नष्ट करावयाचें काम करावें लागतें. या दोन वर्गांना अनुसरून भांडवलशाही व कामगारवर्गीय अशी दोन प्रकारची जागृति या वर्गांतून वावरत असते. समाजवादी जागृति ही कामगारवर्गाला योग्य अशीच असते... पण जर तिचा प्रसार कामगारवर्गांत होत नसेल तर समाजवादी जागृतीचा उपयोग तरी काय? तो एक केवळ पोकळ शब्दप्रयोग होईल. याशिवाय त्याला कांहीं जास्त किंमत राहणार नाहीं. कामगारवर्गांत या जागृतीचा फैलाव होईल त्या वेळीं एक अगदीं निराळीच परिस्थिति निर्माण होऊन कामगारवर्गाला आपल्या परिस्थितीची पूर्ण जाणीव होईल आणि समाजवादी जीवनाकडे अधिक जोराचे कदम टाकून ते धांव घेऊं लागतील."

स्टॅलिनच्या या लेखांतील विचारसरणीशीं आपलें पूर्ण मतैक्य असून "बाहेरून[1] जागृतीचा प्रवेश" या प्रसिद्ध सिद्धांताचें सूत्रीकरण या लेखांत त्यानें केलें आहे, असें लेनिननें म्हटलें आहे.

मेनशेव्हिकांच्या कामगार पक्षाच्या अस्पष्ट कल्पनेविरुद्धही स्टॅलिननें अनेक लेख लिहिले व आपल्या पार्टीविषयक धोरणाचा त्यानें चांगला ऊहापोह केला. आपली पार्टी कामगारवर्गीय पार्टी असली पाहिजे. ती क्रांतिकारी पार्टी असली पाहिजे. ती आंतरराष्ट्रीय पार्टी असली पाहिजे. असें या लेखांतून त्यानें प्रतिपादन केलें.

"जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील कामगार जितके जितके अधिकाधिक जवळ येतील तितकें तितकें त्यांचें सामर्थ्य वाढत जाईल. त्यांच्याभोंवतीं उभ्या करण्यांत आलेल्या राष्ट्रीय भिंतींचा पूर्णपणें नाश करण्यासाठीं ते अधिकाधिक समर्थ होतील. कामगारवर्गाच्या पार्टीचें सामर्थ्य जितकें अधिक वाढेल तितकें तितकें कामगारांना एका अभेद्य वर्गांत संघटित करणें अधिकाधिक सोपें जाईल." असें पार्टीसंघटनेच्या संबंधांत मेनशेव्हिकांना उत्तर देतांना स्टॅलिननें म्हटलें आहे.

मेनशेव्हिकांविरुद्ध याप्रमाणें एकीकडे मोहीम सुरू होती तर दुसरीकडे १९०५ सालांत रशियांत सुरू झालेल्या जनताक्रांतींतही ट्रान्सकॉकेशियांतील

---

१ वर्गदृष्ट्या जागृत व संघटित होण्याची पात्रता कामगारवर्गात नसल्यानें प्रथमतः राजकीय दृष्ट्या जागृत झालेला मध्यम वर्गच हें कार्य करीत असतो.

कामगारवर्ग जोरानें भाग घेत होता. याच साल्च्या उन्हाळ्यांत बाकूमध्यें सार्वत्रिक संप करण्याचें ट्रान्सकॉकेशियांतील बोल्शेविकांनीं ठरविलें. टिफ्लिस-मध्यें यापूर्वींच अशा प्रकारचे संप चालू होते. बाकूशिवाय बाटुम, कुटे, चियातुरी वगैरे शहरांतही असे संप घडून आले. संपवाल्यांनीं मोठमोठ्या मिरवणुका काढल्या व पोलिसशींही दोन हात केले. या सर्व चळवळीचीं सूत्रें अर्थात् स्टॅलिनच्याच हातांत होतीं. कामगारांनीं सुरू केलेली ही क्रांतिकारी लाट जॉर्जियांतील शेतकऱ्यांमध्येंही पसरली. ओझुर गेटी, झुगदिदि, सेनाकीं, गोरी, टिफ्लिस वगैरे जिल्ह्यांतून शेतकऱ्यांचीं सशस्त्र बंडें झालीं. शेतकऱ्यांनीं क्रांतिकारी कमिट्या निवडल्या. जमीनदारांच्या जमिनी कबजांत घेतल्या, कर रद्द केले व झारच्या अधिकाऱ्यांवर बहिष्कार घातला. ट्रॅन्सकॉकेशियांतील शेतकऱ्यांनीं व कामकऱ्यांनीं केलेला हा क्रांतिकारी लढा टिफ्लिस कमिटीनें स्टॅलिनच्या नेतृत्वाखालीं चालविला होता. जॉर्जियांतील गुरिया प्रांतांत तर सर्व सत्ता क्रांतिकारकांनीं काबीज केली व तीन महिन्यांवर प्रांताचा सर्व राज्यकार-भार त्यांच्या कमिट्यांनीं चालविला व स्टॅलिनच्या सूचनेप्रमाणें कामगार-सत्ते-पासून अपेक्षित अशा पुष्कळ जनहिताच्या सुधारणा त्यांनीं अमलांत आणल्या. या तीन महिन्यांत स्टॅलिनला सरकारी कारभाराचे पहिले धडे मिळाले. या वेळीं यशाचे धडे त्याला मिळाले, त्याप्रमाणें अपयशाचेही धडे त्याला मिळाले. हे धडे तो कधींही विसरला नाहीं. लेनिनच्या धोरणाप्रमाणें क्रांतीकरतां स्टॅलिननें सशस्त्र उठावाची तयारी केली होती. या तयारीसंबंधानें बोलतांना तो एकदां म्हणाला कीं, आम्हांला तीन गोष्टींची गरज आहे. त्यांतील पहिली गोष्ट म्हणजे शस्त्रें, दुसरी गोष्ट म्हणजे शस्त्रें आणि तिसरी गोष्ट म्हणजेही शस्त्रेंच!

जॉर्जियामध्यें आपल्या क्रांतीच्या व क्रांतीनंतरच्या योजना स्टॅलिनच्या नेतृत्वाखालीं किती तरी यशस्वी झाल्या, हें लंडनहून अत्यंत सूक्ष्मपणें निरीक्षण करून लेनिननें अत्यंत समाधान व्यक्त केलें असल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं. १९०५ सालीं रशियांत झालेल्या या क्रांतीचा पराजय झाला. गुरियां-तील सोव्हिएट उधळून झारशाहीनें आपली दडपशाहीची हांव पुरी करून घेतली. क्रांतीच्या पराभवांतला हा शेवटचा टप्पा होता. क्रांतिकारकांनीं माघार खाल्ल्याबरोबर क्रांतीनें पुन्हा डोकें वर काढूं नये म्हणून शेतकरी-कामकरी जनतेवर झारच्या सरकारनें अनन्वित अत्याचार केले. पण त्यामुळें जनता

भेदरून गेली नाहीं. आणि पुढारी तर मुळींच भेदरून गेले नाहींत तर उलट या प्रसंगानंतर एकदां या क्रांतीविषयीं बोलतांना " १९०५ ची रंगीत तालीम झाली नसती तर १९१७ची क्रांति विजयी होणें अशक्य होतें " असें लेनिननें म्हटलें होतें.

१९०५ च्या अखेरीस टामरफोर्स ( फिनलंड ) येथें अखिल रशियन बोल्शेव्हिक परिषदेस स्टॅलिन हजर होता. याच ठिकाणीं लेनिनची व त्याची प्रत्यक्ष भेट झाली. पुढारी म्हटला म्हणजे तो सर्वांच्या मागून यावयाचा. सर्वांनीं त्याला खडी ताजीम द्यावयाची, त्याच्या नांवाचा जयजयकार करून टाळ्या पिटायच्या. पण लेनिनच्या बाबतींत त्याला तसें कांहींच दिसलें नाहीं. परिषदेच्या हॉलच्या एका कोपऱ्यांत तो कांहीं दोस्तांबरोबर बोलत बसला होता. अहंता नाहीं, आढयता नाहीं, लहानमोठा भेद नाहीं. दोस्त दिसला कीं, त्याच्याबरोबर मोकळेपणानें बोलायचें. लेनिनच्या या साध्या, सरळ, निर्व्याज व प्रेमळ वृत्तीमुळें लेनिनबद्दल स्टॅलिनच्या मनांत असलेला आदर अधिक दुणावला. या परिषदेंत राजकीय ठरावाचा मसुदा तयार करण्याकरतां नेमलेल्या कमिटींत स्टॅलिनला निवडण्यांत आलें. क्रांतिकारी मार्क्सिस्ट पार्टीचा एक प्रमुख रचयिता व नेता या नात्यानें या परिषदेंत लेनिनबरोबर त्यानें काम केलें. या परिषदेचें काम चालू होतें नि मॉस्कोमध्यें सशस्त्र बंड सुरू झाल्याची वार्ता येऊन पोंचली. पुढारीपणानें या बंडाला संघटित वळण लावण्याकरतां परिषदेचें काम ताबडतोब संपवून सर्व मंडळी आपापल्या केंद्रांकडे निघून गेली. झारच्या सरकारनें इतर ठिकाणांपेक्षां ट्रान्सकॉकेशियामध्यें दडपशाहीचा जणूं कांहीं डोंब उठविला. टिफ्लिसचा बंदोबस्त करून झारचें लष्कर जॉर्जियाच्या इतर जिल्ह्यांतून शिरलें. तेथील जनतेवर त्यांनीं आगीचा वर्षाव केला खरा; पण या प्रदेशांतील एकेका इंचाकरतां झारच्या लष्कराला तेथील शेतकरी-कामगारांशीं लढावें लागलें. जालिमांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें क्रांतीचें बंड मोडलें तरी कित्येक महिनेपर्यंत झारच्या पोलीस व लष्करी अधिकाऱ्यांनीं देशभर धुमाकूळ घातला, व बोल्शेव्हिकांच्या एकूण एक कामगारसंस्थांचा बीमोड करण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाहीं. या दडपशाहींत जनतेचा तात्पुरता पराभव झाला; पण लेनिननें म्हटल्याप्रमाणें पुढल्या चढाईची तयारी करण्याकरतांच ही पीछेहाट होती.

# क्रांतियज्ञाची दीक्षा ४

१९०५ ची क्रांति अयशस्वी झाली. झारच्या सरकारनें बंडवाल्यांना व त्यांच्या संस्थांना नेस्तनाबूद करण्याचा प्रयत्न केला. झार क्रांतीचा पराभव करूं शकला; पण बंडवाल्यांना नेस्तनाबूद करण्याच्या त्याच्या दुसऱ्या प्रयत्नांत त्याला मुळींच यश आलें नाहीं. उलट जनतेला संतुष्ट ठेवण्याकरतां कांहीं हक्क त्याला द्यावेच लागले. राज्यकारभाराशीं जनतेचा कांहींच संबंध नव्हता. लोकसभेचा (ड्यूमाचा) हक्क मान्य करून केवळ एकतंत्री राज्यसत्तेला कांहीं तरी निर्बंध घालून घेण्यास त्याला तयार व्हावें लागलें. कामगारसंघ काढण्यासच नव्हे, तर सभा भरविण्याससुद्धां रशियांत परवानगी नव्हती. क्रांतीनंतर झारनें हे मनाई हुकूम काढून घेतले. ड्यूमा सभा मिळाली, कामगारसंघाची चळवळ उघडपणें करतां येऊं लागली. सभा भरवतां येऊं लागल्या. क्रांतीमुळें हे फायदे झाले. क्रांतीनें अगदीं कांहीं नाहीं तरी राज्यकारभारांत लोकमताचा प्रवेश करून दिला. राजकीय परिस्थितींत अशा रीतीनें फरक झाल्याबरोबर बोलशेविक व मेनशेविक यांच्यामध्यें पुन्हा तडजोडीचे प्रयत्न सुरू झाले. नवीन सेंट्रल कमिटी निवडण्याच्या कामीं दोन्ही पक्ष एक झाले; आणि या दोन्ही पक्षांची कॉंग्रेस स्टॉकहोम येथें १९०६ च्या एप्रिलांत भरली. टिफ्लिस कामगारसंघटनेच्या बोल्शेविक शाखेचा प्रतिनिधि या नात्यानें स्टॅलिन या परिषदेस हजर होता. पहिल्या ड्यूमा सभेच्या निवडणुकीच्या चळवळीचे ते दिवस होते. या निवडणुकीवर बहिष्कार घालावा असें बोल्शेव्हिकांचें मत होतें. परिषदेंत बोल्शेव्हिक अल्पसंख्य असल्यामुळें त्यांचा पराभव झाला. स्टॅलिननें या परिषदेंत लेनिनला जोराची साथ दिली. स्टॅलिन यानंतर टिफ्लिसला आला व तेथील दैनिक "ड्रो" पत्राचें संपादकत्व त्यानें पत्करिलें. जॉर्जियांतील निःशासनवाद्यांविरुद्ध व सुधारणावाद्यांविरुद्ध या पत्रद्वारा त्यानें मोहीम सुरू केली. "निःशासनवाद व समाजवाद" या विषयावर त्यानें लेखमाला प्रसिद्ध केली. स्टॉकहोम कॉंग्रेस ऐक्य परिषद या नांवाखालीं

भरली. पण परिषदेच्या वेळीं परिषदेनंतर बोलशेव्हिक व मेनशेव्हिक यांच्यांतील मतभेद अधिकच उजेडांत आले. या एकीचा एवढाच उपयोग झाला कीं, मेनशेव्हिकांचें सत्य स्वरूप प्रकट झालें. क्रांति झाली तर ती मेनशेव्हिकांना पाहिजे आहे. पण तिचें पुढारीपण कामगारवर्गाकडे न जातां भांडवलवाल्या लोकसत्तावाद्यांकडे असलें पाहिजे हें मेनशेव्हिकांचे मत होतें. मेनशेव्हिक आतां क्रांतीचाही धिक्कार करूं लागले होते. त्यांना सनदशीर संघटनेची राजसत्ता पाहिजे होती. मेनशेव्हिकांचीं हीं सर्व अंडींपिलीं बाहेर काढून स्टॅलिननें त्यांना सळो का पळो करून सोडलें.

अखिल रशियन बोल्शेविक पार्टीची परिषद याच वर्षाच्या नोव्हेंबरमध्यें भरली व पार्टीची पांचवी कॉंग्रेस भरविण्याचा तिनें ठराव केला. याच्या विरुद्ध मेनशेव्हिकांनीं अपक्ष कामगार परिषद भरविण्याची चळवळ सुरू केली. सर्व संग्रही कामगार पक्ष निर्माण करण्यांत यावा व त्याच्यामार्फत सर्व कामगार-चळवळी चालवाव्या, असें मेनशेव्हिकांना आतां वाटूं लागलें होतें. ट्रान्स-कॉकेशियांतील मेनशेव्हिकांनीं तर या कल्पनेचा जोराचा पुरस्कार करण्यास सुरुवात केली होती. गुप्त क्रांतिकारी पक्ष आतां कामगारवर्गाला उपयोगी पडावयाचा नाहीं तेव्हां त्याच्या जागीं शांततावादी पार्लमेंटरी पद्धतीनें चळवळ करणारा कामगारपक्ष काढावा. या पक्षास कायदेशीरपणें व उघडपणें काम करण्यास आतां सरकारनेंच परवानगी दिली आहे. शिवाय या पक्षानें आतां वर्गकलहाचें व भांडवलदार वर्गाशीं फटकून वागण्याचें धोरण सोडून देऊन भांडवलवाल्यांशीं सहकार करून कामगारवर्गाची परिस्थिति सुधारण्याची चळ-वळ करावी, असें मेनशेव्हिक म्हणूं लागले होते. या क्रांतिपक्षभंजकांविरुद्ध स्टॅलिननें जोराची चळवळ केली. त्यांचें सर्व प्रचारकार्य त्यानें ठिकठिकाणीं हाणून पाडलें. स्टॅलिनचा हा विरोधाचा तडाखा इतका जोराचा होता कीं, अपक्ष कामगार परिषद भरविण्याची कल्पना मेनशेव्हिकांना सोडून द्यावी लागली.

बोल्शेव्हिक पार्टीनें निश्चित केलेली रशियन सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची पांचवी कॉंग्रेस लंडन येथें ब्रदरहुड चर्चमध्यें १९०७ सालीं भरली. पार्टीच्या दीड लाख संघटित सभासदांचे प्रतिनिधी म्हणून तीनशें लोक या कॉंग्रेसला हजर होते. स्टॅलिन या कॉंग्रेसला इव्हॅनोव्हिच या नांवानें हजर होता. तो या

कॉंग्रेसमध्यें कॉकेशियांतील बोलशेव्हिक गटाचा प्रतिनिधि या नात्यानें हजर राहिला होता. स्थानिक परिस्थिति कॉंग्रेसपुढें मांडण्याकरितां व तेथील पार्टीच्या चळवळीची माहिती सांगण्याकरतां त्याला पाठविण्यांत आलें होतें. या परिषदेस ट्रॉट्स्कीही हजर होता. मेनशेव्हिझमकडील त्याचा कल सर्वांना माहीत होता व 'तसाच तो' म्हणून त्याच्याकडे कानाडोळा करण्यांत आला होता. या परिषदेंत ट्राट्स्कीनें लेनिनवर जोराचे कर्णकटु हल्ले चढविले. स्टॅलिनचें या गोष्टीकडे पूर्ण लक्ष होतें. या कॉंग्रेसमध्यें बोल्शेव्हिक व मेनशेव्हिक प्रथम जवळ जवळ सारखेच होते; पण अखेर बऱ्याचशा चर्चेनंतर बऱ्याचशा मेनशेव्हिकांनीं प्रामाणिकपणानें आपल्याला पटलेल्या विचारसरणीला अनुसरून मत दिल्यामुळें बोलशेव्हिकांचा विजय झाला. कामगारचळवळींशीं सहानुभूति असलेल्या सर्व पक्षांचा समावेश होईल अशी व्यापक व सर्वसंग्रही कामगार-परिषद भरवावी, या प्रश्नावरच या परिषदेंत चर्चा झाली व मेनशेव्हिकांची ही कल्पना बोलशेव्हिकांनीं हाणून पाडली. परिषदेनंतर मेनशेव्हिकांच्या बुद्धीचें कसें दिवाळें निघालें आहे व कम्यूनिझमच्या शत्रुस्थानीं असलेल्या भांडवलवाल्यांना ते कसे मदत करीत आहेत, हें त्यानें अनेक टीकात्मक लेख लिहून दाखवून दिलें. या पांचव्या कॉंग्रेसमध्यें मेनशेव्हिझमविरुद्ध बोलशेव्हिझमचा विजय झाला व बोलशेव्हिझमवरची स्टॅलिनची निष्ठा अधिकच दृढ झाली. या परिषदेसंबंधानें "प्रतिनिधीचीं टिपणें" या नांवाचा जो लेख त्यानें लिहिला त्यांत रशियांतील सर्व पुढारलेल्या कामगार-कार्यकर्त्यांचें ऐक्य या परिषदेंत घडून आलें, असें त्यानें नमूद केलें आहे. क्रांतिकारी सोशल डेमॉक्रसीच्या निशाणाखालीं अखिल रशियन पार्टींत आतां हे लोक एकत्र आले आहेत, असेंही त्यानें त्यांत म्हटलें आहे. कामगारांची स्थिति सुधारण्यासंबंधाचे व त्यांच्या हक्कासंबंधाचे जे ठराव या कॉंग्रेसमध्यें करण्यांत आले, त्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. कारण या परिषदेनंतर थोड्याच दिवसांत ड्यूमाचें विसर्जन करण्यांत आलें, कामगार-संस्थांचीं कायदेशीर पत्रें बंद करण्यांत आलीं, सर्व देशभर दडपशाहीचें सत्र सुरू झालें, अनेक क्रांतिकारी पक्ष मोडून टाकण्यांत आले, व सर्वांची धरपकड व हद्दपारी करून कामगार-चळवळीचें डोकें ठेंचून टाकण्याचा झारनें पुन्हा एकदां जोराचा प्रयत्न केला.

स्टॅलिन या दिवसांत बाकू येथें कामगार-चळवळीचें कार्य करीत होता.

पार्टीतर्फे त्याची या भागांत कायमची नेमणूक झाली होती. येथें आल्यावर त्यानें "बाकू कामगार" नांवाचें एक नवीन पत्र सुरू केलें. बालाखानी, बिबि, इबाट, चर्नीगोरोड व वेलयीगोरोड या बाकूमधील जिल्ह्यांत कामगार-संघटनांतून कामें करणाऱ्या मेनशेव्हिकांना त्यानें हांकून लावलें. बाकूला त्यानें बोल्शेव्हिझमचा बालेकिल्ला बनविलें. १९०६ नंतर झारनें आपलें धोरण बदलून कामगार-चळवळींना व समाजवादी क्रांतिकारकांना दडपून टाकण्या-करतां सर्वत्र धरपकडीचें व कामगारसंघटना मोडण्याचें सत्र सुरू केलें. त्यामुळें रशियाच्या सर्व भागांत गुप्त पोलिसांचें जाळें पसरलें. पुन्हा एकदां रशियांत उघड पोलिस व गुप्त पोलिस यांचें साम्राज्य चालू झालें होतें, अशा वेळीं सर्व कामें अर्थातच गुप्तपणें करावीं लागत. गुप्त पोलिसांचा सर्वत्र सुळसुळाट असतांही स्टॅलिनचीं सर्व कामें अगदीं सुरळीतपणें चालू होतीं. "बाकू कामगार" पत्राचा छापखाना एका कबरस्थानांतील भुयारांत चालू होता. कबरस्थानाचें रक्षण करण्याकरतां ठेवलेला एक म्हातारा मुसलमान व त्याचे तरुण मुलगे या छापखान्यांत कामें करीत व त्याचें रक्षणही करीत. गुप्त पोलिसांनीं जंगजंग पछाडलें, पण शेवटपर्यंत त्यांना या छापखान्याचा सुगावा लागला नाहीं. कामगारकार्यकर्त्यांना शोधून काढून त्यांना पकडण्याचा व कामगारचळवळीची धूळधाण उडविण्याचा पोलिसचा एका बाजूला सपाटा चालू होता, तर त्याच वेळीं दुसरीकडे पोलिसच्या हातावर तुरी देऊन या संघटना व चळवळी जिवंत ठेवण्याचा व त्या चालविण्याचा स्टॅलिनप्रभृति बाकू प्रांतांतील बोल्शेव्हिक कामगारकार्यकर्त्यांचा व पुढाऱ्यांचा सपाटाही जोरांत चालू होता. कोण कुणाला मागें टाकतो, याची जणूं काय स्पर्धाच या वेळीं लागली होती. या वेळींही अनेक संप बाकू प्रांतांत झाले. स्टॅलिननें गुप्तपणें हे संप यशस्वी रीतीनें चालवून तेलाच्या खाणीवाल्यांना दांतीं तृण धरावयास लावलें. या तेलमालकांनीं कामगारांच्या मागण्या तर मान्य केल्याच व त्याबरोबर उभयपक्षीं सामुदायिक कराराचें तत्त्वही त्यांनीं मान्य केलें. स्टॅलिनच्या नेतृत्वाखालीं बाकूच्या बोल्शेव्हिकांनीं कामगारवर्गांत राजकीय जागृतीही केली. कामगारवर्गावरील अन्याय व जुलूम पूर्णपणें नाहींसा व्हावयाचा असल्यास झारशाहीचा व त्याबरोबरच भांडवलशाहीचा नाश झाला पाहिजे या वर्गजागृतीच्या तत्त्वाचा प्रसार बाकू-बोल्शेव्हिकांनीं केला.

१९०७ च्या अखेरीच्या दिवसांत झारच्या दडपशाहीचा वरवंटा रशियाच्या इतर प्रांतांत फिरत होता आणि बाकूमध्यें पहावें तर तेथील खाणीं- तील कामगारांनीं आपलें एक पार्लमेंट स्थापलें होतें व त्यांत आपल्या परिस्थितीसंबंधानें ते विचार करीत होते. या पार्लमेंटची बैठक ट्रोनोव्ह नांवाच्या एका बोल्शेव्हिक कामगाराच्या अध्यक्षतेखालीं झाली. कामगार- चळवळींतील बोल्शेव्हिकांच्या डावपेचांना व धोरणाला या पार्लमेंटांतील बहुसंख्य सभासदांनीं मान्यता दिली. ही मान्यता केवळ पार्लमेंटच्या सभासदांनींच दिली असें नाहीं तर प्रांतांतील तेल-कामगारांची या प्रश्नावर सार्वत्रिक मतमोजणी करण्यांत आली त्या वेळींही प्रचंड बहुसंख्येनें बोल्शे- व्हिकांच्या डावपेचांना व धोरणाला मान्यता दिली. याच कामगारांच्या पार्ले- मेंटमध्यें आठ तासांचा दिवस, जमीन-मालमत्तांची जप्ती, आणि लोकसत्ता- त्मक राज्यपद्धति अशा कामगारांच्या मागण्याही निश्चित करण्यांत आल्या. स्टॅलिननें बाकूच्या कामगारवर्गाला बोल्शेविझमच्या तेजस्वी विचारसरणीची व धोरणाची इतकी ओळख पटवून दिलेली होती कीं, १९१७ च्या क्रांतीच्या वेळीं या प्रांतांतील कामगार-क्रांतीकरितां, कामगार-सर्वाधिकारीसत्तेकरितां व समाजसत्तावादाची प्रस्थापना करण्याकरतां चाललेल्या लढ्यांत आघाडीला राहिले व त्यांनीं मोठमोठाले विजय संपादन केले. बाकूच्या तेल-काम- गारांच्या लढ्याच्या या दोन वर्षांत स्टॅलिनला पुष्कळ अनुभव मिळाले. या- संबंधानें त्यानें आपला पुढील मजेदार अनुभव १९२६ च्या जूनमध्यें झालेल्या टिफ्लिस रेल्वे वर्कशॉपमधील कामगारांच्या सभेंत सांगितला.

"बाकूच्या तेल-कारखान्यांतील कामगारांत राहून मीं दोन वर्षें जें क्रांति- संघटनेचें कार्य केलें त्या कार्यानें मला पोलादासारखें कणखर बनविलें, व्यवहारकुशल लढवय्या बनविलें व क्रियाकुशल नेत्यांपैकीं एक नेता बनविलें. वाटसेक व साराटोवेट्झ या बाकूमधल्या पुढारलेल्या कामगारांचा माझ्याशीं आलेला संबंध व कामगार व तेल-मालक यांच्यांतील तीव्र लढ्याचें वादळ या दोन्हींनीं प्रचंड कामगारजनता कशा रीतीनें विचार करीत असते, हें प्रथम मला शिकविलें. बाकूमध्येंच मला क्रांतियज्ञाची दुसरी दीक्षा दिली. याच ठिकाणीं मी क्रांतीचा रोजंदार बनलों."

# क्रांति-विद्यालय

# ५

बाकू विभागांत स्टॅलिननें कामगारसंघटनेचें नवीन क्षेत्र निर्माण केलें होतें, व या दिवसांत त्याचें हेंच मुख्य कार्यक्षेत्र झालें होतें, तरी तो मधूनमधून टिफ्लिस भागांत जात येत होता. तेथल्या बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांना तो वेळोवेळीं सल्ला देत होता व इतर अनेक बाबतींत तो व त्याचे दोस्त या विभागांतील आपल्या दोस्तांना मदत करीत होते. स्टॅलिनच्या सल्ल्याप्रमाणें वागणाऱ्या टिफ्लिसमधील बोल्शेव्हिकांनीं आपल्या पार्टीची संघटना स्थिर व दृढतर करण्याचा प्रयत्न चालविला होता. या कामीं कायदेशीर, बेकायदेशीर सर्व मार्गांचा अवलंब त्यांनीं केला होता. बाकूमधील कामगारांनीं यशस्वी रीतीनें संप चालविले. आपल्या मागण्या पूर्ण करण्यास त्यांनीं मालकवर्गाला भाग पाडलें. आपली पार्लमेंट स्थापून तिच्यांत ते आपल्या स्थितीसंबंधानें विचार करूं लागले. बोल्शेव्हिकांच्या तंत्रानें ते सर्वस्वी वागूं लागले. कायदेशीर, बेकायदेशीर वगैरे सर्व मार्गांचा अवलंब करून बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं बाकू व टिफ्लिस भागांत आपल्या प्रचंड पार्टी संघटना निर्माण केल्या आणि या सर्व चळवळी केव्हां, तर ज्या वेळीं झारनें रशियांत दडपशाहीला सुरुवात करून कामगार-संघटना नेस्तनाबूद करण्याचा चंग बांधला त्या वेळीं.

अशा परिस्थितींत गुप्त पोलिसखात्यानें आकाशपाताळ एक करून शेवटीं एकदां स्टॅलिनचा नक्की शोध लावला व १९०८ च्या मार्चमध्यें त्याला अटक केली. क्रांतीला चिथावणी देण्याचा व बाकू संप-कमिटीवर सभासद या नात्यानें काम करण्याचा असे दोन आरोप त्याच्यावर ठेवण्यांत आले. कोर्टांमध्यें क्रांतीला चिथावणी देण्याचा आरोप पोलिस अधिकाऱ्यांना सिद्ध करतां आला नाहीं आणि दुसऱ्या आरोपाच्या बाबतींतही पोलिसला भक्कम पुरावा सांपडला नाहीं तरी त्याला अठरा अठरा महिन्यांच्या दोन शिक्षा सांगण्यांत आल्या. दोन्ही शिक्षा हद्दपारीच्या होत्या. युरोपियन रशियाच्या उत्तरेकडील सॉल्व्ही शेगोदस्क येथें त्याचें हद्दपारीचें ठिकाण मुक्रर करण्यांत आलें होतें.

पण यापूर्वीं त्यानें आठ महिने बाइलोव्ह तुरुंगांत काढले होते व हद्दपारीच्या ठिकाणाला पोंचवीपर्यंत त्याला त्याच ठिकाणीं ठेवण्यांत आलें होतें. बाकू भागांतील या बाइलोव्ह तुरुंगांत एका ईस्टरच्या रविवारीं पहाटे तेथील राजकीय कैदी एकदम दंगा करूं लागले. गटागटानें या सेलपासून त्या सेलपर्यंत जाऊन दंग्यांत सामील होण्याबद्दल ते कैद्यांना सांगूं लागले. एक सशस्त्र टोळी स्टॅलिनच्या सेलच्या दारावर धक्के देऊं लागली. पण स्टॅलिन या दंग्यांत सामील झाला नाहीं. दंगेखोरांपैकीं एकानें त्याच्यावर बंदूक रोखली तरीही दंग्यांत सामील होण्याचें त्यानें साफ नाकारलें. सकाळीं दंगा मोडून टाकून सर्वत्र बंदोबस्त करण्यांत आला. 'पशू' म्हणून प्रसिद्ध असलेल्या सेलयान्स्क रेजिमेंटच्या पहिल्या कंपनींतील सोल्जरांना हा दंगा मोडण्याकरतां पाठविण्यांत आलें होतें. या सोल्जरांना दोन रांगेंत उभें करण्यांत आलें होतें व रायफलच्या बुंध्यांचा उपयोग करण्याचा त्यांना हुकूम देण्यांत आला होता. सगळया राजकीय कैद्यांना एका फाइलमध्यें उभें करण्यांत आलें होतें. या फाइलमधून एक एक कैदी बाहेर काढायचा व त्याला या दोन्ही रांगांमधून चालायला लावायचें व त्यांत उभ्या असलेल्या सोल्जरांनीं रायफलच्या बुंध्यांनीं त्याला ठोकून काढायचें असा हा कार्यक्रम होता. स्टॅलिन दंग्यांत नव्हता तरी त्याला फाइलमध्यें उभें करण्यांत आलें होतें. त्याच्यावर पाळी आली त्या वेळीं तो मुळींच डगमगला नाहीं. सगळ्यांवर आलेल्या प्रसंगाला त्यानें स्वतःही धैर्यानें तोंड दिलें. स्टॅलिन फाइलींत उभा होता तेव्हां त्याच्या हातांत एक पुस्तक होतें. हें पुस्तक हातांत वर धरून, छाती व मान ताठ ठेवून, या रांगेंतून तो शांतपणें चालत गेला. रांग संपेपर्यंत त्याच्यावर बुंध्यांच्या माराचा सारखा वर्षाव चालू होता. या वेळीं 'कोबा' या नांवानें तो ओळखला जात होता.

सबंध कॉकेशसमधील हद्दपार कैदी सैबेरियांत अगर उत्तरेकडील जंगलांतून पाठवावयाच्या पूर्वीं ते सर्व या बाइलोव्हच्या सेंट्रल जेलमध्यें ठेवण्यांत येत असत. फक्त चारशें कैद्यांची राहण्याची व्यवस्था होईल अशा रीतीनें हा जेल बांधण्यांत आला होता. पण या वेळीं या जेलमध्यें पुरुष व स्त्री कैदी गर्दीनें कोंबून भरण्यांत आले होते. असल्या गर्दीमुळें राजकीय कैद्यांच्या बाबतींत थोडासा ढिलाच कारभार होता. "हा जेल म्हणजे धंदेवाईक

क्रांतिकारकांचें एक ट्रेनिंग स्कूलच बनलें होतें. प्रचारक तयार करण्याची संस्था, लढाऊ कामगार-कार्यकर्त्यांचें एक विद्यालय असेंच या जेलला स्वरूप आलें होतें.

कोबा एक मार्क्सवादी विद्यार्थी या नात्यानें राजकीय कैद्यांच्या निरनिराळ्या मंडळांतून वावरत होता. रुंद कॉलरचा, पट्टा नसलेला निळ्या सॅटिनचा झगा तो वापरीत असे. तो उघडा बोडका हिंडत असे. त्याच्या हातांत नेहमींच एखादें पुस्तक असे. मध्यमपेक्षां थोड्या जास्त उंचीचा असा तो मांजरांसारखीं हळूहळू पावलें टाकीत असे. अंगानें सडपातळ, टोंकदार चेहरा, त्याच्यावर देवीचे वण, सरळ नाक, अरुंद कपाळाखालून पाहणारे बारीक डोळे. पाहणाराच्या मनावर परिणाम करणारी अशी ही त्याची चेहरेपट्टी होती. तो फार थोडें बोलत असे व कोणाशीं स्नेहसंबंध जोडण्यास तो तयार नसे. त्या दिवसांतला स्टॅलिन बेदरकारपणें वागत असे. कोणतेच नियम तो पाळीत नसे. बाकूमधील राजकीय कैदी गुन्हेगार कैद्यांपासून शक्य तितके वेगळे राहण्याचा प्रयत्न करीत असत. या अलिखित कायद्याचा कोणी तरुण राजकीय कैद्यानें भंग केल्यास त्याला शिक्षा करण्यांत असे. राजकीय कैद्यांनींच हा नियम केला होता. पण स्टॅलिन हा नियम उघडपणें भंग करी. बदमाष, उचले, चोर, दरोडेखोर वगैरे गुन्हेगार कैद्यांत स्टॅलिन मिसळलेला दिसायचा. असल्या कैद्यांच्या कोठडींत राहण्यासही तो तयार असे. चळवळे, धाडसी व कांहीं तरी कर्तबगारीचीं कृत्यें करणारे लोक त्याला नेहमींच आवडत. हे लोक जिवावर उदार होऊन असलीं कृत्यें करण्यास कां प्रवृत्त होतात या गोष्टीचा तो त्यांच्यांत मिळून-मिसळून राहून विचार करीत असे.

कोणत्याही प्रश्नावर उगाच व्यक्तिविषयक चर्चा करीत बसण्यास स्टॅलिन तयार नसे. संघटित रीतीनें वादविवाद चालविण्याचें आपल्या विरोधकांना तो आव्हान देत असे. किसानांचा प्रश्न, क्रांतींतील डावपेंच, समाजवाद व तत्त्वज्ञानात्मक विषय यावर जेलमधील राजकीय कैद्यांमध्यें वादविवाद चाले. कधीं बोलशेविक गटाचा प्रतिनिधि या नात्यानें तर कधीं अध्यक्ष या नात्यानें तर कधीं कधीं विरोधक या नात्यानें तो या वादविवाद मंडळांत भाग घेत असे. जेलमधील बोलशेव्हिक गटानें बाहेरच्या कामगारसंघांशींही आपले संबंध

जुळवून ठेवले होते. कामगारसंघाच्या हालचालींची खडानूखडा माहिती मिळवून त्यांना सल्ला देण्याचें काम स्टॅलिन करीत असे व 'बाकू कामगार' पत्राला वारंवार लेख पुरवीत असे. एके वेळीं तर पत्राचा सर्वच्या सर्व मजकूर जेलमधें तयार करून पाठविण्यांत आला. जेलमधें जे वाद होत त्यांचेच प्रतिध्वनि अर्थात् या वर्तमानपत्राच्या लेखांतून उमटत असत. स्टॅलिनची मुद्रा व वागण्याची पद्धति वादविवादाला सहायक नसे. विनोद त्याला माहीत नव्हता. आपले विचार अगदीं रुक्ष भाषेंत श्रोत्यांपुढें तो मांडीत असे. अगदीं यंत्राप्रमाणें अचूकपण दाखविणाऱ्या त्याच्या स्मरणशक्तीकडे पाहून श्रोते आश्चर्यचकित होत. मार्क्सचें कॅपिटल बहुतेक त्याला पाठ होतें. एकाद्या विषयावर त्यानें एकदां आपलें ठाम मत बनविलें म्हणजे त्यापासून तो ढळायचा नाहीं. एखाद्या विषयावर मार्क्सचे समानार्थक उतारेचे उतारे तो भराभर म्हणून दाखवी. तरुण मंडळीच्या मनावर या गोष्टीचा फार परिणाम होत असे. कोबाच्या मनाचा समधातपणा वाखाणण्यासारखा होता. कधीं कधीं असेही प्रसंग येत कीं, ज्या वेळीं जेलमधील सर्व कैदी अस्वस्थ होत. विशेषतः रात्रीं एकाद्याला फांशी द्यावयाचें आहे, अशी बातमी आली कीं, सर्व कैदी बेचैन होत. त्यांच्या डोळ्यांवरील झोप उडून जाई. पण कोबाकडे पहावें तर त्या वेळीं तो गाढ झोपेंत मग्न झालेला दिसे.

बाकू जेलमध्यें येण्यापूर्वीं कांहीं महिने स्टॅलिननें एका जॉर्जियांतील मुलीशीं लग्न केलें होतें. ही मुलगी पार्टीची सभासद व बोल्शेव्हिक कार्यकर्ती होती. स्टॅलिनचें हें पहिलें लग्न १९०८ सालीं झालें. या बायकोपासून स्टॅलिनला एक मुलगा झाला. त्याचें नांव त्यानें जेकब ठेवलें. त्याचें लाडकें नांव याशा असें होतें. हे बापलेक कधींही एकत्र राहूं शकले नाहींत. कैद, हद्दपारी, पुन्हा कैद, पुन्हा हद्दपारी. बाहेर राहिलाच तर अत्यंत गुप्तपणें. स्टॅलिनचें जीवन अशा प्रकारचें अस्थिर होतें.

जेलमध्यें आठ महिने काढल्यानंतर स्टॅलिनला त्याची दोन वर्षांची हद्दपारीची शिक्षा भोगण्याकरतां व्होलोगदा प्रांतांतील सोल्व्हयचेगोदस्क या हद्दपारीच्या गांवीं पाठविण्यांत आलें. या ठिकाणीं तो फार दिवस राहिला नाहीं. १९०९ मध्यें तो तेथून निसटला व प्रथम सेंटपीटर्सबर्गला आला. तेथून एक महिन्यानें तो बाकू प्रांतात दाखल झाला व आपल्या गुप्तप्रचाराच्या कार्याला

त्यानें सुरुवात केली. बाकू येथें आल्यानंतर टिफ्लिस येथें बोलशेव्हिकांची एक परिषद भरविण्याची त्यानें तयारी केली व त्याचबरोबर "टिफ्लिस कामगार" नांवाचें पत्र छापण्याचीही तयारी त्यानें केली. या पत्राच्या पहिल्या अंकांत त्यानें पुढील विचार प्रकट केले होते.

"रशियांतील ती मोठी क्रांति अद्याप मृत झालेली नाहीं. ती अद्याप जिवंत आहे. तिनें केवळ पीछेहाटीचें धोरण स्वीकारलें आहे. आणि भविष्यकालीं एक अचाट कृत्य करण्याची ती तयारी करीत आहे.

"क्रांतीचे मुख्य घटक कामगार व शेतकरी जिवंत आहेत, ते आपलीं हत्यारें परजून तयार आहेत. आपल्या जिव्हाळयाच्या मागण्या ते सोडून देणार नाहींत व सोडून देणें शक्य नाहीं."

"१९०५ प्रमाणें आतांही क्रांतीचा पुढाकार घेणें व पूर्ण विजय होईल अशा मार्गानें तिला नेणें हें आपलें काम आहे.

"याकरितां एक अत्यंत बलशाली व एकजुटीची पार्टी असणें आवश्यक आहे. येत्या क्रांतीच्या युद्धासाठीं कामगारांच्या सर्व शक्ति संघटित करण्याकरतां अशा पार्टीची आपल्याला अत्यंत आवश्यकता आहे."

झारच्या मर्जीतला स्टालिपिन याचा राज्यकारभार या दिवसांत चालू होता. दडपशाहीचे हे भयंकर दिवस होते आणि क्रांतिकारकांच्या गटांतील देखील कांहीं लोक या वेळीं नामोहरम झाले होते. बोल्शेव्हिकांत फूट पडून अनेक गट निर्माण झाले होते. पण त्यांचा स्वभाव असा होता कीं, संकटाची जसजशी भरती येत जाई तसतशी तिचा प्रतिकार करण्याच्या त्यांच्या मनःसामर्थ्यालाही भरती येत असे. स्टॅलिनच्या मनाचा पोलादी कणखरपणा या वेळीं दिसून आला. त्यानें आपल्या पत्रद्वारें व पत्रकांच्याद्वारें आपल्या दोस्तांच्या मनांतील कमकुवतपणा काढून टाकला. मेनशेव्हिक गुप्त चळवळ नको म्हणणारे व सनदशीर चळवळवाले होते त्यांचा खरपूस समाचार घेऊन आपल्या पार्टींतील लढाऊ व क्रांतिकारी जोम कायम ठेवण्याचा त्यानें शर्थीचा प्रयत्न केला व त्यांत त्याला यशही आलें.

पण या वेळीं त्याला फार दिवस बाहेर राहणें शक्य झालें नाहीं. कामगार-चळवळींतीलच गुप्तहेरांच्या एजंटांनीं स्टॅलिनचा सुगावा लावला आणि मार्च १९१० मध्यें पळून आलेला हद्दपारी म्हणून त्यास पकडण्यांत आलें. हद्दपारीची

त्याची या वेळची तीन वर्षांची शिक्षा पांच वर्षें करण्यांत आली. अशा पळून येणाऱ्या लोकांना पुन्हा हद्दपार करतांना सैबेरियांतील किंवा पूर्व रशियाच्या उत्तरेकडील भयाण अरण्यांत पाठविण्यांत येतें. पण स्टॅलिनच्या बाबतींत तसें करण्यांत आलें नाहीं. पुन्हा त्याला पहिल्याच सोल्व्हयचेगोदस्क या गांवीं पाठविण्यांत आलें.

या ठिकाणीं आल्यावर तेथील राजकीय हद्दपारी कैद्यांना आपल्या पार्टीचें अचूक धोरण समजावून देण्याचें काम त्यानें सुरू केलें. कामगारांची क्रांतिसंघटना हें स्टॅलिनचें आवडतें जीवितकार्य होतें. याकरितां आपल्याला झालेल्या कोणत्याही कैदेची किंवा हद्दपारीची मुदत त्यानें पुरती भोगली नाहीं. अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करून तो जेलमधून व हद्दपारीच्या मुलखांतून निसटायचा व आपल्या कामाला लागायचा. पण जेव्हां त्याचा नाइलाजच होई व प्रसंगीं त्याचे दोस्तच निमकहराम होऊन त्याला पोलिसाच्या स्वाधीन करीत त्या वेळीं त्याला कारागृहांत व हद्दपारीच्या ओसाड मुलखांत दिवस काढावे लागत. पण अशा परिस्थितींतही तो कधींही डगमगून गेला नाहीं. तो कधींही निराश झाला नाहीं. कांहीं हद्दपारी लोकांप्रमाणें तो आपल्या जिवाला कंटाळला नाहीं. उलट तो हद्दपारीच्या मुलखांत आला कीं, त्याच्या चळवळीच्या कार्याला एक निराळीच दिशा लागे बाहेर तो कामगारांना व किसानांना वर्गजागृत व राजकीय क्रांतिकारी बनवी, तर शिक्षेच्या व हद्दपारीच्या दिवसांत देशांतील निरनिराळ्या पक्षांतील मध्यमवर्गीय तरुणांना व तेथें आलेल्या कांहीं कामगारवर्गांतल्याही पुढाऱ्यांना मार्क्सवादाचें क्रांतिकारी रहस्य समजून देण्याचें कार्य तो अंगावर घेई. अविरत श्रम हें स्टॅलिनच्या जीवनाचें मुख्य सूत्र आहे. बाहेर काय किंवा आंत काय, या अविरत श्रमांमुळें व मार्क्सवादावरील निष्ठेमुळें मेनशेव्हिक, सोशालिस्ट रेव्होल्युशनरी या पक्षांतील किती तरी तरुणांना त्यानें आपलेसें करून सोडलें होतें.

१९०९ ते १९११ हा काल तर अत्यंत बिकट होता. एकीकडे झारची अनन्वित दडपशाही चालू होती व समाजवाद्यांमध्येंही अनेक पक्षोपपक्ष निर्माण झाले होते. १९१० च्या प्रारंभीं तो हद्दपारीच्या पहिल्या गांवीं गेल्याबरोबर तेथें आसपास जमलेल्या रशियांतील हद्दपाऱ्यांत क्रांतीचें पुढारीपण कोणाकडे असावें या वादाला जणूं काय ऊत आला होता.

अर्थात् स्टॅलिनही या वादांत पडला. या विषयावर त्यानें अनेक व्याख्यानें दिलीं व आपली विचारसरणी तेथल्या राजकीय हद्दपाऱ्यांच्या गळीं उतरविली. त्याच्या स्वभावाप्रमाणें केवळ तात्त्विक चर्चेवर व वादविवादावर तो थांबला नाहीं तर या ठिकाणच्या निर्वासितांमध्यें त्यानें समाजवादी गट प्रस्थापित केले. या भागांतील इतर निर्वासितांतूनही निवडक लोक त्यानें आपल्या गटांत सामील करून घेतले. यांपैकीं जन्मतःच कटवाले असे जे लोक त्याला आढळून आले त्यांना गुप्त राहून क्रांतिसंघटनेचें कार्य कसें करावें, या कलेचें त्यानें शिक्षण दिलें.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे याच वेळीं एका बाजूला लेनिन व प्लेखानोव्ह व दुसऱ्या बाजूला ट्रॉट्स्की, मारटोव्ह, बोगडानोव्ह, झिनोव्हिफ, कामेनेव्ह वगैरे पुढाऱ्यांमध्यें कामगार-चळवळीच्या प्रत्यक्ष कामासंबंधाच्या धोरणासंबंधानें खडाजंगी चालू होती. बोलशेव्हिक व प्लेखानोव्हच्या मताचें मेनशेव्हिक यांचा तात्त्विक पायावर एक ब्लॉक बनवून आपली पार्टी प्रबल बनवावी व तिचें पुनरुज्जीवन करावें या लेनिनच्या मताचा स्टॅलिननें अर्थातच पुरस्कार केला. आपल्या हद्दपारीच्या गांवाहून पाठविलेल्या पत्रांतही त्यानें लेनिनचें हें धोरण उचलून धरलें आणि रशियांतील कामगार-संघटना-कार्याच्या दृष्टीनें पार्टीच्या धोरणाचे सर्व खरे पुरस्कर्ते एकत्र आणून त्यांचा ब्लॉक बनविणें अत्यंत हितप्रद आहे, असें त्यानें आपलें मत प्रदर्शित केलें. ट्रॉट्स्कीनेंही क्रांतिकारी पक्षाच्या विरोधकांचा व 'गुप्त चळवळ करणारा पक्ष नको' म्हणणाऱ्या सर्व प्रकारच्या लोकांचा गट बनविण्याचा उद्योग चालविला होता. या गटाचा स्टॅलिननें अर्थातच निषेध केला.

"ट्रॉट्स्कीचा ब्लॉक म्हणजे शुद्ध तत्त्वहीनता आहे. विजातीय तत्त्वांचा तो एक मिलाफ आहे. एका चांगल्या तत्त्वासंबंधानें असलेला एका तत्त्वहीन माणसाचा खुळा छंद आहे. तर्कदृष्ट्याच बोलायचें म्हणजे स्वाभाविकच हा खरमरीत तत्त्वाचा प्रश्न आहे. अनेक विजातीय तत्त्वांच्या खिचडीचा या कामीं कांहीं उपयोग नाहीं." असें या पत्रांत स्टॅलिननें म्हटलें आहे. "कॉकेशसहून पत्र" या स्टॅलिनच्या प्रसिद्ध व पुढें सोशल डेमॉक्रॅटच्या अकराव्या अकांत प्रकाशित झालेल्या पत्रांत ही गुप्त चळवळ करणारा पक्ष मोडून टाकण्यास सांगणाऱ्या लोकांवर, तडजोडवाल्यांवर, टॉट्स्काइटांवर त्यानें हल्ला चढविला आहे

व कामेनेव्ह, झिनोव्हिफ, रायकोव्ह यांच्या दगेबाज वर्तणुकीमुळें पार्टींत जो गोंधळ माजला आहे तो मिटविण्यासंबंधानेंही त्यानें या पत्रांत विनंति केली आहे. आणि याकरितां ताबडतोबीचे उपाय म्हणून पार्टीची सर्वसाधारण परिषद भरवावी, कायद्यानें मंजूर केलेलें एक पार्टीचें पत्र प्रसिद्ध करावें व त्याचा देशभर प्रसार करावा आणि पार्टीच्या प्रत्यक्ष व्यवहार्य हालचालींना योग्य मार्गदर्शन करण्याकरतां रशियामध्यें एक गुप्त केंद्र प्रस्थापित करावें, असें त्यानें या पत्रांत सुचविलें आहे.

# कोबाची यशस्वी फरारी ६

तुरुंगांतून व हद्दपारीच्या मुलखांतून पोलिस हेरांच्या हातांवर तुरी देऊन निसटून जाणाऱ्यांपैकीं स्टॅलिन हा सर्वांत अत्यंत यशस्वी झुकांडी मारणारा अशी त्याची ख्याती झाली होती. स्टॅलिनपेक्षां जास्त वेळां झुकांडी मारणारे अनेक लोक होते पण पोलिसच्या हातांत सांपडल्यानंतर पुन्हा जुजबी शिक्षेवर हद्दपार झालेल्यांची संख्या फारच थोडी. स्टॅलिनच्या गुप्त कटाच्या हालचाली इतक्या विलक्षण होत्या कीं, आपल्या पळत्या पावलांचा तो मागमूसही लागूं देत नसे. आणि पोलिस अधिकाऱ्यांचा असा ग्रह तो करून सोडी कीं, पार्टीचे आपण एक अगदीं क्षुल्लक व क्षुद्र सभासद आहों. पण ही स्थिति पालटली. तो जसजसा महत्त्वाच्या जागीं काम करूं लागला तसतसा त्याचा सुलभपणें तलास लागूं लागला. स्टॅलिनचें वय त्या वेळीं एकतीस वर्षांचें होतें. चौदा वर्षें त्यानें कॉकेशसमध्यें क्रांति-संघटनेचें कार्य केलें. आतां हा स्वदेश सोडून देण्यास व व्यापक राष्ट्रीय कार्यक्षेत्रांत काम करण्यास तो तयार झाला होता. १९११ च्या वसंत ऋतूंत सेंट्रल कमिटीच्या सूचनेवरून तो या वेळीं हद्दपारींतून निसटला व पेट्रोग्राड हें त्यानें आपलें कार्यक्षेत्र बनविलें. इव्हॅनोव्ह हें नांव धारण करून या राजधानीच्या शहरांतील एका लहानग्या हॉटेलमध्यें तो राहिला होता. निरनिराळ्या वेळीं निरनिराळे पोषाख करून देशांतील मुख्य कामगार-केंद्रांना तो वारंवार भेट देत असे आणि पार्टीच्या विस्कळित झालेल्या गटांना एकत्र जोडण्याचा तो प्रयत्न करीत असे. पहिल्या प्रतीचें संघटनाचातुर्य त्याच्या ठिकाणीं आहे, हें त्यानें या प्रसंगीं दाखवून दिलें. लेनिनच्या "सोशल डेमोक्रॅट" पत्रांत वारंवार तो लेखही देत असे. या मासिकाच्या सप्टेंबरच्या अंकांत त्याचा जो लेख प्रसिद्ध झाला त्याला लेनिननें पुढील टिप्पणी जोडली:—

"आपली पार्टी ज्यांना मोलवान् वाटते त्यांच्या दृष्टीनें कोबाचा हा पत्रव्यवहार महत्त्वाचा आहे. तडजोडवाल्यांच्या व शांततावाद्यांच्या आशांचा व विचारांचा इतक्या चांगल्या रीतीनें कोणीच धुव्वा उडविलेला नाहीं."

पण यानंतर थोड्याच दिवसांनीं पेट्रोग्राडमधील हॉटेलच्या खोलींत त्याला पकडण्यांत आलें. कांहीं महिने तुरुंगांत ठेवल्यानंतर व्होलोगदा प्रांतांतील त्याच्या मूळच्या गांवीं त्याला हद्दपार करण्यांत आलें. या वेळीं तो या ठिकाणीं फार दिवस राहिला नाहीं. निसटून जाण्याची जी संधि त्याला प्रथम मिळाली, तिचा त्यानें फायदा घेतला व १९११ च्या अखेर तो पुन्हा पेट्रोग्राड येथें दाखल झाला.

यानंतर लवकरच, जानेवारी १९१२ मध्यें प्रेग येथें झालेल्या रशियन स्पेशल डेमोक्रॅटांच्या परिषदेमध्यें बोल्शेव्हिकांची एक स्वतंत्र पार्टी स्थापण्यांत आली. स्टॅलिन या परिपदेला हजर नव्हता. पण या परिषदेंत बोल्शेव्हिक पार्टीची जी सेंट्रल कमिटी निवडण्यांत आली तिचा एक सभासद म्हणून स्टॅलिनला निवडण्यांत आलें व सेंट्रल कमिटीच्या रशियन ब्यूरोचें काम त्याच्या हवालीं करण्यांत आलें. स्टॅलिनवर सोंपविलेलें हें काम अत्यंत महत्त्वाचें होतें कारण रशियांतील पार्टीच्या सर्व हालचालींना मार्गदर्शन करण्याचें या ब्यूरोकडे होतें. सेंट्रल कमिटीच्या आदेशानुसार त्यानें देशांतील सर्व महत्त्वाच्या केंद्रांना भेट दिली. प्रेग परिषदेंत पास झालेल्या ठरावांची अमलबजावणी करण्याकरतां देशभर चळवळ चालविण्याची त्यानें संघटित व्यवस्था केली. सर्व देशभर मे-दिनाचा समारंभ मोठ्या प्रमाणावर करण्याबद्दलही त्यानें सर्व कामगारसंस्थांना निश्चित सूचना दिल्या. त्याच्या पुरस्कारानें सुरू झालेल्या "झ्वेझदा" पत्राचें काम सुरळीत चालेल अशी योजना त्यानें केली. लेना येथें झालेल्या गोळीबाराचा निषेध करण्याकरतां सर्वत्र राजकीय संप करण्यांत यावे अशी तयारी त्यानें केली. आणि त्याचबरोबर जनतेंत वर्गजागृति निर्माण करण्याकरतां काढण्यांत यावयाच्या "प्रवदा" दैनिकाच्या प्रकाशनाचीही सर्व व्यवस्था लावून दिली.

१९१० च्या अखेर स्टॅलिननें कामगारजागृतीकरतां व पार्टीच्या संघटनेकरतां ज्या सूचना केल्या होत्या त्या सर्व त्यानें स्वतःच अशा रीतीनें अमलांत आणून दाखविल्या. स्टॅलिननें या सूचना केल्या त्या वेळींच 'एंजिन चांगलें वर उचलून रुळावर ठेवण्यांत आलें आहे' असें लेनिननें म्हटलें होतें. त्याचे हे उद्‌गार आतां सार्थ झाले होते. प्रेग परिषदेंत ज्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी ठरविण्यांत आल्या त्यांत चौथ्या ड्यूमाच्या

निवडणुकीच्या चळवळींत बोल्शेव्हिकांनीं भाग घ्यावा, असें ठरविण्यांत आलें होतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. बोल्शेव्हिक पार्टीचें कार्यक्षेत्र याप्रमाणें जसजसें विस्तृत होऊं लागलें, तसतशी पोलिसच्या गुप्त हेरांना या ना त्या मिषानें पार्टींत प्रवेश करून घेण्याची संधि मिळत चालली. स्टॅलिन खुद्द राजधानीच्या शहरांतच आपल्या सर्व चळवळी चालवीत होता. पण त्याची स्थिति दिवसेंदिवस बिकट होत चालली होती. लेनिनचा कुलमुखत्यार म्हणून तो या ठिकाणीं काम करीत होता. स्टॅलिननें आपल्या हालचाली इतक्या गुप्त राखल्या होत्या तरी आपल्या सावलीचा पिच्छा करणारा कोणी तरी आहे, असें त्याला वाटूं लागलें होतें आणि आपल्या गुप्त लपण्याच्या जागीं सुद्धां आपल्याला पकडण्याकरतां जाळें विणण्यांत येत आहे, असा वास त्याला येऊं लागला होता. लेनिनच्या विश्वासांतला व त्याचा लेफ्टनंट म्हणून मानला गेलेला सेंट्रल पार्टीचा एक सभासद मॅलिनोव्हस्की हा गुप्त हेरखात्याचा पगारी नोकर आहे, हें त्याला माहीत नव्हतें.

१९०५ ची क्रांति होऊन सहा वर्षें होऊन गेलीं होतीं. या इतक्या दिवसांत शेतकऱ्यांच्या सर्व चळवळी दडपून टाकण्यांत आल्या होत्या. शेतकरी वर्गाला एका बाजूनें याप्रमाणें नामोहरम करण्यांत आलें होतें तर दुसऱ्या बाजूनें स्टालिंपिननें कांहीं शेतकरी-सुधारणा अमलांत आणून त्याला संतुष्ट ठेवण्याचाही उद्योग चालू ठेवला होता. कामगारवर्गाच्या बाबतींत असेंच धोरण स्वीकारण्यांत आलें होतें. एकीकडे त्याच्या सर्व चळवळी हाणून पाडण्यांत आल्या होत्या, तर दुसरीकडे मर्यादित का होईना, पण कामगारसंघ काढण्याचा हक्क त्याला देण्यांत आला होता. मध्यम वर्ग निराश झाला होता तरी सनदशीर चळवळीचे झोके घेण्यांतच तो आपलें समाधान मानून घेत होता. बुद्धिमान् वर्गांतही कांहीं लोक विनोदी अश्लील वाङ्मय लिहिण्यांत कृतकृत्यता मानीत होते तर कांहीं गूढवादाच्या मागें लागले होते. आणि क्रांतिकारी पक्षांकडे पहावें तर त्यांच्या चिंधड्या उडाल्या होत्या. सर्वत्र गटबाजी वाढली होती. परस्परमत्सर, निंदा, द्वेष यांचा सुकाळ झाला होता. अशा परिस्थितींत झारशाहीची पोलादी पकड अधिकाधिक घट्ट होत गेली व देशांत सर्वत्र निराशामय वातावरण पसरलें. रशियाच्या या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत, बाल्टिक समुद्रापासून पॅसिफिक महासागरापर्यंत निष्क्रियतेचे व

हताशपणाचे थंडगार वारे सुटल्यामुळें जनतेचीं मनें गारठून गेलीं होतीं. जनतेचे पुढारी आपसांत भांडूं लागले. त्याच्यांत फूट पडली आणि जनता निर्नायक बनून हताश झाली म्हणजे तिची पिळणूक करणाऱ्या व तिच्यावर नाना प्रकारचे जुलूम करणाऱ्या जालिमांना विजयोन्माद चढावा, हें साहजिक आहे. झारशाहीला चढलेला उन्माद तिला स्वस्थ बसूं देत नव्हता. देशांतील सर्व राजकीय व क्रांतिकारी चळवळे नामशेष करण्याचा तिनें चंग बांधला होता आणि थोडेंसें कोठें निमित्त सांपडलें कीं, त्याचा फायदा घेऊन जनतेवर सर्रास अत्याचार करण्यास झारचे पोलिस मागेंपुढें पहात नव्हते. सैबेरियांतील एका बाजूच्या प्रदेशांत लेनाच्या सोन्याच्या खाणींतील कामगारांवर १९१२ च्या एप्रिल ४ तारखेस जो तुफान गोळीबार झाला तो या अत्याचारांपैकींच एक अत्याचार होता. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, ब्रिटिश भांडवलवाल्यांनीं-ही आपलें बरेंचसें भांडवल या कारखान्यांत गुंतविलें होतें. मलेरियानें पछाडले-ल्या सैबेरियांतील जंगलांत काम करणाऱ्या, कंगाल व सांथीनें पीडित झालेल्या व आपल्या दुःस्थितीला कंटाळून गेलेल्या कामगारांनीं आपली कांहीं तरी दाद लागावी म्हणून नाइलाजानें संप केला. स्वतः कामगारांनीं आपण होऊनच हा संप केला होता. पण संपवाल्यांच्या मागण्यांचा विचार करण्याचें बाजूलाच राहिलें. उलट त्यांच्यांतील कांहीं लोकांना त्यांचे पुढारी म्हणून पकडण्यांत आलें, संपवाले अधिकच आवेशाला पेटले. खाणींतील एकूण एक कामगार संपांत सामील झाले व त्यांनीं आपल्या अटकेंत ठेवलेल्या पुढारी लोकांच्या मुक्ततेची मागणी केली. नेहमींप्रमाणें झारच्या पोलिसांनीं कोणतीही आगाऊ सूचना न देतां, पुढाऱ्यांच्या मुक्ततेची मागणी करणाऱ्या या हजारों कामगारांच्या जमावावर बंदुकीच्या फेरीवर फेरी झाडल्या व शेंकडों कामगार ठार व जखमी केले. एप्रिल ४ च्या या पोलिसनें केलेल्या कामगारां-च्या कत्तलीची बातमी रशियांतील शहरांपर्यंत येऊन पोंचेपर्यंत आठवडा लागला. रशियांतील थंडगार होत चाललेल्या जनतेला धरणीकंपाचा धक्काच बसला. सर्व देशांतील कामगारवर्गांत प्रचंड खळबळ उडाली. देशांत सर्वत्र संपांची लाट उसळली. लाखों कामगारांनीं या निषेध-संपांतून भाग घेतला.

यानंतर दोन तीनच आठवड्यांनीं आलेल्या मे-दिनाच्या प्रसंगीं झारशाहीच्या या अत्याचाराचा निषेध करण्याकरतां संप व मिरवणुका काढण्याचें देशांतल्या

कामगार-क्रांतिकारी पुढाऱ्यांनीं ठरविलें. १९०७ पासून एवढ्या मोठ्या प्रमाणावर रशियांत कधींच मे-दिन साजरा करण्यांत आला नव्हता. या वर्षीच्या या दिवसाला लेना-निषेधदिनाचें स्वरूप प्राप्त झालें. या दिवशीं देशांत जे सार्वत्रिक संप झाले व मिरवणुका निघाल्या त्यांत आठ-दहा लाखांवर कामगारांनीं भाग घेतला. लेनाच्या कत्तलीनें कामगारजनतेंत नवीन जोश उत्पन्न केला. देशांत सर्वत्र संघटितपणें या कत्तलीचा निषेध करण्याकरतां स्टॅलिननें सर्व देशभर फिरून व्यवस्था केली होती. आणि स्वतः तो या प्रसंगीं सेंट-पीटर्सबर्गमध्यें होता. बोल्शेव्हिकांचें साप्ताहिक 'झ्वेझ्दा' याचें संपादकीय कामही त्याच्याकडे होतें.

बेफामपणानें दडपशाही करून शांतिप्रस्थापनेचें कंकण बांधलेल्या स्टालिपिननें गेलीं कांहीं वर्षें देशांत स्मशानशांतता निर्माण केली होती. जनतेच्या मताची मुस्कटदाबी, दडपशाहीमुळें जनतेला आलेली गुंगी, आपसांतील फूट, दौर्बल्याची जाणीव, सार्वत्रिक निराशा हा स्टालिपिनच्या अत्याचारी कारकीर्दीचा स्वाभाविक परिणाम झालेला होता. वरवर पाहणाराला साहजिकच असें वाटत होतें कीं, क्रांतीचा दिन आतां यापुढें उगवेल, अशी कल्पना करणेंही शक्य नाहीं. प्रशियाच्या धर्तीवर सनदशीर मार्गानेंच रशियाची जी काय प्रगति करतां येईल ती करावी व क्रांतीची आशा सोडून द्यावी, असें बोल्शेव्हिकांतील कांहीं वुद्धया लोकांना वाटूं लागलें होतें व आपल्या बदललेल्या विचारसरणीमुळें त्यांनीं तसा हळूहळू प्रचार करण्यासही सुरुवात केली होती. फटके मारण्याच्या चाबकांचा, रायफलीच्या दस्त्यांचा, गोळीबारांचा व दडपशाहीच्या अंधाराचा याप्रमाणें विजय झालेला होता.

लेनाच्या निषेधदिनानें ही सुस्ती अजीबात घालविली व प्रत्येकाला देशांत एक नवीनच देखावा दिसूं लागला. स्टालिपिनची कारकीर्द जितकी कडक, कणखर व अभेद्य वाटत होती तितकी ती नाहीं, असें सामान्य लोकांनाही वाटूं लागलें. दडपशाहीच्या व अत्याचाराच्या दिवसांतही पोलिसाच्या निगराणीला झुकांड्या देऊन बोल्शेव्हिक चळवळ्यांनीं आपलें कामगार-शेतकरी-जनता-जागृतीचें कार्य चालू ठेवलें. ड्यूमामधील बोल्शेव्हिक प्रतिनिधींनींही कामगारांमध्यें भरपूर असंतोष निर्माण केला होता. ठिणगी पडायचाच अवकाश होता कीं, या असंतोषाच्या वणव्यानें सर्व देशभर पेट घेतला.

लेनाच्या कत्तलीसंबंधानें ड्यूमामध्यें भाषण करतांना मॅकॅरोव्ह नांवाच्या एका बढाईखोर दिवाणानें "हें असें नेहमींचेंच आहे व असें नेहमींच चालणार" असली घमेंडीची घोषणा केली होती. पण देशभर उठलेल्या संपांच्या वावटळीनें ही घोषणा कोणीकडच्या कोणीकडे उडवून लावली होती. ही संपांची वावटळ म्हणजे आगामी प्रचंड क्रांतिकारी चळवळीची शकुनवंती होती. या शकुनावरच बोल्शेव्हिकांचें जनतापत्र "प्रवदा" सुरू झालें.

"१९१२ एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यांत एके दिवशीं संध्याकाळीं पोलेटेयेव्हच्या घरीं आम्ही जमलों होतों. या बैठकींत पोलेटेयेव्ह व पोक्रोव्हस्की हे ड्यूमाचे दोघे प्रतिनिधी होते. ओलमिन्स्की व बाटुरिन हे दोघे लेखक व मी सेंट्रल कमिटीचा एक सभासद या नात्यानें तेथें हजर होतों. समाजांत उघडपणानें वावरणेंही माझ्या बाबतींत बेकायदा गोष्ट. त्यामुळें पोलेटेयेव्हच्या घरीं मी ओलीस असणाऱ्या माणसासारखा रहात होतों. पोलेटेयेव्ह ड्यूमाचा सभासद असल्यामुळें त्याचें शरीर व त्याचें बिऱ्हाड पोलिसच्या कारवाईच्या कक्षेबाहेर होतीं. आम्हीं सर्वांनीं मिळून प्रवदाची मुहूर्तमेढ रोवण्याचें ठरविलें व त्याच्या पहिल्या अंकाची तयारी केली." अशा आशयाचे विचार स्टॅलिननें या प्रसंगाला अनुसरून प्रकट केले होते.

प्रवदा हें कांहीं सामान्य पत्र नव्हतें. क्रांतीच्या चळवळीला लागणारी लोकशाही निर्माण करण्याचें कार्य या पत्रानें केलें. हजारों कामगारांनीं या पत्राला आपलेंसें केलें.

"१९१२ चा 'प्रवदा' १९१७ च्या बोल्शेव्हिझमच्या विजयाची कोनशिला होती." असें स्टॅलिननें यासंबंधानें आपल्या एका मित्राला लिहून कळविलें. ही कोनशिला बसविणारे गंवडी लेनिन व स्टॅलिन होते. १९१२ च्या वेळच्या देशाच्या परिस्थितींत 'प्रवदा'सारखें पत्र काढणें, हें एक मर्दुमकीचें व साहसाचें कृत्य होतें, कायद्याच्या कक्षेंत या पत्राचें प्रकाशन होत होतें. सेन्सॉरच्या कडक निगराणीखालीं त्याचें प्रकाशन होत असल्यामुळें प्रत्यक्ष सरकारविरोधी चळवळ या पत्रद्वारा करतां येत नव्हती. शेतकरी-कामगार-जनतेची गाऱ्हाणीं, त्यांचीं दुःखें, त्यांच्या गरजा, त्यांच्यावर होणारे अन्याय यांना तोंड फोडण्याचें काम हें पत्र अर्थात् चांगल्या प्रकारें करीत होतें.

हें पत्र ताबडतोब लोकप्रिय झालें व त्याचा खप झपाट्यानें वाढत चालला हें सांगावयास नकोच.

स्टॅलिनच्या सगळ्या हालचाली आतां सरकारला खडान्‌खडा कळूं लागल्या, कारण बोल्शेव्हिकांत शिंगें मोडून शिरलेला पगारी गुप्त हेर मॅलिनोव्हस्की याचा प्रवदा पत्राशीं संबंध होता. गुप्त पोलिसांनीं या वेळीं स्टॅलिनचा जणूं काय पिच्छा पुरविला होता. तो आणि सर्जो ओरबोनिकिड्झ् यांनीं १९१२ च्या एप्रिलमध्यें सेंट पीटर्सबर्गला जाण्याकरतां मॉस्को सोडलें. पोलिस खात्याकडे तेथल्या पोलिस मुख्याधिकाऱ्यानें खालील तार केली. "सो. डे. सेंट्रल कमिटीचा सभासद सर्जो व कमिटीवर को-ऑफ्ट करून घेतलेला सभासद कोबा (स्टॅलिन) यांनीं आज (ता. ९ एप्रिल) निकोलायेव्हस्की स्टेशनहून ट्रेन नं. ८ नें पीटसबर्गला जाण्याकरतां मॉस्को सोडलें. त्यांच्यावर नजर ठेवा. अटक इष्ट आहे; पण केवळ स्थानिक पुराव्यावर. मॉस्कोच्या ठावठिकाणांचा पत्ता लावूं न देतां."

पण स्टॅलिनचा माग ठेवणाऱ्या या पोलिसांना त्यानें चांगलाच गुंगारा दिला. १९ एप्रिल रोजीं सेंट पीटर्सबर्गच्या गुप्त पोलिस खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यानें पोलिस खात्याला रिपोर्ट केला, "निर्दिष्ट केलेल्या ट्रेनमधून सर्जो आला. त्याच्यावर नजर ठेवली आहे. कोबा या ट्रेनमध्यें नव्हता."

स्टॅलिनच्या हालचालीसंबंधानें कांहीं कळलें नाहीं म्हणजे लेनिनचीही तगमग सुरू होत होती. १९१२ मार्च २८ च्या पत्रांत लेनिननें घाबरटपणानें आपल्या एका दोस्ताला विचारलें, "इव्हानोव्हिच (स्टॅलिन) कडून कांहींच समजलें नाहीं. त्याच्यावर कांहीं अरिष्ट तर नाहीं आलें? तो कुठें आहे, कसा आहे?

१९१२ एप्रिल अखेर स्टॅलिनला शेवटीं अटक करण्यांत आली. सैबेरियांतील नारयम भागांत हद्दपारीची तीन वर्षांची शिक्षा त्याला देण्यांत आली. पण शिक्षा झाल्यापासून अवघ्या सहाच महिन्यांनीं तो नारयममधून निसटून पळून आला व सेंट पीटर्सबर्गमध्यें दाखल झाला. पार्टीच्या सेंट्रल कमिटीच्या रशियन ब्यूरोचें व प्रवदाच्या संपादनाचें काम पुन्हा त्यानें हातीं घेतलें. स्वर्डलोनें याच वेळीं निसटून पळून जाण्याचा प्रयत्न केला पण त्याला वाटेंतच

पकडलें. याच वेळीं निसटलेला दुसरा एक बोलशेव्हिक लॅशेव्हिच् मात्र पोलिसला सांपडला नाहीं. स्टॅलिन तर सेंट पीटर्सबर्गमध्यें येऊन केव्हांच आपल्या कामाला लागला. पोलिसांचा कडक पहारा चुकवून व गुप्त पोलिसांच्या हातावर तुरी देऊन हद्दपारींतून निसटून फरारी होणें जितकें धाडसाचें होतें त्यापेक्षांही पुन्हा त्याच ठिकाणीं येऊन पूर्ववत् आपल्या कामास लागणें किती धोक्याचें होतें! पांच सहा वेळां अशा रीतीनें पळून आल्यामुळें 'कोबाची यशस्वी फरारी' म्हणून सर्वत्र त्याच्या या पलायनांची ख्याति झाली होती. कितीही कडक पहारा ठेवा, निगराणी ठेवा, त्यांतून निसटून जाण्याची व्यवस्था स्टॅलिन कसा करूं शकतो, याबद्दल पोलिसवर्गाकडून हताशपणा व आश्चर्य व्यक्त केलें जात होतें. स्टॅलिनचें हें पलायन मात्र शेवटचेंच होतें. यानंतर त्याला पुन्हा अटक करून लांब मुदतीपर्यंत हद्दपार करण्यांत आलें व तेथून तो मात्र पुन्हा निसटून आला नाहीं.

स्टॅलिन या वेळीं जो आला तो एका विशिष्ट कामासाठींच आला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. चौथ्या ड्यूमाच्या निवडणुकीची प्रचंड धामधूम या वेळीं देशांत चालू होती. या निवडणुकींत भाग घेण्याचें बोलशेव्हिकांनीं ठरविल्यानंतर स्टॅलिनला हद्दपारीच्या खेड्यांत बसून राहणें, कसें शक्य होतें? स्टॅलिनच्या दोस्तांना तो या वेळीं बाहेर पाहिजे होता. यामुळें त्याच्या पलायन-चातुर्यांत दोस्तांच्याही कुशल मदतीची भर पडली होती. स्टॅलिन बाहेर पडला तो या निवडणुकीच्या धामधुमींत इतका रंगून गेला कीं, 'प्रवदा'-च्या संपादकीय कचेरींतही तो एका प्रसंगीं येऊन गेला. निवडणुकीच्या धामधुमीमुळें प्रवदाचे ऑफिसांत या दिवसांत कोण गर्दी! अशा ठिकाणीं येणें व जरूर त्या सूचना संपादकांना देणें हें एक धाडसच होतें. पण जरूरीच्या प्रसंगीं धाडस केलें नाहीं तर तो स्टॅलिन कसला? प्रवदाचे संपादक लेनिनकडून येणाऱ्या लेखाची अत्यंत उत्कंठेनें वाट पहात होते. कारण लेनिन अनेक टोपणनांवांखालीं प्रवदाला लेख पुरवीत होता. या प्रसंगीं या संपादकांच्या घोळक्यांत स्टॅलिन उभा आहे, असें पत्राच्या लेखकवर्गांपैकीं एका दोस्तानें पाहिलें. स्टॅलिन पत्राचा मुख्य संपादक होता व तो या वेळीं कांहीं महत्त्वाच्या सूचना देण्याकरतां आला होता.

"मिशांखालून व्यंग स्मित व्यक्त करीत स्टॅलिन आपला डायरेक्टराचा

दंडा फारच शांतपणें हाताळतो. थोडक्यांत पण स्पष्ट रीतीनें तो आपल्या सूचना देत असतो." असें या दोस्तानें स्टॅलिनचें वर्णन केलें आहे.

बोलशेव्हिक पार्टीच्या प्रतिनिधींना कामगारांनीं दिलेला मॅंडेट स्टॅलिननेंच तयार केला होता. "कामगार प्रतिनिधींना सेंट पीटर्सबर्गच्या कामगारांचा मॅंडेट" या नांवानें हा मॅंडेट प्रसिद्ध आहे. बोलशेव्हिक पार्टी कोणता कार्यक्रम अमलांत आणण्याकरतां ड्यूमांत जाणार याचा खुलासा या मॅंडेटमध्यें करण्यांत आला होता. स्टॅलिननें तयार केलेला हा मॅंडेट लेनिनला फार महत्त्वाचा वाटला. मॅंडेटच्या एका प्रतीवर लेनिननें स्वतः आपल्या हस्ताक्षरांत कांहीं टांचणें लिहिलीं. "ही प्रत न चुकतां परत आणून द्या! प्रत स्वच्छ ठेवा. त्याच्यावर डाग पाडूं नका. संग्रहीं ठेवण्याइतका हा लेख अत्यंत महत्त्वाचा आहे." असें लेनिननें बोलून दाखविलें.

निवडणुकीची पद्धति स्पष्ट करण्याच्या निमित्तानें झारच्या अधिकाऱ्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें; आणि बऱ्याच कारखान्यांतर्फे निवडून आलेल्या मतदारगटाच्या प्रतिनिधींचा उमेदवारीचा हक्क काढून घेण्यांत आला. सरकारच्या या कारवाईचा निषेध करण्याचें सेंट पीटर्सबर्ग पार्टी कमिटीनें ठरविलें आणि सार्वत्रिक राजकीय संप पुकारला. परिणाम असा झाला कीं, झारच्या सरकारनें आपलें स्पष्टीकरणपत्रक मागें घेतलें इतकेंच नाहीं, तर ज्या कामगारांना निवडणुकींत भाग घेण्याचा हक्क होता त्यांच्या सोईकरतां कारखान्यांच्या यादींतही आणखी जास्त भर टाकली. या संपाच्या प्रसंगीं गुप्तपणानें राहणें स्टॅलिनला भाग होतें तरी पुष्कळशा कारखान्यांतून आगाऊ सूचना न देतां झटपटीनें भरविलेल्या सभांतून त्यानें भाषणें केलीं.

निवडणुकीमध्यें बोल्शेव्हिक पार्टीचा पूर्ण विजय झाला. ज्या प्रांतांतून कामगारांना आपले प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क देण्यांत आला त्या सहाही प्रांतांतून कामगारांचे सर्व बोल्शेव्हिक उमेदवार निवडून आले. याचा अर्थ असा कीं, रशियन कामगारवर्गाच्या चारपंचमांश जनतेच्या प्रतिनिधींनीं ड्यूमा सभेंत प्रवेश केला.

हा विजय संपादन करण्यास बोल्शेव्हिकांना किती तरी अडचणींतून मार्ग काढावा लागला. पोलिसांना न कळत निवडणुकीची सर्व चळवळ स्टॅलिनला चालवावी लागली. केवळ ब्लॅक हंड्रेड, ऑक्टोबरिस्ट व कॅडेट या पक्षांविरुद्धच

नव्हे, तर कामगारवर्गाच्या चळवळींत भाग घेणाऱ्या लिक्विडेटर, ट्रॉट्स्काइट, व्हपेरियोडाइटस्, प्रेखानोव्हाइट्स्, अनार्किस्ट वगैरे अनेक विरोधी पक्षांविरुद्ध बोल्शेव्हिकांना लढावें लागलें.

पार्टीच्या सेंट्रल कमिटीच्या देखरेखीखालीं चौथ्या ड्यूमाचे बोल्शेव्हिक सभासद काम करीत होते. स्टॅलिनच्या देखरेखीखालीं चाललेल्या या कामाला लेनिन अत्यंत महत्त्व देत असे. ड्यूमामध्यें सोशल डेमोक्रॅटांचा एक संयुक्त गट जेव्हां निर्माण करण्यांत आला त्या वेळीं बोल्शेव्हिक प्रतिनिधींना सर्व प्रकारचा सल्ला देण्याचें काम स्टॅलिननें केलें. त्यांचें जाहीरपत्रक तयार करण्याच्या कामीं स्टॅलिननें त्यांना मदत केली. त्यांचीं भाषणें त्यानें तयार करून दिलीं व ड्यूमाबाहेर करावयाच्या चळवळीची आखणीही त्यानें त्यांना करून दिली. यासंबंधानें सेंट्रल पार्टीकडे केलेल्या रिपोर्टांत त्यानें म्हटलें आहे कीं, ही योजना तयार करण्याकरतां बोल्शेव्हिक प्रतिनिधींच्या बिऱ्हाडामध्यें मला नऊ दिवस व नऊ रात्रीं घालवाव्या लागल्या. या बोल्शेव्हिक प्रतिनिधींपैकीं बाडेयेव्हनें लिहिलेल्या आठवणींत ड्यूमांतील बोल्शेव्हिक गटाचें काम सर्वथा स्टॅलिनच्या सूत्रानें कसें चालत होतें याचें वर्णन केलें आहे.

या सर्व प्रसंगीं स्टॅलिन कधींही रागवावयाचा नाहीं. रात्रीच्या रात्री जागरणें करून चाललेल्या या जोराच्या वादविवादांत कोणीही बोल्शेव्हिक प्रतिनिधि कितीही आवेशानें व तडफेनें बोलले तरी स्टॅलिन आपला मुद्दा सोडीत नव्हता व आपलें मतच सर्वांच्या गळीं उतरवीत होता, असा स्टॅलिनच्या या बाबतींतल्या नेतृत्वासंबंधानें या आठवणींत उल्लेख केला आहे. आपल्या पार्टीचें धोरण यापुढें कसें असावें व बोल्शेव्हिक प्रतिनिधींच्या ड्यूमा सभेंतील कार्याची योजना कशी असावी, हें ठरविण्याकरतां परदेशांत एक परिषद् भरविण्याची जरूरी आहे असें स्टॅलिननें सुचविलें. स्टॅलिनच्या या सूचनेप्रमाणें क्रॅको येथें ही परिषद् भरविण्याचें ठरलें. लेनिन याच ठिकाणीं या वेळीं राहत होता. ६ डिसेंबर १९१२ च्या अदृश्य शाईनें लिहिलेल्या आपल्या पत्रांत परदेशांतील प्रवासाकरितां बेकायदेशीर पासपोर्ट तयार करण्यासंबंधानें व त्याचप्रमाणें लाल रविवारचा वर्षदिन मोठ्या प्रमाणांत रशियांत सर्वत्र करण्यासंबंधानेंही सूचना केल्या होत्या. या प्रसंगीं जें क्रांतिकारी

पत्रक वाटावयाचें त्यांतील घोषणाही कोणत्या स्वरूपाच्या असाव्या याचीही रूपरेषा लेनिननें आपल्या या पत्रांत लिहून कळविली होती. डिसेंबरच्या अखेरीस क्रॅको येथें परिषद् भरली. लेनिन या परिषदेचा अध्यक्ष होता. आणि त्याचा उजवा हात म्हणून स्टॅलिन तिचीं सर्व सूत्रें हलवीत होता. परिषदेचें काम १९१३ जानेवारी १ ला संपलें.

या परिषदेनंतर स्टॅलिन क्रॅको येथें दोन महिने होता. व्हिएन्नामध्येंही तो कांहीं दिवस राहिला. लेनिनच्या सहवासांत इतके दिवस स्टॅलिन प्रथमच राहिला. लेनिनबरोबर असतांना करमणूक म्हणून तो त्याच्याशीं केव्हां तरी बुद्धिबळें खेळत असे. पण आपल्या गुरूच्या सान्निध्याचा काळ त्यानें फुकट घालविला नाहीं. "मार्क्सवाद व राष्ट्रीय प्रश्न" या विषयावर स्टॅलिननें एक संशोधनात्मक प्रबंध लिहिला. स्टॅलिनचा हा प्रबंध 'पार्टी रिव्ह्यू'मध्यें लेखमालेच्या रूपानें प्रसिद्ध झाला. रशियाखेरीज झारच्या ताब्यांत अनेक लहान मोठीं परतंत्र राष्ट्रें होतीं. क्रांतीनंतर रशियांत जी मध्यवर्ती सत्ता निर्माण होईल तिचें धोरण या राष्ट्रांच्या बाबतींत कशा प्रकारचें राहील, हा एक त्या वेळचा चर्चेचा सवाल होऊन बसला होता. १९१३ च्या फेब्रुवारीच्या प्रारंभीं या सवालासंबंधीं मॅक्झिम गॉर्कीला लिहितांना लेनिननें पुढील उल्लेख केला होता:—

"'राष्ट्रीय सवाल' या विषयासंबंधानें गंभीरपणानें विचार करण्याची वेळ आतां आली आहे, हें तुमचें म्हणणें मलाही मान्य आहे. इथें आमच्यापाशीं सध्यां एक 'विस्मयजनक जॉर्जियन' राहत आहे. त्यानें या विषयासंबंधींची बरीच सामुग्री जमा केली आहे व त्यावर तो एक मोठा लेख लिहीत आहे." स्टॅलिननें हा प्रबंध व्हिएन्ना येथें लिहून संपविला.

स्टॅलिन वसंत ऋतूंत रशियास परत आला. क्रॅको परिषदेंत मंजूर झालेल्या ठरावांची अमलबजावणी करण्याच्या उद्देशानें तो सेंट पीटर्सबर्गला आला व मोठ्या उत्साहानें कामास लागला. पण त्याचा हा हेतु सफळ झाला नाहीं. गुप्त हेर खात्याचा पगारी एजंट मॅनिलोव्हकी क्रॅको परिषदेला हजर होता. यापूर्वींच कांहीं महिने बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना पकडण्यांत आलें असतें; पण ड्यूमांतील आपल्या एजंटाचें बिंग बाहेर पडेल म्हणून पोलिसांनीं आपला हात आंखडून धरला होता. आतां त्यांनीं मॅनिलोव्हस्कीला स्टॅलिन व स्वर्डलो यांना पकडून देण्याच्या कामीं मदत करण्याबद्दल स्पष्ट हुकूम दिले. स्टॅलिनचें

पाऊल राजधानींत पडल्यापासून सावलीप्रमाणें आपला कोणी तरी सारखा पिच्छा पुरवीत आहे, असें त्याला आढळून आलें. स्टॅलिनकडून पत्र आलें नाहीं किंवा त्याची खुशाली दुसऱ्या कोणाकडून कळली नाहीं कीं, लेनिनचा व त्याच्या पत्नीचा जीव कासावीस होत असे. या प्रसंगींही असेंच झालें. या वेळीं क्रुप्स्कायानें ८ मार्चला पोदव्हॉइस्कीला पत्र लिहून विचारलें :—

"स्टॅलिनकडून कांहींच हकीकत कशी कळत नाहीं? त्याला कांहीं झालें आहे का? आम्ही काळजींत आहोंत." पुन्हा दोन दिवसांनीं त्यालाच आणखी एक पत्र लिहून स्टॅलिनशीं पूर्ण सहकार्यानें वागण्यास त्यास बजावलें.

"स्टॅलिनची फार काळजी घेतली पाहिजे. तो फारसा सशक्त नाहीं हें सर्वांना ठाऊकच आहे. तो सारखा नेहमीं नेहमीं आजारी पडत असतो." असें स्टॅलिनसंबंधानें लिहून त्याची बातमी कळविण्यासंबंधानें तिनें त्यास सुचविलें.

सेंट पीटर्सबर्गला आल्यानंतर ड्यूमाचा सभासद बाडायेव्ह याच्या पवित्र मकाणाचा त्यानें आश्रय घेतला. या ठिकाणीं तो कित्येक दिवस लपून राहिला. रस्त्यावर म्हणून तो कधीं फिरकला नाहीं. गुप्त हेर संशयानें बाहेर सारखी टेहळणी करीत राहिले होते. तो केव्हां बाहेर पडतो याची सारखी ते वाट पाहत होते. बाडायेव्ह ड्यूमाचा सभासद होता तेव्हां त्याच्या मकाणाची झडती घेण्याची त्यांची ताकदच नव्हती. या वेळीं मॅनिलोव्हस्की गुप्त पोलिस खात्याला मदत करण्यास पुढें सरसावला. प्रवदा पत्राच्या मदतीकरतां कामगार हॉलमध्यें एक गायनवादनाचा जलसा करावयाचें ठरलें होतें. असल्या प्रसंगीं नेहमीं पुष्कळ गर्दी जमते. साध्या, सरळ स्वभावाच्या बोलशेव्हिक पुढारी लोकांच्या आरड्या-ओरड्यांत व गोंधळांत आपल्या माणसांना भेटतां येईल व त्यांच्याशीं मनसोक्त बोलतां येईल, असें स्टॅलिनला वाटलें व त्यानें या जलशाला जाण्याचें ठरविलें. गुप्त हेर गर्दींत सर्रास जिकडे तिकडे मिसळून राहिले होते. धोका असल्याची स्टॅलिनला शंका आलीच. बाहेर जाण्याच्या दरवाजाकडे तो गेला. त्याच्यामागें पोलिस होतेच. या वेळीं त्याच्या अंगावर लेडीचा झगा टाकून तेथून त्याला पळवून नेण्याचा प्रयत्न कोणी तरी केला. पण या गडबडींतच स्टॅलिनला पकडण्यांत आलें.

"कितीही शिक्षा दिल्या तरी क्रांतिकारक पार्टीच्या चळवळींत हा इसम

सारखा भाग घेत असतो. या पार्टींतून तो नेहमीं पुढारीपणानेंही काम करीत असतो. हद्दपारीच्या ठिकाणांहून तो दोनदां निसटून पळून आला आहे. त्याला झालेल्या कोणत्याही शिक्षेची मुदत त्यानें शिक्षा भोगून संपविलेली नाहीं. तेव्हां त्याला सैबेरियांतील अगदीं दूरवरच्या प्रदेशांत पांच वर्षे हद्दपारीची अशी मोठ्यांत मोठी शिक्षा द्यावी." असें पोलिस मुख्याधिकारानें कोर्टाला पत्र लिहून सुचविलें होतें. पोलिस मुख्याधिकाऱ्याच्या सूचनेप्रमाणें स्टॅलिनला पांच नाहीं तर सहा वर्षांची हद्दपारीची शिक्षा देण्यांत आली. या वेळची शिक्षा कांहीं निराळीच होती. येथून पळून जाणें अशक्य आहे, असें स्टॅलिन-ला थोड्याच आठवड्यांत आढळून आलें. आर्क्टिक सर्कलवरील योनेसिस्क प्रांतांतील तुरुखान्स्क जिल्ह्यांत कुरीका नांवाच्या वाडींत स्टॅलिनला ठेवण्यांत आलें होतें. या वाडींत फक्त सहाच झोंपड्या होत्या. क्रासिनचा जिवाचा स्नेही व लेनिनच्या आदरास पात्र झालेला स्वर्डलोव्ह या ठिकाणीं स्टॅलिन-ला भेटला नसता तर त्याला हे दिवस फार कठीण गेले असते. दिवसा शिकार करण्यांत व रात्रीं निरनिराळ्या विषयांवर चर्चा करण्यांत या दोघांनीं आपले येथील दिवस घालविले. रशियांत केव्हां तरी बंडाचा उठाव होईल, याची हे दोघे मोठ्या उत्कंठेनें वाट पाहत होते. लेनिनच्या सूचनेवरून या दोघांना पळवून आणण्याचे दोनदां प्रयत्न झाले पण पार्टींतीलच गुप्त हेरांच्या एजंटांच्या विश्वासघातामुळें हे प्रयत्न फसले. रशियांत क्रांति होऊन एकतंत्री राजसत्ता नष्ट झाल्यावरच म्हणजे १९१७ सालीं स्टॅलिनला तेथें येता आलें.

कधीं कधीं ते रोज पंधरा पंधरा मैल शिकारीकरतां रपेट करीत असत. "हवा फारच छान आहे, निसर्ग आल्हादजनक आहे आणि वारा तर किती गोड सुटतो. स्कीवरून घसरत जाणें तर फारच मजेचें वाटतें." कुरीकाहून स्वर्डलोनें आपल्या मित्राला लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे इतक्या या दूरवरच्या प्रदेशांत व इतक्या लांब मुदतीची हद्दपारीची शिक्षा भोगीत असतांना सर्व-सामान्य राजकीय निर्वासित कैदी उदासीन, दुःखीकष्टी, हताश व वेडेही होतात. कधीं कधीं ते आत्महत्येचाही प्रयत्न करतात. पण स्टॅलिन खंबीर मनाचा होता. वातावरणांतला भयाणपणा व औदासीन्य त्याच्या मनावर कांहींच परिणाम करूं शकत नसत. आत्मसंयमी स्टॅलिन या वातावरणाशींही समरस झाला.

१९१४ च्या ऑगस्टमध्यें पहिलें साम्राज्यशाही युद्ध सुरू झालें. वसाहतींवर वर्चस्व प्रस्थापित करण्याकरतां, बाजारपेठा बळकावण्याकरतां, मुलूखगिरी करण्याकरतां, भांडवलवाल्यांना प्रचंड प्रमाणावर आपलें भांडवल गुंतविण्याचा मोका देण्याकरतां, नवीन नवीन प्रदेश काबीज करण्याकरतां हें महायुद्ध होतें. भांडवलशाहीचें व साम्राज्यशाहीचें वर्चस्व व सत्ता वाढविण्याकरतां हें युद्ध होतें. साम्राज्यवादी राष्ट्रांनीं जगाची वांटणी कशी करून घ्यावयाची हें ठरविण्याकरितां हें युद्ध होतें. अर्थात् अशा युद्धाला मदत करण्यास कामगारवर्ग व पिळणुकीनें गांजलेली जनता कशी तयार होणार ? असल्या युद्धांत साम्राज्य सरकारशीं सहकार्य करणें म्हणजे कामगारवर्गाशीं बेइमानी करण्यासारखेंच होतें. कामगारवर्गाचा हा विश्वासघात होता. पण युरोपमधील सेकंड इंटरनॅशनलनें हा सारासार विचार केला नाहीं. सेकंड इंटरनॅशनलच्या त्या त्या राष्ट्रांतील कामगार-संघांनीं आपापल्या सरकारला मदत करण्याचें ठरविलें. साम्राज्यवादी भांडवलदार गटांना ते सामील झाले. पण संबंध युरोपांत लेनिनच्या पुढारीपणाखालीं काम करणाऱ्या केवळ बोलशेव्हिक पक्षानेंच तेवढें झारच्या सरकारशीं युद्धकार्याच्या बाबतींत असहकार करण्याचें ठरविलें. याच्या खालोखाल जर्मनीमधल्या रोझा लक्झेंबर्ग व लिबकनिश यांच्या नेतृत्वाखालील लहानशा कम्यूनिस्ट गटानें युद्धकार्यांवर बहिष्कार घातला. बोलशेव्हिकांनीं केवळ बहिष्कारच घातला असें नव्हे, तर या साम्राज्यशाही युद्धाला आपसांतील वर्गयुद्धाचें व क्रांतियुद्धाचें वळण देण्याचाही प्रयत्न त्यांनीं केला.

स्टॅलिन या वेळीं हद्दपारीच्या मुलखांत होता. महायुद्ध सुरू झाल्यानंतर या मुलखांतील हद्दपार कैद्यांच्या ज्या ठिकाणीं सभा झाल्या, त्यांत त्यानें लेनिनच्या युद्धविषयक धोरणाचा पुरस्कार केला. "युद्ध, शांति व क्रांति" या सवालांच्या बाबतींत लेनिनचाच त्यानें पाठपुरावा केला. १९१५ सालीं स्टॅलिननें लेनिनशीं या बाबतींत बराच पत्रव्यवहार केला. हद्दपारीच्या

मुलखांतील मोनास्टयरस्कोये या गांवीं झालेल्या राजकीय निर्वासितांच्या सभेंत स्टॅलिननें चौथ्या ड्यूमांतील बोल्शेव्हिक सभासदांच्या चौकशीच्या वेळीं कामेनेव्ह वगैरेनीं जें विश्वासघाताचें वर्तन केलें त्याचा अत्यंत कडक शब्दांत निषेध केला. कायदेशीर रीतीनें प्रसिद्ध होणाऱ्या 'विमाप्रश्न' या बोल्शेव्हिक मासिकाला हद्दपाऱ्यांच्या वतीनें त्यानें एक संदेश धाडला व आंतरराष्ट्रीय तत्त्वाविरुद्ध प्रोट्रेसोव्ह, लेव्हिट्स्को व फ्रेखालोव्ह वगैरेनीं जो प्रचार चालविला होता त्यापासून सावध राहण्याबद्दल इशारा दिला.

महायुद्ध जसजसें लांबत चाललें होतें तसतशी रशियांतील सामान्य जनतेच्या हलाखींत अधिकाधिक भर पडत चालली होती. खुद्द झारच्या लष्करांतील बेदिली व असंतोष झपाट्यानें वाढत चालला होता. महायुद्धाच्या या कालांत जवळ जवळ एकशेंनव्वद लाखांवर लष्कर रशियांत उभारण्यांत आलें. म्हणजे रशियांतील पुरुष लोकसंख्येपैकीं शें. २३ लोक लष्करांत भरती करण्यांत आले होते. रशियाची आर्थिक परिस्थिति या वेळीं इतकी बिघडली होती कीं, या लष्कराच्या सामान्य गरजाही झारच्या सरकारला पुरवितां येत नव्हत्या. हें तर राहोच पण युद्धाकरितां उभारलेल्या या लष्करांतील अर्ध्या अधिक शिपायांना रायफली पुरविण्याइतकीही व्यवस्था सरकार करूं शकत नव्हतें. नवीन रिक्रूट भरावे, त्यांना ड्रिल शिकवावें, बंदुका वगैरे कशा वापराव्या याचें सामान्य शिक्षण त्यांना द्यावें, दूरदूरच्या प्रांतांतून त्यांना पाठवावें व तेथें महिनोगणती माशा मारीत बसवावें, असा गोंधळ चालू होता. लढणाऱ्या लष्करांत भगदाड पडलें म्हणजे या लोकांची मागणी करण्यांत येई. गंमत अशी कीं, कांहीं कांहीं प्रसंगीं प्रत्यक्ष आघाडीवर गेल्यावरच सैनिकांच्या हातांत रायफल मिळे. अशा प्रकारचें सर्वतोपरी कच्चें असें हें लष्कर प्रत्यक्ष लढाईत कोणता पराक्रम दाखविणार? रशियाचा सारखा पराभवामागून पराभव होत होता त्याचें हें एक मुख्य कारण होतें. हवेंत बदल झाला, थंडी पडूं लागली, बर्फाचा वर्षाव होऊं लागला कीं, या लष्करांतील शिपायांचे हाल कुत्राही खात नसे. बाहेर कडाक्याची थंडी अन् शिपायांना गरम कपडा पुरविण्याइतकें सामर्थ्य लष्करी स्टोअरमध्यें नाहीं. गरम कपडा नाहीं. थंडीला प्रतिकार करण्याची थोडी तरी ताकद निर्माण करील असें भरपूर अन्नही पोटांत नाहीं, अशा स्थितींत हजारों सैनिक सर्दीच्या सांथींना बळी पडले व त्याबरोबरच सरकारविरुद्ध असंतोष

वाढत चालला. इकडे लष्करांतील लोक अन्नवस्त्रावांचून पटापट मरत होते तर तिकडे लष्करावरचे लहान मोठे अधिकारी खाऊन पिऊन मजा मारीत होते, मद्याचे पेल्यावर पेले उडवून व रोज नवीन नवीन नर्तक्या आणवून नाचरंगांत ते दंग असलेले पाहून सामान्य सैनिकाच्या संतापांत अधिकच भर पडत होती. जर्मनी तडाख्यावर तडाखे मारीत होता. रशियन सैन्याचे सारखे पराभव होत होते. आणि हे कर्तृत्वशून्य सैन्याधिकारी चैनींत व ऐष-आरामांत दिवस घालवीत होते. सैनिकांना ही गोष्ट सहन होणें शक्य नव्हतें. ते या अधिकाऱ्यांवर चवताळून गेले होते. त्याचप्रमाणें या वेळीं खुद्द देशांतही सर्वत्र अन्नटंचाई झाली होती. सामान्य जनता भुकेनें व्याकुळ झाली होती. रशियांतील नोकरशाही हा अन्न-टंचाईचा प्रश्न सोडविण्यास समर्थ नव्हती. देशांत भयंकर दुष्काळ पडला. हजारों लोक उपासमारीनें पटापट मरत आहेत, अशा बातम्या लष्करांत दाखल होऊं लागल्या. या सर्व बातम्या मुळींच अतिशयोक्तीच्या नव्हत्या. आपल्याला इथें लष्करांत अन्नवस्त्र भरपूर मिळत नाहीं व तिकडे आपल्या घरांदारांतूनही उपासमारीनें आपल्या बायकामुलांचा छळ मांडला आहे, हें ऐकून शिपायांचीं मनें चिंताग्रस्त होऊन दुःख-शोकानें तळमळूं लागलीं होतीं.

याप्रमाणें देशांतले सामान्य जन व लष्करांतले सामान्य सैनिक हलाखीच्या परमावधीला पोंचले होते तर त्यांच्या दुःखीकष्टी अंतःकरणाला डागण्या देण्या-करतांच कीं काय, झार निकोलस व त्याचे बादशाही दरबारचे सरदार-दरकदार बेफिकीरपणें चांडाळचैनींत व विषयविलासांत दंग झाले होते. देशांतल्या हलाखीचा व सामान्य रयतेच्या हालांचा त्यांच्या मनावर यत्किंचितही परि-णाम होत नव्हता. खुद्द झार व झारीना रासपुतीन नांवाच्या एका ढोंगी बुवाच्या नादीं लागले होते. या बुवानें झारीनाला जणूं काय आपल्या मुठींत ठेवलें होतें. या दारूबाज व रंडीबाज बुवानें आपले मंत्रतंत्र, जादूटोणा यांच्या मिषानें झारीनाला भाळून टाकून; तिला तो माकडाप्रमाणें आपल्या बोटांच्या खुणांवर नाचवीत होता. हीनबुद्धि, दुर्बल मनाचा झार निकोलस हे सर्व दुरा-चार स्वतः डोळ्यांनीं पाहत होता. बायकोपुढें त्याचें कांहीं चालत नव्हतें. तिकडे युद्ध जोरांत सुरू होतें. रशियाचे पराभव होत होते तर इकडे शाहीदर-बारांत रासपुतीन आपल्या भुतावळीसह नंगानाच करीत होता. या बुवानें

आपले सगळे अनुयायी दरबारांत घुसविले होते. खुद्द मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांनाही आपल्या नोकरीची शाश्वति वाटत नव्हती. पिढीजाद दरबाऱ्यांना तर या बुवानें सळो का पळो करून सोडलें होतें. कोणाचें वतन केव्हां खालसा होईल, याचा नेम राहिलेला नव्हता. यामुळें रासपुतीन सरकारी अधिकाऱ्यांना नकोसा झाला होता; अन् दरबारी लोकांच्या डोळ्यांत तर तो शल्यासारखा सलत होता. पिढीजाद दरबाऱ्यांच्या सुंदर तरुण मुली त्यानें आपल्या भजनीं व सेवेला लावल्या होत्या व कांहींना आपल्या शिष्यगणांत वांटून त्यानें एक बुवाबाजीचा नवाच दरबार सजविला होता. पण असला भुताटकीचा दरबार किती दिवस टिकून राहणार? सर्व बाजूंनीं अप्रिय झालेला रासपुतीन शेवटीं दरबाऱ्यांच्या रोषास बळी पडला. गुप्त मारेकरी घालून कोणी त्याचा खून केला. आपल्या गुरूचा असा निर्दयपणें व गुप्त रीतीनें खून झालेला पाहून झारीना चवताळून गेली. आपल्या नवऱ्यावर तिनें आपल्या संतापाची आग पाखडली. दुर्बल मनाच्या निकोलसला त्याच्या कारकीर्दींतील हे जवळ जवळ शेवटचे दिवस अत्यंत वाईट गेले. पराभूत होत असलेल्या आपल्या लष्कराच्या बातम्या ऐकून लष्करी अधिकाऱ्यांच्या नादानपणाबद्दल तो संतापानें बेहोष होई; तर गुरूच्या मरणामुळें विव्हळणाऱ्या झारीनाकडे पाहून बाईलवेड्या निकोलसला बायकांप्रमाणें वेळोवेळीं रडण्याचीही लहर येई.

युद्धाच्या आघाडीवर पराजयावर पराजय होत आहेत. लष्करापाशीं युद्धसामुग्री नाहीं. भरपूर अन्न नाहीं. भरपूर कपडा नाहीं. देशांतील सामान्य जनतेची तर यापेक्षांही हलाखीची स्थिति झालेली. नोकरशाही या दुःस्थितींतून मार्ग काढण्यास असमर्थ व दरबारी लोक तर या बाबतींत अगदीं बेपर्वा. अशा परिस्थितींत सामान्य जनता बेहोष होऊन बंडाला प्रवृत्त होऊं नये व गोष्टी भलत्या थराला जाऊं नयेत म्हणून ड्यूमासभेंतील लिबरल पक्षानें जनतेच्या मनाला विरंगुळा उत्पन्न करण्याकरतां व तसेंच धान्यपुरवठ्याच्या बाबतींत जी सट्टेबाजी व नफेबाजी चालली होती ती बंद पाडण्याकरतां एक सुधारणांची योजना आंखली. पण या लिबरलांचें ऐकतो कोण? या योजनेला झारची व त्याच्या दरबारी लोकांची संमति मिळाली नाहीं. याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला.

१९१७ च्या आरंभीं या दुर्दशेचा कळस झाला होता. कधींही पडली नाहीं

इतकी थंडी मॉस्को व पेट्रोग्राडमध्यें पडली होती. शहरांतील अन्नाचा सांठा झपाट्यानें कमी होत चालला होता. कांहीं थोड्या औंस काळ्या भाकरीकरतां ज्यांना अंतच नाहीं अशा रांगांतून कामगार स्त्रियांना रखडावें लागत होतें. झालें! अन्नाचा पुरवठा होईनासा झाला, दंग्याला व लुटालुटीला सुरुवात झाली व ही आग देशांत सर्वत्र वणव्याप्रमाणें पसरली. वाढत्या प्रमाणावर जिकडे तिकडे पोटाकरतां दंगेधोपे होऊं लागले. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, असल्या परिस्थितींत साहजिकच संपाच्या वावटळीला जी सुरुवात झाली तींत कामगार स्त्रियांनींच प्रामुख्यानें भाग घेतला. देशांतील प्रचंड पोलादी कारखान्यांतील कामगारांनीं सार्वत्रिक संप करण्याचा निर्णय घेतला. पुटिलॉव्ह येथील पोलादी कारखान्यांतील कामगार बाहेर आल्यावर सर्वत्रच संपाचे वारे वाहूं लागले. रशियांतील १९१७ च्या क्रांतीच्या आगीचा भडका या संपांनींच प्रज्वलित केला. पुटिलॉव्हच्या कारखान्यांतील कामगारांनीं या वेळीं जो सार्वत्रिक संपाचा निर्णय घेतला तो तुरुखान्स्कमधून स्टॅलिननें पाठविलेल्या पत्रांतील सल्लयानुसारच घेतला, असें स्टॅलिनचा भावी सासरा अलीलूएव्ह यानें म्हटलें आहे. कारण पुटिलॉव्हमधील कामगारांत जो बोलशेव्हिक गट होता त्याचें पुढारीपण बाकूच्या कामगारचळवळीपासून स्टॅलिनचा शिष्य या नात्यानें काम करणाऱ्या एका कामगार-कार्यकर्त्याकडे होतें. पुटिलॉव्हच्या सार्वत्रिक संपांतून अर्थात् बोल्शेव्हिकांनींच पुढारीपण स्वीकारलें होतें.

संपाच्या या चळवळीमुळें झारचे व त्याच्या मंत्रिमंडळाचे डोळे उघडले नाहींत. उलट नेहमींप्रमाणें झारनें या वेळींही मूर्खपणा केलाच. त्यानें पेट्रोग्राडमधील संपवाल्यांवर घोडेस्वार घातले व इतर ठिकाणच्या संपवाल्यांचा अत्यंत निर्दयपणें बंदोबस्त करण्याचे त्यानें निरनिराळ्या पलटणींना हुकूम सोडले. आश्चर्य हें कीं, या हुकुमांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. लष्करी शिपायांनीं संपवाल्यांवर हत्यार चालविण्याचें नाकारलें. गेलीं कित्येक वर्षें लष्करांतून बोल्शेव्हिकांनीं जो गुप्त प्रचार केला होता त्याचाच हा परिणाम होता. संपवाल्या क्रांतिकारी कामगारांना आजवर जी उणीव भासत होती ती या गोष्टीमुळें पुरी झाली. संपवाल्यांच्या मागें प्रचंड शस्त्रशक्ति उभी राहिली. झारची संघटित लष्करी शक्ति आतां क्रांतिकारकांच्या बाजूनें लढण्यास तयार झाली. लष्करी लोकांनीं खुद्द कामगारांनाही शस्त्रें पुरविलीं. पुटिलॉव्हचे

कारखाने म्हणजे लष्करी बंदोबस्तानें सुसज्ज असे भुईकोट किल्लेच बनले. देशांतल्या इतर कारखान्यांना सर्वत्र असेंच स्वरूप येऊं लागलें. असल्या प्रसंगीं सरकारी हल्ल्यापासून कामगारांना आपलें संरक्षण करून घ्यावें लागतें. पण आतां पारडें फिरलें. क्रांतिवाल्या कामगारांपासून आपलें संरक्षण कसें करावें याची काळजी सरकारला वाटूं लागली. मॉस्को ते काझानपर्यंत व दक्षिणेतील तेलाच्या खाणींपासून डोनेट्झ दरींतील लोखंडाच्या खाणींपर्यंत सर्वत्र संपांचा वणवा पेटला. आणि जवळ जवळ पेट्रोग्राडचाच कित्ता या सर्व ठिकाणच्या लष्करी शिपायांनीं गिरविलेला दिसूं लागला. या बंडखोरीच्या परिस्थितीला तोंड देण्याइतकी कुवत आतां मध्यवर्ती सरकारमध्यें राहिली नव्हती. एकाच वेळीं जणूं प्रथमपासूनच ठरविल्याप्रमाणें सर्वत्र झपाट्यानें या चळवळीनें धारण केलेलें हें उग्र स्वरूप पाहून मध्यवर्ती सरकारचे अधिकारी दिङ्मूढच झाले. अशा वेळीं धांवून येईल असा कोणी मित्र झारला दिसत नव्हता. आपल्या सत्तेच्या संरक्षणाकरितां पोसलेलें व राखलेलें लष्कर तर केव्हांच क्रांतिवाल्यांना फितुर झालें होतें. अशा परिस्थितींत आपल्या गादीचा राजीनामा देणें हा एकच मार्ग निकोलसपुढें शिल्लक होता. ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, पेट्रोग्राडमध्यें पहिला संप झाला त्या दिवसापासून बरोबर एका आठवड्यांत, तीन शतकें अनियंत्रित सत्ता गाजवीत राहिलेल्या रोमॅनोव्हच्या घराण्याचें सिंहासन उलथें पालथें झालें. दुसरा निकोलस व बादशाही कुटुंब गिरफ्तार करण्यांत आलें. एवढ्या मोठ्या झारची ही अवस्था झाली! मग त्याच्या नातेवाइकांना व दरबारी लोकांना कोण विचारतो. झारच्या गैरहजेरींत कशीबशी, दुर्बल का असेना, ड्यूमा अस्तित्वांत होती. या लोकप्रतिनिधिसभेला हंगामी सरकार जाहीर करणें भागच पडलें. या सरकारचीं सूत्रें प्रथम कांहीं दिवस लिबरल सरकार प्रिन्स ल्वाव्ह याच्या हातांत होतीं व नंतर तीं केरेन्स्की नांवाच्या एका अत्यंत हुशार वकिलाच्या हातांत गेलीं. "या क्रांतीनें खुद्द क्रांतिकारकांना देखील चकविलें" असें मत प्रतिपादन करून क्रांतिसंघटनेच्या बाबतींत बोल्शेव्हिकांनीं वीसोगणति केलेल्या प्रचारकार्याचें व कामगारांतील वर्गजागृतीच्या प्रत्यक्ष कार्याचें महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. पण तो अर्थातच चुकीचा आहे. १९०५ सालीं केलेली कामगारक्रांति फुकट गेलेली नव्हती. त्या क्रांतीचा पाडाव झाला

व बोल्शेव्हिकांचीं पाळेंमुळें खणून काढण्याकरतां झारच्या सरकारनें जंग जंग पछाडलें तथापि हा पक्ष जिवंत राहिला होता. गुप्त रीतीनें व संधि मिळाली त्या वेळीं उघड उघड रीतीनें, क्रांतीची ज्योत या पक्षानें तेवत ठेवली होती. १९१७ सालीं एका आठवड्यांत यक्षिणीची कांडी फिरवल्याप्रमाणें रशियांत सर्वत्र क्रांतीचे सार्वत्रिक राजकीय संप झाले. संपवाल्या कामगारांनीं झारचें लष्करही आत्मसात् करून टाकलें, ही केवळ सहजगत्या घडून येणारी अद्भुत घटना नव्हती. इच्यामागें लेनिन व स्टॅलिनप्रभृति पुढाऱ्यांनीं व त्यांच्या रशियांतील लहानमोठ्या अनुयायांनीं पसरलेली शिस्तीची क्रांतिकारी संघटना होती. जिनीव्हामधून लेनिननें किंवा आपल्या हद्दपारीच्या तुरुखान्स्क गांवामधून स्टॅलिननें या क्रांतीकरतां हुकूम रवाना केले. परंतु तो उठाव नव्हता तर अशांति होती. राजत्यागापर्यंतच्या काळांत तिला क्रांतिकारक उठावाचें स्वरूप मिळालें नव्हतें हें खरें आहे. बोल्शेव्हिकांच्या नेतृत्वाखालीं तयार झालेल्या वर्गजागृत क्रांतिकारी कामगारजनतेला या हुकुमांची वाट पाहण्याची जरूरच नव्हती. योग्य संधि सांपडतांच क्रांतीला हात घालायचा हा अलिखित हुकूम कामगारांना केव्हांच मिळालेला होता. हा हुकूम १९१७ सालीं रशियन कामगारांनीं संपूर्णपणें पाळला होता.

प्रत्यक्ष क्रांतीच्या वेळीं नाहीं तरी, क्रांति होऊन थोडे दिवस झाले नाहीं तोंच मार्चच्या आरंभीं स्टॅलिन तुरुखान्स्कहून निघून पेट्रोग्राडमध्यें दाखल झाला. त्याच्या कांहीं निवडक दोस्तांशिवाय त्याच्या आगमनाची वार्ता कोणाला सुद्धां कळली नाहीं. लेनिनची गोष्ट निराळी. तो आंतरराष्ट्रीय कामगारपुढारी म्हणून गणला जात होता. रशियांतील कामगारांवरील त्याचें वजन सर्वश्रुत व सर्वमान्य झालेलें होतें. स्टॅलिनला ती योग्यता प्राप्त झाली नव्हती तरी लेनिनचा तो एकनिष्ठ अनुयायी आहे, तो एक कर्तबगार संघटनाकुशल क्रांतिकारी आहे, तो आपला जिवलग दोस्त आहे, हें कामगारांना माहीत झालें होतें. स्टॅलिन आला तो थेट पेट्रोग्राडमधील सेंट्रल कमिटीच्या कचेरींत जाऊन तेथल्या कामाचीं सूत्रें त्यानें आपल्या हातांत घेतलीं. क्रांतीनंतर देशामध्यें जणूं एक प्रकारची द्विदल राज्यपद्धतीच निर्माण झाली होती. एका बाजूला हंगामी सरकार प्रस्थापित झालें होतें, तर दुसरीकडे कामगार व लष्करी सैनिक यांच्या प्रतिनिधींचें पेट्रोग्राड सोव्हिएट सरकार अस्तित्वांत आलें होतें.

पेट्रोग्राडप्रमाणें इतर ठिकाणींही अशा प्रकारचीं सोव्हिएट सरकारें प्रस्थापित होत होतीं. पेट्रोग्राडमध्यें आल्याबरोबर त्याच दिवशीं प्रवदामध्यें स्टॅलिननें आपलें पुढील धोरण जाहीर केलें.

" जुनी राज्यसत्ता उलथून पाडण्याकरितां बंडखोर कामगार व लष्करी सैनिक यांची तात्पुरती दोस्ती झाली हें ठीकच झालें. कारण ही गोष्ट स्वतः-सिद्ध आहे कीं, रशियन क्रांतीचें सामर्थ्य कामगार व सैनिकांचा गणवेष घात-लेले शेतकरी यांच्या दोस्तींत सामावलेलें आहे. पण मिळविलेलें स्वातंत्र्य सुरक्षित राखण्याकरतां व क्रांतीच्या सर्वांगीण धोरणाची प्रगति करण्याकरितां असल्या हंगामी दोस्तीचा फारसा उपयोग नाहीं.

" याकरतां ही दोस्ती दोन्ही वर्गांनीं समजून उमजून केली पाहिजे; ती निश्चित स्वरूपाची झाली पाहिजे. तिला कायमपणा व स्थैर्य प्राप्त झालें पाहिजे. ती इतकी भरभक्कम व दृढ असली पाहिजे कीं, प्रतिक्रांतिवाल्यांच्या संताप आणणाऱ्या प्रयत्नांना तोंड देण्यास ती समर्थ असली पाहिजे. कारण ही गोष्ट सर्वांना स्पष्टपणें समजून चुकली आहे कीं, रशियन क्रांतीच्या अखेरच्या विजयाची हमी क्रांतिकारी कामगार व क्रांतिकारी सैनिक यांची दोस्ती घनी-कृत करण्यामध्येंच सामावलेली आहे.

" कामगारांचें सोव्हिएट व सैनिकांचें सोव्हिएट हे या दोस्तीचे दोन घटक आहेत. आणि हीं दोन्ही सोव्हिएटें जितकीं निगडितपणें सांधलीं जातील व त्यांची संघटना जितकी प्रबल होईल, तितकें तितकें त्यांचें क्रांतिकारक सामर्थ्य-ही अधिक शक्तिशाली होईल. कारण तेंच क्रांतिकारी जनतेच्या सामर्थ्याचें प्रतीक आहे. म्हणूनच हें सामर्थ्य जितकें प्रबल असेल तितकी अधिक खरी हमी प्रतिक्रांतिवाद्यांविरुद्ध देतां येईल. क्रांतिकारी सोशल डेमोक्रॅटांनीं हीं सोव्हिएटें सुघटित करण्याकरतां झटलें पाहिजे. सर्वत्र अशा प्रकारचीं सोव्हिएटें स्थापन केलीं पाहिजेत. आणि जनतेच्या क्रांतिकारी सामर्थ्याचें हत्यार या दृष्टीनें कामगार व सैनिक प्रतिनिधींच्या सेंट्रल सोव्हिएटच्या निशाणाखालीं त्यांना एकत्र आणलें पाहिजे."

क्रांतीनंतर हद्दपारींतून आल्यावर लिहिलेला स्टॅलिनचा हा पहिला लेख होता. कालिनिन, मोलोटोव्ह, कामेनेव्ह वगैरे दोस्तांनीं स्टॅलिनचें मनःपूर्वक स्वागत केलें व पार्टीच्या कचेरींत पुढच्या योजनेसंबंधानें चर्चा करण्याकरतां

त्यांच्या बैठकी होऊं लागल्या. लेनिन येईपर्यंत तो थांबून राहिला नाहीं. झारशाहीचा पराभव ही या क्रांतींतील अगदीं पहिली पायरी आहे. आजचें हंगामी सरकार म्हणजे भांडवलदारी वृत्तीच्या लिबरल लोकांचा एक गट आहे. सामान्य जनतेच्या आकांक्षा तें पूर्ण करूं शकणार नाहीं, ही गोष्ट प्रवदां-तून रशियांतील क्रांतिकारी कामगारांना व सैनिकांना त्यानें पटवून दिली. ता. २७ मार्च रोजीं स्टॅलिनच्या सहीचा पहिला लेख प्रवदांतून प्रसिद्ध झाला. स्टॅलिनचा हा प्रचार म्हणजे लेनिनच्या स्वागताची तयारीच होती. स्टॅलिनच्या या लेखानंतर तीन आठवड्यांनीं लेनिननें रशियांत प्रवेश केला. इतिहास-प्रसिद्ध सीलबंद गार्डीतून लेनिन आपल्या दोस्तांसह जो रशियांत आला तो सोशालिस्ट क्रांतीच्या गर्जना करीतच आला.

"जी क्रांति भांडवलवाल्यांना देशभर वावरूं देते ती क्रांति कसली ?"
"लूटमारीच्या साम्राज्यशाही युद्धानें सर्व युरोपमध्यें आपसांतील युद्धाला प्रारंभ करून दिला आहे. जागतिक सोशालिस्ट क्रांतीच्या उषेची प्रभा फांकूं लागली आहे."

बोल्शेव्हिक पार्टीतर्फे लेनिनचें स्वागत करण्यांत आलें त्या वेळचीं त्याचीं हीं पहिलीं वाक्यें होतीं. ता. ३ एप्रिल रोजीं लेनिन रशियांत दाखल झाला व क्रांतीसंबंधाचें व क्रांतीनंतरचें बोल्शेव्हिकांचें धोरण काय राहील याची रशियन जनतेला कल्पना देण्याकरतां त्यानें एक विस्तृत लेख प्रसिद्ध केला. "एप्रिल थीसिस" या नांवानें हा लेख प्रसिद्ध आहे. हा लेख प्रवदांतून क्रमशः प्रसिद्ध झाला. १९०५ ची क्रांति अपयशी ठरली. तिचीं कारणें लेनिन-प्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांच्या स्मरणांत ताजीं होतीं. म्हणून त्या वेळीं घडून आलेले प्रमाद या वेळीं न घडूं देण्याची लेनिननें अतिशय काळजी घेतली. या क्रांतीनंतर देशांत जीं सर्वत्र कामगार व सैनिक सोव्हिएटें प्रस्थापित करण्यांत आलीं होतीं त्यांना क्रांतीचें रक्षण कसें करावयाचें व क्रांतींतून निर्माण व्हावयाच्या कामगार-शेतकरी राज्याचा गाडा कसा हांकावयाचा, याचें पद्धत-शीर शिक्षण देण्यास प्रवदा पत्राच्या द्वारा व इतर पत्रकांच्या द्वारा त्यानें सुरुवात केली. महायुद्धानें जेरीस आलेल्या क्रांतिप्रवण जनतेला काय पाहिजे, हें लेनिनप्रभृति पुढाऱ्यांनीं पूर्णपणें जाणलें होतें. म्हणूनच लेनिननें रशियांत प्रवेश केल्याबरोबर "शांतता, जमीन व भाकरी" ही घोषणा केली. केरेन्स्कीच्या

हंगामी सरकारची ही ताकद नव्हती. जनतेचें मन तें ओळखूं शकत नव्हतें. या सरकारनें कांहीं सुधारणा मोठ्या अगडबंब शब्दांत जाहीर केल्या. पण त्याही अंमलांत आणण्याचें त्याला धैर्य नव्हतें. हंगामी सरकार शांततेला तर अनुकूल नव्हतेंच. शांततेची तहान लागलेल्या जनतेला सुधारणा नको होत्या; तिला शांति व भाकरी पाहिजे होती. "शांति आणि जमीन" या घोषणेनें रशियाच्या सरहद्दीवर हजार मैल पसरलेली आघाडी दुमदुमून सोडली. बोल्शेव्हिक पार्टी कामगार-जनतेची पार्टी होती. शेतकरी-जनतेशीं ती एकरूप झाली होती. आघाडीवर असलेला प्रत्येक सैनिक त्याच्या युनिफॉर्ममागें शेतकरीच आहे, हें पार्टीला पूर्णपणें माहीत होतें. कामगार जनतेला व सैनिकरूपानें आघाडीवर वावरणाऱ्या हजारों शेतकऱ्यांना आपलेसे करून घेण्याकरतां बोल्शेव्हिकांनीं ही घोषणा आपल्या कार्यक्रमांत समाविष्ट केली होती. हंगामी सरकार इतक्या आपलेपणानें कामगार व जनतेशीं एकरूप होऊं शकत नव्हतें. आजपर्यंतच्या क्रांत्यांच्या अनुभवाप्रमाणें क्रांति घडवून आणण्यापुरता सामान्य जनतेचा त्यांना उपयोग करून घ्यावयाचा होता व तो त्यांचा उद्देश सफलही झाला होता. कामगार-जनतेला निःशस्त्र करा, सर्व मजूरसंघ बेकायदेशीर ठरवा, असल्या कार्यक्रमाच्या ते मागें होते. झारच्या जागीं लोकसत्तेच्या नांवाखालीं भांडवलदार वर्गाची सत्ता हंगामी सरकारला देशांत कायम राखावयाची होती. युरोपांतील युद्धमान राष्ट्रांशीं संगनमत करून युद्ध चालू ठेवण्याच्या तें विचारांत होतें. 'शांतता नाहीं नि भाकरी तर नाहींच नाहीं.' हंगामी सरकार अशा रीतीनें निकामीं झालेलें पाहून हें सरकारच खलास करण्याचा विचार जनतेच्या मनांत येऊं लागला असल्यास त्यांत कांहींच नवल नव्हतें. उतावळ्या स्वभावाच्या ट्रॉट्स्कीनें पार्टीपुढें तशी सूचनाही मांडली. स्टॅलिनला ही सूचना अर्थातच मान्य नव्हती. हंगामी सरकार उलथून टाकून त्या ठिकाणीं कामकरी-शेतकरी जनतेची सत्ता प्रस्थापित करावयास कांहींच हरकत नाहीं, पण या जनतेच्या सरकारचा राज्यकारभार चालविण्याइतकें शिक्षण अद्याप कामगारांना मिळालें नाहीं व हें हंगामी सरकार उलथून टाकण्याइतकें सशस्त्र सामर्थ्यही जनतेच्या अंगीं नाहीं असें स्टॅलिनचें मत होतें. खुद्द लेनिनसुद्धां याच मताचा होता. शहरांतील कामगार आपल्याला येऊन मिळतील; पण हंगामी सरकारविरुद्ध बंड करण्याइतकी सैनिकांच्या मनाची तयारी झालेली नाहीं, असें स्टॅलिनचें म्हणणें होतें.

झारची सत्ता उलथून टाकण्याच्या कामीं कामगार-शेतकरी जनतेला सैनिकांनीं साहाय्य केलें. पण झारचें सरकार उलथून टाकल्यावर जें लोकांचें हंगामी सरकार प्रस्थापित झालें त्याविरुद्ध पुन्हा शस्त्र उचलण्याइतकी सैनिकांच्या मनाची तयारी झालेली नव्हती. हंगामी सरकारनें जीं आश्वासनें दिलीं होतीं तीं तें अद्याप पुरीं करूं शकत नव्हतें, ही गोष्ट उघड झाली होती. पण हंगामी सरकारसंबंधाची अप्रियता अद्याप इतक्या शिगेला पोंचली नव्हती कीं, ज्यामुळें पूर्वीप्रमाणें आघाडीवरचे सैनिक हें सरकार उलथून पाडण्यास तयार व्हावे.

सामान्य जनतेची मनःस्थिति याप्रमाणें उघड दिसत असतां व हंगामी सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न यशस्वी होणें आज शक्यतेच्या कोटींत नाहीं हेंही स्पष्ट समजून आलें असतांहि, पार्टीतील कांहीं जहाल लोकांनीं जुलै महिन्यांत हंगामी सरकारवर हल्ला करण्याचें निश्चित केलें. केरेन्स्कीच्या योजनेचा निषेध करण्याकरतां पेट्रोग्राडमध्यें कामगारांनीं मोठमोठ्या मिरवणुका काढल्या. या मिरवणुका सशस्त्र नसाव्या, अशी लेनिननें सूचना दिली असतांही त्याकडे दुर्लक्ष करण्यांत आलें. क्रांतीनंतर सर्वतोपरी समर्थ झालेल्या हंगामी सरकारनें या मिरवणुका उधळून लावल्या. अर्थात् अकालीं झालेला हा बंडाचा प्रयत्न अयशस्वी ठरला व ट्रॉट्स्की आणि त्याचे पुरस्कर्ते पकडण्यांत येऊन हंगामी सरकारनें त्यांना तुरुंगांत डांबून टाकलें. या प्रयत्नानंतर लेनिन व स्टॅलिन यांना पकडण्याकरतां हंगामी सरकारनें बक्षिसें जाहीर केलीं. लेनिनला पकडण्याकरतां गुप्त हेरांची टोळकींच्या टोळकीं सर्व देशभर पसरलीं. लेनिन त्यांच्या हातीं लागला नाहीं. तो फिनलंडमध्यें निघून गेला; आणि स्टॅलिन! नेहमींप्रमाणें पेट्रोग्राडमधल्या कामगारजनतेंत तो मिसळून गेला. गुप्त पोलिस खात्यानें जंग जंग पछाडलें पण बोलशेव्हिकांचे हे दोन लोकप्रिय पुढारी सरकारच्या हातीं लागले नाहींत. जुलै ६ पासून ते ऑक्टोबर २५ म्हणजे दुसऱ्या क्रांतीच्या दिवसापर्यंत लेनिनला स्वतः होऊन पतकरलेल्या हद्दपारीच्या मुलखांत राहावें लागलें. अर्थात् या सर्व कालांतील पार्टीच्या मार्गदर्शनाचें काम स्टॅलिनलाच करावें लागलें. हा मध्यंतरीचा काल अत्यंत महत्त्वाचा होता. क्रांतीनंतर स्थापन झालेलें हंगामी सरकार आपलीं आश्वासनें पुरीं करूं न शकल्यामुळें जनतेच्या मनांतून तें उतरत चाललें होतें. केवळ पोलिस व लष्करी सत्ता मागें असल्यामुळें नेहमींप्रमाणें या सरकारची नोकर-

शाही बेगुमानपणें वागत होती. नोकरशाहीचा हा नेहमींचाच दंडक असतो. झारशाही नष्ट झाली होती, हंगामी सरकार अप्रिय झालें होतें, अशा परिस्थितींत राजवाड्यांतील कारस्थानांना ऊत येणें स्वाभाविक होतें. दरबारी लोकांना, सरदार-दरकदारांना, झारशाहीची आठवण होत होती. जनतेला खरी लोकसत्ता पाहिजे होती. पण जनतेच्या पुढाऱ्यांत फूट झाल्यामुळें राजघराण्यांतील कारस्थानांनीं डोकें वर काढणें साहजिक होतें. अशा कारस्थानांचें एक उदाहरण म्हणजे जुलैच्या बंडानंतर झारशाहीचा पुरस्कर्ता जनरल कॉर्निलोव्ह यानें हंगामी सरकार उलथून पाडून पुन्हा राजशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला हें होय. कॉर्निलोव्हच्या या बंडामुळें एक मोठाच गंभीर सवाल उत्पन्न झाला व लेनिनच्या गैरहजेरींत जबाबदारीनें पार्टीच्या कार्यांचें तारूं हांकणाऱ्या स्टॅलिनला या प्रश्नाचा निर्णय करावा लागला. हंगामी सरकार अप्रिय झालें होतें. राज्यकारभाराची आपली नालायकी त्यानें सिद्ध केली होती. कोणताही एखादा मोठा तडाखा बसला तर हें सरकार कोलमडून पडेल, इतकें तें खिळखिळें होतें आणि कॉर्निलोव्हसुद्धां ही परिस्थिति जाणूनच या सरकारच्या नाशास प्रवृत्त झाला होता. तेव्हां प्रस्थापित हंगामी सरकार उलथून पाडण्याच्या कामीं कॉर्निलोव्हला मदत करून नंतर आपल्याला हवें असलेलें कामकरी-शेतकरी जनतेचें सोव्हिएट सरकार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा, कीं झारशाहीच्या पुरस्कर्त्या कॉर्निलोव्हचें डोकें ठेंचण्याच्या कामीं हंगामी सरकारला मदत करून या हंगामी सरकारचेंच रूपांतर कामकरी-शेतकरी राज्यांत करावें हा एक मोठा सवाल होता. हंगामी सरकार कितीही अप्रिय असलें तरी तें लोकांचें होतें. भांडवलदारवर्गाच्या हातांत तें असलें तरी क्रांतीनंतर लोकशाहीच्या नांवावर देशांतील लिबरल पक्षाच्या लोकांनीं तें चालविलें होतें, अशा परिस्थितींत कॉर्निलोव्हला मदत करून व हंगामी सरकार नष्ट करून आपलें शुद्ध लोकशाहीचें ध्येय गांठावयाचें असल्या द्राविडी-प्राणायामापेक्षां झारशाहीच्या व एकतंत्री राजसत्तावादी लोकांना केव्हांही डोकें वर काढूं द्यावयाचें नाहीं, शक्य त्या उपायांनीं त्यांचा प्रथम नायनाट करावयाचा व नंतर आज सदोष असलेल्या लोकशाहीला विशुद्ध निर्दोष स्वरूप द्यावयाचें, हाच मार्ग स्टॅलिननें पसंत केला. जनतेचा खरा शत्रु कॉर्निलोव्ह होता; केरेन्स्की नव्हता. स्टॅलिननें अर्थातच हंगामी सरकारला या प्रसंगीं मदत

करण्याचें ठरवून या बिकट सवालाचा निर्णय लावला. बोलशेव्हिक पार्टी या वेळीं कॉर्निलोव्हला जाऊन मिळाली असती तर आपला धुव्वा उडाला असता ही गोष्ट केरेन्स्कीप्रभृति पुढाऱ्यांना पूर्णपणें माहीत होती. तेव्हां स्टॅलिनच्या मदतीचें आश्वासन मिळाल्याबरोबर त्यांच्या जीवांत जीव आला. आणि या मदतीची परतफेड म्हणून बोलशेव्हिक पार्टीच्या बाबतींत कांहीं महत्त्वाच्या सवलती देण्याचें त्यांनीं जाहीर केलें. जुलै महिन्यांत जे बोलशेव्हिक पुढारी पकडण्यांत आले होते त्यांना जामीनावर सोडण्यांत आलें व यापेक्षांही महत्त्वाची गोष्ट म्हणजे कॉर्निलोव्हला यशस्वी रीतीनें तोंड देण्याकरतां कामगार-जनतेला सशस्त्र करण्याचीही सवलत या सरकारला द्यावी लागली. असल्या प्रकारची सवलत देण्यास हंगामी सरकार अगदीं नाखूष होतें. पण प्रत्यक्ष प्राणावरच बेतल्यामुळें या सरकारला कामगारांना सशस्त्र करावें लागलें. कामगारवर्गाला एकदां सशस्त्र होण्याची संधि मिळाल्याबरोबर कामगारांनीं आपलें एक स्वतंत्र लष्कर उभारण्याचें ठरविलें. निरनिराळ्या कारखान्यांतील निरनिराळ्या कामगारांच्या स्वतंत्र तुकड्या निर्माण करावयाच्या, या तत्त्वावर या सशस्त्रीकरणाचा उपयोग करून घेण्याचें कामगारवर्गानें ठरविलें. सरकारच्या लष्करी खात्याचा व या कामगार-सैनिक संस्थेचा कांहीं संबंध ठेवण्यांत आलेला नव्हता. हंगामी सरकारला मदत करण्याचें ठरवून स्टॅलिननें कामगारवर्गाला सशस्त्र केलें हें एक त्यानें मोठेंच कार्य केलें. ऑक्टोबरमध्यें झालेल्या दुसऱ्या क्रांतीचीं सैनिक-पथकेंच स्टॅलिननें या रीतीनें उभारलीं. सशस्त्रीकरणाच्या या सवलतीचा स्टॅलिननें अशा रीतीनें फायदा घेतलेला पाहून हंगामी सरकार घाबरून गेलें. आपलें मरण त्यांच्या स्वतःच्याच डोळ्यांना दिसूं लागलें. पण हें सरकार या वेळीं इतकें पेंचांत सांपडलें होतें कीं, स्टॅलिन मागेल त्या सवलती देण्याशिवाय त्याला गत्यंतरच नव्हतें. स्टॅलिनची मदत धिक्कारावी तर कॉर्निलोव्हची नागवी तरवार डोक्यावर लटकत असलेली दिसत होती. अशा परिस्थितींत स्टॅलिनला शरण जाणेंच त्याला भाग होतें.

रशियांत क्रांति होऊन हंगामी सरकार प्रस्थापित झालें तरी सरहद्दीवरील आघाडीवर रशियनांचा पराभव होण्याचें कांहीं थांबलें नव्हतें. देशांत कोणतीही एक जबाबदार सत्ता अस्तित्वांत नसल्यामुळें, रशियाची नाचक्की शिगेला

पोंचली होती. तेव्हां ही नाचक्की थांबविण्याकरतां झारशाही पुन्हा प्रस्थापित करून, आपण सर्वाधिकारी बनण्याचें कॉर्निलोव्हनें ठरविलें. कॉर्निलोव्ह हंगामी सरकारचा सरसेनापति होता. केरेन्स्कीला बाजूला सारून सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेण्याकरतां तो पेट्रोग्राडवर चालून आला. कॉर्निलोव्हच्या स्वारीच्या बातमीनें पेट्रोग्राडमधील सर्व कामगारवर्गाला खडबडून जागे केलें. या लष्करी अरेरावापासून राजधानीचें रक्षण करण्याकरतां शहरांतील एकूण एक कामगार संघटित झाले. कॉर्निलोव्हपासून राजधानीचें रक्षण करण्याचे कामीं बोल्शेव्हिक पार्टीनें पुढाकार घेतला. या प्रसंगीं हंगामी सरकारला त्यांनीं मदत केली. हंगामी सरकारच्या लोकांनीं पार्टीचा कितीही छळ केला व तिच्याविरुद्ध नाना प्रकारचे आक्षेप घेऊन तिला लोकांच्या मनांतून उतरविण्याचा प्रयत्न केला तरी, बोल्शेव्हिकांनीं या सर्व गोष्टी बाजूला सारून लोकशाहीच्या रक्षणाकरतां हंगामी सरकारशींही त्यांनीं संगमन केलें. या गोष्टींमुळें बोलशेव्हिकांविरुद्ध जी दोषारोपांची वावटळ उठविण्यांत आलीं होती ती आपोआपच नष्ट झाली. बोल्शेव्हिकांनीं कॉर्निलोव्हचा पराभव करण्याच्या कामीं हंगामी सरकारला मदत करून रशियन जनतेवर कोसळूं पाहत असलेलें संकट टाळलें. या धोरणामुळें बोल्शेव्हिक हेच जनतेचे खरे मित्र आहेत हें सिद्ध झालें. कॉर्निलोव्हचा पराभव झाल्यावर हंगामी सरकारला बोल्शेव्हिकांना वगळून राज्यकारभार चालविणें अर्थातच अशक्य झालें. हंगामी सरकारच्या मुत्सद्द्यांनीं पुन्हा कशीं तरी एकीचीं ठिगळें जोडून हंगामी संयुक्त सरकार बनविलें. कॉर्निलोव्हच्या उतावीळपणामुळें व महत्त्वाकांक्षेमुळें एक गोष्ट नक्की झाली. दुसरी राज्यक्रांति करून सर्व सत्ता सोव्हिएटांच्या हातीं घेणें अपरिहार्य आहे, असें रशियांतील जनतेला वाटूं लागलें.

कॉर्निलोव्हचें संकट दूर झाल्याबरोबर केरेन्स्की उलटून पडला. बोलशेव्हिकांची मदत नसती तर हंगामी सरकार केव्हांच धुळीला मिळालें असतें हें तो विसरला व आयत्या वेळीं पूर्वीचीं सर्व वैरें विसरून ज्यांनीं हंगामी सरकारला मदत केली त्यांच्याविरुद्धच पुन्हा दोषारोपांची वावटळ उठवून रशियन जनतेच्या मनांत असलेलें बोलशेव्हिकांचें स्थान उखडून टाकण्याचा त्यानें प्रयत्न केला. या प्रयत्नांत केरेन्स्कीला यश येणें शक्य नव्हतें. पण आपलें स्थान गमावण्याचाच प्रसंग आल्याबरोबर केरेन्स्कीला सारासार विचारानें सोडलें

असल्यास त्यांत कांहींच नवल नव्हतें. बोलशेव्हिकांविरुद्ध किटाळें उठवून त्यांना अप्रिय करण्याची चळवळ हातीं घेण्यापूर्वी पेट्रोग्राडच्या रक्षणास असलेलें सैन्य तेथून दूर करण्याचा त्यानें हुकूम दिला. हें संरक्षक सैन्य अर्थात् बोलशेव्हिक होतें. हें संरक्षक सैन्य काढून टाकून ज्यांच्या राजनिष्ठेबद्दल संशय घेणें शक्य नाहीं, असें लष्कर त्या ठिकाणीं नेमणें त्याला जास्त शहाणपणाचें वाटलें. असें न करण्यानें झालें असतें काय तर हंगामी सरकारचे दिवस जलदीनें भरत आले असते. केरेन्स्कीलाही या गोष्टीची जाणीव नव्हती असें नाहीं. तेव्हां त्यानें या बाबतींत सरळ हुकूम न देतां शहरांच्या वाटांचें रक्षण करण्याकरतां पेट्रोगाडच्या संरक्षक सैन्याचा उपयोग करावा, अशा सूचना त्यानें जनरल स्टाफला पाठविल्या. आपल्या विश्वासांतील संरक्षक सैन्य नेमण्यापूर्वी आपल्याला विरोधी असलेल्या सैन्याचा परस्पर कांटा काढण्याचा हा केरेन्स्कीचा डाव होता. पण दुर्दैवानें केरेन्स्कीचा हा डाव क्रॉन्स्टॅड्ट नाविकांचा प्रतिनिधि डिबेंको यानें ओळखला. कांहीं वर्षांनंतर या प्रसंगाची सर्व हकीकत स्टॅलिननें आपल्या एका जुन्या दोस्ताला सांगितली. क्रॉन्स्टॅडट्च्या नाविकांच्या सोव्हिएटांच्या बैठकींत केरेन्स्कीच्या योजनेची चर्चा झाली त्या वेळची ही हकीकत आहे. रेव्हेल व शहरांत जाणारे रस्ते यांचें रक्षण करण्याकरतां पेट्रोग्राडच्या संरक्षक सैन्याची गरज आहे, असें जेव्हां सांगण्यांत आलें त्या वेळीं डिबेंको यानें दिलेलें पुढील उत्तर महत्त्वाचें होतें. “रेव्हेलचें रक्षण करण्यासंबंधाचा प्रश्नच नाहीं. पण या बाबतींत विश्वासघाताचें यत्किंचित् जरी चिन्ह दिसून आलें तरी सर्व जनरल स्टाफला आम्ही शिडाच्या कांठ्यांवर फाशी देऊं. क्रांतीच्या रक्षणाच्या दृष्टीनें शहरांच्या वाटांचें रक्षण करणें आम्हांला प्राप्तच आहे.” अगदीं वरपासून खालपर्यंत बोलशेव्हिक पार्टींत दिसून येणारी ही एकवाक्यता पाहिल्याबरोबर केरेन्स्कीनें पेट्रोग्राडचें संरक्षक सैन्य मोडून टाकण्याची कल्पनाच सोडून दिली.

याच सुमारास म्हणजे जुलै २६ ते ऑगस्ट ३ पर्यंत बोलेशेव्हिक पार्टीच्या सहाव्या कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. या अधिवेशनाला लेनिन हजर नव्हता. अधिवेशनाचें सर्व काम स्टॅलिननें लेनिनच्या सूचनांप्रमाणें चालविलें. पेट्रोग्राडमध्यें वरील प्रकारच्या हालचाली चालू असतांना स्टॅलिननें फिनलंडला जाऊन लेनिनशीं या बाबतींत चर्चा केली व हंगामी सरकारपासून सत्ता काबीज कर-

प्याचे दिवस जवळ आले आहेत व त्या दृष्टीनें आपली तयारी ठेवली पाहिजे, असें दोघांनीं ठरविलें. पार्टीच्या सहाव्या काँग्रेसच्या वेळीं या स्टॅलिन-लेनिन मुलाखतीचा बराच उपयोग झाला. पार्टीची ही सहावी काँग्रेस ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची होती. पार्टीच्या हालचालींना तिनें एक नवीन वळण दिलें. हंगामी सरकारविरुद्ध सशस्त्र उठावणी कशी करावयाची यासंबंधाच्या सूचनांचा या काँग्रेसमध्यें खल करण्यांत आला. या काँग्रेसमध्यें आणखी एक महत्त्वाची गोष्ट झाली व ती म्हणजे स्टॅलिनची ट्रॉट्स्कीशीं झालेली दोस्ती ही होय. "प्रतिक्रांतिवाल्यांबरोबर दोन हात करण्यास तयार असलेल्या आंतरराष्ट्रीयवाद्यांशीं एकी" हें आपलें या वेळीं घोषवाक्य असावयास पाहिजे, असें स्टॅलिननें जाहीर रीतीनें सांगितलें. ही एकी घडविणारा खुद्द स्टॅलिनच होता. त्याच्याच सूचनेप्रमाणें नवीन निवडण्यांत आलेल्या सेंट्रल कमिटींत ट्रॉट्स्कीला घेण्यांत आलें. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, स्टॅलिनचा व ट्रॉट्स्कीचा पुढें ज्या सिद्धांताच्या बाबतींत मतभेद झाला त्याची भूमिका स्टॅलिननें याच काँग्रेसमध्यें विशद करून सांगितली. दुसरी सोव्हिएट क्रांति यानंतर तीन महिन्यांनीं झाली. त्यापूर्वींच स्टॅलिननें धीटपणानें या बाबतींतील विचार प्रकट केले आणि ट्रॉट्स्की व स्टॅलिन यांच्यांत जो जगप्रसिद्ध राजकीय व आर्थिक मतभेद झाला त्याचें बीज याच वेळीं रोवण्यांत आलें.

**"एका देशांत समाजवादी क्रांति होणें शक्य आहे, का तिचें अस्तित्व जागतिक क्रांतीवर अवलंबून आहे?"** यापैकीं पहिल्या मताचा पुरस्कार स्टॅलिननें केला व ट्रॉट्स्की दुसऱ्या मताला चिटकून राहिला. या सर्व मतभेदाचा मुख्य मुद्दा ट्रॉट्स्कीच्या "शाश्वत" क्रांतीच्या सिद्धांताभोंवतीं घुटमळत होता. 'कामगारांची सर्वाधिकारी सत्ता' या लेनिनच्या सिद्धांताच्या अगदीं विरुद्ध ट्रॉट्स्कीचा हा सिद्धांत आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सत्ता काबीज करण्यासंबंधाचा ठराव ज्या वेळीं या काँग्रेसमध्यें चर्चेस निघाला त्या वेळींही आपल्या मताविरुद्ध आलेल्या सर्व सूचनांना स्टॅलिननें विरोध केला. "रशिया हा असाच देश आहे कीं, त्यामध्यें समाजवादी क्रांति होणें शक्य आहे. युरोपमधील क्रांतीवर अवलंबून राहण्याचें त्याला कारण

नाहीं. पश्चिम युरोपपेक्षां आपल्या क्रांतीचा पाया अधिक रुंद आहे. युरोपमध्यें तेथल्या कामगार-जनतेला भांडवलशाहीशीं एकाकी तोंड द्यावें लागतें. आमचें तसें नाहीं. शेतकरीवर्गांतील अगदीं दरिद्री शेतकरीही आमच्या कामगारांना मदत करण्यास तयार आहे....क्रांतीचें मार्गदर्शन फक्त युरोपच करील, ही जुनीपुराणी कल्पना आपण सोडून दिली पाहिजे. दुराग्रही Dogmatic व कल्पक ( Creative ) असे मार्क्सवादाचे दोन प्रकार आहेत. दुसऱ्या प्रकाराचा मी पुरस्कर्ता आहे." स्टॅलिनचे हे ठोसदार व स्पष्ट उद्गार त्या वेळीं सर्व विसरून गेले. यानंतर रशियांत जी दुसऱ्या क्रांतीची वावटळ उठली त्यावेळींही या उद्गारांचें महत्त्व कोणाला वाटलें नाहीं. जागतिक क्रांतीचें महत्त्व लेनिन पूर्णपणें जाणून होता. पण कामगार-सर्वाधिकारी सत्तेचा तो पुरस्कर्ता होता. तथापि स्टॅलिननें आपलें हें मत पार्टीपुढें मांडून त्यावर चर्चा करण्याचें या वेळीं टाळलें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

हंगामी सरकार अद्याप केरेन्स्कीच्या हातांत होतें. लोकशाही व स्वातंत्र्य या सैद्धांतिक तत्त्वांनाच तो अद्याप चिकटून राहिला होता. आपण एका ज्वालामुखीच्या तोंडावर बसून राहिलों आहों, हें बिचाऱ्याला माहीत नव्हतें. "लोकशाही व स्वातंत्र्य" असल्या अमूर्त कल्पना सामान्य जनतेला पसंत नव्हत्या. "शांति व जमीन" या दोनच गोष्टी जनतेला पाहिजे होत्या. आपल्या गुप्त स्थानांतून पत्रकांवर पत्रकें काढून जनतेच्या या भावनांना प्रज्वलित करण्याचें कार्य लेनिन करीत होता व त्याचे हजारों चळवळ्ये अनुयायी त्याला या कामीं मदत करीत होते. नेमस्त समाजवाद्यांच्या पायाखालची भूमि सारखी घसरत चालली होती. प्रत्येक निवडणुकीच्या वेळीं नेमस्तांना मागें टाकून बोल्शेव्हिक प्रतिनिधी राज्यकारभारांतील जागा पटकावीत होते. केरेन्स्कीचा लोकांवर विश्वास होता. पण लोक केरेन्स्कीवर विश्वास ठेवण्यास तयार नव्हते. हंगामी सरकारचीं सर्व सूत्रें जणूं काय बोल्शेव्हिकांनींच आपल्या हातांत ठेवलीं होतीं. क्रांतीच्या उठावाची संघटना करण्याच्या कामीं बोल्शेव्हिकांचे सर्व प्रयत्न केंद्रीभूत झाले होते. ट्रॉट्स्की आतां मोकळा झालेला होता. पेट्रोग्राड सोव्हिएटचा तो अध्यक्ष होता. क्रांतिकारी लष्करी कमिटीचीं सर्व सूत्रें त्याच्या हातांत होतीं. पार्टीच्या चतुःसीमेंत राहून क्रांतीच्या उठावाची तयारी स्टॅलिन करीत होता. बोल्शेव्हिकांच्या धोरणानें व त्यांच्या नियंत्रणा-

खालींच क्रांतीचा उठाव झाला पाहिजे व ती यशस्वी झाली पाहिजे या धोरणानेंच स्टॅलिनचें संघटनेचें काम चालू होतें.

हंगामी सरकारवर आलेलें हें संकट टाळण्याकरतां केरेन्स्कीनें नॅशनल डेमोक्रॅटिक परिषद् भरविण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण या परिषदेवर बोल्शेव्हिकांनीं बहिष्कार घातला. कामेनेव्ह व रायकोव्ह या बहिष्काराच्या विरुद्ध होते तर ट्रॉट्स्की व स्टॅलिन दोघे एकमतानें या बहिष्काराचा पुरस्कार करीत होते. या गडबडीच्या दिवसांसंबंधानें स्टॅलिनचा एक असिस्टंट सेक्रेटरी पेस्टकोव्हस्की यानें पुढील मजेदार हकीकत लिहून ठेवली आहे.

“कॉर्निलोव्ह प्रकरण चालू होतें त्या वेळीं स्मॉलने इन्स्टिटयूटमध्यें मी स्टॅलिनला भेटण्याकरतां वारंवार जात असे. (बोलशेव्हिकांचें मुख्य ठाणें या वेळीं येथें होतें.) ऑक्टोबर क्रांतीच्या तयारीचें मुख्य काम करण्यांत सेंट्रल कमिटीचे सभासद स्टॅलिन, स्वर्डलोव्ह व जरजिन्स्की हे तिघेजण गुंतलेले आढळून येत. पेट्रोग्राड कमिटीचें व लष्करी कमिटीचें सर्व काम या तिघांच्या धोरणानें चालू होतें. या तयारीच्या राजकीय मार्गदर्शनाचा चार्ज एकट्या स्टॅलिनच्या हातांत होता. पार्टीतर्फे निघणाऱ्या पत्राचा डायरेक्टरही तोच होता. पेट्रोग्राडमधील कामगार जनता स्टॅलिनला त्या वेळीं फारशी ओळखीत नव्हती. स्टॅलिनलाही लोकप्रियतेची हाव नव्हती. आपण कांहीं मोठे वक्ते नाहीं, याची जाणीव स्टॅलिनला असल्यामुळें मोठमोठ्या कामगारांच्या सभांतून तो जाण्याचें टाळीत असे. पण याच्या उलट पार्टीची एकही सभा तो हजर असल्याशिवाय भरत नसे व या सभेंतून स्टॅलिन बोलला नाहीं, असें होत नसे. यामुळें पार्टीमधील कार्यकर्त्या सभासदांच्या तो पूर्ण परिचयाचा झाला होता.

क्रांतीच्या पहिल्या पहिल्या दिवसांत ‘सर्व सत्ता सोव्हिएटांच्या हातीं’ ही घोषणा म्हणजे एक नवलाची गोष्ट आहे, असें रशियन जनतेला वाटत होतें. एप्रिलमध्यें हंगामी सरकारविरुद्ध ही घोषणा करण्यांत आली. जूनमध्यें कामगारांनीं व सैनिकांनीं प्रचंड मिरवणुका काढून व त्यांतून या घोषवाक्यांचा गजर करून या कल्पनेला जोराचा पाठिंबा दिला. जुलैमध्यें केरेन्स्कीचें हंगामी सरकार व क्रांतिकारी जनता यांच्यांत जी सशस्त्र झटापट झाली तिच्या मुळाशीं ही घोषणाच होती.

ऑगस्टअखेर कॉर्निलोव्हनें खुद्द पेट्रोग्राडवर चाल केली; पण या उठावाचा

एका दृष्टीनें फायदाच झाला. यामुळें देशांतल्या सर्व क्रांतिकारक शक्ति एकवटल्या व संघटित झाल्या. या उठावामुळें सोव्हिएटांमध्यें जणूं नव्या शक्तीचाच संचार झाला. सैबेरिया, कॉकेशस, फिनलंड, युरल, खारकोव्ह व ओडेसा येथील राजसत्ता त्यांनीं काबीज केली. अशा रीतीनें सत्ता काबीज करून क्रांतिकारकांचें सामर्थ्य वाढलें नसतें तर क्रांतीचा नायनाटच झाला असता. याप्रमाणें पेट्रोग्राडमधील एका लहानशा बोल्शेव्हिक गटानें केलेली 'सर्व सत्ता सोव्हिएटांच्या हातीं' ही घोषणा देशव्यापी बनली आणि ऑगस्टअखेर तर रशियांतील सर्व क्रांतिकारी गटांनीं या घोषणेला उचलून धरलें. ही घोषणा आतां प्रत्यक्ष अमलांत आणण्याचा काल समीप येत चालला होता.

कामगारक्रांतीच्या उठावाचा हाच क्षण आहे, असे निरोप लेनिन आपल्या लपलेल्या जागेंतून सारखे पाठवीत होता. पेट्रोग्राड-सोव्हिएटमध्यें बोलशेव्हिकांचें बहुमत होतें. देशांतील बहुतेक सोव्हिएटांतून बोलशेव्हिकांचाच वरपगडा होता. कामगार, शेतकरी व सैनिक यांच्या सोव्हिएटांच्या हातीं सर्व सत्ता असली पाहिजे, असें प्रतिपादन करणारी बोलशेव्हिक पार्टी क्रांतीकरतां केव्हांही सज्ज असतांना व देशांतील इतर क्रांतिकारी गटही याच मताचे असतांना क्रांतीचा उठाव करण्यास कांहींच हरकत नव्हती.

पण हा उठाव आतांच करूं नये, सोव्हिएट काँग्रेसची बैठक भरवून हा निर्णय घ्यावा, असें ट्रॉट्स्कीचें मत पडलें. कामेनेव्ह व झिनोव्हिफ तर मुळांतच या उठावाविरुद्ध होते. असा प्रयत्न म्हणजे एक साहसच होईल तेव्हां घटनासमिति भरेपर्यंत आपण या गोष्टीला हात घालूं नये, अशा कालहरणाकडे कामेनेव्ह व झिनोव्हिफ यांचा कल होता.

स्टॅलिनचा लेनिनला पूर्ण पाठिंबा होता. ऑक्टोबर १० व आक्टोबर १६ या दोन दिवशीं लागोपाठ बोलशेव्हिक पार्टीच्या सेंट्रल कमिटीच्या महत्त्वाच्या सभा भरल्या व कामेनेव्हप्रभृति सशस्त्र उठावाच्या विरुद्ध असतांनाही थोडक्याच दिवसांत क्रांतीचें निशाण उभारण्याचें ठरविण्यांत आलें. या बैठकींतून चर्चा चालू असतांना स्टॅलिननें कामेनेव्हप्रभृतींच्या कालहरणाच्या धोरणावर सडकून टीका केली. "कामेनेव्ह व झिनोव्हिफ आज सुचवीत आहेत तें मान्य करणें म्हणजे प्रतिक्रांतिवाल्यांना संघटित होण्याला संधि देण्यासारखेंच आहे. असें झाल्यास आम्हांला सारखी माघार घ्यावी लागेल;

व क्रांति करून आज जें आम्हीं संपादन केलें आहे तेंही गमावून बसावें लागेल. आज आपल्यांत दोन पक्ष आहेत. क्रांतीच्या लढ्यांत विजयी होण्याच्या इर्षेनें एक पक्ष पुढें जाऊं पाहत आहे व दुसऱ्याचा क्रांतीवरच मुळीं विश्वास नसून तो या प्रयत्नाला विरोध करूं पाहत आहे. पेट्रोग्राड सोव्हिएटांनीं तर आजच बंडाचें निशाण उभारलें आहे आणि केरेन्स्कीच्या विरुद्ध आरमारी सैनिकांनीं बंडाचा उठाव केला आहे. ऑक्टोबर १६ रोजीं पार्टीच्या सेंट्रल कमिटीची एक खासगी सभा भरविण्यांत आली व पुढील क्रांतीच्या उठावाच्या दृष्टीनें एक क्रांतिकारी लष्करी कमिटीही नेमण्यांत आली. या कमिटींत ट्रॉट्स्कीला अर्थात् घेण्यांत आलें होतें. या उठावाच्या सर्व हालचाली ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाखालींच झाल्या, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सशस्त्र क्रांतीच्या उठावाच्या आदल्या दिवशीं म्हणजे नोव्हेंबर ६ रोजीं लेनिननें सेंट्रल पार्टीच्या सभासदांना जें पत्र पाठविलें त्यांत "आतां यापुढें कालहरण करणें म्हणजे आत्मनाश करून घेण्यासारखें आहे" असें स्पष्टपणें कळविलें. स्टॅलिननेंही या पत्रानुसार 'कामगार-पुढारी' या पत्रांतल्या अग्रलेखांत कामगारवर्गाला पुढील अपील केलें :

"आतां अशी वेळ आली आहे कीं, या वेळीं दिरंगाई करणें म्हणजे क्रांतीच्या सर्वच कार्याचा नाश करून घेण्यासारखें आहे.

"जमीनदारांचें व भांडवलवाल्यांचें आजचें सरकार नष्ट करून त्या ठिकाणीं कामगारांचें व शेतकऱ्यांचें सरकार प्रस्थापित केलें पाहिजे.

"कामगार, शेतकरी व सैनिक यांच्या प्रतिनिधींच्या हातांतच राज्यसत्ता आली पाहिजे.

"एक नवीन सरकार अस्तित्वांत आलें पाहिजे. सोव्हिएटांनीं हें सरकार निवडलेलें असलें पाहिजे व सोव्हिएटांना तें खारीज करतां आलें पाहिजे व सोव्हिएटांनाच तें जबाबदार असलें पाहिजे."

शेवटीं ७ नोव्हेंबरचा क्रांतीचा दिवस उगवला. क्रांतिकारी लष्करी कमिटीच्या गुप्त हुकमानें पेट्रोग्राडमध्यें सर्वत्र सशस्त्र लष्करी तुकड्या हालचाल करतांना दिसूं लागल्या. हंगामी सरकार व त्याचे अधिकारी भयानें इतके गर्भगळित झाले होते कीं, या तुकड्यांना कोणीही विरोध करण्यास पुढें आलें नाहीं. सरकारी इमारती, रेलवे स्टेशनें, बँका, तार ऑफिसें वगैरे या लष्करी

तुकड्यांनीं बिनविरोध ताब्यांत घेतलीं. "सोव्हिएटांच्या हातीं सर्व सत्ता आली आहे" असें ट्रॉट्स्कीनें जाहीर केलें. विंटर पॅलेस अद्याप क्रांतिकारी लष्कराच्या ताब्यांत आला नव्हता. ट्रॉट्स्की, स्टॅलिन, पोडव्हॉइस्कीप्रभृति पुढारी क्रांतिवाल्या लष्कराला स्मॉलनी राजवाड्यांतून हुकुमावर हुकूम देत होते. पेट्रोग्राडमध्येंच काय पण देशांत सर्वत्रच अशा प्रकारचे उठाव झाले. हा सर्व प्रकार पाहून केरेन्स्कीनें केव्हांच यःपलाय केलें होतें.

याच सुमारास रेपिन नांवाचा एक चित्रकार केरेन्स्कीला पुढें बसवून त्याचें चित्र रेखाटत होता. त्याच्या अनेक बैठकी झाल्या होत्या. पण हें चित्र रेखाटण्याची अखेरची बैठक होण्यापूर्वींच केरेन्स्कीला विंटर पॅलेसमधून पळून जावें लागलें. रेपिननें बिचाऱ्यानें राजवाड्याचा कोपरान् कोपरा शोधला पण केरेन्स्की त्याला सांपडला नाहीं. राजवाडा सर्वत्र सामसूम झाला होता. कोणीही पहारेकरी जाग्यावर नव्हता. बहुमूल्य कलाकृतींनीं, बहुमूल्य रत्नांनीं, सोन्याचांदीच्या दागिन्यांनीं भरलेला तो राजवाडा आज ओसाड पडला होता.

नोव्हेंबर ७ ची ही क्रांति याप्रमाणें बिनविरोध यशस्वी झाली आणि कामगार व सैनिक यांच्या प्रतिनिधींच्या पेट्रोग्राड-सोव्हिएटनें आपल्या क्रांतिकारी लष्करी कमिटीमार्फत सरकारी रीत्या खालील जाहीरनामा प्रसिद्ध केला :—

"ज्या ध्येयाकरतां जनता लढत होती तें आतां साध्य झालें आहे. लोकशाही शांतता ताबडतोब प्रस्थापित झाली पाहिजे. जमिनीवरील खासगी मालकी नष्ट झाली पाहिजे, उत्पादनावर कामगारांचा ताबा असला पाहिजे व सोव्हिएट सरकारची निर्मिति झाली पाहिजे. या सर्व जनतेच्या मागण्या आतां आपल्याला खात्रीनें पुऱ्या करतां येतील."

याच दिवशीं रात्रीं ऑल रशियन सोव्हिएट कॉंग्रेसचें दुसरें अधिवेशन भरविण्यांत आलें व क्रांतिकारी लष्करी कमिटीनें सोव्हिएटांच्या हातांत सत्ता आल्यासंबंधाचा जो जाहीरनामा काढला होता तो प्रचंड बहुमतानें मंजूर करण्यांत आला. "कामगार, सैनिक व शेतकरी यांच्या प्रचंड बहुमताचा पाठिंबा असलेली, पेट्रोग्राडचें संरक्षक सैन्य व कामगार यांच्या विजयी उठावामुळें बलिष्ठ झालेली ही कॉंग्रेस सरकार-सत्ता आपल्या ताब्यांत घेत आहे" असें या कॉंग्रेसनें जाहीर केलें व लेनिनच्या नेतृत्वाखालीं पहिलें सोव्हिएट सरकार स्थापन करण्यांत आलें.

या सरकारमध्यें राष्ट्रांच्या कामकाजांचा लोकप्रतिनिधि म्हणून स्टॅलिनची नेमणूक करण्यांत आली. ही सोव्हिएट सत्ता सुरक्षित राखण्याकरतां लेनिन व स्टॅलिन यांनीं जर कोणतें पहिलें काम केलें असेल तर तें रशियांतील अनेक राष्ट्रांच्या शेतकरी जनतेचा या नव्या सरकारला पाठिंबा मिळविणें हें होय. "शांति, शेतकरी-क्रांति व रशियांतील राष्ट्रांना स्वातंत्र्याचे हक्क" या तीन तत्त्वांवर रशियांतील कामगारांच्या लाल बावट्याखालीं वीस राष्ट्रांतील शेतकरी जनता जमा करण्यांत आली, असें स्टॅलिननें या प्रसंगाला अनुसरून "मार्क्स-वाद व राष्ट्रीय सवाल" या आपल्या लेखांत म्हटलें आहे. क्रांति झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशीं (नोव्हेंबर ८) दुसऱ्या सोव्हिएट काँग्रेसनें शांतते-संबंधाचें व जमिनीच्या मालकीसंबंधाचें आज्ञापत्र जाहीर केलें. पुन्हा लगेच ता. १६ नोव्हेंबर रोजीं "रशियांतील राष्ट्रांच्या हक्कांचा जाहीरनामा" सोव्हि-एट सरकारमार्फत जाहीर करण्यांत आला. हा जाहीरनामा स्टॅलिननें तयार केला होता व त्यांत सोव्हिएट सरकारच्या राष्ट्रविषयक धोरणाचें स्पष्टीकरण केलें होतें :

१ रशियांतील राष्ट्रांचें अधिराज्य व समानाधिकार.

२ अलग होण्याच्या व स्वतंत्र सरकार प्रस्थापित करण्याच्या हक्कांसह रशियांतील राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचें स्वातंत्र्य.

३ सर्व राष्ट्रीय विशेषाधिकार व धार्मिक निर्बंध दूर करणें.

४ रशियन प्रदेशांत राहणाऱ्या निरनिराळ्या मानववंशांच्या गटांना व राष्ट्रीय अल्पसंख्याकांना आपली प्रगति करून घेण्याचें स्वातंत्र्य.

वरील चार तत्त्वांवर रशियांतील राष्ट्रीय धोरणाचा जाहीरनामा आधारलेला होता. राष्ट्रीय कामकाज खात्याचा लोक-मुखत्यार या नात्यानें स्टॅलिननें सुसंगतपणें राष्ट्रीय समानाधिकाराचें तत्त्व अमलांत आणलें व सर्व राष्ट्रीय जुलुमाचा व विषमतेचा नायनाट केला.

# अंतर्युद्ध ८

नोव्हेंबरची क्रांति फारसे आयास न पडतां झाली खरी; पण ती सोव्हिएट सरकारला सुखाची गेली नाहीं. या क्रांतीनंतर रशियावर ज्या भयंकर आपत्ति आल्या त्यांतून बाहेर पडण्यानेंच सोव्हिएट रशियाच्या कर्तबगारीची खरी कसोटी लागली. रशियांतील ही क्रांति साधी लोकशाही क्रांति नव्हती. फ्रान्स-मध्यें अठराव्या शतकाच्या अखेर झालेल्या क्रांतीप्रमाणें एकतंत्री राजसत्ता नष्ट करून त्या ठिकाणीं लोकशाही सत्ता प्रस्थापित करावयाची अशा मर्यादित स्वरूपाची ही क्रांति नव्हती. या क्रांतीनें समाजाच्या मुळाशीं हात घातला होता. खरी अस्सल लोकशाही प्रस्थापित करण्याच्या ईर्षेनें रशियांतील बोल्शेव्हिक क्रांतिवीर सुसज्ज झाले होते. समाजांत यापुढें कोणी कोणाची पिळणूक करतां कामा नये. जनतेंतील एकूण एक सर्व घटकांना आपल्या प्रगतीची समान संधि मिळाली पाहिजे. सर्व प्रकारच्या गुलामगिरीचें मूळ असलेल्या वर्गकलहाचा नायनाट झाला पाहिजे, या ईर्षेनें लेनिनप्रभृति मार्क्सवाद्यांनीं या क्रांतीला हात घातला होता. या साम्यवादी क्रांतिकारकांना एक नवीन संस्कृतीच निर्माण करावयाची होती. यामुळें खालच्या समाजास पिळण्यास सोकावलेल्या भांडवल-दारांच्या व वासाहतिक राष्ट्रांना कायमच्या गुलामींत ठेवूं इच्छिणाऱ्या साम्राज्य-वाद्यांच्या डोळ्यांत ही क्रांति शल्यासारखी सलूं लागली असल्यास त्यांत कांहींच नवल नव्हतें.

नोव्हेंबरच्या क्रांतीनंतर लेनिन-स्टॅलिनप्रभृति क्रांतीच्या पुढाऱ्यांनीं जे तड-जोडीचें व शांतीचें धोरण स्वीकारलें त्यामुळें तर इंग्लंड, फ्रान्स वगैरे साम्राज्य-वादी राष्ट्रें सोव्हिएट सरकारवर जास्तच जळफळूं लागलीं. जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्याविरुद्ध एक युद्धमान राष्ट्र म्हणून रशियाचें नातें जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत या क्रांतीनंतरचें सोव्हिएट सरकार सुरक्षित आहे, असें म्हणतां याव-याचें नाहीं, ही गोष्ट लेनिन-स्टॅलिनप्रभृतींनीं पूर्णपणें जाणली होती. म्हणून ही क्रांति यशस्वी झाल्यानंतर त्यांनीं पहिली महत्त्वाची गोष्ट केली ती ही कीं,

जगांतील सर्व युद्धमान राष्ट्रांबरोबर तडजोड व तह घडवून आणून रशियांत शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्याला हात घातला व त्याप्रमाणें या सर्व राष्ट्रांना त्यांनीं तशी विनंतिपत्रेंही पाठविलीं. इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही राष्ट्रांनीं सोव्हिएट क्रांतिकारकांची ही विनंति धुडकावून लावली व त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारची तडजोड करण्याचें नाकारलें. इंग्लंड-फ्रान्सनें नकार दिल्या-बरोबर सोव्हिएट सरकारनें जर्मनी-ऑस्ट्रियाबरोबर तडजोडीचें बोलणें सुरू करण्याचें ठरविलें. ३ डिसेंबर १९१७ रोजीं हें बोलणें सुरू झालें व ५ डिसेंबर रोजीं युद्धतहकुबीच्या कागदावर दोन्ही पक्षांच्या सह्या झाल्या. लेनिन-स्टॅलिन-प्रभृति पुढाऱ्यांनीं पक्षाच्या मध्यवर्ती कमिटीच्या नांवावर ब्रेस्टलिटोव्हिस्कच्या तहावर सह्या करण्यांत याव्या असा आग्रह धरला; पण ट्रॉट्स्कीप्रभृति वाम-पक्षाच्या लोकांनीं या तहाविरुद्ध कोलाहल माजविलें. यामुळें १० फेब्रुवारी १९१८ रोजीं या तहाच्या वाटाघाटी तात्पुरत्या फिसकटल्या. "ना शांतता ना युद्ध" हें या वेळीं ट्रॉट्स्कीचें धोरण होतें व जर्मनीनें ज्या शर्ती घातल्या होत्या त्या मान्य करणें अपमानास्पद आहे, असें या वामपक्षीयांचें मत होतें.

वाटाघाटी फिसकटल्या व ट्रॉट्स्कीनें बोल्शेव्हिक पक्षाच्या सूचना धाब्यावर बसवून सोव्हिएट प्रजासत्ताक राज्य जर्मनीनें घातलेल्या शर्तींवर त्याच्याशीं तह करण्यास तयार नाहीं, असें जाहीर केलें. आणि त्याच वेळीं उलट सोव्हिएट प्रजासत्ताक युद्ध चालू ठेवण्यासही तयार नाहीं व सर्व लष्कर लोकप्रातिनिधिक बनविण्याचें आपलें कार्य चालू ठेवील, असेंही त्यानें जाहीर केलें. जर्मनांना तेंच पाहिजे होतें. त्यांनीं युद्ध तहकुबीचा करार सरळ सरळ उधळून लावला व ते आपल्या लष्कराच्या जोरावर रशियांतील मुलूख जिंकीत पेट्रोग्राडवर चालून आले. जर्मनीनें केलेल्या सशस्त्र हल्ल्यानें सर्व रशिया जागा झाला. क्रांती-च्या भावनांना एक जोराची उसळी मिळाली. "समाजवादी पितृभूमि संक-टांत आहे" अशी घोषणा कम्युनिस्ट पार्टी व सोव्हिएट सरकारतर्फे करण्यांत आली. तिला उत्तर म्हणून हजारों कामगार व विद्यार्थी लाल फौजेंत दाखल होण्यास तयार झाले. या तरुण कामगार-किसानांच्या व विद्यार्थ्यांच्या लष्करी तुकड्या बनविण्यांत आल्या आणि नवीन उभारलेल्या या क्रांतिकारी फौजेनें सर्व आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असलेल्या जर्मन सेनेला यशस्वी रीतीनें तोंड दिलें. नर्व्हा व पस्कोव्ह येथें जर्मन स्वारीला जोराचा अटकाव करण्यांत आला

आणि यामुळें अर्थातच पेट्रोग्राडवर होणारा हल्लाही रोकण्यांत आला. २३ फेब्रुवारीचा हा दिवस होता. जर्मन साम्राज्यशाहीच्या लष्कराला या दिवशीं क्रांतिकारकांच्या लष्करी तुकड्यांनीं मागें हटावयास लावलें आणि याच दिवशीं लाल फौजेचा जन्म झाला. लाल फौजेचा खरा जन्म जर्मनांना मागें हटविण्याच्या या शुभ दिवशीं झाला.

एकीकडे जर्मनांना मागें हटविण्याचें काम लाल फौज करीत होती तरी क्रांतीच्या पुढाऱ्यांनीं आपले तडजोडीचे तसेच प्रयत्न चालू ठेवले होते. ताबडतोब तह करण्याबद्दल जर्मन सरकारला तारेनें मागणी करण्याची लेनिनची सूचना पार्टीच्या सेंट्रल कमिटीनें मंजूर केली. ही तार पोंचली तरी आपल्याला फायदेशीर शर्ती मिळविण्याच्या हेतूनें जर्मनांनीं आपली चाल तशीच चालू ठेवली आणि २२ फेब्रुवारी रोजीं आपली तह करण्याची इच्छा जर्मन सरकारनें प्रकट केली. पहिल्यापेक्षांही या शर्ती अधिक कडक स्वरूपाच्या होत्या. कसेंही असलें तरी तह करण्याच्या आपल्या धोरणापासून बोल्शेव्हिक पुढारी ढळले नाहींत.

तह करण्याच्या निर्णयाला सेंट्रल कमिटीकडून मंजुरी मिळविण्याकरतां लेनिन, स्टॅलिन् व स्वर्डलोव्ह या तिघांना ट्रॉट्स्की-बुखारिनप्रभृति वामपक्षीयांशीं जोराचा लढा करावा लागला. या वाटाघाटींच्या बाबतींत स्टॅलिननें पहिल्यापासूनच शेवटपर्यंत लेनिनलाच पाठिंबा दिला. स्टॅलिनचा या बाबतींतील निश्चय अगदीं ठाम ठरला होता. स्टॅलिनच्या पाठपुराव्याची लेनिनला पूण खात्री होती. १९ फेब्रुवारी रोजीं तहाच्या वाटाघाटीसंबंधानें बोलणें चालू असतां ट्रॉट्स्कीनें ब्रेस्टलिटोव्हिस्कहून तार करून लेनिनला आपल्या सूचना कळविण्याबद्दल विनंति केली. “ तुमच्या प्रश्नांना उत्तर देण्यापूर्वी प्रथम मला स्टॅलिनशीं या बाबतींत चर्चा केली पाहिजे, असें लेनिननें ट्रॉट्स्कीला तारेनें उत्तर पाठविलें. स्टॅलिनच्या मताला लेनिन किती महत्त्व देत होता, हेंच यावरून सिद्ध होतें. नंतर पुन्हा तीन दिवसांनीं अगदीं आणीबाणीच्या क्षणीं ट्रॉट्स्की व लेनिन यांचें टेलिफोनवर बराच वेळ भाषण झालें. त्या वेळीं देखील “ स्टॅलिन आतांच आला आहे. मी त्याच्याबरोबर या बाबतींत बोलेन व ताबडतोब आमचें दोघांचें संयुक्त उत्तर तुम्हांला कळवीन.” असें लेनिननें ट्रॉट्स्कीला कळविलें. शेवटीं २३ फेब्रुवारी रोजीं सेंट्रल कमिटीनें जर्मन सरकारच्या अटी मान्य करून तहनाम्यावर सही करण्याचें ठरविलें. जर्मनांशीं

तह करून रशियांतील क्रांतिकारक कामकरी-किसान राज्याचा कार्यक्रम अमलांत आणण्यास मोकळे झालेले पाहून इंग्लंड व फ्रान्स वगैरे साम्राज्यवादी राष्ट्रांचा अधिकच जळफळाट झाला. या तहामुळें ट्रॉट्स्कीप्रभृति वामपक्षीय कम्यूनिस्ट लोकांनीं लेनिनविरुद्ध अधिक जोरानें आपला झगडा चालविला. सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाच्या लोकांना तर हेंच पाहिजे होतें. कोणीकडून तरी सोव्हिएट सरकार हाणून पाडलें पाहिजे असल्या राष्ट्रविघातक प्रवृत्तीला ते बळी पडले व या कामीं कोणाचें सहाय घ्यावयाचें, याचा विधिनिषेधही त्यांना राहिला नाहीं.

त्यांतल्या त्यांत या क्रांतीमुळें ज्यांच्या हितासंबंधावरच घाला पडला होता अशा रशियांतील जमीनदारवर्गानें, सरदारवर्गानें व भांडवलदारांनीं ही क्रांति नष्ट करण्याच्या कामीं चंग बांधला, युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स वगैरे सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांना आपल्या मदतीला बोलावलें व सोव्हिएट यूनियनवर चोहोंबाजूंनीं हल्ला चढविण्याची तयारी केली. क्रांतीनंतर हें युद्ध अर्थातच आपसांतील युद्ध या नांवानें ओळखलें जातें. कारण मुख्यतः रशियांतील पिळणाऱ्या व पिळल्या जाणाऱ्या दोन वर्गांतीलच हें युद्ध होतें. पहिल्या वर्गानें युरोपांतील सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांचें बल एकवटून सोव्हिएट यूनियनवर हल्ला चढविला होता तर दुसऱ्या वर्गाला सोव्हिएट यूनियनमधील आम जनतेनें पाठिंबा दिला होता. त्यांना हव्या असलेल्या स्वराज्यावरच या साम्राज्यवादी गिधाडांनीं हल्ला चढविला होता. या आपसांतील युद्धाला केवळ देशांतील पांढरपेशे रशियन (भांडवलदार रशियन) कारणीभूत झाले होते असें नाहीं तर भांडवलदारांचे हस्तक असलेले पक्षही या कामगार-क्रांतिविरोधी चळवळींत सामील झाले होते.

रशियांतील कामगार-शेतकरी जनता क्रांतीसाठीं भुकेलेली होती, शांततेसाठीं ती भुकेलेली होती त्याचप्रमाणें ती भाकरीकरतांही भुकेलेली होती. पहिल्या क्रांतीनंतर प्रस्थापित झालेलें हंगामी सरकार जनतेची भूक शमवूं शकलें नाहीं. नोव्हेंबरमध्यें झालेल्या कामगारक्रांतीनंतर आपण पोटाला मिळवूं शकूं असें जनतेला वाटूं लागलें. पण ही क्रांति झाल्यावरही सहा महिने झाले तरी भाकरीचा हा प्रश्न सुटणें शक्य झालें नाहीं.

या परिस्थितीचा फायदा देशांतील सोशल रेव्होल्यूशनरी व मेनशेव्हिक

पक्षांनीं घेण्याचें ठरविलें. ब्रेस्टलिटोव्हिस्कच्या तहामुळें हे सर्व पक्ष अगोदरच नाराज झाले होते. या पक्षांच्या लोकांना भांडवलदारी क्रांति पाहिजे होती. कामगारक्रांति त्यांना मनापासून नको होती. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स वगैरे देशांप्रमाणें रशियांतही भांडवलदारी लोकशाही प्रस्थापित झाली पाहिजे, असें या पक्षांचें खरेंखुरें मत होतें. तेव्हां या पक्षांच्या लोकांनीं अन्नटंचाईच्या व भुकेच्या प्रश्नावर भर देऊन देशांतील अज्ञ जनतेला क्रांतिकारी बोल्शेव्हिकां-विरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला.

यापुढें रशियांत जें आपसांतील युद्ध सुरू झालें त्यांत बोल्शेविकविरोधी पक्षांनीं देशांतील आम जनताच क्रांतीविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला पण तो पूर्णपणें सफल होणें शक्यच नव्हतें. कांहीं मध्यमवर्गीय शेतकरी व कोसॅकांच्या कांहीं टोळ्या या क्रांतिविरोध्यांना मिळाल्या. सामान्य जनता आपल्यामागें नाहीं, याची जाणीव क्रांति-शत्रूंनाही नव्हती असें नाहीं. म्हणून सोव्हिएट क्रांति हाणून पाडण्याकरतां देशांतील लोकांच्या मदतीपेक्षां बाहेरच्या साम्राज्य-वादी राष्ट्रांच्या मदतीवरच ते विश्वसून राहिले. कारण उघड होतें. क्रांतींतून नवीनच जन्मास आलेल्या या नूतन राष्ट्राला युरोपांतील प्रबल साम्राज्यवादी राक्षसी सत्ता केव्हांच चिरडून टाकतील, अशी घमेंड त्यांना वाटत होती.

सोव्हिएट रशियावर आलेलें हें आपसांतील युद्धाचें संकट बोल्शेव्हिकांच्या क्रांतिसूर्याला ग्रासूं पाहणारें खग्रास ग्रहणच होतें. पण या संकटांतूनही रशियन क्रांति सहीसलामत पार पडली. अंतर्युद्धाच्या या जळजळीत भट्टींतून रशियांतील कामगारक्रांतीचें हें सोनें चांगलें तावूनसुलाखून निघालें. हें सोनें अगदीं शंभर नंबरी आहे. भांडवलशाहीचा कसल्याही प्रकारचा हिणकस भाग यांतून झडून गेला आहे, हेंच या युद्धानें सिद्ध केलें. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या आडदांड राष्ट्रांनीं कितीही घण मारले तरी बोल्शेव्हिक क्रांतीचा हा जवाहीर जसाचा तसा शाबूत राहिला. हें अंतर्युद्ध असेंच भयानक होतें. जें कांहीं तावडींत सांपडेल तें ओढून नेऊन व उडवून लावून धुळीस मिळवावयाचें असें त्याचें उग्र स्वरूप होतें. सर्व रशियाभर या अंतर्युद्धाच्या ज्वाला पसरल्या होत्या. मॉस्कोच्या मध्य चौकांत उभें राहून कोणत्याही दिशेकडे पाहिलें तर सर्वत्रच या अंतर्युद्धानें मोठमोठ्या अघाड्या निर्माण केलेल्या दिसत होत्या. जर्मन सैन्याच्या मदतीनें एक ‘स्वतंत्र’ सरकारच निर्माण होऊन त्यानें युक्रेन

आपल्या कबजांत घेतलें होतें. डॉनच्या मुलखांतील व उत्तर कॉकेशियांतील कोसॅक सेनापति आपल्या हातांतील हंटरचे आवाज काढून नवीं नवीं बंडखोर दलें उभारीत होते. झेकोस्लोवकांची फौज सैबेरियाच्या मुलखांतून इकॅटेरिन-बर्गवर चाल करून येत होती. झारच्या रोमानोव्ह घराण्यांतले लोक या भागांत कैद करून ठेवले होते व त्यांना मुक्त करण्याचा या फौजेचा उद्देश होता. सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाच्या लोकांनीं तर खुद्द मॉस्को व यारोस्लाव्ह येथें बंडें उपस्थित केलीं होतीं. १९१८ ते २० या दोन वर्षांत रशियन भूमि इतिहासांतील अभूतपूर्व अशा अंतर्युद्धाचें रणक्षेत्र बनली होती.

शमत चाललेल्या मुदतीच्या ज्वरानें पुन्हा जोराची उलट खावी, अशी रशियन क्रांतीची या वेळीं स्थिति झाली होती. क्रांतीच्या सर्वत्र पसरलेल्या वणव्याचा फायदा घेऊन खुद्द तिलाच भस्मसात् करून टाकण्याचा प्रयत्न तिच्या शत्रूंनीं चालविला होता. पूर्व भागांत पॅसिफिक समुद्राकडून व्हॉलगाच्या रोखानें कोल्च्याकही झपाट्यानें आपल्या लष्करासह चालून येत होता. दक्षिण भागांतील अघाडीचें क्षेत्र आशियाटिक रशियापासून रुमानियाच्या सरहद्दीपर्यंत पसरलें होतें. काळ्यासमुद्रापासून ते मस्कोव्हीच्या मध्यप्रदेशापर्यंतचा सर्व प्रदेश जनरल डेनिकिननें व नंतर जनरल रँगलनें उध्वस्त करून टाकला होता. पश्चिम भागांत पोल, लेट व इस्थोनियन बोलशेव्हिकांविरुद्ध हत्यारें सरसावून उठले होते. उत्तरेकडील फिनलंडनें रशियन कामगार-क्रांति चिरडून टाकण्याची संधि घेण्याचें ठरविलें होतें आणि युडेनिचच्या फौजा या भागांतील रशियन किल्ल्याच्या दरवाजांवर धडका मारीत होत्या. इंग्रज व फ्रेंच तर प्रत्यक्षच रशियांतील क्रांति-विरोधकांना सर्वतोपरी मदत करीत होते. त्याचप्रमाणें रशियाला सर्व दिशांनीं घेरून त्याची गळचेपी करण्याच्या कामांत जपाननें व समतेच्या, स्वातंत्र्याच्या व बंधुभावाच्या गप्पा मारणाऱ्या अमेरिकेनेंही भाग घेतला होता. या गळचेपीमुळें बाहेरची सर्व प्रकारच्या मालाची आयात रशियांत होणें बंद झाल्यामुळें त्याचे प्राण हैराण झाले होते.

रशियांतील क्रांतिकारक पुढाऱ्यांपैकीं स्टॅलिन हा एकच असा पुढारी होता कीं, तो या सर्व अघाड्यांवर देखरेख करीत फिरत होता. सर्व अघाड्यांवरील रशियन फौजांना धान्यसामुग्री पुरविण्याचें काम स्टॅलिनकडे देण्यांत आलें होतें. सैनिकाचा पेशा स्टॅलिनला मुळींच अवगत नव्हता. तथापि या सर्व अघाड्यां-

वरील आपल्या सैनिकांच्या व्यवस्थेंत असलेल्या उणीवा त्याच्या लक्षांत आल्या होत्या. स्टॅलिननें लष्करांत कधींच काम केलें नव्हतें तरी त्याच्या ठिकाणची संघटनकुशलता व परिस्थितीचें सांगोपांग ज्ञान करून त्यावर योग्य तो उपाय योजण्याची त्याची हातोटी लक्षांत घेऊनच सेंट्रल कमिटीनें त्याची या कामावर योजना केली होती. सगळ्या अघाडीवर असलेल्या लष्करी तुकड्यांना तो अन्न-सामुग्री पुरवीत असे व त्याबरोबरच कोणत्या ठिकाणीं कशाची उणीव आहे, हें लक्षांत घेऊन ती पुरी पाडण्याचें कामही तो यशस्वी रीतीनें करीत असे. " आपण बेफिकीर रहा. सर्व ठिकाणच्या सर्व लष्करी तुकड्यांना मी गहूं पुरवीत आहे." अशी एक तार त्यानें लेनिनला पाठविली होती. तसेंच " निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं. सर्व परिस्थिति आशाजनक आहे. कुचराई, आळस, बेपर्वाई इत्यादि दोष व दुर्गुण ज्या ज्या लोकांच्या ठिकाणीं आढळून आले त्या सर्वांचा समाचार मी घेत आहे. या बाबतींत दमदाटी व धाक दपटशा देण्यासही मी कमी करीत नाहीं. या वेळीं आपल्या सर्व शक्ति एकवटून शत्रूला तोंड देण्याची जरूरी आहे. स्वतःसुद्धां हात राखून वागण्याची सोय आतां उरलेली नाहीं. कुणालाच आम्ही तसें करूं देणार नाहीं." असें पत्र त्यानें लेनिनला पाठविलें. सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी झारिस्तानमध्यें कदाचित् बंड उभारतील, अशी काळजी लेनिननें जेव्हां एका पत्रांत व्यक्त केली त्या वेळीं " असल्या भ्रमिष्ट लोकांच्या बाबतींत निर्धास्त रहा. आम्ही मार्गेपुढें मुळींच पाहणार नाहीं. जे आमचे शत्रू आहेत त्यांच्याशीं आम्ही शत्रूप्रमाणें वागूं." असें कळवून लेनिनला त्यानें निर्धास्त केलें.

१९१८ च्या जून महिन्याच्या आरंभीं स्टॅलिनला व्होलगाच्या मुख्य प्रदेशांत पाठविण्यांत आलें. अन्नसामुग्री पुरविणारा या नात्यानेंच त्याला मध्यवर्ती कमिटीनें पाठविलें होतें पण तेथें गेल्यावर लाल फौजेंत अत्यंत गैरशिस्त व गैरव्यवस्था माजल्याचें त्याला दिसून आलें. या भागांतील मुख्य शहर झारिस्तान ( आजचें स्टॅलिनग्राड ) रक्षण करण्याचा प्रश्नच या वेळीं बोल्शे-व्हिकांपुढें होता. बंडखोर कोसॅक तर अगदीं शहरापर्यंत चालून आले होते व त्या ठिकाणची बोल्शेव्हिक सत्ता तर दुर्बल होती. स्टॅलिननें या कामाला ताबडतोब जुंपून घेतलें. लष्करी कायदा जाहीर करून तेथली गैरव्यवस्था मोडण्याचें त्यानें ठरविलें. या कृत्यामुळें ट्रॉट्स्की, त्याच्या हाताखालचें युद्धमंडळ

व स्टॅलिन यांच्यांत अर्थात् बेबनाव उत्पन्न झाला. ट्रॉट्स्कीविरुद्ध जाण्याचा व त्याच्याशीं तडाक्यानें दोन हात करण्याचा स्टॅलिनवर आलेला हा पहिलाच प्रसंग नव्हता, तर यानंतरही अनेक प्रसंग आले. आणि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, स्टॅलिनचें धोरणच या सर्व प्रसंगीं यशस्वी ठरलें.

झारित्सानच्या संरक्षणाच्या बाबतींत लष्करी अधिकाऱ्यांनीं ठेवलेलें धोरण स्टॅलिनला पहिल्यापासूनच पसंत नव्हतें. ट्रॉट्स्कीनें नेमलेले लष्करी अधिकारी झारच्या लष्करांत काम केलेले तज्ज्ञ म्हणून नांवाजलेले होते. आपली लाल फौज असल्या जुन्या बुद्रुक लोकांच्या ताब्यांत असावी, ही गोष्ट तर स्टॅलिनला मुळींच नापसंत होती. स्टॅलिनला या सर्व जागांवर नव्या दमाचे व नव्या रक्ताचे लोक पाहिजे होते. या जुन्या लष्करी अधिकाऱ्यांच्या धोरणामुळें लाल फौजेंत कशी बेबंदशाही माजली आहे, हें ता. ११ जुलै रोजीं स्टॅलिननें लेनिनला तारेनें कळविलें होतें. ही तार पुढीलप्रमाणें होतीः—

“ इकडील प्रत्येक गोष्ट अगदीं गुंतागुंतीची झाली आहे. उत्तर कॉकेशसमधील लष्करी अधिकारी प्रतिक्रांतिवाल्यांना तोंड देण्याच्या बाबतींत नालायक आहेत, हेंच याचें कारण आहे. हे आमचे “ खास तज्ज्ञ ” प्रतिक्रांतिवाल्यांविरुद्ध निर्णायक धडका मारण्याच्या बाबतींत मानसिक दृष्ट्याच असमर्थ आहेत. पुनर्व्यवस्थेच्या नवीन नवीन योजना लिहून काढाव्या एवढीच यांची योग्यता. खुद्द लष्करी हालचालींकडे यांचें लक्षच नाहीं. सामान्यतः बोलावयाचें म्हणजे हे लोक परक्या माणसासारखे, पाहुण्यासारखे या ठिकाणीं वागतात. ही परिस्थिति पार बदलून टाकण्याचें व पुष्कळशा उणीवा दूर करण्याचें माझ्या मनांत आहे. जे लष्करी अधिकारी व कामगार कार्यनाश करीत आहेत, असें मला आढळून आलें आहे, त्यांना कामावरून काढून टाकण्याचे उपाय मी अमलांत आणणार आहे. या बाबतींत कांहीं औपचारिक अडचणी असल्या तरी त्या मी बाजूस सारणार आहे. सर्व वरिष्ठ संस्थांसमोर याबद्दलचा जाब देण्यास व यासंबंधाची सर्व जबाबदारी घेण्यास मी तयार आहे.”

स्टॅलिनचें हें कृत्य म्हणजे ट्रॉट्स्कीनें केलेल्या लष्करी व्यवस्थेची मोडतोड करण्यासारखेंच होतें. लष्करी शिस्तीचा हा उघड उघड भंग होता. कोर्टमार्शल करण्याच्या शिक्षेला पात्र असें हें कृत्य होतें. पण स्टॅलिन खुद्द युद्ध-

कौन्सिलचा सभासद होता. लेनिनचा त्याला पूर्ण पाठिंबा होता. व्होरोशिलॉफ, मिनिन यांच्यासारख्या जुन्या बोलशेव्हिक पुढाऱ्यांच्या गटाचा त्याला पाठिंबा होता. व्होरोशिलॉफ हा युद्धखात्याचा कॉमिसार (मुखत्यार) होता. स्टॅलिन व व्होरोशिलॉफ हे दोघे संगनमतानें हातांत हात घालून काम करीत होते. लष्करच्या कांहीं तुकड्यांवरही त्याला कॅप्टन नेमण्यांत आलें होतें.

झारिस्तानमध्यें स्टॅलिननें पहिलें महत्त्वाचें कृत्य कोणतें केलें असेल तर तें हें कीं, त्यानें गुप्त पोलिस खात्याची एक खास तुकडी तेथें बोलावली, क्रांति-विरोधी लोकांना निवडून बाहेर काढलें व शहरांतील घाण पार नाहींशी करून टाकली. बाहेरच्या हल्ल्याला मदत करणाऱ्या या अंतःशत्रूंचा समाचार घेणें या वेळीं अत्यंत जरूरच होतें.

झारिस्तानचें रक्षण करण्याची जबाबदारी स्टॅलिननें घेतली होती तरी इतर युद्ध-अघाडीवरील सैन्याला धान्य पुरविण्याच्या व्यवस्थेकडेही त्याचें लक्ष होतें. या बाबतींत बाकूच्या अघाडीवर धान्य पाठवावयाचें, कीं मॉस्कोकडे धान्य पाठवावयाचें हा प्रश्न उत्पन्न झाला त्या वेळीं या खात्यांतील एका अधिकाऱ्याला त्यानें कळविलें कीं,

"कसल्या फजूल गोष्टी बोलत आहां ? आपण बाकू गमावून बसलों तर त्यांत कांहींच नाहीं. कांहीं थोड्या महिन्यांनीं किंवा फारच झालें तर एका वर्षांत आम्ही बाकू परत काबीज करूं. परंतु जर आज मॉस्को हातचें गेलें तर सर्वच ग्रंथ आटपला. क्रांतीचाच शेवट लागेल." धान्य ताबडतोब मॉस्कोकडे रवाना झालें.

अघाडीवर राहून शत्रूला प्रत्यक्ष तोंड देण्याची तयारी ज्याप्रमाणें स्टॅलिननें केली त्याचप्रमाणें त्याच्या पिछाडीवर हल्ले करून त्याची रसद तोडावयाची, पिछाडीच्या बाजूला राहून त्याला मदत करणाऱ्या लोकांचा नायनाट करा-वयाचा, हें कामही त्यानें तितक्याच दक्षतेनें केलें.

स्टॅलिनच्या या वेळच्या कर्तबगारीसंबंधानें व मनःस्थितीसंबंधानें व्होरो-शिलॉफनें आपल्या आठवणींत असें नमूद करून ठेवलें आहे कीं, "१९१८ ऑगस्टची आरंभीची परिस्थिति जणूं काय आजच एकादी गोष्ट घडून यावी, त्याप्रमाणें मला आठवते. क्रासनोव्हचे कोसॅक झारिस्तानवर हल्ल्यावर हल्ले चढवीत होते व आपलें सर्व बळ एकवटून व्होलगापर्यंत लाल फौजेला मागें

रेटीत नेण्याचा ते प्रयत्न करीत होते. मुख्यतः डोनेट्झच्या खोऱ्यांतून आलेल्या कामगारांनींच भरलेल्या कम्यूनिस्ट डिव्हिजनमधील लाल फौजेच्या लष्करी तुकड्यांनीं अत्यंत शिस्तीनें लढणाऱ्या कोसॅकांच्या जबर हल्ल्यांना तोंड दिलें. ही वेळ खरी कसोटीचीच होती. कॉमरेड स्टॅलिनला या वेळीं तुम्ही पहावयास पाहिजे होतें. नेहमींप्रमाणें तो शांत व विचारांत पूर्ण गढून गेलेला असा दिसत होता. कित्येक दिवस त्याला अक्षरशः झोंप मिळाली नाहीं. लष्करचें मुख्य ठाणें व अघाडीवरील रणक्षेत्र या ठिकाणीं तो सारखा फिरत होता. अघाडीवरील परिस्थिति अत्यंत बिकट व आणीबाणीची होती. शत्रूची अघाडी घोड्याच्या नालासारखी होती. दोन्ही बाजूंच्या फळ्यांचीं टोंकें व्होलगा नदीवर टेकलीं होतीं व तीं हळूहळू संकुचित होत चाललीं होतीं. आम्हांला बाहेर निघायला मार्ग नव्हता पण स्टॅलिनला त्याची कांहींच पर्वा नव्हती. **'विजय'** या एकाच विचारानें त्याचें मन प्रस्फुरित झालें होतें. कांहींही झालें तरी शत्रूचा धुव्वा उडवावयाचा त्यानें ठरविलें होतें आणि या त्याच्या अप्रतिहत इच्छाशक्तीनें जवळच्या सोबत्यांनाही भारून टाकलें होतें. जवळ जवळ निराशाजनक परिस्थितींत आम्ही सांपडलों होतों तरी आमच्या अंतिम विजयाबद्दल कोणीही साशंक नव्हता."

झारिस्तान भागांतील आघाडीवरील व पिछाडीवरील सर्व घाण स्टॅलिननें आपल्या पोलादी निश्चयाच्या जोरावर नाहींशी केली व लाल फौजेंतील तरुणांना निर्वाणीच्या निश्चयानें लढावयास लावून झारिस्थानचें रणक्षेत्र शत्रूच्या आघातांपासून पूर्ण निर्धास्त बनविलें. इतक्यांत उत्तर-पूर्वेकडील पर्म भागांतील अघाडीवरची अव्यवस्था दूर करण्याकरतां युद्ध-कौन्सिलाचा स्टॅलिनला हुकूम झाला. स्टॅलिन पर्म भागांत दाखल झाला त्या वेळीं तेथील लष्कराची स्थिति अत्यंत नादान व हलाखीची झालेली त्यानें पाहिली. या फौजेचे अधिकारी व शिपाईदेखील दारूच्या निशेनें धुंद होऊन तेथून पळून जाण्याच्या तयारींत होते व लढाईला प्रत्यक्ष तोंड देण्याच्या बाबतींत अंग चोरीत होते. स्टॅलिननें या अघाडीवरील सर्व सेनेची पुनर्घटना केली. पेट्रोग्राडपासून थोडेच मैल दूर असलेल्या बाल्टिकच्या किनाऱ्यावर जनरल युडेनिच सैन्यासह तळ देऊन राहिला होता. त्याचा समाचार स्टॅलिनला घ्यावयाचा होता. इकडील फौज तर हिंमत गमावून बसलेली व दारूच्या निशेंत गुग

झालेली असली तरी स्टॅलिन स्वतः कच्च्या दिलाचा नव्हता. त्यानें भराभर जुने अधिकारी बडतर्फ केले. त्यांच्या जागीं तरुण, विश्वासाचे, निर्व्यसनी व ध्येयनिष्ठ अधिकारी नेमले. हिंमत गमावून बसलेल्या सामान्य शिपायांत त्यानें नवचैतन्य निर्माण केलें. आणि ही सर्व उलटापालट त्यानें इतक्या झपाट्यानें केली कीं, तिकडे गेल्यापासून अवघ्या तीन आठवड्यांत जनरल युडेनिचवर जोराचा हल्ला चढवून त्याला त्यानें दे माय धरणी ठाय करून सोडलें.

पेट्रोग्राडवर हल्ला करून येणाऱ्या युडेनिचचा याप्रमाणें पराभव केल्यामुळें कोलच्याकबरोबर दोन हात करणें लाल फौजेला सोपें गेलें. १९१९ च्या अखेरीस त्याच्याही फौजेचा धुव्वा उडविण्यांत आला. खुद्द कोलच्याकलाच कैद करण्यांत आलें व रेव्होल्यूशनरी कमिटीच्या हुकुमानें इर्कुटस्क येथें गोळी घालून त्याला ठार करण्यांत आलें. ब्रिटिशांचा युनिफॉर्म वापरणाऱ्या व फ्रेंच सरकारनें दिलेल्या आरमारी फिती खांद्यावर मिरवणाऱ्या कोलच्याकचा याप्रमाणें शेवट लावण्यांत आला.

ज. युडेनिचचा व त्याचप्रमाणें कोलच्याकचाही निकाल लावल्यावर स्टॅलिनची स्वारी मॉस्कोकडे वळली. सेंट्रल कमिटीनें व्होरोशिलॉफ, ओर्दोनिकिदझ, आणि बुडोनी यांना स्टॅलिनच्या सहायाकरतां पाठविलें होतें. दक्षिण अघाडीवरील लाल फौजेच्या हालचाली करण्याचें काम ट्रॉट्स्कीकडून काढून घेण्यांत आलें होतें. स्टॅलिन या भागांत येण्यापूर्वी टॉट्स्की व त्याचे सहकारी यांनीं झारिस्तानपासून नोव्होरोसिस्कच्या दिशेनें डेनिकिनवर प्रमुख हल्ला चढविण्याची योजना तयार केली होती. डॉन नदीच्या खोऱ्यांतून हें सैन्य यावयाचें होतें, या भागांत रस्तेही नव्हते आणि ज्या मुलखांतून ही लाल फौज जावयाची त्यांत कोसॅकांची वस्ती होती. हे सर्व कोसॅक या वेळीं क्रांतीचे शत्रु असलेल्या व्हाइट गार्डस्‌ना जाऊन मिळाले होते. स्टॅलिननें या योजनेवर अर्थातच सडकून टीका केली व डेनिकिनचा पराभव कसा यशस्वी रीतीनें करतां येईल, याची योजना त्यानें सेंट्रल कमिटीपुढें मांडली. खारकोव्ह, डोनेट्झ नदीचें खोरें व रास्टोव्ह या मार्गानें डेनिकिनवर प्रमुख हल्ला चढविण्याची ही योजना होती. या योजनेप्रमाणें डेनिकिनवर लाल फौजेला झपाट्यानें चाल करून जाणें शक्य होतें. कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या वस्तीचा हा प्रदेश होता. लाल फौजेवर या वर्गाचें अत्यंत प्रेम होतें व तिला उघड

सहानुभूति दाखवून सर्वतोपरी मदत करण्यास ते तयार होते. याशिवाय या भागांत रेल्वेचें जाळें पसरलें होतें व लाल फौजेला लागणारी सर्व प्रकारची सामुग्री पुरविण्याची व्यवस्था करणें शक्य होतें. या योजनेमुळें डोनेट्झ नदीचें खोरें मोकळें होऊन कोळसा वगैरे सरपणाची भरपूर सामुग्री देशाला पुरविणारा प्रदेश ताब्यांत येत होता.

सेंट्रल कमिटीनें स्टॅलिनची ही योजना अर्थात् मान्य केली. या योजने-प्रमाणें १९१९ ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यांत डेनिकिनवर भयानक हल्ला चढवून ओरेल व व्होरोनेट्झ या ठिकाणीं झालेल्या लढायांतून त्याचा पराभव करण्यांत आला. डेनिकिनच्या सैन्याचा लाल फौजेनें जोराचा पाठलाग करून दक्षिणेस काळ्या समुद्रापर्यंत त्याला रेटीत नेलें आणि १९२० च्या आरंभीच्या दिवसांत सर्व युक्रेन व उत्तर कॉकेशस या भागांतून प्रतिक्रांतिवाल्या सफेत रशियनांना पूर्णपणें हांकून लावण्यांत आलें. डेनिकिनवर चालून आलेल्या लाल फौजेचें चित्त व्यग्र करून डेनिकिनला बळ पोंचविण्याकरतां युडेनिचनें पेट्रोग्राडवर पुन्हा एकदां हल्ला चढविला. युडेनिचचा हा शेवटचाच प्रयत्न होता. पण या राजधानीच्या शहरांतील असंख्य कामगारांनीं संरक्षणाची अभेद्य भिंत उभी करून शहराचें रक्षण केलें इतकेंच नव्हे, तर या भागांतील सफेत रशियनांचा पुरा बींमोड केला व रशियाच्या हद्दींतून त्यांना पार घालवून परत इस्थोनियांत पळून जाण्यास भाग पाडलें. स्टॅलिनच्या हाताखालीं तयार झालेल्या कम्यूनिस्टांनीं या हल्ल्यांत पुढाकार घेतला होता, हें सांगा-वयास नकोच.

पेट्रोग्राड कांहीं दिवस हातचें गेलें तरी हरकत नाहीं पण डेनिकिनचा प्रथम पुरा समाचार घ्यावा असें लेनिनचें मत होतें. स्टॅलिनला हें धोरण आवडलें नाहीं. या वेळीं लेनिनच्याही मताविरुद्ध जाऊन डेनिकिनवर हल्ला करणाऱ्या लाल फौजेपैकीं कांहीं निवडक तुकड्या त्यानें पेट्रोग्राडच्या रक्षणाकरतां पाठ-विल्या होत्या हेंही या ठिकाणीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पेट्रोग्राडवरील संकट दूर करून विजयी झालेल्या लाल फौजेच्या तुकड्या डेनिकिनच्या फौजेवर आणखी नव्या आवेशानें तुटून पडल्या. डेनिकिनच्या सैन्याचा या वेळीं धीर सुटला होता. कॉकेशस पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून धांवपळ करीत आपल्या संरक्षणाचा मार्ग तें शोधीत होतें. या भागांतील लोक तर स्टॅलिनला पुरे

ओळखत होते. तो या लोकांच्या गळ्यांतला लाल होता. मार्च १५ रोजीं डेनिकिनचा पाठलाग करीत आलेल्या लाल सेनेचें टिफ्लिसच्या लोकांनीं अत्यंत उत्साहानें स्वागत केलें. या विजयोत्साहाच्या प्रसंगीं आपल्यांत पूर्वीं वावरणाऱ्या 'सोसो'चा व 'कोबा'चा ते जयजयकार करीत होते.

यानंतर अकरा दिवसांनीं एक तारणकर्ता विजयी वीर या नात्यानें स्टॅलिननें बाकूंत प्रवेश केला. इकडे डेनिकिनच्या सैन्याची धांवपळ चालली होती व मोडकी तोडकी फौज घेऊन तो काळ्या समुद्रावरील नोव्होरोसिस्कच्या बंदरावर आपलें आश्रयस्थान शोधीत होता. एक दिवस देखील लष्करी शिक्षण न घेतलेल्या माणसानें आपल्या प्रचंड योजना उलथून पाडलेल्या पाहून डेनिकिननें आपल्या सेनापतित्वाचा त्याग केला व तो कॉन्स्टॅन्टिनोपलला पळून गेला. स्टॅलिननें खुद्द जातीनें हा विजय संपादन केला होता. रशियांतील झारच्या अनुयायांचा व प्रतिक्रांतिवाल्या सर्व विरोधी शक्तींचा त्यानें याप्रमाणें धुव्वा उडविला होता. पार्टीच्या सेंट्रल कमिटीनें या विजयाबद्दल स्टॅलिनवर स्तुतीचा वर्षाव करून त्याचें अभिनंदन केलें.

क्रांतियुद्धानें, आयात बंद करण्याकरतां चोहोंकडून झालेल्या रशियाच्या गळचेपीनें व दुष्काळानें सर्वतोपरी गांजलेल्या सोव्हिएट जनतेनें हिंमत गमावून न बसतां स्टॅलिनप्रभृति पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं कोलच्याक, डेनिकिन, युडेनिचसारख्या नांवाजलेल्या सेनापतींच्या हल्ल्यांना यशस्वी रीतीनें तोंड देऊन त्यांना पराभूत केलेलें पाहून, सोव्हिएट सरकारच्या बाबतींत स्वीकारलेलें आपलें धोरण इंग्लंड, फ्रान्स, इटली वगैरे साम्राज्यवादी राष्ट्रांनीं बदललें व १९२० च्या जानेवारींत सोव्हिएट रशियाभोंवतीं घातलेला ब्लॉकेड काढून घेतला. पण इतकें झालें तरी प्रतिक्रांतिवाल्या सफेत रशियनांची खुमखुम अद्याप जिरली नव्हती. पोलंडचा सर्वाधिकारी पिल्सुडस्की याची मदत घेऊन व पराभूत झालेल्या डेनिकिनचें उरलें सुरलें लष्कर गोळा करून डोनेट्झ खोऱ्यावर व युक्रेनवर पुन्हा चाल करूं पाहणाऱ्या जनरल रँगल्ची त्यांनीं कांस धरली. सोव्हिएट युक्रेनवर हल्ला करून पोलंडनें तें काबीज करावें व डोनेट्झ नदीच्या खोऱ्यांतल्या कोळशांचा खाणीचा सर्व प्रदेश ज. रँगलनें पादाक्रांत करावा, असा या वेळचा बेत होता. ब्लॉकेड उठवून सोव्हिएट यूनियनबद्दल सहानुभूतीचें ढोंग प्रदर्शित करणाऱ्या इंग्लंड, फ्रान्समधील त्या वेळच्या बेइमान

साम्राज्यवादी मुत्सद्द्यांनीं ज. रँगलला शस्त्रास्त्रांची सर्व सामुग्री पुरविली. पण सोव्हिएट रशियाला नामशेष करण्याचा प्रतिक्रांतिवाद्यांचा व साम्राज्यवाद्यांचा हा बेतही सफल झाला नाहीं. दोन अडीच वर्षें अंतर्युद्ध लढवून थकल्या-भागलेल्या लाल फौजेनें पुन्हा एकदां या क्रांतिशत्रूंचा प्रतिकार केला. थोड्याच दिवसांत पोलंडकडून झालेला हल्ला त्यांनीं थोपवून धरला व उलट पोलंडवरच चढाई करण्याची तयारी केली. लाल फौजेच्या चढाईपुढें पोलंडला टिकाव धरून राहणें शक्य झालें नाहीं. चढाई करून चाललेल्या लाल फौजेनें पोलंडचा पुरा पराभव केला व नीपरच्या पश्चिमेकडील युक्रेन प्रांत व बायलोव्ह रशिया यावरील आपला हक्क सोडून देऊन सोव्हिएट रशियाशीं तह करण्यास त्यास भाग पाडलें.

बंदुका, दारूगोळा, तोफा, टँक, विमानें वगैरे सर्व प्रकारची युद्धसामुग्री ब्रिटन व फ्रान्सकडून मिळाली तरी कुबान व डॉन नदीच्या मुलखांतील शेतकरी व कोसॅक जनरल रँगलला पाहिजे होते. पण त्यांना आपल्या सैन्यांत सामील करून घेण्याच्या त्याच्या प्रयत्नाला यश आलें नाहीं. तरीसुद्धां त्यानें सोव्हिएट मुलखावर हल्ला चढविला व डोनेट्झ नदीच्या खोऱ्यापर्यंत तो येऊन ठेपला. एका बाजूला शस्त्रास्त्राच्या सर्व सामुग्रीनें सज्ज असलेली सेना व दुसऱ्या बाजूनें सर्वतोपरी थकली भागलेली लाल फौज असा हा सामना होता. असल्या विषम सामन्यांतही लाल फौजेंतील बहाद्दर वीरांनीं जनरल रँगलवर मात केली. क्रिमियन द्वीपकल्पांत त्याला हांकून लावलें व तेथेंच त्याला अटकावून धरलें. १९२० च्या नोव्हेंबरांत लाल फौजांनीं पेरिकोपचा किल्ला घेतला, क्रिमियांत त्या घुसल्या, ज. रँगलच्या सैन्याचा त्यांनीं धुव्वा उडविला व या द्वीपकल्पांतून सफेत रशियनांस पूर्णपणें काढून लावलें.

डेनिकिनला कॉन्स्टॅन्टिनोपलची वाट दाखवून स्टॅलिननें विजयोत्साहानें मार्चच्या अखेरीस बाकूमध्यें पूर्वीं प्रवेश केला होता. आपल्या सैन्याची धूळधाण उडालेली पाहून ज. रँगलला कॉन्स्टॉन्टिनोपलचा रस्ता धरावा लागला तेव्हां स्टॅलिननें १५ नोव्हेंबर १९२० रोजीं सबॅस्टॅपूलमध्येंही एक विजयी वीर म्हणून प्रवेश केला.

याप्रमाणें पोलंडचा पिल्सुडस्की व रँगल यांचा पराभव करून अडीच तीन

वर्षे चाललेल्या अंतर्युद्धांत लाल फौजेनें विजय संपादन केला. या सर्व विजयी रणांगणांवर स्टॅलिन अभिमानानें व डौलानें मिरवत होता.

या सर्व विजयास स्टॅलिनचें बिनचूक धोरणच बहुतांशीं कारणीभूत झालें होतें. या विजयोत्साहांत एकदांच नव्हे तर दोनदां स्टॅलिनला "ऑर्डर ऑफ धी रेड बॅनरर्स" लाल झेंड्याचीं दोन भूषण पदकें देऊन त्याचा गौरव करण्यांत आला. स्टॅलिनला देण्यांत आलेल्या एका पदकावर खालील मजकूर खोदण्यांत आला आहे :—

"एका अगदीं संकटाच्या प्रसंगीं, ज्या वेळीं लाल फौज चोहोंकडून घेरली गेली होती त्या वेळीं लढाईच्या अघाडीवर पाठविलेल्या स्टॅलिननें धीर सुटून मागें हटूं लागलेल्या लाल फौजेला पुन्हा एकत्र व संघटित करण्यांत यश मिळविलें. तो स्वतः पलटणीच्या पहिल्या रांगेंत हजर होता. त्यानें आपल्या जातीहिंमतीनें, शौर्यानें व धैर्यानें सर्व फौजेंत असा असीम जोश उत्पन्न केला कीं, त्यामुळें ही फौज समाजसत्तावादी क्रांतीच्या रक्षणाकरतां तळहातावर शिरें घेऊन पुन्हा लढूं लागली."

स्टॅलिनच्या दुष्मनांनीं व समाजवादाच्या विरोधकांनीं लष्करी हालचालीच्या व चढाईच्या बाबतींत स्टॅलिनच्या अंगचे जे शौर्यधैर्यादि गुण प्रकट झाले व त्यानें या विषयांतली आपली जी लायकी सिद्ध केली त्यावर पडदा पाडण्याचा प्रयत्न केला आहे व अद्यापिही त्यांचा हा प्रचार चालूच आहे. पण ज्या ब्रिटिश राष्ट्रानें अंतर्युद्धाच्या प्रसंगीं रशियांतील प्रतिक्रांतिवाल्यांना सर्व प्रकारें मदत करून बोलशेव्हिक क्रांतीचा नायनाट करण्याकरतां जंग जंग पछाडलें, त्याच राष्ट्राचे मुख्य प्रधान मि. चर्चिल यांनीं १९४१ सालीं स्टॅलिनसंबंधानें बोलतांना "एक बहुत बडा शिपाई" असें त्याचें गुणगान करून स्टॅलिनच्या व समाजवादाच्या दुष्मनांचीं तोंडें कायमचीं बंद पाडलीं आहेत.

अंतर्युद्धांत मिळालेल्या विजयानंतर कामगार-किसान क्रांतीची दृढ पायावर प्रस्थापना करण्यास लेनिन-स्टॅलिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढारी अर्थातच मोकळे झाले. या कामीं स्टॅलिन लेनिनचा उजवा हात बनला.

अंतर्युद्धाच्या कालांत स्टॅलिनला या आघाडीवरून त्या आघाडीवर सेंट्रल कमिटीच्या हुकुमाप्रमाणें धांवपळ करावी लागली. कांहीं कांहीं प्रसंगीं त्यानें रात्रीच्या रात्री जागून काढल्या. या सर्वांचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर झाला.

या दिवसांत कधीं कधीं निव्वळ मीठभाकरीवरच त्याला भागवावें लागे. केव्हां केव्हां कांदे, लसूण व कांहीं प्रसंगीं त्याला लाल दारू मिळे. धांवपळ, दगदग, जाग्रणें व वरील प्रकारचें कोरडें अन्न खाणें यामुळें त्याच्या आंतड्यांत बिघाड झाला. जेवल्यानंतर त्याचें पोट दुखूं लागे. याला उपाय म्हणून तो लंघन करी. लंघनामुळें बरें होण्याच्याऐवजीं तो अधिकच अशक्त होत चालला. मध्यें कांहीं दिवस बरें वाटावें व पुन्हा पोट दुखूं लागावें असा प्रकार कांहीं काळ झाला. डेनिकिनवरील चढाईनंतर या रोगाचा त्याच्यावर जोराचा अटॅक झाला व त्याला विश्रांति घेणें भाग पडलें. यांतून थोडे बरे झाल्यानंतर जनरल रँगलचा प्रतिकार करण्याकरतां लेनिनच्या इच्छेनुसार सेंट्रल कमिटीनें त्याला तिकडे जाण्यास हुकूम केला. ज. रँगलचा समाचार घेतल्यानंतर मात्र त्याची प्रकृति फारच ढासळली. १९२० सप्टेंबरचे हे दिवस होते. हिंवाळ्यांत त्याची प्रकृति पुन्हा सुधारली ती इतकी कीं, क्रॉन्स्टॅडट येथें झालेलें नाविकांचें बंड त्यानें मोठ्या धडाडीनें व उत्साहानें मोडून टाकलें. यानंतर मात्र तो फारच आजारी झाला. आतां या आजारांतून तो जगत नाहीं, असेंही त्याच्या दोस्तांना वाटूं लागलें. मरणाची कळा त्याच्या तोंडावर आली. डॉ. रोझानोफनें त्याच्या रोगाचें निदान करून अॅपेंडिसाइटिसचा तीव्र अटॅक आहे, असें सांगितलें. मॉस्को येथील सोल्डाटेनकोव्हस्की हॉस्पिटलमध्यें त्याच्यावर ऑपरेशन करण्यांत आलें. तें पूर्णपणें यशस्वी झालें नाहीं. बरेच दिवस त्याला अंथरुणावर पडून राहावें लागलें. मरतो का जगतो अशा स्थितींत त्याचे कांहीं दिवस गेले.

अंतर्युद्धांत कराव्या लागलेल्या धांवपळीमुळें व सोसाव्या लागलेल्या दगदगीमुळें स्टॅलिन आजारी पडला, ही गोष्ट लेनिनच्या मनास फार लागली. कारण या बाबतींत सेंट्रल पार्टीचे हुकूम पाळण्याचे कामीं त्यानें कधींच कुचराई केलेली नव्हती. मरणाच्या दारीं पडलेल्या स्टॅलिनचे गुण लेनिनला आठवले. आपल्याशीं केव्हांही अगदीं एकनिष्ठेनें वागणारा असा हा एकच एक बोल्शेव्हिक होता, याचें त्याला वारंवार स्मरण होऊं लागलें. स्टॅलिन त्याचा शिष्य होता. त्याच्याविरुद्ध झालेल्या कारस्थानांतून लेनिननें त्याला वांचविलें होतें. इतर लोक त्याला कॉकेशियन वानर म्हणत; पण त्याच्या ठिकाणच्या गूढ बुद्धीची व हुषारीची जाणीव लेनिनला झाली होती. यामुळें त्याच्या आजारी-

पणांत लेनिन वारंवार हॉस्पिटलमध्यें त्याच्या समाचारास जाई. शेवटीं स्टॅलिन या आजारांतून पूर्ण बरा झाला व भयाचें कांहीं कारण नाहीं, असें डॉक्टरांनीं सांगितलें त्या वेळीं लेनिननें डॉ. रोझानोव्हचे फार फार आभार मानले. आजारांतून बरा होत चाललेल्या या दिवसांत स्टॅलिनची जन्मभूमि जॉर्जिया येथें त्यास नेण्यांत यावें, असें डॉक्टरनें सुचविलें. "होय, चांगली कल्पना आहे. मॉस्कोपासून कुठें तरी दूर, जिथं कुणी त्याला त्रास देणार नाहीं अशा ठिकाणीं." लेनिननें रुकार दिला.

ट्रॉट्स्कीचा हा चढता काळ होता. प्रत्येक अघाडीवरील प्रतिक्रांतिवाल्यांचा आतां पूर्ण पराभव झाला होता. याचें पुष्कळसें श्रेय अर्थात् त्यालाच मिळालें. कारण तो लाल फौजेचा सरसेनापति होता. तो या वेळीं बादशाही रुआबानें राहत होता. आपल्या सफेत घोड्यावर तो परेडच्या वेळीं हजर राहत असे. झारच्या मोटारमधून तो फिरत असे. मोटारच्या दोन्ही बाजूच्या पायऱ्यांवर शरीरसंरक्षक उभे असत. उत्तम प्रकारें सजवलेल्या घरांत तो राहत असे. रशियांतल्यापेक्षां रशियाबाहेर त्याची खूब प्रसिद्धि झाली होती. लेनिनच्या खालोखाल त्यालाच रशियांतला पुढारी म्हणून त्याची गणना केली जात असे. लेनिननंतर पुढारीपणाचा वारसा त्याला मिळणार, अशी लोकांची सर्वत्र कल्पना होती. एक बडा शिपाई अशी त्याच्यासंबंधानें फौजेंतल्या लोकांची समजूत होती. त्याचा मत्सर करणारे लोक दुसरा नेपोलियन होण्याचीं स्वप्नें त्याला पडत आहेत, असें आपसांत कुजबुजत होते. नेपोलियन होण्याची कल्पना ट्रॉट्स्कीच्या मनाला कधींच शिवली नसली पाहिजे. पण क्रांतीचा नियंत्रक सूत्रधार आपण होणार, याबद्दल निःसंशय त्याला भरंवसा वाटत होता.

सेंट्रल पार्टीच्या अध्यक्षाशीं त्याचें बऱ्याच बाबतींत पटत नसलें तरी लेनिन आपण सांगितलेल्या गोष्टी ऐकून घेतो व त्याचा आपल्यावर विश्वास आहे, असें त्याला वाटत होतें. पॉलिट ब्यूरो (पार्टीचें राजकारणी मंडळ)मध्यें १९२१ सालीं लेनिन, ट्रॉट्स्की, स्टॅलिन व कामेनीफ हे चार सभासद होते. कम्यूनिस्ट पार्टीच्या सेक्रेटरीचें काम क्रेस्टीन्स्की, सेरेब्रियाकोफ व स्टॅसॉफ हे तिघे पाहत होते. हे तिघेजण केवळ कारकून होते. स्वतःच्या उभारीनें एकादा कार्यक्रम हातीं घ्यावयाची हुशारी त्यांच्यांत नव्हती व त्यांचें पार्टीमध्यें कांहीं वजनही नव्हतें. पार्टीच्या सेक्रेटरीमध्यें कोणी तरी खमक्या माणूस लेनिनला पाहिजे

होता. पार्टीची संघटना करील, तिच्यावर नियंत्रण ठेवील, सेक्रेटरी मंडळाकडे सुपूर्द केलेल्या एक ना दोन शंभर बाबी निकालांत काढील, असा कर्तबगार माणूस या मंडळांत लेनिनला पाहिजे होता. पार्टीच्या सर्वच कामांकडे लक्ष देण्याइतकी ताकद त्याला वाटेनाशी झाली होती. आजारीपणाची छाया त्याच्यावर पडली होती व या गोष्टीची त्यालाच फक्त जाणीव होती. क्रांतीच्या भविष्यकाळासंबंधानें त्याला काळजी वाटूं लागली होती. सेक्रेटरीचें काम या वेळीं जरी सामान्य स्वरूपाचें वाटत असलें तरी, आपल्यामागें या कामाला अत्यंत महत्त्व प्राप्त होईल हें तो जाणून होता. ही जागा मिळविण्यासंबंधानें कोणाच्या कांहीं कारवाया चालू नव्हत्या. ट्रॉट्स्कीला ही जागा नको होती. तिचें त्याला महत्त्व वाटत नव्हतें. क्रांतीचा नियंत्रक सूत्रधार बनण्याची त्याची जी महत्त्वाकांक्षा होती तिच्याआड स्टॅलिन येणें शक्यच नाहीं, असें तो समजत होता. स्टॅलिन हा कॉकेशसमधला अडाणी मूळचा रहिवासी, एक दयाशून्य रानटी माणूस! क्रांतीच्या शत्रूंचा नाश करण्याच्या कामीं काय तो उपयोगी. केवळ लेनिनच्या लोभामुळेंच पार्टीत त्याला मान, अशीच त्याची स्टॅलिनसंबंधानें अद्याप समजूत होती. अंतर्युद्ध संपलें. या जॉर्जियनला आतां कांहीं काम राहिलें नाहीं. स्वाभाविकच तो आजारी पडला. आजारी झालेला स्टॅलिन जवळ जवळ कॉकेशसमध्यें हद्दपार झाल्यासारखाच होता. ट्रॉट्स्कीच्या आकांक्षांच्या आड तो येण्यासारखा नव्हता.


पण स्टॅलिन पूर्णपणें बरा झाला व तिकडून परत आला. लेनिननें त्याला पार्टीचा सेक्रेटरी करण्याचें ठरविलें. त्यानें ट्रॉट्स्कीला आपला हा बेत कळविला.

"हा नवा आचारी आपल्याकरतां मसालेदार पक्वान्नें तयार करील." लेनिन म्हणाला.

ट्रॉट्स्कीनें खांदे उडविले.

१९२२ च्या वसंतऋतूमध्यें स्टॅलिनची या जागेवर नेमणूक झाली व लेनिनच्या अपेक्षेप्रमाणें कम्यूनिस्ट पार्टीची संघटना व सामर्थ्य वाढविण्याकडे त्यानें आपलें सर्व लक्ष घातलें.

तेहरान परिषद.





आजच्या रशियाचा प्रमुख

**मा. स्टॅलिन**

( Photo-U. S. O. W. I. )




मा. स्टॅलिन



एम. मोलोताव



ए. बेरिया



एम. मेलिन्काव



मा. व्होरोशिलाव



मा. टिमोशेन्को



मा. बुडेनी



मा. झुकॉव

# लेनिनचें निधन



ज. रँगलनें कॉन्स्टॅन्टिनोपलची वाट धरली व त्याची फौज "जनरल कॉर्निलोव्ह" नांवाच्या क्रूझरनें सॅबॅस्टेपूल बंदरांतून बाहेर पडली. ही बातमी ऐकतांच सर्व रशिया विजयोत्साहानें नाचूं लागला.

"चला आपण आतां समाजवादी राज्यपद्धति प्रस्थापित करण्याच्या विधायक कार्यक्रमाला हात घालूं."

असें लेनिननें या वरील प्रसंगानंतर भरलेल्या बोलशेव्हिक सरकारच्या पहिल्या सभेंत जाहीर केलें. या सभेंत सोव्हिएट सरकारचे सर्व जबाबदार पुढारी एकत्र जमले होते. रशियांतील लाल फौजेनें इंग्लंड, फ्रान्स, इटली वगैरे युरोपांतील चौदा साम्राज्यवादी राष्ट्रांच्या एकवटलेल्या शक्तीला तोंड देऊन विजय मिळविलेला होता. या प्रचंड विजयाच्या अभिमानानें व आत्मविश्वासानें या पुढाऱ्यांचीं अंतःकरणें भरून गेलीं होतीं. लेनिन या सभेंत दाखल होऊन प्लॅटफॉर्मवर चढला व त्यानें वरील वाक्य उच्चारलें त्या वेळीं त्यांनीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. समाजवादी नव्या संस्कृतीच्या प्रस्थापनेच्या कार्याला सर्व राष्ट्राची संमति आहे, असें त्यांनीं या टाळ्यांच्या किती तरी मिनिटें चालू असलेल्या गजरानें दर्शविलें.

महायुद्धांत रशियानें भाग घेतला व त्यानंतर दोन क्रांत्या होऊन या प्रचंड अंतर्युद्धालाही त्याला तोंड द्यावें लागलें. या सर्व युद्धांतून रशियाचे दशलक्षावधि लोक कामास आले व दोनशें अब्ज रुपयांचें नुकसान देशास सोसावें लागलें. पेट्रोग्राड व मॉस्को यांच्या भोंवतालचा कांहीं प्रदेश सोडून बाकी सर्व प्रदेश या युद्धकालांत वेळोवेळीं सफेत लष्कराच्या ताब्यांत गेला. शत्रूंनीं या सर्व भागांतील एकूण एक कारखाने तोफांच्या गोळ्यांनीं उडवून लावले व सर्व मुलूख उध्वस्त करून टाकला. रशियांतील वाहतुकीचीं साधनें केव्हांच पुरेशीं नव्हतीं आणि या युद्धकालांत तर सर्वत्र गोंधळ माजून गेला. ट्रॅन्स-सैबेरियन रेल्वेदेखील धड राहूं शकली नाहीं. कारण ॲडमिरल

कोल्च्याकच्या हाताखालच्या झेक टोळयांनीं या रेल्वेचे ठिकठिकाणचे रूळ लांबवर उखडून वाहतुकीच्या कामाला ती निरुपयोगी करून टाकली होती. या युद्धकालांत एकंदर एकशेंनव्वद लक्ष म्हणजे जवळ जवळ दोन कोटी लोक लष्करांत भरती करण्यांत आले. यांपैकीं चारपंचमांश लोक शेतकरी वर्गांतले होते. लढण्याकरतां लष्करांत सामील झाल्यामुळें या लोकांच्या शेत जमिनी पडीत पडल्या. सफेत लष्करांनीं लक्षावधि जनावरें व खंडोगणती धान्य आपल्या ताब्यांत घेतलें. हजारों घोड्यांची कत्तल करून खाण्याकरतां त्यांचा उपयोग केला. १९१९ च्या कडाक्याच्या थंडींत या घोड्यांच्या मांसावर हीं लष्करें जिवंत राहिलीं. या खडतर दिवसांत खुद्द खेडेगांवच्या लोकांनाच खाण्याची पंचाईत पडली होती मग ते शहरांना कोठून धान्य पुरविणार? पेट्रोग्राड व मॉस्कोमध्यें काळी भाकरी मिळणें ही मोठी भाग्याची गोष्ट झाली होती. तेथील लक्षावधि कामगारांना बटाटे व पेंड खाऊन महिने न् महिने काढावे लागत होते. ऐन स्वारीच्या दिवसांत लाल फौजेंतील सैनिकांना पायांत घालण्यास बूट मिळाले नाहींत. अनवाणी पायांनीं त्यांना रणक्षेत्रांतून रखडावें लागलें. या सैनिकांपाशीं स्वतःच्या अशा रायफली नव्हत्या. आपल्यावर चालून आलेल्या शत्रूच्या सैन्याला उध्वस्त करून व त्यांना पळवून लावून त्यांच्याकडून काबीज करून घेतलेल्या रायफलीच काय त्या त्यांच्यापाशीं होत्या. असल्या बिकट परिस्थितींतही समाजसत्तावादी पितृभूमीच्या संरक्षणाच्या आवेशानें लाल फौजा छातीचा कोट करून लढल्या व आपल्या सर्व शत्रूंना त्यांनीं पादाक्रांत करून उधळून लावलें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

पण आतां लढाईचे दिवस संपले होते. युद्धाच्या अनेक आघाड्यांवरून परत आलेले लाल सैनिक सुखाचे चार घास खाण्याच्या इच्छेनें खेडोपाडीं व घरोघरीं परतले होते. पण येथें काय होतें? लक्षावधि एकर जमीन नापीक होऊन पडली होती. शहरांकडे पहावें तर तेथलेही उद्योगधंदे व कारखाने बंद झाले होते. बहुतेक सर्व गिरण्यांना कुलुपें पडलीं होतीं. कोळशाच्या खाणी उध्वस्त करून टाकल्यामुळें पाण्यानें त्या तुडुंब भरून गेल्या होत्या. लोखंडाच्या व पोलादाच्या कारखान्यांची स्थिति फार गंभीर झाली होती. महायुद्धापूर्वी देशांत जितका माल तयार होत असे त्याच्या एकसप्तमांश मालही १९२० सालीं उत्पन्न झाला नाहीं. १९२१ सालीं ओतीव लोखंड ११६३००

टन तयार झालें. म्हणजे युद्धपूर्वकालच्या या उत्पन्नाच्या मानानें अवघें शें. ३ टक्के इतकें या मालाचें उत्पन्न झालें. लोखंड नाहीं, कोळसा नाहीं, इतर सरपण नाहीं, अन्न नाहीं, कपडा नाहीं, मग मांस व चरबी कोठून मिळणार? काड्याच्या पेट्या, साबण, रॉकेल या जिनसांचा तर पत्ताच नव्हता आणि टंचाई इतकी वाढली होती कीं, मीठसुद्धां दुर्मिळ झालें होतें. युद्ध चालू असे-पर्यंत कोणी कांहीं तक्रारी करूं शकत नव्हता. आतां युद्ध संपलें होतें. ही टंचाई सहन करण्यास आतां कोणी तयार नव्हते. सामान्य शेतकरी, कामकरी, सैन्यांतून परत आलेले सैनिक सर्वच या सगळ्या जीवनावश्यक जिनसांची मागणी करीत होते. त्यांना त्या मिळत नव्हत्या व यामुळें देशांत सर्वत्रच असंतोष निर्माण झाला होता.

क्रांतीनंतर झालेल्या अंतर्युद्धांतून शिरसलामत पार पडलेल्या सोव्हिएट सरकारला असल्या गंभीर परिस्थितीला तोंड द्यावयाचें होतें. या वेळीं सोव्हिएट सरकारपुढें एकच उपाय शिल्लक उरलेला होता व तो म्हणजे ज्यांनीं आपल्या-पाशीं वाजवीपेक्षां जास्त धान्य सांठवून ठेवलें आहे त्यांच्याकडून ते सक्तीनें काढून घेणें हा होय. अंतर्युद्धाच्या प्रसंगींदेखील लाल सेनेला धान्य वगैरे सामुग्री पुरविण्याकरतां बोलशेव्हिक पुढाऱ्यांनीं हाच उपाय अमलांत आणला होता. युद्धकालांत चालू असलेली ही पद्धति "युद्ध-साम्यवाद" (War Communism) या नांवानें संबोधण्यांत येत होती. पण आतां युद्ध संपलें असल्यामुळें युद्धकालांत अमलांत आणलेले सक्तीचे उपाय शांततेच्या कालांत मात्र अमलांत आणणें शक्य नव्हतें.

असल्या सक्तीमुळें जनतेच्या असंतोषांत आणखी भरच पडली असती. ही सक्तीची पद्धति बंद करून ज्या मध्यमवर्गीय शेतकऱ्यापाशीं शिल्लक धान्य असेल त्यावर योग्य त्या प्रमाणांत कर बसवावा व हा कर धान्याच्या रूपांत घ्यावा, अशी तोड सोव्हिएट सरकारनें यावर काढली होती. यामुळें शेत-कऱ्याला आपल्याजवळच्या शिलकी धान्याचा मोठा भाग आपल्या मर्जी-प्रमाणें कसाही उपयोगांत आणतां येत होता. कराचें ठराविक धान्य दिल्या-नंतर बाकीच्या धान्याची विक्री आपल्याला हवी तशी करतां येईल व मालाच्या मागणीप्रमाणें कोणतेंही धान्य आपल्याला पिकवितां येईल, अशी मुभा या योजनेनें शेतकऱ्याला मिळणार होती. या योजनेमुळें शेतीला उत्तेजन

मिळेल, धान्याची व कारखान्यास लागणाऱ्या कच्च्या मालाची पैदास करतां येईल, शहरांतील वस्तीला धान्याचा पुरवठा हव्या तितक्या प्रमाणांत करण्यांत येईल, शहरांतले कामगार व खेड्यापाड्यांतील शेतकरी यांचें संगनमत घडवून आणण्याचा पायाच या योजनेमुळे घालतां येईल, अशी पार्टीच्या सेंट्रल कमिटीला खात्री वाटत होती. पण ही योजना अमलांत येण्यापूर्वी आणखी एका लहानशा संकटाला सोव्हिएट सरकारला तोंड द्यावें लागलें.

अंतर्युद्धाच्या कालांत सैन्याला व शहरांतील कामगारजनतेला धान्य आणि व इतर सामुग्री पुरविण्याकरितां युद्धसाम्यवादपद्धतीचा अवलंब स्टॅलिनप्रभृति कम्यूनिस्ट पुढारी मंडळींनीं केला होता. अंतर्युद्ध संपून थोडें स्थिरस्थावर होत होतें इतक्यांत देशांतील मेनशेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाच्या लोकांनीं युद्धसाम्यवादाची पद्धति अमलांत आणल्यामुळें शेतकऱ्यांत पसरलेल्या असंतोषाचा फायदा घेण्याकरतां एका नवीन घोषणेवर देशांत बंडाची उभारणी करण्याचें ठरविलें. अंतर्युद्ध चालू असेपर्यंत "सोव्हिएटांना हाणून पाडा" (Down with the Soviets) अशी घोषणा प्रचलित करण्यांत आली होती. आतां "सोव्हिएट चालतील पण कम्यूनिस्ट नकोत" या नवीन घोषणेचा पुकारा करण्यांत आला.

या बंडाला क्रॉन्स्टॅड्ट येथें सुरुवात झाली. या बंदरांतील बोलशेव्हिकांची संघटना दुर्बल होती. येथल्या आरमारांतील खलाशांत नादानपणा पसरला होता. त्यांची कशावरच दृढ निष्ठा नव्हती. ऑक्टोबर-क्रांतींत भाग घेतलेले जुने खलाशी लाल फौजेंत शौर्यानें लढत होते पण त्यांच्यामागें जी नवी भरती करण्यांत आली होती त्या नव्या लोकांना क्रांतिवादाचें योग्य तें शिक्षण मिळालेलें नव्हतें. हे सर्व लोक अननुभवी हिरवट शेतकरी होते व सक्तीनें धान्य ताब्यांत घेण्याच्या पद्धतीमुळें शेतकऱ्यांत पसरलेल्या असंतोषानें यांनाही पछाडलें होतें.

क्रॉन्स्टॅड्टच्या या बंडाळीनें थोड्याच दिवसांत बरेंच उग्र स्वरूप धारण केलें. या बंडखोरांनीं येथील किल्ला, आरमार व पुष्कळच मोठी शस्त्रास्त्रांची व दारूगोळ्याची सामग्री आपल्या कबजांत घेतली. आंतर्राष्ट्रीय प्रतिक्रांतिवाल्यांना हा एक मोठाच विजय मिळाला होता. पण हा आनंद क्षणिक होता. कारण सोव्हिएट लाल फौजांनीं या बंडखोरांचा केव्हांच धुव्वा उडवून दिला.

स्टॅलिनचा दोस्त कॉ. व्होरोशिलॉफ याच्या नेतृत्वाखालीं ही लाल फौज पाठविण्यांत आली. होती. या सेनेबरोबरच्या तोफखान्यानें जोराचा गोळीबार करून क्रॉन्स्टॅड्टचा अभेद्य किल्ला सर केला व हें बंड शमविण्यांत आलें.

मेनशेव्हिक, सोशल रेव्होल्यूशनरी वगैरे प्रतिक्रांतिवाल्यांचा हा शेवटचा प्रयत्न होता. पण तो पूर्णपणें फसला. तरीही बोलशेव्हिकांना पदोपदीं विरोध करण्याचें आपलें काम त्यांनीं चालूच ठेवलें. उघड उघड रीतीनें त्यांना हें काम करतां येत नव्हतें तेव्हां या वामपक्षानें अनेक वाममार्गांचाही अवलंब केला. सोव्हिएट सरकारच्या मागें लागलेला हा भुंगा या पक्षाचा कांटा अजीबात उपटून टाकण्यांत आला तेव्हांच सुटला.

शेतकऱ्यांजवळचें फालतू धान्य सक्तीनें घेण्याची युद्धसाम्यवादी पद्धति बंद करण्यांत आली. या धान्याचा आपल्याला वाटेल तसा विनियोग करण्याची मुभा शेतकऱ्यांना देण्यांत आली व हा प्रश्न निकालांत काढण्यांत आला. यानंतर उद्योगधंद्यांच्या वाढीकडे सोव्हिएट सरकारनें लक्ष दिलें. लाल फौजेंतील सैनिकांकडूनच तडाखेबंद मजुरांप्रमाणें (Shock workers) काम करून घ्यावें, कारखान्यांतल्या कामालाही लष्करी शिस्त लावावी, अशी सूचना हा सवाल सोडविण्याकरितां ट्रॉट्स्कीनें मांडली होती. पण लेनिनला व स्टॅलिनला ही सूचना पसंत पडली नाहीं. गेलीं तीन-चार वर्षें युद्धांत रखडून व अनेक संकटांना तोंड देऊन लाल सैनिक परत आले होते. साहजिकच त्यांना थोडा आराम पाहिजे होता. स्वस्थ बसून खाण्याची त्यांची इच्छा नव्हती. फुकटचें अन्न त्यांना नको होतें. पण त्यांच्यामागें पुन्हा ही लष्करी शिस्तीची ब्याद नको होती. लेनिननें ही गोष्ट जाणली होती. मनुष्यस्वभावाची त्याला चांगली पारख होती. पण ट्रॉट्स्कीनें केलेली सूचना अजीबात धुडकावून न लावतां खुद्द स्टॅलिननेंच तिचा कांहीं दिवस प्रयोग करून पाहिला व तो यशस्वी झाला नाहीं तेव्हां अर्थात् ही कल्पना सोडून द्यावी लागली.

शेतकीमध्यें काय किंवा उद्योगधंद्यांमध्यें काय युद्ध-साम्यवादाची पद्धति सोडून देऊन व परिस्थितीचा योग्य अंदाज करून जनतेच्या कलानेंच समाजवादाचें एक एक पाऊल टाकावयाचें, असेंच लेनिननें ठरविलें. स्टॅलिनसुद्धां याच मताचा होता. स्टॅलिन दुराग्रही आहे, हट्टी आहे, अरेरावी गाजविण्याची त्याला हौस आहे, असे आरोप त्याच्या दुष्मनांनीं केले आहेत. पण ते खोटे

आहेत, असेंच त्याच्या यापूर्वीच्या व पुढच्या वर्तनावरून व धोरणांवरून अनेकदां सिद्ध झालें आहे.

युद्धसाम्यवादाची कल्पना अजीबात बाजूला सारण्याचें व सक्तीनें सुधारणा अमलांत आणण्याची कल्पना बाजूला ठेवण्याचें ठरल्यानंतर कामगार-संघांच्या धोरणाच्या बाबतींत स्टॅलिन व ट्रॉट्स्की यांच्यांत मतभेद उत्पन्न झाला. कामगारसंघांचा सोव्हिएट सरकारशीं कसा संबंध असावा, हाच तो प्रश्न होता. रशियांत कामगारराज्य प्रस्थापित झालें आहे तेव्हां या संघांनीं फार तर आपल्या वर्गाच्या सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा करण्याकडे लक्ष द्यावें, त्यांच्या राजकीय व आर्थिक सुधारणा करण्याचें काम सरकार अर्थातच करणार, असें ट्रॉट्स्कीचें मत होतें. कामगारसंघांच्या हातची खरी सत्ता काढून घ्यावी, त्यांना संप करण्याचाही हक्क ठेवूं नये, 'असाच ट्रॉट्स्कीच्या या सूचनेचा अर्थ होता. कामगारराज्य असलें तरी कामगारांचें संघस्वातंत्र्य त्यांचे आचार व विचार-स्वातंत्र्य हिरावून घेतां कामा नये. संपाच्याच काय तर त्यांच्या कोणत्याच हक्कांवर गदा आणतां कामा नये. कामगारसंघ म्हणजे राज्यकारभाराचें एक बांडगूळ बनवितां कामा नये. सोव्हिएट सरकार व कामगारवर्ग यांच्यांतील एकी कायम राखण्याचें काम या संघांनीं करावें. राजकीय, आर्थिक, सामाजिक वगैरे सर्व प्रकारच्या सुधारणांचा त्यांनीं आपल्या वर्गदृष्टीनें स्वतंत्रपणें विचार करावा. सरकार व संघ या दोघांनीं संगनमतानेंच या प्रश्नांचा विचार करावा. असें स्टॅलिननें या बाबतींतलें आपलें मत प्रकट केलें व तें लेनिनलाही पसंत पडलें.

" आमचे मतभेद " या आपल्या लेखांत स्टॅलिननें आपलें या विषयावरील मत स्पष्टपणें मांडलें आहे. सक्तीच्या साम्यवादाची ट्रॉट्स्कीची कल्पना या प्रश्नाच्या बाबतींतही डोकावत होती. शेतकऱ्यांची किंवा त्या वर्गांतूनच आलेल्या सैनिकांची गोष्ट थोडी निराळी आहे, त्यांच्या बाबतींत केव्हां केव्हां थोडी सक्ती करावी लागेल. पण कामगारांचें तसें नाहीं. या वर्गानें आपल्या सरकारच्या रक्षणाकरतां आपलें सर्वस्व अर्पण करण्याची तयारी वेळोवेळीं दाखविली आहे, तेव्हां त्याच्या बाबतींत सक्ती करण्याची कल्पना अजीबातच सोडली पाहिजे, असें स्टॅलिननें आपल्या या लेखांत म्हटलें आहे.

कामगारसंघाच्या धोरणाबाबत असा मतभेद झाला होता तरी ट्रॉट्स्कीनें

आपला विरोध चालू ठेवला. बुखारिन त्याच्या मदतीला धांवून आला. मॉस्कोमधील कामगार-संघांतून फाटाफूट करण्याचा या लोकांनीं प्रयत्न केला. पण मॉस्कोच्या बोल्शेव्हिक कामगारांनीं त्याचें कांहीं चालू दिलें नाहीं. युक्रेनमधील पार्टी-संघटनेंत या भांडणानें डोकें वर काढलें. पण मोलोटोव्हनें तें वेळींच ठेचून काढलें. मोलोटोव्ह या वेळीं सेंट्रल कमिटीचा एक सेक्रेटरी होता. युक्रेनच्या कम्यूनिस्ट पार्टीनें स्टॅलिनच्याच मताला पाठिंबा दिला. बाकूमध्यें असाच प्रयत्न झाला पण कॉ. आर्दोनोकिद्झनें या लेनिनविरोधी लोकांना उधळून लावलें. ८ मार्च १९२१ रोजीं भरलेल्या पार्टीच्या दहाव्या कॅाग्रेसमध्यें या प्रश्नाची सांगोपांग चर्चा होऊन बहुमतानें लेनिन-स्टॅलिनच्या मतालाच पाठिंबा दिला.

सरकारनें प्रत्यक्ष धान्याच्या रूपांत ठरविलेला कर एकदां देऊन टाकला म्हणजे फालतू धान्य व इतर कच्चा माल शेतकऱ्यानें हवा तर विकावा किंवा त्याचा आपल्या मर्जीप्रमाणें विनियोग करावा, अशी सवलत देण्यांत आली. त्याचप्रमाणें शहरांतील कामगार जनतेला पुरेसें अन्न मिळण्याकरतां खासगी व्यापारासंबंधाचे कडक कायदे ढिले करण्यांत आले. बँकिंगच्या व्यवहारावर व बड्या उद्योगधंद्यांवर सोव्हिएट सरकारनें कडक नजर ठेवून ते आपल्या ताब्यांत ठेवले. पण त्याचबरोबर लहान लहान कारखानदारांना, व्यापाऱ्यांना व शेतकऱ्यांना जुन्या व्यापारी धर्तीवर व्यवहार चालवितां यावा म्हणूनही सवलती देण्यांत आल्या.

युद्ध-साम्यवादाचें धोरण बाजूला सारून नवीन आर्थिक धोरणाचा प्रारंभ लेनिननें या पद्धतीनें केला होता. दहाव्या पार्टीकॅाग्रेसनेंही लेनिनच्या या धोरणाला पाठिंबा दिला. हें नवें आर्थिक धोरण मान्य करणें म्हणजे भांडवलशाहीला पुन्हा उत्तेजन देण्यासारखेंच आहे, असा गवगवा लेनिनविरोधी पक्षानें अर्थातच केला. हें धोरण थोडेंसें पिछेहाटीचें असलें तरी आजच्या परिस्थितींत रशियांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळण्यास तें पुरेसें आहे. पराभूत होऊन स्वीकारलेली ही पीछेहाट नसून विजयी सैन्यानें आपली फळी अधिक मजबूत करण्याकरतां व सर्व फौजेचीच बळकटी वाढविण्याकरतां स्वीकारलेली ही पीछेहाट आहे. यामुळें जे कांहीं थोडेसे दोष उत्पन्न होतील ते आपल्या सामर्थ्याच्या बळावर केव्हांच नाहींसे करतां येतील, अशा आत्म-

विश्वासानेंच लेनिननें या धोरणाचा पुरस्कार केला व स्टॅलिननेंही त्याला या कामीं उत्साहानें मदत केली.

शेतकऱ्यांच्या बाबतींत सर्व बोल्शेव्हिक पक्षानें चुकीचें धोरण स्वीकारलें होतें हें खरें आहे; पण पार्टींतील लोकांना आपल्या अंतिम विजयाबद्दल बेभरंवसा वाटूं नये म्हणून लेनिननें जाहीर रीतीनें पुढील उद्‌गार काढले: "खचित आम्हीं पुष्कळ चुका केल्या आहेत व त्यामुळें अनेक आपत्याही आम्हीं खाल्ल्या आहेत. पण अशा चुका झाल्याशिवाय व आपत्या खाल्ल्याशिवाय इतिहासांत अपूर्व असें नव्या धर्तीचें सरकार प्रस्थापित करणें शक्य आहे काय ? आम्ही आमच्या चुका सुधारूं व सोव्हिएट तत्त्वें अमलांत कशीं आणावयाचीं हेंही आम्ही संशोधनपूर्वक ठरवूं. लष्करी साम्यवादाचें धोरण स्वीकारून जी राजकीय चूक करण्यांत आली होती ती या नवीन आर्थिक धोरणाच्या स्वीकृतीनें सुधारण्यांत आली आहे." "क्रांति झाली म्हणून लगेच माणसें देवदूत बनतात असें नाहीं." असें लेनिननें याच संबंधांत आणखी एका प्रसंगीं म्हटलें होतें.

या वेळीं नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करणें किती बरोबर होतें, हें या धोरणाच्या पहिल्या वर्षांतच अनुभवास आलें. या धोरणामुळें एका नवीन तत्त्वावर कामगार व शेतकरी यांच्या एकजुटीचा पाया घालण्यांत आला. कामगार सर्वाधिकारीसत्तेचें सामर्थ्य वाढलें. कुलक शेतकऱ्यांच्या बदमाषगिरीला जवळ जवळ पुरा आळा बसला. मध्यम वर्गाच्या शेतकऱ्यांकडून त्याच्याजवळचें जादा धान्य सक्तीनें नेण्यांत येत नसल्यामुळें, कुलकांच्या टोळक्यांना हाणून पाडण्याच्या कामीं त्यांनीं सोव्हिएट सरकारला मदत केली. मोठाले कारखाने, बँका, वाहतुकीचीं साधनें, जमीन, देशांतील व बाहेरच्या देशांशीं चालणारा व्यापार यांवर सरकारनें नियंत्रण ठेवलेंच होतें. आर्थिक क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं पार्टीला यश आलें. शेतीची प्रगति झपाट्यानें होऊं लागली. रेल्वेच्या व उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत पहिले विजय नजरेस पडूं लागले. पार्टीनें स्वीकारलेलें हें धोरण बरोबर आहे, असें कामगारांना व शेतकऱ्यांना वाटूं लागलें व त्यांच्या तसें अनुभवासही आलें.

छोट्या दुकानदारांना या धोरणामुळें व्यापार करण्यास परवानगी मिळाली व यक्षिणीच्या कांडीप्रमाणें सर्व मॉस्को शहर बदलून गेलें. एकाद्या यात्रे-

प्रमाणें शहरांत जिकडे तिकडे दुकानें दिसूं लागलीं. जुने कपडे विकण्याचा एक मोठा बाजारच भरला. जवळचें धान्य वगैरे विकावें, पैसा करावा व या पैशानें पुन्हा आपल्याला लागतील त्या वस्तू घ्याव्या या सामान्य शेतकरी जनतेच्या आवडीच्या व्यवहारांना पुन्हा सुरवात झाली. हुशार व्यापारांचा देवघेवीचा व्यवहार झपाट्यानें होऊं लागला. व्यापारी संस्कृतीला डोकें वर काढण्यास पुन्हा वाव मिळाला. समाजांत श्रीमंत, गरीब असे वर्ग निर्माण झाले. सारांश, भांडवलशाहीचे दोष पुन्हा व्यवहारांत आढळून येऊं लागले.

झिनोव्हिफनें नवीन आर्थिक धोरणाला जोराचा विरोध केला. "ही शुद्ध पीछेहाट आहे दुसरें कांहीं नाहीं" असें त्यानें एकदां उद्‌गार काढले. त्या वेळीं "नाहीं, सकृद्दर्शनीं तसें दिसणें शक्य आहे. पण या बाबतींतली योजनाच अशी आहे कीं, प्रारंभीच्या या पीछेहाटीच्या धोरणामुळेंच आम्ही आमच्या शक्ति संघटित करून पुन्हा चढाई करूं शकतों" असें स्टॅलिननें त्यावर उत्तर दिलें.

या धोरणामुळें सट्टेबाजीला व नफेबाजीला थोडेंसें उत्तेजन मिळालें. समाजांत वर्गभेदही निर्माण झाले खरे, पण १९२१ मधील सोव्हिएट सरकार नाजुक व शंकेखोर नव्हतें. आपल्या विजयाबद्दल त्याला खात्री होती. सोव्हिएट सरकारनें नवीन आर्थिक धोरण स्वीकारलेलें पाहून भांडवलशाही राष्ट्रांना गुदगुल्या होऊं लागल्या होत्या. नवीन समाजरचनेच्या कल्पना सोडून देऊन स्पर्धेच्या तत्त्वावर उभारलेल्या आर्थिक धोरणाचा बोलशेव्हिकांना शेवटीं स्वीकार करावा लागलाच ना! आतां ते पुन्हा जगांतील भांडवलशाही राष्ट्रांच्या पंक्तीला साहजिकच येऊन बसतील अशा मिटक्या हीं राष्ट्रें मारूं लागलीं होतीं. पण त्यांचा हा विघ्नसंतोषी आनंद फार काळ टिकला नाहीं. नवीन आर्थिक धोरणापासून ज्याची अपेक्षा होती तें कार्य सिद्धीस गेलेलें पाहून स्टॅलिननें त्याला राखदाणी दाखविली.

याच वेळीं राष्ट्रमुखत्यार (Commissar of Nationalities) या नात्यानें रशियांतील अनेक राष्ट्रांसंबंधानें सोव्हिएट सरकारचें धोरण कसें असावें, यासंबंधानें स्टॅलिननें स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर एक योजना आंखली. लेनिनही या वेळीं सोव्हियट यूनियनच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करीत होता. बऱ्याच संशोधनानंतर तयार केलेली स्टॅलिनची ही योजना अगदीं जशीच्या तशी लेनिननें आपल्या मसुद्यांत सामील करून घेतली.

रशियन साम्राज्यांतील या अनेक राष्ट्रांना गुलाम राष्ट्रें म्हणून तुच्छ बुद्धीनें वागविण्यांत येत होतें. या राष्ट्रांना साम्राज्याबद्दल कधींही आपलेपणा वाटला नाहीं आणि साम्राज्याचें सामर्थ्य कमी होण्यास व त्याची चीरफाड होण्यास झारशाहींतील अधिकाऱ्यांची ही अहंपणाची व आढयतेची बुद्धीच कारणीभूत झाली होती. झारशाहीच्या कारकीर्दींत या अनेकविध राष्ट्रांच्या संस्कृतिसंरक्षणाची गोष्ट राहोच, उलट त्यांच्या राष्ट्रीय भाषादेखील नामशेष करण्यापर्यंत झारशाहीची मजल गेली होती. रशियन साम्राज्य झपाट्यानें मोडकळीच्या मार्गास लागलें त्याचें हें एक मुख्य कारण होतें.

" आपण रशियन म्हणजे कोणी श्रेष्ठ माणसें आहों अशा अहंतेच्या गर्तेत आपण पडलों तर आपल्यादेखील चिंधड्या उडतील. मेनशेव्हिकांच्या व युरोपांतील सोशॅलिस्टांच्या मताप्रमाणें हें आपलें नवीन समाजवादी सरकार जातिभेदाच्या तत्त्वावर निरनिराळीं अगदीं स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करून तीं विभागून टाकील व अगदीं दुसऱ्या टोंकाला जाईल तर ती एक मोठीच चूक होईल. युरोपांतील भांडवलशाही राष्ट्रांच्या मानानें आपलें सामर्थ्य कमी होईल व एकेकाला वेगळे वेगळे गांठून या सर्व राष्ट्रांचा पुढल्या युद्धांत हीं भांडवलशाही राष्ट्रें फडशा उडवतील." असें राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या बाबतींत लिहितांना स्टॅलिननें आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें आहे.

सोव्हिएट प्रजासत्ताक यूनियनपासून वेगळें होणें बरें, असें ज्या राष्ट्राच्या लोकांना वाटेल त्यांना तसें करूं देण्याचा हक्क या नव्या योजनेंत स्टॅलिननें मान्य केला होता. सोव्हिएट यूनियनमध्यें हीं राष्ट्रें राहतील तर प्रत्येकाला त्याचें स्वतःचें कायदेमंडळ प्रस्थापितां येईल. सर्व अंतर्गत कारभारावर त्याचा पूर्ण ताबा राहील. फक्त परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतींत तेवढें मध्यवर्ती सत्तेच्या हाताखालीं त्यांना राहावें लागेल. या सर्व राष्ट्रांचें रूसीकरण करण्याचा प्रयत्न तर या योजनेंत मुळींच नव्हता. अगदीं मागासलेल्या प्रांतांतून शिक्षणाचा प्रसार करण्याकरतां सर्वत्र नवीन शाळा घालण्यांत याव्या व त्या त्या राष्ट्रांतील जुनी संस्कृति सुरक्षित राहील, असें शिक्षण या शाळांतून देण्यांत यावें, अशीही तरतूद या योजनेंत करण्यांत आली होती. रशियांतील जुलमी लोक व त्यांच्या हाताखालचीं गुलाम राष्ट्रें, यांच्यांतील शतकानुशतकांचें वैमनस्य यामुळें नष्ट होईल, असा आत्मविश्वास स्टॅलिनला वाटत होता.

रशियाच्या हाताखालील राष्ट्रांचें सांस्कृतिक अस्तित्व कायम राखून सोव्हिएट समाजवादी प्रजासत्ताक संघांत त्यांचें एकीकरण करावयाचें, ही स्टॅलिनची योजना यशस्वी झाली असल्याचें प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध झालें आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत मध्यवर्ती सरकाराविरुद्ध– त्या वेळच्या रशियन साम्राज्याविरुद्ध– त्यांतील लहानमोठ्या राष्ट्रांनीं वेळोवेळीं बंडें केलीं पण कामगारराज्य झाल्यापासूनच्या या पंचवीस वर्षांत अशा प्रकारचें एकही बंड या सत्तेविरुद्ध झालें नाहीं. ठिकठिकाणीं बंडाचीं निशाणें उभारून सोव्हिएट समाजवादी सत्तेपासून वेगळें होण्याचा या राष्ट्रांपैकीं कोणीही प्रयत्न केला नाहीं.

आपसांतील युद्धांत विजय प्राप्त झाल्यानंतर "चला, आपण आतां सोव्हिएट सत्तेच्या रचनात्मक कार्याला हात घालूं" असें लेनिननें जें म्हटलें होतें त्याप्रमाणें कामगावर्गाला संघस्वातंत्र्य व आचारविचार-स्वातंत्र्य देण्यांत आलें. युद्धकालीन साम्यवादाचें धोरण स्थगित करून नवें आर्थिक धोरण स्वीकारण्यांत आलें. शहरांतील कामगार व खेड्यांतील शेतकरी यांची एकजूट करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. कारखाने व उद्योगधंदे वाढीस लागतील अशी परिस्थिति निर्माण करण्यांत आली व आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे रशियांतील लहानमोठ्या राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा हक्क देऊन एक प्रबल सोव्हिएट समाजवादी प्रजासत्ताक संघ बनविण्यांत आला.

अंतर्युद्ध संपल्यानंतर कांहीं दिवस स्टॅलिन भयंकर आजारी पडून मरतां मरतां वाचला व त्यानंतर वरील सर्व कामांत त्यानें लेनिनला एकनिष्ठेनें मदत केली. स्टॅलिनची ही सर्व कर्तबगारी लक्षांत घेऊन लेनिननें त्याला पार्टीचा सेक्रेटरी नेमलें होतें आणि योगायोग असा कीं, हें कार्य पूर्ण झाल्यानंतर १९२२ मे मध्यें लेनिनला अर्धांगवायूचा झटका येऊन तो आजारी झाला. क्रांतीला संघटित करून तिचें दृढीकरण केल्यानंतर जणूं काय लेनिन मरणप्राय आजारी पडायला मोकळा झाला होता.

१९१८ सालीं सोशल रेव्होल्यूशनरी पार्टीच्या डोरा कापलान नांवाच्या एका माथेफिरू मुलीनें लेनिनवर गोळी झाडून त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला. या अपघातांतून लेनिन त्या वेळीं वांचला खरा; पण तिनें घातलेली गोळी मेंदूच्या खालीं मस्तकांत अडकून राहिली. ही गोळी मेंदूजवळ असल्यामुळें

ऑपरेशन करून ती काढून टाकण्यास डॉक्टर लोक धजावले नाहींत. कांहीं थोडे दिवस आजारी पडल्यानंतर लेनिन बरा झाला व तो आपल्या कामास लागला. मेंदूची सर्व शक्ति वेधून घेणारें असेंच हें काम होतें. असल्या कामामुळें लेनिन वेडा तरी होईल किंवा तो मृत्यूच्या तावडींत तरी सांपडेल, असें डॉक्टरांना वाटत होतें. डॉक्टरांचा हा अंदाज एका प्रकारें खरा ठरला. अर्धांगवायूनें त्याला पछाडलें. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट म्हणजे क्रांतीनंतर कांहीं महत्त्वाचीं वर्षें त्याला क्रांतीच्या दृढीकरणाचें काम करतां आलें. या झटक्यामुळें लेनिन वेडा झाला नाहीं तरी त्याचें लिहिणें व बोलणें बंद पडलें.

लेनिन मरण पावला तर, या कल्पनेनें पार्टीच्या सभासदांचें मन हताश होई. पण पुढें कसाही प्रसंग आला तरी त्यांतून निभावून जाण्याचा आपला निश्चय व्यक्त करण्याकरतांच जणूं काय पार्टीनें स्टॅलिनची पार्टीच्या सेक्रेटरीच्या जागीं लेनिननें केलेली नेमणूक एकमतानें मान्य व कायम केली.

सप्टेंबरमध्यें बरा होऊन लेनिन पुन्हा कामाला लागला. ता. २० नोव्हेंबर रोजीं मॉस्को-सोव्हिएटच्या सभेंत त्यानें भाषण केलें. त्याचें हें भाषण शेवटचेंच ठरलें. १६ डिसेंबर रोजीं त्याला आणखी एक झटका आला. यानंतर त्यानें सरकारी कामकाज करण्याचें सोडून दिलें. पण त्याचें लेखनाचें कार्य चालूच होतें. शेतकरी व कामकरी वर्गाच्या प्रतिनिधींनीं सरकारी कामकाजावर कशी देखरेख करावी, याची एक नवीन योजना त्यानें या लेखांतून मांडली. सहकार्य या विषयावर त्यानें लेखमाला लिहून शेतकरी व कामकरी यांचें सहकार्य कसें होईल, याचीही कल्पना त्यानें या लेखांत मांडली होती. स्टॅलिननें पुढें सामुदायिक शेतीचे प्रयोग केले त्यांच्या मूलतत्त्वांचा ऊहापोह या लेखांत लेनिननें केला होता. यानंतर ९ मे १९२३ रोजीं त्याला आणखी एक झटका आला व त्याचें सर्व कामच काय, तर बोलणेंही बंद पडलें. हवापालट म्हणून त्याला गॉर्की येथें नेण्यांत आलें. उन्हाळा कमी झाला तशी त्याची प्रकृति सुधारूं लागली व त्याला बोलतां येऊं लागलें. १९ ऑक्टोबर रोजीं मॉस्को येथें त्याला आणण्यांत आलें. पण यानंतर मात्र त्याची प्रकृति जी बिघडली ती पुन्हा सुधारली नाहीं. २१ जानेवारी रोजीं सकाळीं त्याला जो झटका आला त्यांतच त्याचा अंत झाला.

लेनिनच्या मृत्यूमुळें आपला एक पुरस्कर्ता नाहींसा झाला,असें सर्व जगांतील

कामगारांना वाटलें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. कारण त्यानें जगांतील एका मागासलेल्या देशांत कामगारांचें राज्य प्रस्थापित केलें होतें. आणि कामगार-सत्तेच्या बळावरच सर्व जगभर क्रांति करून कामगार-शेतकऱ्यांचीं राज्यें प्रस्थापित करावयाचीं, हें त्याचें व त्याच्या पार्टीचें ध्येय होतें. लेनिनच्या अकालीं मृत्यूमुळें या चळवळीला एक मोठाच धक्का बसला. लेनिनच्या प्रेतयात्रेच्या दिवशीं आंतरराष्ट्रीय कामगारवर्गानें पांच मिनिटें आपलें काम बंद ठेवलें. लेनिनच्या मागें कम्यूनिस्ट पार्टी हीच त्याची खरी वारसदार होती. लेनिनच्या मृत्यूमुळें सोव्हिएट यूनियनमधील सर्व कामगारवर्ग या पार्टीभोंवतीं जमा झाला. पार्टींत प्रवेश मिळविण्यासाठीं हजारों कामगारांनीं पार्टीकडे अर्ज केले व बोलशेव्हिक पार्टीला अडीच लाख नवे सभासद मिळाले. लेनिनच्या मृत्यूनंतर सोव्हिएट यूनियनची दुसरी कॉंग्रेस भरली त्या वेळीं स्टॅलिननें पार्टीच्यातर्फे पुढील प्रतिज्ञा जाहीर केल्याः—

" आम्ही कम्यूनिस्ट एका विशेष घडणीचीं माणसें आहों. आमच्यांत एक विशेष प्रकारचें पाणी आहे. आम्ही कॉ. लेनिनच्या, त्या थोर कामगारवर्गाच्या कुशल सेनापतीच्या सेनेंतील सैनिक आहों. या सेनेंतील सैनिक बनणें यापेक्षां अधिक मानाची कोणतीही दुसरी गोष्ट नाहीं. ज्या पार्टीचा संस्थापक व पुढारी लेनिन आहे, तिचा सभासद होणें यापेक्षां अधिक श्रेष्ठ असें कांहींही नाहीं...

" आमचा निरोप घेतांना पार्टीच्या सभासदत्वाची थोर प्रतिष्ठा व तिचें पावित्र्य कायम राखण्याबद्दल लेनिननें आम्हांला आज्ञा केली. कॉ. लेनिन, तुझी ही आज्ञा आम्ही इमानेंइतबारें पाळूं. आमचा निरोप घेतांना कॉ. लेनिननें पार्टीच्या ऐक्याला तळहाताच्या फोडाप्रमाणें जपा अशी आज्ञा केली. कॉ. लेनिन तुझी ही आज्ञासुद्धां आम्हीं इमानेंइतबारें पाळूं...

" आमचा निरोप घेतांना कॉ. लेनिननें कामगार-हुकूमशाहीचें रक्षण करा व तिचें सामर्थ्य वाढवा, अशी आज्ञा केली. कॉ. लेनिन, तुझी ही आज्ञासुद्धां पाळण्यासाठीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यास आम्हीं चुकणार नाहीं. अशी तुला साक्ष ठेवून आम्ही प्रतिज्ञा करतों.

" आमचा निरोप घेतांना कॉ. लेनिननें कामकरी व शेतकरी यांची दोस्ती जोरदार करा व त्याकरतां आपल्या सर्व शक्ति खर्ची घाला, अशी आज्ञा केली.

कॉ. लेनिन, तुझी ही आज्ञादेखील आम्ही इमानेंइतबारें पाळूं अशी तुला साक्ष ठेवून आम्ही प्रतिज्ञा करतों.

" कॉ. लेनिननें आम्हांला अविश्रांतपणें बजावलें आहे कीं, आपल्या देशांतील अनेक राष्ट्रांनीं स्वतःच्या खुषीनें घडवून आणलेली एकजूट कायम ठेवणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें प्रजासत्ताक राज्यसंघटनेच्या चौकटींत त्यांच्यांतील परस्परबंधुभाव कायम राखणें अवश्य आहे. आमचा निरोप घेतांना या प्रजासत्ताक राष्ट्रांची एकजूट वाढवा, ती अधिक दृढ करा अशी आज्ञा त्यानें केली. कॉ. लेनिन, तुझी ही आज्ञासुद्धां आम्ही इमानेंइतबारें पाळूं.

" लाल फौजेचें सामर्थ्य वाढविणें व तिच्या स्थितींत सुधारणा करणें हें एक पार्टीचें महत्त्वाचें काम आहे असें लेनिननें आम्हांला अनेक वेळां दाखवून दिलें आहे. म्हणून दोस्त हो, आपल्या लाल फौजेचें व आरमाराचें सामर्थ्य वाढविण्याच्या कामीं आम्ही आपल्या प्रयत्नांची शिकस्त करूं. अशी आपण प्रतिज्ञा करूं...

" कम्यूनिस्ट इंटरनॅशनलच्या तत्त्वाशीं एकनिष्ठ राहण्याबद्दल कॉ. लेनिननें आमचा निरोप घेतांना आम्हांला आज्ञा केली. कॉ. लेनिन, आम्ही तुझी साक्ष घेऊन प्रतिज्ञा करतों कीं, अखिल जगांतील श्रमिक जनतेच्या एकजुटीचें रक्षण करण्याकरतां व कम्यूनिस्ट इंटरनॅशनलची वाढ करून तिला शक्तिशाली करण्याकरतां आम्ही आमचे प्राणही खर्चीं घालूं."

# क्रांति-शत्रूंचें निर्दालन १०

लेनिनच्या निधनानंतर त्याची गादी कोणी चालवावी ? स्टॅलिननें का ट्राट्स्कीनें, हा सवाल महत्त्वाचा नव्हता. भोंवतालच्या जगांत भांडवलशाही व साम्राज्यशाही राष्ट्रें नांदत असतांना सोव्हिएट यूनियनमधील समाजसत्तावादी क्रांति कशी टिकवून धरावयाची व या यूनियनमधील उद्योगधंद्यांची समाजसत्तावादी तत्त्वावर कशी वाढ करावयाची, हे दोन सवाल सोव्हिएट यूनियनपुढें होते. ज्या पार्टीनें रशियांत समाजसत्तावादी क्रांति केली व रशियाच्या ताब्यांतील एकोणचाळीस लहानमोठ्या राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा व स्वातंत्र्याचा हक्क देऊन सोव्हिएट एकजूट निर्माण केली त्या पार्टीपुढें हे दोन मुख्य सवाल होते. ट्रॉट्स्की व त्याचे अनुयायी व इतर नवे डाव्या-उजव्या पक्षाचे पुढारी मुळांतच या प्रश्नांविरुद्ध होते. लेनिनच्या निधनानंतर सोव्हिएट यूनियनची दुसरी कॉंग्रेस भरली. या कॉंग्रेसमध्यें लेनिनचें कार्य पुढें चालविण्याच्या शपथा घेण्यांत आल्या. पार्टीतर्फें या शपथा घेण्याचें काम स्टॅलिननें केलें. सोव्हिएट यूनियनमधील कामगारसत्तेचें आम्ही रक्षण करूं. यूनियनमधील कामगार व शेतकरी यांची दोस्ती प्रबल करण्याकरतां आम्ही आमच्या सर्व शक्ति खर्ची घालूं, अशा शपथा स्टॅलिननें पार्टीच्यातर्फें घतल्या. पार्टीनें केलेल्या या प्रतिज्ञा म्हणजेच वरील दोन सवाल सोडविण्याच्या प्रतिज्ञा होत्या. यूनियनमधील समाजसत्तावादी क्रांतीचें रक्षण झाल्याशिवाय तेथील कामगारसर्वाधिकारी सत्ता टिकून राहणें, कसें शक्य होतें ? त्याचप्रमाणें यूनियनमधील कामगार-शेतकऱ्यांच्या एकजुटीचें सामर्थ्य वाढवावयाचें असेल तर देशांतील उद्योगधंद्यांचें प्रचंड प्रमाणावर समाजसत्तावादी औद्योगीकरण करणेंच जरूर होतें. स्टॅलिन व त्याचे पार्टीतील दोस्त यांना ही गोष्ट पूर्णपणें पटली होती. तेव्हां पार्टीनें स्टॅलिनला जनरल सेक्रेटरीच्या जागीं कायम ठेवलें व वरील सिद्धांत ज्यांना पटला त्यांनीं एकदिलानें लेनिनचें कार्य पुढें चालविण्याच्या त्याच्याबरोबर प्रतिज्ञा केल्या व त्या प्रत्यक्ष अमलांत आणण्याच्या प्रयत्नाला ते लागले.

"एका राष्ट्रांत समाजसत्तावादी क्रांति" व तेथें "समाजसत्तावादी औद्योगीकरण" या दोन्ही गोष्टी अशक्य, मार्क्सवादाला अनुसरून हा सिद्धांत नाहीं. या आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरतां नास्तिपक्षानें मार्क्स व एंगल्स यांच्या ग्रंथांतील शेंकडों उतारे दाखविले तर स्टॅलिनप्रभृति अस्तिपक्षानेंही मार्क्स-एंगल्सचे उतारे जनतेपुढें मांडून वरील सिद्धांत अशक्य म्हणणें, हेंच मार्क्स-वादाला धरून नाहीं असें सिद्ध केलें. या प्रश्नाचा सर्वांगीण व पूर्ण ऊहापोह व्हावा, या सवालांतील अनेक पैलूंसंबंधाचे आपले विचार सर्वांनीं कोणाची भीड न धरतां मनसोक्त मांडावे व त्यानंतर या प्रश्नासंबंधाचा कायम निर्णय घेण्यांत यावा म्हणूनच केवळ पार्टीची चौदावी कॉंग्रेस भरविण्यांत आली. पूर्वीं ठरल्याप्रमाणें सर्व पक्षांच्या लोकांनीं आपापलें म्हणणें कॉंग्रेसपुढें मांडलें. या कॅंग्रेसचें काम बरेच दिवस चाललें. या प्रश्नाचा कीस काढण्यांत आला आणि शेवटीं एका देशांत समाजवादी-क्रांति टिकविणें व तेथें समाजवादी औद्योगीकरण करणें शक्य आहे व तें मार्क्सवादाला पूर्णपणें धरून आहे, असाच निर्णय बहुमतानें या कॉंग्रेसनें दिला.

"चौदाव्या कॉंग्रेसचें ऐतिहासिक महत्त्व हें कीं, तिनें नवविरोध पक्षाच्या चुकांचे अगदीं मूळ दोष उघडकीला आणले. पार्टीच्या धोरणासंबंधानें वाट-णारी संशयात्मकता नाहींशी केली. समाजवादी लढ्यांतील प्रगतिपर मार्गाचें स्पष्टपणें दिग्दर्शन केलें, समाजवादी रचनात्मक कार्याच्या विजयासंबंधानें कामगारवर्गांत प्रबल व दृढ श्रद्धा निर्माण केली." असें स्टॅलिननें या कॉंग्रेस-बद्दल लिहितांना म्हटलें आहे.

अर्थातच या निर्णयाप्रमाणें स्टॅलिन व त्याचे दोस्त पुढच्या उद्योगास लागले. अर्थात् पार्टीचें हें काम म्हणजे सोव्हिएट सरकारचेंच काम होतें.

पण विरोधी पक्ष केवळ मतभेद दाखवूनच स्वस्थ बसला नाहीं. आपला विरोध प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याकरतां त्यानें नवा विरोधी पक्ष निर्माण केला. या पक्षानें चालविलेली विरोधी चळवळ कांहीं ठराविक मर्यादेच्या पलीकडे जाऊं लागली व प्रत्यक्ष सोव्हिएट सरकारच्या रचनात्मक कामांत ती अडथळा करूं लागली. या चळवळीमुळें सोव्हिएट सरकारच्या इभ्रतीलाच धक्का बसूं लागला त्या वेळीं या पक्षाच्या पुरस्कर्त्यांच्या बाबतींत सोव्हिएट सरकारला कडक उपाय अमलांत आणावे लागले. अशा परिस्थितींत ट्रॉट्स्कीलाही हद्दपार

करावें लागलें आणि पुढें पुढें तर या विरोधी पक्षांतील लोकांनीं कट केले. ट्रॉट्स्कीनें आपल्या हद्दपारीच्या मुलखांतून या विरोधी पक्षाशीं पत्रव्यवहार ठेवला. या पक्षानें सोव्हिएट सरकारच्या शत्रुस्थानीं असलेल्या व्हाइट गार्ड्सशीं व इतर साम्राज्यवादी राष्ट्रांशीं संगनमत केलें. पार्टींतील अत्यंत कर्तबगार व लोकप्रिय पुढारी सरजी किरोफ याचा खून करण्यापर्यंत या पक्षाची मजल गेली तेव्हां या पक्षाचा समूळ नायनाट करण्याकरतां झिनोव्हिफ, कामेनेव्ह प्रभृति या पक्षाच्या पुढाऱ्यांना देहांतशासन करून पार्टीला आपला मार्ग मोकळा करावा लागला. सोव्हिएट सरकारला विरोधी पक्षाबरोबर करावा लागलेला हा लढा लेनिनच्या निधनानंतर जवळ जवळ बारा वर्षें चालला होता. या बारा वर्षांत व यापूर्वींही पार्टीची शिस्त व तिचें पावित्र्य कायम राखण्याकरतां हजारों विरोधी व कुचर लोकांना पार्टींतून काढून टाकण्यांत आलें होतें. एका बाजूला क्रांतीचें विधायक कार्य चालू असतां पार्टीची शुद्धता व शिस्त कायम राखण्यासाठीं आपल्यांतील घाण बाजूला काढणें जरूरीचें होतें आणि ही दोन्ही कामें अत्यंत दक्षतेनें डोळ्यांत तेल घालून चालू राहिलीं म्हणूनच पार्टीला लेनिनच्या निधनानंतर घेतलेल्या प्रतिज्ञा पुऱ्या करतां आल्या.

क्रांतीच्या शत्रूंचें शासन व क्रांतिरक्षणाचें विधायक कार्य हीं दोन्हीं कामें एकसमयावच्छेदेंकरूनच १९२८ ते १९३४ पर्यंत चालू होतीं. एकीकडे क्रांतीच्या शत्रूंच्या चळवळीची बातमी काढणें, त्यांना कोर्टापुढें खेंचणें व त्यांच्याविरुद्ध असलेला पुरावा कोर्टाच्या उघड चौकशीपुढें मांडणें ही कामें चालू होतीं तर दुसरीकडे त्याच वेळीं म्हणजे १९२८ सालीं आंखलेली समाजवादी पहिली पंचवार्षिक योजना यशस्वी रीतीनें अमलांत आणण्याचें काम स्टॅलिन व त्याचे पार्टींतील दोस्त करीत होते.

या सर्व कामांत विशेषतः विरोधी पक्षाला बाजूला काढण्याच्या बाबतींत स्टॅलिनला जें जें करावें लागलें तें तें सर्व त्यानें पार्टीच्या सेंट्रल कमिटीच्या आज्ञेप्रमाणेंच केलें. ज. सेक्रेटरी या नात्यानें त्याला असलेल्या अधिकाराचा त्यानें सदैव सदुपयोगच केला. **स्टॅलिन हुकूमशहा तर कधींच नव्हता.** तो पार्टीचा एक साधा पण अत्यंत कर्तबगार सेक्रेटरी होता. लेनिननें केलेल्या क्रांतिकार्याचा तो एक कट्टर एकनिष्ठ पुरस्कर्ता होता. हें कार्य यशस्वी करण्याच्या कामांत जे जे अडथळे आले ते त्यानें निष्ठुरपणें दूर केले.

लेनिननें आपल्या मरणापूर्वीं दोन अडीच महिने पार्टींतील प्रमुख व्यक्तींचे स्वभावचित्र रेखाटलें होतें त्यांत त्यानें स्टॅलिन फारच कडक स्वभावाचा आहे असें म्हटलें होतें. लेनिनच्या मरणानंतर भरलेल्या एका कॉंग्रेसमध्यें बोलतांना "होय दोस्त हो, मी कडक आहे. जे लोक आपल्या चळवळींनीं पार्टीचें सामर्थ्य खची करूं पाहतात त्यांच्या बाबतींत मी कडक आहे व अशा लोकांशीं कडकपणें वागत राहण्याचेंच मी ठरविलें आहे," असें स्टॅलिननें म्हटलें होतें. विरोधी पक्षांतील लहान मोठ्या लोकांना जें शासन करण्यांत आलें तें सुद्धां कोर्टापुढें उघड उघड त्यांच्या अपराधांची चौकशी करून पुराव्यानें त्यांच्यावर गुन्हे शाबीत झाले तेव्हांच करण्यांत आलें. स्टॅलिनला ज. सेक्रेटरी या नात्यानें या बाबतींत कडक हुकूम सोडावे लागले व १९३३ सालीं व पुढेंही या देशद्रोही लोकांच्या डेथ वारंटांवर त्याला सह्या कराव्या लागल्या. हें सर्व काम एक निष्ठुर कर्तव्य म्हणूनच स्टॅलिनला करावें लागलें.

यानंतर १९३५ ते ३८ पर्यंत झिनोव्हिफ, कामेनेव्ह, रॅडेक प्रभृति विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यांच्या गुन्ह्यांची जी उघड चौकशी झाली व कोर्टानें जो निर्णय दिला त्याची अंमलबजावणी करण्याकरतांही स्टॅलिनला एक निष्ठुर कर्तव्य म्हणूनच या प्रसंगालाही तोंड द्यावें लागलें.

पार्टीतील कुचर व निमकहराम लोकांना वेळोवेळीं काढून टाकून पार्टींतील घाण नाहींशी करणें, क्रांतीच्या रक्षणाच्या व समाजवादी औद्योगीकरणाच्या योजनेच्या कामांत अडथळा करून सोव्हिएट सरकारच्या कामांतच व्यत्यय आणणाऱ्या प्रतिक्रांतिवादी लोकांना शासन करणें, या पार्टीच्या धोरणामुळेंच सोव्हिएट क्रांतीच्या अंतर्बाह्य शत्रूंचें पूर्ण निर्दालन झालें आहे आणि आजच्या लोकयुद्धांत प्रचंड नाझी हल्ल्याला यशस्वी रीतीनें लाल फौज जें तोंड देत आहे तें या वरील धोरणाचेंच फल आहे. पार्टीनें पहिल्यापासून या बाबतींत कडक व निष्ठुर धोरण स्वीकारलें म्हणूनच सोव्हिएट यूनियनमधील सर्व राष्ट्रें व त्यांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुष आपल्या क्रांतीच्या पितृभूमीचें रक्षण करण्याकरतां एकजूट व एकजीव होऊन लढत आहेत. स्टॅलिनची सोव्हिएट लाल फौज आज रोजच्या रोज जे विजय संपादन करीत आहे त्याच्यामागें सोव्हिएट यूनियनमधील अखिल जनतेची एकजूट व एकजीव झालेली प्रचंड शक्ति आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

समाजवादी रचनायुगाला सोव्हिएट यूनियनमध्यें १९२८ पासूनच खरी सुरवात झाली. लेनिनच्या निधनानंतरच्या म्हणजे १९२४ ते १९२८ या चार वर्षांच्या कालांत या समाजवादी औद्योगीकरणाच्या बाबतींत कोणकोणत्या उपायांचा अवलंब करावा लागेल, याची वाटाघाट चालू होती. पार्टीच्या चौदाव्या काँग्रेसमध्यें समाजवादी औद्योगीकरणाचें धोरण निश्चित ठरल्यावर या बाबतींत आपल्यांत काय उणीवा आहेत व त्या कशा भरून काढावयाच्या याचा विचार सोव्हिएट सरकारला प्रथम करावा लागला. या वेळीं रशियांत ज्या गिरण्या व कारखाने होते ते सर्व जुने होते. जुनीपुराणी गंजलेली यंत्रसामुग्री या कारखान्यांतून होती. ही यंत्रसामुग्री काढून टाकून त्या ठिकाणीं अद्ययावत् सुधारलेली यंत्रसामुग्री उभी करणें जरूरीचें होतें.

पण ही यंत्रसामुग्री कशी मिळवायची ? परदेशांतून ती मिळविण्यापेक्षां खुद्द देशांतच यंत्रें तयार करण्याचे कारखाने काढणें अपरिहार्य होतें. देशांतील जादा धान्य व कच्चा माल परदेशांत पाठवून त्याच्या बदला यंत्रें आणण्याचा प्रयत्न केला तरी ज्या प्रचंड प्रमाणावर सोव्हिएट सरकारनें देशाचें औद्योगिकरण करण्याचें ठरविलें होतें त्याला हा प्रयत्न पुरेसा नव्हता. याकरतां अशा प्रकारचे शेंकडों प्रचंड कारखाने काढले तरच औद्योगीकरणाची योजना सफल होईल, ही गोष्ट सोव्हिएट सरकारला पूर्णपणें कळून चुकली होती. शिवाय या वेळीं रशियांत जे कारखाने होते ते सर्व लहान प्रमाणावर बांधलेले कारखाने होते.

क्रांति झाल्यानंतर देशांतील जनतेच्या सर्व प्रकारच्या गरजा पुरवावयाच्या व त्यांचें जीवन सुखाचें व सोयीचें करावयाचें तर असल्या अवश्य मालाची पैदास मोठ्या प्रमाणावर करण्याकरतां प्रचंड कारखान्यांची उभारणी करावयास पाहिजे होती. एकंदरींत झारच्या रशियांत जें पूर्वी नव्हतें तें निर्माण करावयाचें होतें. नवीं यंत्रें, नवीं अवजारें, नवीं औतें, मोटारी, लोखंड व पोलाद बनविणारे नवे अवाढव्य कारखाने, सोव्हिएट सरकारला उभारावयाचे होते. त्याचप्रमाणें खनिज पदार्थांच्या व कोळशाच्या खाणीही त्याला खोदावयाच्या होत्या.

सोव्हिएट यूनियनमध्यें समाजवाद विजयी करावयाचा असेल तर या सर्व गोष्टी करणें अत्यंत अवश्य होतें. तसेंच भांडवलशाही जगानें वेढलेल्या सोव्हिएट यूनियनचें रक्षण करावयाचें तर नवीन दारूगोळ्याचे कारखाने, तोफा, टँक्स, मशीनगन्स, विमानें तयार करणारे कारखानेही सोव्हिएट सरकारला उभारावयास पाहिजे होते. जगांतील इतर देशांच्या मानानें शेतीचें उत्पन्न वाढवावयाचें तर सुधारलेलीं अर्वाचीन शेतीचीं औतें, यंत्रें व ट्रॅक्टर तयार करणारे कारखाने उभारून देशांतील कोट्यवधि शेतकऱ्यांना सामुदायिक पद्धतीनें शेती करण्यास समर्थ बनवायचें होतें. औद्योगीकरणाचें धोरण स्वीकारून याच गोष्टी सोव्हिएट सरकारला संपादावयाच्या होत्या. समाजवादी औद्योगीकरणाचा खरा अर्थ हाच होता.

सोव्हिएट सरकारला वरील प्रकारच्या पुष्कळ गोष्टी करावयाच्या होत्या. पण खुद्द देशांतील परिस्थिति या योजनेला मुळींच उत्तेजनकारक नव्हती. नवीन आर्थिक धोरणामुळें आपसांतील युद्धाच्या वेळीं आलेल्या आपत्तीचें थोडेंसें निवारण झालें होतें; पण बोल्शेव्हिकांनीं जो कार्यक्रम आंखला होता त्याला हें धोरण मुळींच सहायकारक नव्हतें. या धोरणामुळें पुढें आलेले लहान मोठे व्यापारी व कारखानदार आपापलें भांडवल कसें वाढेल याच फिकीरींत होते. सोव्हिएट सरकारच्या औद्योगीकरणाच्या योजना त्यांना पसंत पडणें कधींच शक्य नव्हतें. तेव्हां समाजवादी औद्योगीकरणाची कल्पना जनतेला समजावून देण्याकरतां प्रवदा पत्रांतून या विषयावर लेखमाला सुरू करण्यांत आली. या विषयावरचे पहिले लेख स्टॅलिननें व मोलोटॉव्हनें लिहिले. देशांत जे कांहीं थोडे मोठे कारखाने अस्तित्वांत असतील ते पुन्हा नव्या यंत्रसामुग्रीसह सुरू करावयाचे व असले नवीन कारखाने उभारावयाचे तर हें काम काळजीपूर्वक तयार केलेल्या योजनेशिवाय व ही योजना सर्वांनीं सहकार्यानें पार पाडल्याशिवाय यशस्वी व्हावयाची नाहीं असें स्टॅलिननें या लेखांत म्हटलें होतें.

त्याचप्रमाणें एक सरकारी योजनामंडळ ( State Planning Commission ) नेमावें व त्यानें पंचवार्षिक योजना आंखावी, असें स्टॅलिननें सुचविलें व त्याची ही सूचना लगेच अमलांतही आली. ग्रिंकोसारखे यंत्रशास्त्रविशारद या कमिशनमध्यें नेमण्यांत आले. त्याच्या मदतीला तसल्याच शास्त्रांतील तज्ज्ञ असे त्याचे दोस्तही देण्यांत आले. एकादी सूचना अगदींच

अयोग्य वाटली तर ती बाजूला ठेवण्याचा व्हेटोचा अधिकार स्टॅलिनला देण्यांत आला होता. ही पंचवार्षिक योजना अतिशय साधी होती. सोव्हिएट सरकारचें या वेळचें (१९२८) उत्पन्न रशियाच्या १९१३-१४ सालच्या उत्पन्नाएवढें होतें. या उत्पन्नाचें प्रमाण तिपटीनें वाढवावयाचें व शें. ५० या प्रमाणांत शेतकीच्या उत्पन्नाची वाढ करावयाची, अशी ही योजना होती.

पांच वर्षांत सोव्हिएट यूनियनचें इतक्या मोठ्या प्रमाणांत उत्पन्न वाढवावयाचें तर आज ८००० कोटी रुबल भांडवल उभारण्याची व्यवस्था केली पाहिजे असा ग्रिंकोप्रभृति कमिटींतील तज्ज्ञांचा अंदाज होता. ऑक्टोबर-क्रांतीनंतर देशांतील लहान मोठे महत्त्वाचे कारखाने, गिरण्या, जमिनी कारखानदारांकडून व जमीनदारांकडून सोव्हिएट सरकारनें आपल्या ताब्यांत घेतल्या होत्या. वाहतुकीचीं सर्व साधनें, बँका, आंतला व बाहेरचा सर्व व्यापार सोव्हिएट सरकारच्या ताब्यांत होता. तेव्हां सरकारी मालकीच्या गिरण्या-कारखान्यांचा, व्यापारांचा, वाहतुकीच्या साधनांचा व बँकांचा सर्व नफा भांडवल म्हणून देशांतील उद्योगधंदे वाढविण्याच्या कामीं उपयोग करण्याचें सो. सरकारनें अर्थातच ठरविलें.

जमीनदारांचा जमिनीवरील हक्क नाशाबीत केल्यामुळें दरसाल खंडापायीं खर्च होणारे ५० कोटी सोन्याचे रुबल वांचले होते व हे पैसे नवीन उद्योगांत व कारखान्यांत घालण्यास शेतकरीवर्ग तयार झाला होता. शेतीचीं सुधारलेलीं यंत्रें व ट्रॅक्टर्स (मोटार नांगर) शेतकऱ्यांना पाहिजेच होते.

सोव्हिएट सरकारचें बहुतेक सर्व उत्पन्न या कामीं खर्च करावयाचें असें ठरल्यामुळें देशांतील जनतेच्या राहणीचें प्रमाण कमी दर्जाचें झालें, मालाच्या किंमती बेसुमार वाढत चालल्या, युद्धकालाप्रमाणें धान्यासारख्या जिनसांचें रेशनिंग मॉस्कोसारख्या मोठमोठ्या शहरांतून सुरू करण्यांत आलें. परंतु या वेळीं हें सर्व कोणत्या कारणांमुळें व कोणत्या उच्च हेतूनें प्रेरित होऊन सोव्हिएट यूनियनच्या सरकारला करावें लागत आहे, हें देशांतील जनतेला पूर्णपणें समजावून देण्यांत आलें होतें व आपल्याला कमी मजुरी मिळाली, दिवसांतून थोडा जास्त वेळ आपल्याला काम करावें लागलें तरी त्याबद्दल फिकीर न बाळगतां सर्व कामगारवर्ग ही योजना पार पाडण्याच्या कामीं कटिबद्ध झाला व धान्यपुरवठ्याच्या बाबतींत उत्पन्न झालेल्या अडचणी सोसण्यास सोव्हिएट यूनियनमधील अखिल जनताही तयार झाली.

ज्या ठिकाणची जनता व सरकार एकरूप झालीं त्या ठिकाणीं कोणती योजना पार पाडणें अशक्य आहे? ज्या राष्ट्रांतील जनता व सरकार एक झालें–नव्हे अखिल जनताच सरकार बनली– जनता व सरकार दोहोंमध्यें भेद राहिला नाहीं, असा अपूर्व योग ज्या ठिकाणीं साधला त्या राष्ट्राची संपत्ति वाढणार, त्याला सर्वत्र विजय प्राप्त होणार, त्याचें ऐश्वर्य वाढणार व मानवी सुखाच्या व पूर्ण स्वातंत्र्याच्या तत्त्वावर उभारलेली नव्या ध्रुव नीतीची नव-संस्कृति त्या राष्ट्रांत प्रस्थापित होणार, ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे.

या पहिल्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें उद्योगधंदे वाढविण्याचें व देशाचें उत्पन्नही वाढविण्याचें काम सुरू झाल्याबरोबर एक दोन वर्षांतच त्याचे इष्ट परिणाम दृग्गोचर होऊं लागले. आरंभीं जाचक भासणारी धान्यटंचाई कमी झाली इतकेंच नव्हे, तर या दोन वर्षांत धान्यपुरवठ्याचा प्रश्न अजीबात सुटून उलट देशांत धान्य वगैरे जरूरीच्या वस्तू शिल्लक राहूं लागल्या. अर्थात् हा जादा माल परदेशांतून विकून औद्योगीकरणाला लागणाऱ्या भांडवलांत भर टाकण्याचें सोव्हिएट सरकारनें ठरविलें. मालाच्या किंमतीच्या बाबतींत परस्पर चढाओढीचा किंवा स्पर्धेचा या ठिकाणीं प्रश्नच नव्हता. शिवाय या पैदाशीच्या मुळाशीं पिळणुकीचें तत्त्वच नसल्यामुळें हव्या तितक्या स्वस्त दरानें हा माल खपविण्याची सोव्हिएट सरकारची तयारी होती. अशा रीतीनें अगदीं स्वस्त दरांत हवा तितका माल आपल्या देशांत येत असलेला पाहून फ्रान्स, इंग्लंड वगैरे साम्राज्यवादी राष्ट्रांचें धाबें दणाणून गेलें असल्यास नवल.नाहीं.

ज्या राष्ट्राशीं आपण थोड्याच दिवसांपूर्वीं लढाई दिली तें राष्ट्र पुन्हा सांवरून आपल्या मुलखांत हव्या तितक्या मालाची पैदास करूं लागलें इतकेंच नव्हे, तर आपल्या सर्व जनतेच्या सर्व प्रकारच्या गरजा भागवून स्वस्त दरानें हवा तितका माल दुसऱ्या राष्ट्रांतील जनतेला विकण्यास समर्थ झाले हें पाहून साम्राज्यवादी राष्ट्रांच्या पोटांत कसें दुखूं लागलें हें फ्रान्सचे त्या वेळचे मुख्य प्रधान व भांडवलदारीचे पुरस्कर्ते एम. पॉंकारे यांनीं काढलेल्या पुढील उद्गारांवरून स्पष्ट होण्यासारखें आहे— "पंचवार्षिक योजना पूर्ण करण्याकरतां सर्व कांहीं खर्ची घालण्यास सोव्हिएट यूनियनमधील प्रजासत्ताक राष्ट्रें तयार झालीं आहेत. सोव्हिएटांची ही प्रथा आर्थिक दृष्ट्या त्रासाची असून इच्यामुळें

इतर सर्व राष्ट्रांतून कलह व परस्परमतभेद वाढतील व त्यांना आपल्या स्वसंरक्षणाची तजवीज करणें अशक्य होऊन जाईल."

सोव्हिएट यूनियनच्या या वाढत्या भरभराटीमुळें रागावलेल्या व हिरमुसलेल्या पत्रकारांना उत्तर म्हणून स्टॅलिननें या वेळीं एक व्याजोक्तिपूर्ण लेख लिहिला. जिकडे तिकडे उपासमार व बेकारी वाढत असतांना मालाच्या किंमती कायम राखण्याकरतां ब्राझिलमध्यें एक वर्षाचें संबंध कॉफीचें उत्पन्न जाळून खाक करण्यांत आलें. अमेरिकन नद्यांतून हजारों टन दूध ओतण्यांत आलें अशीं उदाहरणें देऊन बिगर समाजवादी राष्ट्रांतील वाढत चाललेल्या सुखसोयींची त्यानें टिंगल उडविली.

सोव्हिएट यूनियनमधून येणाऱ्या स्वस्त मालाला मज्जाव करण्याकरतां भांडवल-शाही राष्ट्रांनीं त्याच्यावर भरमसाट जकाती घेण्यास सुरवात केली. सोव्हिएट सरकारनें त्यांनाही दाद दिली नाहीं व आपला जादा राहिलेला कच्चा व पक्का माल विकून त्याच्या बदला आपल्याला लागणारी यंत्रसामुग्री त्यांनीं आपल्या कारखान्याकरतां मिळविली.

सोव्हिएट यूनियनमधील कामगार आपण किती तास काम करतों व आपल्याला किती मजुरी मिळते याचा विचार करायला या वेळीं देखील तयार नव्हते. "प्रिय कॉम्रेड स्टॅलिनची" पंचवार्षिक योजना ठरलेल्या मुदतीपूर्वींच पार पाडून दाखवावयाची याच इर्षेनें सर्व कामगारवर्ग या वेळीं कामाला लागला होता. योजना आंखल्यानंतर तीन वर्षांतच म्हणजे १९३१ सालीं असें दिसून आलें कीं, जी मूळ योंजना मुदतींत पूर्ण होणें अशक्य म्हणून थट्टा उडविली जात होती ती मुदतीपूर्वींच पूर्ण होण्याची खात्री वाटूं लागली व "पंचवार्षिक योजना चार वर्षांत" असेंच त्या वेळचें एक घोषवाक्य बनलें.

एकीकडे देशांतील प्रचंड कामगारवर्ग अहमहमिकेनें पंचवार्षिक योजना मुदतीपूर्वी पार पाडण्याकरतां झटत होता तर ट्रॉट्स्कीवादानें भारलेले कांहीं विघ्नसंतोषी गट या योजनेला अडथळा करूं पाहत होते. या गटांतून कांहीं प्रोफेसर व यंत्रशास्त्रज्ञही होते. त्यांनीं खाणींत, कारखान्यांत व एंजीनियरिंग खात्यांत महत्त्वाच्या जागा मिळविल्या होत्या. नवीन आर्थिक धोरणामुळें ज्यांची स्थिति सुधारली होती व यापुढें लहान कारखान्यांचें महत्त्व राहणार नाहीं, आपला धंदा आतां बुडणार, असें ज्यांना वाटूं लागलें ते लोकही वरील

स्टॅलिनविरोधी गटांत सामील झाले. सोव्हिएट सरकारला उघडपणें विरोध करण्याची या लोकांची छाती नव्हती. तेव्हां गुप्त संघटना करून या योजनेला विघ्न करण्याचें त्यांनीं ठरविलें. या गुप्त संघटनेच्या कामीं लागणारा पैसा नवीन आर्थिक धोरणामुळें जे गबर होऊन बसले होते त्यांनीं पुरविला. या विघ्नसंतोषी गटांच्या कृत्यांचा सुगावा पंचवार्षिक योजनेच्या कामाला सुरुवात होऊन कांहीं महिने होतात तोंच स्टॅलिनला लागला व पार्टीकडून ताबडतोब निर्णय घेऊन स्टॅलिननें या लोकांचा समाचार घेण्याचें ठरविलें.

पार्टीच्या राजकीय समितीनें (पॉलिट ब्यूरो) एकमतानें असल्या गुन्हेगारांना जबर शिक्षा देण्याचें ठरविलें. पंचवार्षिक योजनेला विरोध करणाऱ्या व त्यांत विघ्नें आणणाऱ्या सोव्हिएट विरोधकांविरुद्ध कडक उपाय अमलांत आणले पाहिजेत अशीं पत्रें प्रवदा पत्रांतूनही प्रसिद्ध होऊं लागलीं. १९२८ च्या अखेरच्या महिन्यांत पन्नास एंजिनियरांना मोडतोड करण्याच्या व देशद्रोहाच्या आरोपावरून पकडण्यांत आलें. यापैकीं एका गटानें तर कोर्टाच्या उघड चौकशींत आपला गुन्हा कबूल केला व डोनेट्झच्या कोळशाच्या खाणींत तीन वेळां पाण्याचे पूर सोडले, दोन आगगाड्या पाडल्या व यंत्रांची मोडतोड करून किती तरी वेळां कारखाने बंद पाडले असें सांगितलें. या सर्वांवर गुन्हा शाबीत होऊन त्यांपैकीं कांहींना देहान्तशासनाची शिक्षा देण्यांत आली व कांहींना सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें. १९३० सालीं अशाच प्रकारच्या विघ्नकारी गुन्ह्यांबद्दल कांहीं प्रोफेसरांवर खटला भरून त्यांची चौकशी करण्यांत आली. "रामझेन चौकशी" या नांवानें ही चौकशी पुढें प्रसिद्धीला पावली. या गुन्ह्यांतील सर्व आरोपी रसायनशास्त्रज्ञ होते. लेनिनग्राडच्या औद्योगिक भागांतील कामगारांकरतां राखून ठेवलेल्या धान्याच्या कोठारांवर यांची नेमणूक झालेली होती. या लोकांनीं पंचवार्षिक योजनेच्या बाबतींत जर कोणतें काम केलें असेल तर हें कीं, त्यांनीं अन्नामध्यें दूषित रसायन द्रव्यें मिसळलीं व पिठाच्या साठ्यांतूनही कांचेची पूड घुसडून दिली. कोर्टापुढें या सर्व गोष्टी जेव्हां पुराव्यानें सिद्ध झाल्या त्या वेळीं या लोकांच्याविरुद्ध जनतेंत भयंकर क्षोभ उत्पन्न झाला.

अशा प्रकारचे गुन्हे ज्या वेळीं एकामागून एक भराभर उघडकीला येऊं लागले त्या वेळीं उद्योगधंद्यांतील नेतृत्वाच्या सुधारणेसंबंधानें स्टॅलिननें पुढील

उद्गार काढले: “ अधिकार गाजविण्याची इच्छा, कागदी घोडे नाचविण्याची संवय, प्रत्यक्ष नेतृत्व तर नाहींच; उलट, नेतृत्वाच्या ‘तत्त्वांची’ वायफळ बडबड, वैयक्तिक जबाबदारीचा अभाव, तसेंच प्रत्यक्ष कामामध्यें व्यक्तिमत्वाचा दिसून येणारा अभाव, सर्वांना सारखीच मजुरी देण्याची हौस, प्रत्यक्ष कार्य काय घडलें यासंबंधींच्या पद्धतशीर चौकशीचा अभाव आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आत्मपरीक्षण करण्याचें भय, याच गोष्टी आजच्या आमच्या सर्व अडचणींच्या मुळाशीं आहेत.”

या विघ्नसंतोषी गटांनीं पंचवार्षिक योजना हाणून पाडण्याकरतां अनेकविध विघ्नें उपस्थित केलीं. पण अखिल जनतेकडून ओढल्या जाणाऱ्या पंचवार्षिक योजनेच्या जगन्नाथ-रथाच्या प्रचंड चाकांखालीं तीं सर्व चिरडून गेलीं. मात्र या विरोधी गटांच्या या उपद्व्यापामुळें एक चांगला परिणाम झाला: आपल्यांतील उणीवा शोधून काढून आत्मपरीक्षण करण्याची बोलशेव्हिकांची प्रवृत्ति या विघ्नकर्त्यांच्या अनेकविध उपद्व्यापांनीं वाढीस लागली. देशांतील सर्व महत्त्वाचे मोठे कारखाने आपल्या ताब्यांत घेऊन ते चोख चालवावयाचे तर त्याकरतां लागणारे यंत्रशास्त्रज्ञ आपल्या विश्वासांतले पाहिजेत. ते उच्च हेतूनें प्रेरित झालेले असले पाहिजेत. सोव्हिएट सरकार ज्या ध्येयसिद्धीकरतां झटत आहे त्याची स्पष्ट कल्पना असलेले असे तज्ज्ञ लोक पाहिजेत अशी जाणीव बोलशेव्हिकांना होऊं लागली व स्टॅलिननें “ यंत्र-शास्त्रांतील प्रावीण्य खुद्द बोलशेव्हिकांनीं हस्तगत केल्याशिवाय आपल्या कोणत्याही औद्योगीकरणाच्या योजना यशस्वी व्हावयाच्या नाहींत.” असें जाहीर रीतीनें सांगितलें. क्रांतीच्या प्रसंगीं, आपसांतील युद्धाच्या वेळीं बोलशेव्हिक तरुण लष्करी शिक्षण घेऊन लाल फौजांत धडाडीनें घुसले व तेथलें नेतृत्व त्यांनीं स्वीकारलें. आतां समाजवादी औद्योगीकरणाकरतां यंत्रविद्येंत निपुण असलेल्या विश्वासू ध्येयनिष्ठ तरुणांची आवश्यकता भासूं लागली. त्या वेळीं हजारों तरुण बोलशेव्हिक हें प्रावीण्य संपादण्याकरतां पुढें आले. विशेष हें कीं, हेच शास्त्रज्ञ व यंत्रविद्या-विशारद तरुण पुढील दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या वेळीं सामुदायिक शेतीच्या कार्यक्रमाच्या वेळीं पार्टीला उपयोगी पडले.

पांच वर्षांची योजना चार वर्षांत पुरी झाली यावरूनच ती सोव्हिएट यूनियनमध्यें किती लोकप्रिय व किती हितावह झाली होती, हें कळण्यासारखें

आहे. सर्व उद्योगधंद्यांचे आंकडे देऊन तें सिद्ध करण्याचें कारण नाहीं. सर्व जगांतील भांडवलशाही राष्ट्रांना जी गोष्ट साध्य होणें शक्य नाहीं ती सोव्हिएट युनियननें शक्यतेच्या कोटींत आणून सोडली. समाजांतील प्रत्येक व्यक्तीला काम देण्याचें आपलें ब्रीदवाक्य सोव्हिएट सरकारनें पुरें केलें. सोव्हिएट यूनियनमध्यें बेकारी ही भूतकालांतील एक भिकार आठवण या रूपांत शिल्लक राहिली. या चार वर्षांत कामगार लोकांची संख्या शें. ४० या प्रमाणांत वाढली व कामगारांच्या मजुरीची रक्कम आठ अब्जांपासून तीस अब्जांपर्यंत वाढली. उद्योगधंद्यांचीं शहरें व खेडेगांवें यांच्यांतील लोकांची राहणी वगैरे-बाबतची सर्व प्रकारची तफावत अजीबात नष्ट करण्यांत आली.

उद्योगधंदा व शेतकी यांचें नातें जमविण्यांत आलें व यामुळें १९२८ सालचें राष्ट्रीय पैदाशीचें ४० टक्के असलेलें प्रमाण १९३२ सालीं ७० टक्के या प्रमाणांत वाढलें. प्रचंड कारखाने हे समाजवादाच्या पाठीच्या कण्याच्या जागीं आहेत असें लेनिनचें मत आहे. असे कारखाने १०० टक्क्यांनीं वाढलें. ज्या मालाकरतां झारच्या रशियाला युरोपांतील देशांवर अवलंबून राहावें लागत होतें त्या उद्योगधंद्याच्या सर्व शाखा सोव्हिएट यूनियनमध्यें काढण्यांत आल्या. मोटारी, वाफेचे नांगर, शेतीची यंत्रसामुग्री प्रचंड प्रमाणावर बनविण्याचे कारखाने अमेरिकेंतील फोर्डच्या कारखान्याबरहुकूम काढण्यांत आले. या कारखान्यांना लागणारी यंत्रशक्ति निप्रोस्टॉय व मॅगनी टोगॉर्स्क येथें प्रचंड प्रमाणावर विद्युतशक्ति निर्माण करणारे कारखाने काढून पुरविण्यांत आली. भांडवलशाही जगांतील कारखाने भलत्याच ठिकाणीं कोठें तरी निघत असतात. त्यांच्यामागें कोणतीही योजना नसते. फक्त कांहीं लोकांची अचाट नफा मिळविण्याची इच्छा मात्र त्यांच्यामागें असते. सोव्हिएट यूनियनमध्यें तसें होणें शक्यच नव्हतें. ज्या ठिकाणीं भरपूर कच्चा माल व वाहतुकीचीं साधनें त्याच ठिकाणीं पक्का माल तयार करण्याचे कारखाने काढण्यांत आले. उदाहरणार्थ जेथें भरपूर कापूस निर्माण होईल व जेथून थोड्या अंतरावर व थोड्या वेळांत त्याच्यापासून होणाऱ्या कापडाची वाटणी करण्यांत येईल, अशाच सोइस्कर ठिकाणीं कापडाच्या गिरण्या काढण्यांत आल्या.

निरनिराळ्या परस्परसंबंध असलेल्या कारखान्यांचें केंद्रीकरण करण्याकरतां या अवकाशांत साडे सात लाख वस्तीचीं पन्नास शहरें निर्माण करण्यांत आलीं.

आपल्या प्रिय कॉ. स्टॅलिनचें नांव चिरंतन राखण्यासाठीं या शहरांपैकीं पुष्कळ शहरांना स्टॅलिनो, स्टॅलिनाबाद, स्टॅलिन्स्क, स्टॅलिनिस्सी, स्टॅलिनिर, स्टॅलिनोगोर्स्क, स्टॅलिनग्राड, स्टॅलिन-औल याप्रमाणें स्टॅलिन या नांवाला जेवढे प्रत्यय लावतां येतील तेवढे लावून नांवें देण्यांत आलीं. या पहिल्या पंचवार्षिक योजनेनें स्टॅलिनच्या चरित्रांत एक मोठी क्रांति घडवून आणली. सोव्हिएट यूनियनच्या प्रजासत्ताक राष्ट्रांत तो अत्यंत लोकप्रिय बनला, इतकेंच नव्हे तर जगांतील प्रसिद्ध व्यक्तींत त्याची गणना होऊं लागली व त्याच्या वचनांचा आधार आपापली बाजू मांडण्याकरितां लोक घेऊं लागले.

स्टॅलिन हा कोणी मोठा वक्ता नाहीं किंवा खंदा लेखक नाहीं. त्याचें भाषण व लेखन सुशिक्षित पाश्चात्य माणसाला ओबडधोबड व भाषाशैलीरहित असें वाटतें. पण सोव्हिएट यूनियनमधील जनतेला एका साध्या, सरळ व सात्त्विक वृत्तीच्या माणसाचें जसे सडेतोड व निःस्पृह भाषण असावें तसेंच तें वाटतें. कॉ. स्टॅलिन भाषण करतांना किंवा लिहितांना व्याकरणाकडे लक्ष देतों कीं नाहीं व मार्मिक शब्दयोजना करतों कीं नाहीं, इकडे कोणी पाहत नाहीं. पंचवार्षिक योजनेसंबंधानें स्टॅलिननें जे पुढील जाहीर उद्गार काढले त्यावरून त्याच्या योजनेची सफलता ज्याप्रमाणें नजरेस पडते त्याप्रमाणेंच जातां जातां त्याच्या भाषासरणीचीही कल्पना आल्याशिवाय राहत नाहीं.

" पूर्वीं आमच्याजवळ लोखंडाचे व पोलादाचे कारखाने नव्हते आतां ते आमच्यापाशीं आहेत."

" आमच्याजवळ वाफेचे नांगर तयार करण्याचे कारखाने नव्हते आतां ते आहेत."

" आमच्याजवळ मोटारी तयार करण्याचे कारखाने नव्हते आतां ते आहेत."

" एंजिनियरिंगचे कारखाने नव्हते आतां ते आहेत."

" महत्त्वाची व अर्वाचीन रासायनिक द्रव्यें तयार करण्याचे कारखाने नव्हते ते आतां आहेत."

" अर्वाचीन सुधारलेलीं शेतीचीं यंत्रें तयार करणारे कारखाने नव्हते ते आतां आहेत."

" विमानें तयार करण्याचे कारखाने नव्हते ते आतां आहेत."

" विद्युच्छक्ति तयार करण्याच्या बाबतींत आमचा नंबर सर्वांत अखेरचा होता. आतां तो पहिला आहे."

" फक्त युक्रेनमध्येंच काय ती कोळशाची व खनिज द्रव्याची खाण होती व तीही आम्हांला नीट चालवितां येत नव्हती. आतां या खाणीच्या कामांत आम्हीं सुधारणा केली आहे इतकेंच नाहीं, तर पूर्वेच्या बाजूस आम्हीं आणखी एक दुसरें खाणीचें काम सुरू केलें आहे. आमच्या देशाला अभिमान वाटेल असें हें काम आहे."

" देशाच्या उत्तरेच्या बाजूस कापडाच्या गिरणीचें एकच एक केंद्र आमच्यापाशीं होतें. आतां लवकरच मध्य आशियांत एक व सैबेरियांत एक अशीं दोन केंद्रें आम्हांला उभारतां येतील."

" आणि याप्रमाणें मोठ्या प्रमाणावर नवीन कारखाने आम्हीं उभारले आहेत. पण ते इतक्या प्रचंड व अवाढव्य प्रमाणावर उभारले आहेत कीं, युरोपांतील कारखाने त्यांच्यापुढें कांहींच नव्हेत असे फिके पडतील."

पंचवार्षिक योजनेच्या कालांत देशाचें औद्योगीकरण किती झपाट्यानें झालें, कामगारवर्गानें या कामांत किती उत्साहानें भाग घेतला ही गोष्ट स्टॅलिनच्या वरील उद्‌गारांवरून लक्षांत येण्यासारखी आहे. पण या योजनेच्या कालांत कामगार जसे पुढें आले त्याचप्रमाणें शेतकरीही अहमहमिकेनें या योजनेंतील सामुदायिक शेतीचा कार्यक्रम पुरा पाडण्याकरतां पुढें आले.

क्रांतीनंतर व आपसांतील युद्धानंतर जमीनदारवर्गाचा नायनाट होऊन ज्या जमिनी सोव्हिएट सरकारच्या मालकीच्या झाल्या होत्या त्यांवर सामुदायिक शेतीचा प्रयोग प्रथम सुरू करण्यांत आला. या सरकारी सामुदायिक शेतांतून अर्थात् ट्रॅक्टरांचें (वाफेच्या नांगरांचें) व शेतीच्या इतर यंत्रांचें काम चाले. हीं कामें रशियांतील शेतकऱ्यांना अगदीं नवीं होतीं व तीं पाहून " आपणही सामुदायिक शेतींत भाग घेऊं" असें ते आपल्या मनाशीं ठरवीत. सामुदायिक शेतीच्या बाबतींत कोणावर जुलूम करतां कामा नये. शेतकरीजनतेचें मन वळवूनच या शेतीची वाढ करावी, असें स्टॅलिननें या वेळीं आपलें धोरण जाहीर केलें होतें. आणि त्याबरोबरच या शेतीच्या वाढीच्या बाबतींत कुलकवर्गाचा जो जोराचा विरोध चालू होता तो नाहींसा करण्याकरतां, सबंध कुलकवर्गच नष्ट करण्याच्या कामास त्यानें निष्ठुरपणें हात घातला होता.

क्रांतीनंतर युद्धसाम्यवादाची पद्धति सुरू झाली व त्यानंतर नवीन आर्थिक धोरणाला सुरुवात झाली. युद्धसाम्यवादपद्धतीमुळें कुलकवर्गांचा फारसा फायदा झाला नसला तरी नव्या आर्थिक धोरणाचा या वर्गानें भरपूर फायदा घेतला व खेड्यांपाड्यांतील सामान्य शेतकऱ्यांना दडपून टाकणारा असा हा एक डोईजड मध्यम शेतकरीवर्ग अस्तित्वांत आला. सामुदायिक शेतीची योजना या वर्गाला अर्थातच मानवणारी नव्हती. या वर्गाचे लोक कधीं उघडपणें तर कधीं गुप्तपणें या प्रयोगाला अडथळा करतात, असें आढळून येतांच सोव्हिएट सरकारनें त्यांना कोर्टापुढें खेंचून व योग्य त्या शिक्षा देऊन त्यांचें खेड्यांपाड्यांतील वर्चस्व नष्ट केलें. पंचवार्षिक योजनेतील औद्योगीकरणाच्या बाबतींत विरोधी गटांनीं केलेला अडथळा बराचसा वैयक्तिक होता. पण या सामुदायिक पद्धतीला या वर्गानें सामुदायिकपणें विरोध केला त्यामुळें तो मोडून काढणें सोव्हिएट सरकारला बरेंच जड गेलें. याकरितां शेंकडों कुटुंबांना हद्दपारीच्या शिक्षा देऊन त्यांना सैबेरियांत पाठवावें लागलें.

पण एवढ्यानें भागणारें नव्हतें. कुलकांच्या या वर्गाचें समूळ उच्चाटण केल्याशिवाय सामुदायिक शेतीचा कार्यक्रम भरगच्चपणें पार पाडतां येणार नाहीं, असेंच जेव्हां दिसूं लागलें, त्या वेळीं या वर्गाचें अस्तित्व मुळांतच नष्ट करण्याकरतां जमिनी खंडानें देणें व मजुरीनें शेतांवर कामाकरतां माणसें लावणें कायद्यानें रद्द करण्यांत आलें. कुलकांच्या मालकीच्या जमिनी काढून घेण्याला जी मनाई होती ती रद्द करण्यांत आली. सामुदायिक शेतीच्या फायद्याकरतां कुलकांचीं जनावरें, शेतींचीं औतें व इतर मालमत्ता शेतकऱ्यांनीं ताब्यांत घेण्याचें ठरविल्यास त्यांना तशी परवानगी देण्यांत आली. १९१८ सालीं भांडवलवाल्यांची मालमत्ता ताब्यांत घेऊन सरकारनें सर्व कारखाने आपल्या मालकीचे केले. त्याप्रमाणें आतांही कुलकांची मालमत्ता सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली. फरक एवढाच केला कीं, कुलकांचीं उत्पादनसाधनें सरकारनें आपल्या मालकीचीं न बनवितां सामुदायिक शेतींत एकजूट झालेल्या शेतकऱ्यांच्या मालकीचीं बनविलीं.

सोव्हिएट सरकारच्या या सर्व धोरणाचा भांडवलशाही राष्ट्रांतील वर्तमानपत्रांनीं निषेध करून त्याविरुद्ध बराच गवगवा केला. पण त्याकडे लक्ष देण्यास स्टॅलिनला सवड नव्हती. पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाच्या मार्गांत आलेले-

अडथळे दूर करण्याच्या कामीं त्याचें अंतःकरण पोलादाहूनही कठीण बनलें होतें. समाजवादी पद्धतीवर प्रचंड कारखाने सुरू करून व सामुदायिक पद्धतीवर शेती चालवून कामकरी-शेतकरीवर्गांची एकजूट करण्याकडे व सोव्हिएट यूनियनमधील समाजवादी नव्या क्रांतिमय संस्कृतीचा पाया दृढ करण्याकडे त्यांचें लक्ष वेधलें होतें.

: वर्ग या नात्यानें कुलकांचें उच्चाटन करण्याच्या व मोठ्या प्रमाणावर जमिनी एकत्र करण्याच्या धोरणामुळें सामुदायिक शेतीची चळवळ जोरानें सुरू झाली. सबंध खेड्यांचे व सबंध जिल्ह्यांचे शेतकरी सामुदायिक शेतींत सामील झाले व आपल्या आड येणाऱ्या कुलकांना हुसकावून लावून त्यांची गुलामगिरी त्यांनीं झुगारून दिली. वर्ग या नात्यानें कुलकांचें उच्चाटन कां करण्यांत आलें व शेतीचें सामुदायीकरण खंबीर बनण्याकरतां शेतकऱ्यांनीं केलेल्या जनतांदोलनाचे काय परिणाम झाले याचा खुलासा स्टॅलिननें १९२९ च्या अखेरीस लिहिलेल्या एका लेखांत पुढीलप्रमाणें केला आहे : “ सोव्हिएट यूनियनमध्यें भांडवलशाहीची पुनरपि स्थापना करण्याच्या स्वप्नांत दंग असलेल्या जगांतील भांडवलवाल्यांची शेवटची आशा म्हणजे ‘खाजगी मालमत्तेचें पवित्र तत्त्व.’ पण हें तत्त्व आतां सोव्हिएट यूनियनमध्यें कोलमडून पडत आहे व नष्ट होत आहे. शेतकरी म्हणजे भांडवलशाहीची जमीन खतविणारें खतच होय, असे हे लोक मानीत होते पण ते प्रचंड समुदायांत एक होऊन खासगी मालमत्तेचा वाखाणलेला झेंडा फेंकून देत आहेत व सामुदायीकरणाचा म्हणजे समाजवादाचा मार्ग स्वीकारीत आहेत. भांडवलशाहीचा रशियांत जीर्णोद्धार करण्याची शेवटची आशा आता भंग पावून नष्ट होऊं लागली आहे.”

सामुदायिक शेतसंस्था स्वेच्छेनें अस्तित्वांत आल्या पाहिजेत, असें स्टॅलिनचें स्पष्ट मत होतें व पार्टीनेंही तेंच धोरण ठरविलें होतें. पण या धोरणाचें उल्लंघन करण्यांत आलें. कित्येक ठिकाणीं शेतकऱ्यांना त्यांची मालमत्ता हिरावून घेण्याची किंवा त्यांचा मताधिकार काढून घेण्याची किंवा अशीच दुसरी धमकी देऊन जबरदस्तीनें सामुदायिक शेतींत सामील करून घेण्यांत आलें. सामुदायिक शेतीच्या चळवळीचें मुख्य स्वरूप “ आर्टेल ” म्हणजे फक्त मुख्य उत्पादन-साधनेंच तेवढीं सामुदायिक मालकीचीं करावयाचीं असें मध्यवर्ती कमिटीनें ठरविलें असतांही तिकडे दुर्लक्ष करून कांहीं कार्यकर्त्यांनीं शेतकऱ्यांचीं

खासगी घरें, दुभतीं जनावरें, शेळ्या, कोंबड्या वगैरे सुद्धां सार्वजनिक मालकीच्या केल्या. याप्रमाणें सामुदायिक शेतीच्या कार्याला धोका आणणाऱ्या पार्टीच्या धोरणाच्या विपर्यासाचीं चिन्हें जेव्हां नजरेस येऊं लागलीं त्या वेळीं मध्यवर्ती कमिटीच्या ठरावास अनुसरून स्टॅलिनचा "विजयाची धुंदी" हा लेख प्रसिद्ध करण्यांत आला. सामुदायिक कृषीकरणाच्या विजयामुळें धुंद होऊन ज्यांनीं ढोबळ चुका केल्या होत्या पार्टीचें धोरण सोडलें होतें व सामुदायिक शेतींत शेतकऱ्यांना जबरदस्तीनें सामील करून घेण्याचा प्रयत्न केला होता त्यांना या लेखांत इशारा देण्यांत आला होता. सामुदायिक शेतीचे गट स्वेच्छेनें अस्तित्वांत आले पाहिजेत. सामुदायिक कृषीकरणाचा वेग व मार्ग ठरवितांना सोव्हिएट यूनियनमधील निरनिराळ्या टापूंची विविध परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे वगैरे गोष्टींवर या लेखांत जोर देण्यांत आला होता. सामुदायिक शेतीच्या चळवळीचें मुख्य स्वरूप 'आर्टेल' हें आहे. या शेतींत फक्त प्रमुख उत्पादनसाधनेंच सामुदायिक मालकीचीं करावयाचीं असतात. प्रत्येक कुटुंबाच्या वापराचीं जमीन, घरें, दुभतीं जनावरें, कोंबड्या वगैरे सामुदायिक मालकीचीं करावयाचीं नसतात या मुद्द्यावर स्टॅलिननें या लेखांत विशेष जोर दिला होता.

स्टॅलिनचा हा लेख राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा होता. पार्टींतील कांहीं लोकांच्या चुकीच्या धोरणाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना सोव्हिएट सरकारविरुद्ध उठाव करण्यास चिथवूं पाहणाऱ्या सोव्हिएट-शत्रूंना या लेखामुळें जबरदस्त धक्का बसला. हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं "सामुदायिक शेतींत काम करणाऱ्या कॉम्रेड्सना उत्तर" असा आणखी एक लेख स्टॅलिननें लिहिला. सामुदायिक शेताच्या चळवळींतील वरील चुकांचें दिग्दर्शन पुन्हा या लेखांत करून त्यापासून सावध राहण्याबद्दल स्टॅलिननें या लेखांत सुचविलें होतें.

१९३० च्या मार्च व एप्रिलमध्यें हे लेख प्रसिद्ध झाले व जूनच्या शेवटच्या आठवड्यांत पार्टीची सोळावी कॉंग्रेस भरली. "आपल्या देशाचें शेतीप्रधान देशांतून औद्योगिक देशांत रूपांतर होण्याची वेळ जवळ आली आहे, असें स्टॅलिननें या कॉंग्रेसमध्यें जाहीर केलें व "आपल्या उद्योगधंद्याचा वेग कमी केला पाहिजे, असें म्हणणारे लोक समाजसत्तावादाचे शत्रु आहेत, आपल्या वर्ग-शत्रूंचे हस्तक आहेत." असेंही त्यानें या वेळीं सांगितलें.

या कॉंग्रेसच्या सुमारास सामुदायिक शेतीखालीं तीन कोटी साठ लक्ष हेक्टर जमीन लागवडीला होती. सोव्हिएट यूनिअनमधील शेतकरीसमाजापैकीं शें.४० ते ५० कुटुंबें सामुदायिक शेतींत सामील झालीं होतीं, बाजारांत विक्रीसाठीं येणारा सामुदायिक शेतीचा माल तीन वर्षांत ४० पटीनें वाढला. १९३० सालीं बाजारांत आलेल्या धान्यापैकीं निम्में धान्य सामुदायिक शेतींतील होतें.

याप्रमाणें सोव्हिएट यूनियनमधील शेतीच्या धंद्यांत सामुदायिक शेतीनें महत्त्वाची क्रांति घडवून आणली होती. ही क्रांति कोणत्या स्वरूपाची होती हें स्टॅलिननें तुफानी कामगारांच्या पहिल्या अखिल यूनियन कॉंग्रेसमध्यें काढलेल्या पुढील उद्‌गारांवरून स्पष्ट होण्याजोगें आहे. "जुन्या पद्धतींत शेतकरी अलग अलग काम करीत. बापजाद्यांपासून चालत आलेल्या जुन्या-पुराण्या पद्धतींचाच ते अवलंब करीत, जुनीं-पुराणीं औतें वापरीत, जमीनदारांसाठीं, भांडवलवाल्यांसाठीं, कुलकांसाठीं, नफेबाजांसाठीं ते काम करीत. ते दुसऱ्यांना श्रीमंत करीत व स्वतः दरिद्री राहत. नव्या सामुदायिक शेतींत शेतकरी सहकार्यानें काम करतात. ट्रॅक्टर वगैरे आधुनिक यंत्रसामुग्रीचा उपयोग करतात. स्वतःसाठीं व सामुदायिक शेतीसाठींच ते श्रम करतात. जमीनदार, भांडवलवाले, कुलक व नफेबाज यांच्याशिवाय ते जिवंत राहतात. आपली राहणी अधिक उच्च दर्जाची व सुखसोयीची करण्याच्या हेतूनें व आपल्या संस्कृतीची दिवसेंदिवस वाढ करण्याच्या हेतूनेंच ते काम करतात."

सामुदायिक शेतीमुळें शेतकरी सर्व प्रकारच्या गुलामगिरींतून मुक्त झाला तरी तो अधिक संपन्न व सुखी व्हावयाचा असल्यास, या शेतकऱ्यांनीं 'सामुदायिक शेतांतून प्रामाणिकपणें काम केलें पाहिजे, गुरांचा योग्य उपयोग केला पाहिजे, जमिनींची योग्य लागवड केली पाहिजे व सामुदायिक शेतांच्या मालमत्तेचें रक्षण केलें पाहिजे, अशा सूचनाही स्टॅलिननें या वेळीं केल्या. या सूचना म्हणजे सामुदायिक शेतीचा कार्यक्रमच बनल्या.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील सामुदायिक शेतीचा कार्यक्रम यशाच्या शिगेला कसा पोंचला, याचीं लक्षणें १९३४ च्या अखेरीसच दिसूं लागलीं. सोव्हिएट यूनियनमधील सर्व शेतकरी कुटुंबांपैकीं एकूण तीनचतुर्थांश कुटुंबें सामुदायिक शेतींत सामील झालीं. लागवडीच्या एकूण जमिनीपैकीं शें. ९० जमिनीवर सामुदायिक शेती सुरू झाली. याप्रमाणें सामुदायिक शेती यशस्वी

झाल्यामुळें धान्याची व इतर मालाची पैदास मुबलक प्रमाणांत झाली. रेशनिंग किंवा जरूरीच्या पदार्थांच्या विक्रीवरील निर्बंध चालू ठेवण्याचें आतां कांहींच कारण राहिलें नाहीं. "पांच वर्षांची योजना चार वर्षांत" या ईर्षेनें देशांतील शेतकरी-कामकरी जनता पडेल तें काम करीत होती. आपण किती वेळ काम करतों व आपल्याला किती मजुरी मिळते याचा विचारही ती करीत नव्हती, म्हणून ही पांच वर्षांची योजना सव्वाचार वर्षांतच पूर्ण झाल्याचें १९३३ च्या आरंभीं आढळून आलें. योजनेच्या आरंभीच्या काळांत कामगारजनतेनें ती पार पाडण्याच्या कामीं जीवाचें रान केलें होतें, पण ही परिस्थिति फार दिवस टिकली नाहीं. केवळ मालाची मोठ्या प्रमाणावर पैदास व प्रचंड कारखान्यांची उभारणी एवढेंच एक ध्येय सोव्हिएट सरकारपुढें नव्हतें; तर या भरभराटी-बरोबरच कामाचे तास कमी करणें, मजूरीचे दर वाढविणें व शेतकरी-कामकरी-जनतेची परिस्थिति सर्व बाजूंनीं सुधारणें, बेकारी निखालस नष्ट करणें या गोष्टीं-चाही या योजनेंत अंतर्भाव झाला होता, हें पार्टीच्या मध्यवर्ती कमिटीच्या १९३३ च्या आरंभीं भरलेल्या सभेंत वाचून दाखविलेल्या पुढील आशयाच्या रिपोर्टावरून स्पष्ट होण्याजोगें आहे.

"सोव्हिएट यूनियन शेतीप्रधान देश होता तो आतां औद्योगिक देश बनला. उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतून भांडवलवाल्यांचें उच्चाटन झालें. समाजसत्तावादी अर्थ-व्यवस्था ही एकमेव अर्थव्यवस्था बनली. शेतीच्या क्षेत्रांत कुलकांचें वर्ग या नात्यानें उच्चाटन झालें. सामुदायिक शेतीच्या पद्धतीमुळें खेड्यांतील दारिद्य नाहींसें झालें. करोडो गरीब शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या निश्चितपणा प्राप्त झाला. उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतील समाजसत्तावादी पद्धतीमुळें बेकारी नष्ट झाली. कांहीं धंद्यांत आठ तासांचा दिवस कायम ठेवण्यांत आला; पण बहुतेक सर्व कारखान्यांत सात तासांचा दिवस सुरू करण्यांत आला आणि आरोग्य-दृष्ट्या अपायकारक असलेल्या धंद्यांत तर सहा तासांचा दिवस सुरू करण्यांत आला. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या सर्व शाखांत समाजसत्तावादाचा विजय झाल्या-मुळें पिळणुकीचें पूर्ण उच्चाटन झालें.

पहिल्या पंचवार्षिक योजनेनें सोव्हिएट यूनियनच्या सर्वांगीण सुधारणेचा याप्रमाणें पाया रचला. दुसरी पंचवार्षिक योजना पार पाडून या सुधारणेवर

कळस चढविण्याचें कार्य स्टॅलिनला करावयाचें होतें. या योजनेची पुढील रूपरेषा पार्टीच्या सतराव्या काँग्रेसपुढें मांडण्यांत आली :—

"भांडवलशाहीच्या बीजाचें संपूर्ण उच्चाटन करणें, आर्थिक जीवनांत व माणसाच्या विचारसरणींत भांडवलशाहीचे जे अवशेष राहिले आहेत ते नाहींसे करणें, आधुनिक यंत्रांच्या आधारें सबंध राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणें, शेतीचें यांत्रिकीकरण करणें व शेतीची उत्पादनक्षमता वाढविणें." दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा हा मुख्य कार्यक्रम होता.

ही योजना पार पाडण्याच्या कामीं पहिल्या योजनेप्रमाणेंच अनेक विघ्नें आलीं. पहिल्या योजनेच्या वेळींच सोव्हिएट यूनियनची ही वाढती समाजवादी भरभराट पाहून भोंवतालच्या भांडवलशाही राष्ट्रांचें पोट दुखत होतें. आतां ही दुसरी योजना पुढें आली तेव्हां अनेक कारस्थानें रचून ती योजना हाणून पाडण्याचा त्यांनीं जोराचा प्रयत्न केला. सोव्हिएट यूनियनमध्यें आपले हेर पाठविले, मोडतोड करणाऱ्या टोळ्या संघटित केल्या, याच्याही पुढें जाऊन सोव्हिएट यूनियनमधील बोलशेव्हिक पार्टीविरोधी लोकांचें साहाय्य घेऊन दहशतवादाचाही त्यांनीं अवलंब केला. सतराव्या पार्टी काँग्रेसमध्यें एका बाजूला पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या विजयाचें गुणगान गायिलें जात असतांना दुसऱ्या योजनेची नांदी होत होती तर त्याच वेळीं दुसरीकडे सोव्हिएट यूनियनमधील कामगारांचा अत्यंत लोकप्रिय व बोल्शेव्हिक पार्टीचा एक प्रमुख कर्तबगार पुढारी एस्. किरोव्ह याच्या खुनाची तयारी चालली होती आणि दुःखाची गोष्ट ही कीं, दहशतवाद्यांना या बाबतींत यश आलें. लेनिनग्राड येथें स्मालनी इमारतींत त्याच्यावर रिव्हॉल्व्हर झाडून त्याला ठार करण्यांत आलें. सोव्हिएट यूनियनमध्यें अधिकारारूढ असलेल्या पार्टीविरुद्ध लढणारे लोक तिचा पराभव करण्याकरतां युरोपांत वाढत चाललेल्या फॅसिझमच्या आहारीं जातील, अशी कल्पनाही करणें शक्य नव्हतें. पण प्रत्यक्ष पुराव्यानें या लोकांनीं सोव्हिएट यूनियनमधील बोल्शेव्हिक पार्टीला हाणून पाडण्याकरतां फॅसिस्टांशीं संगनमत केलें व किरोव्हच्या खुनालाही ते कारणीभूत झाले, असें दिसून आलें. पण बोलशेव्हिक पार्टींतील बहादूर पुढाऱ्यांनीं या विरोधालाही यशस्वी रीतीनें तोंड दिलें. जसजशीं संकटें यावीं तसतसें क्रांतिवाल्या सोव्हिएटांचें सामर्थ्य वाढावें व संकटें जितकीं भयानक तितकें या सोव्हिएटांचें सामर्थ्यही

संघटित व परिणामकारक व्हावें असाच रशियांतील क्रांतीनंतरच्या दहा पंधरा वर्षांतील अनुभव होता.

कॉ. किरोव्हच्या खुनांत सामील झालेल्या निमकहराम क्रांतिद्रोही लोकांना सोव्हिएट सरकारनें कडक शासनें केलीं आणि या खुनापासून बोध घेऊन व पार्टींतील घाण काढून तिला आणखी शुद्ध व क्रांतिनिष्ठ बनविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. सोव्हिएट यूनियनमधील क्रांतिवाल्या पक्षानें हातांत माती धरली तरी त्याचें सोनें होत होतें. याचें मुख्य कारण पार्टीनें वेळोवेळीं स्वीकारलेलें वरील आत्मशुद्धीचें धोरण होतें.

भांडवलशाही जगावर दर तीन वर्षांनीं एकामागून एक आर्थिक अरिष्टें येत होतीं तर सोव्हिएट यूनियनमध्यें याच कालांत उद्योगधंद्याची व शेतीची सारखी भरभराट होत होती. १९३७ च्या मध्याच्या सुमारास जागतिक भांडवलदारी उद्योगधंद्याचें एकंदर उत्पादन १९२९ च्या उत्पादनाच्या शें. ९५-९६ टक्क्यांइतकें जेमतेम पोंचलें होतें आणि १९३७ च्या उत्तरार्धांत तर हे उद्योगधंदे आर्थिक अरिष्टांच्याही भोंवऱ्यांत सांपडले. परंतु इकडे पहावें तर सोव्हिएट यूनियनमधील उद्योगधंद्यांची सारखी जोरानें वाढ होत होती. १९३७ च्या अखेरीस त्याचें उत्पादन १९२९ च्या उत्पादनाच्या शें. ४२८ टक्क्याइतकें झालें किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ते या आठ वर्षांत चार पटीनें वाढलें आणि युद्ध-पूर्व उत्पादनाच्या दृष्टीनें तर ते सातपटीहून अधिक झालें. या गोष्टीचा साहजिकच असा परिणाम झाला कीं, उद्योगधंद्याची दुसरी पंचवार्षिक योजना ठरलेल्या वेळेपूर्वींच म्हणजे चार वर्षें ७ महिने (ता. १ एप्रिल १९३७ रोजीं) पूर्ण झाली.

या योजनेच्या कालांत सामुदायिक कृषीकरण जवळ जवळ पूर्ण झालें होतें. वैयक्तिक शेतकऱ्यांच्या एकंदर कुटुंबांपैकीं शें. ९३ कुटुंबें म्हणजे एकूण एक कोटि पंचेचाळीस लक्ष कुटुंबें १९३७ च्या सुमारास सामुदायिक शेतींत सामील झालीं होतीं. सामुदायिक शेतीच्या धान्यशेतीचें क्षेत्रफळ शेतकऱ्या-च्या वैयक्तिक धान्यशेतीच्या एकूण क्षेत्रफळाच्या शें. ९९ इतकें झालें होतें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत कामगारांचा व कचेऱ्यांतील नोकरांचा त्यांच्या पदरांत खराखुरा पडणारा पगार दुप्पटीहून अधिक झाला. १९३३ सालीं एकंदर पगाराची रक्कम ३४ अब्ज रुबल होती ती १९३७ सालीं ८१ अब्ज

रुबल झाली. सरकारी सामाजिक विम्याची रक्कम त्याच काळांत ४६० कोटी रुबलवरून ६६० कोटी रुबल झाली. कामगारांचा व कचेऱ्यांतील नोकरांचा सरकारी विमा, घरांची सुधारणा, सांस्कृतिक सोयी, विश्रांतिमंदिरें, आरोग्य-मंदिरें, औषधपाण्याची सोय वगैरेसाठीं १९३७ या एका वर्षांतच १० अब्ज रुबल खर्च करण्यांत आले.

जनतेच्या सुखसोयींत वाढ होत असलेली लक्षांत घेऊन १९३६ सालीं सोव्हिएट सरकारनें गर्भपातप्रतिबंधक कायदा पास केला व त्याच वेळीं प्रसूतिगृहें, शिशुमंदिरें, दूध पुरविण्याचीं केंद्रें व बालोद्यान शाळा स्थापन केल्या. पार्टीच्या जनरल सेक्रेटरीनें, स्टॅलिननें, क्रांतीनंतर सोव्हिएट यूनियनमध्यें विवाहविषयक जे सढळ कायदे करण्यांत आले होते त्याबद्दल १९३२ सालींच नापसंती दर्शविली होती. "पोस्ट कार्ड घटस्फोटांचें" प्रमाण अतोनात वाढत चाललें होतें व घटस्फोटित जोडप्यांपासून झालेल्या मुलांची जोपासना करण्याकरितां या जोडप्यांपासून किती रक्कम घ्यावयाची याच्या चौकशीच्या कामांनीं कोर्टें भरून गेलीं होतीं. स्त्रियांना व पुरुषांना विवाहाच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य दिल्यानंतर व जनतेच्या सर्व प्रकारच्या सुखसोयींची काळजी घेतल्यानंतर स्त्री-पुरुषसंबंधांना स्थिरता प्राप्त होण्यास कांहींच हरकत नाहीं; हें लक्षांत घेऊन स्टॅलिननें स्वतः होऊन पार्टीच्या राजकीय मंडळाचें मन वळविलें व विवाहविषयक कायदे अधिक निर्बंधात्मक करण्याचें ठरविलें. गर्भपाताला सर्रास मोकळीक होती ती बंद करून त्याच्यावर कायद्यानें निर्बंध घालण्यांत आले व त्याबरोबरच प्रसूतिगृहें, शिशुमंदिरें सर्वत्र स्थापून असल्या मुलांच्या जोपासनेची व शिक्षणाची व्यवस्था करण्यांत आली.

सर्व जनतेला साक्षर करून सोडण्याचाही एक मोठा कार्यक्रम या दोन्ही योजनांतून आंखण्यांत आला होता व तो पूर्णपणें यशस्वीही झाला. झारच्या रशियांत शिक्षणाचें प्रमाण शें. ९६ निरक्षर व अवघे शें. ४ साक्षर असें होतें. या योजनांच्या कालांत याच्या अगदीं उलट प्रमाण झालें, सोव्हिएट यूनियन-मध्यें निरक्षर माणूस म्हणून ठेवावयाचा नाहीं, असा चंगच बोल्शेव्हिक पार्टीच्या लोकांनीं बांधला होता. रशियांतील क्रांति स्थिर व दृढ करावयाची असल्यास त्यांतील अखिल जनता साक्षर व जागी झाली पाहिजे असें स्टॅलिनचें म्हणणें होतें. सार्वत्रिक व सक्तीचें शिक्षण करून मुलांच्या शिक्षणा-

ची सर्व जबाबदारी सोव्हिएट सरकारनें आपल्या शिरावर घेतली. सबंध देशभर शाळांचीं जाळीं पसरण्यांत आलीं, यामुळें विद्यार्थ्यांची संस्था भराभर वाढली. प्राथमिक व दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या १९१४ सालीं ८० लक्ष होती ती १९३६ सालीं म्हणजे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें काम चालू असतांना २ कोटी ८० लक्ष झाली व युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांची संख्या तर १ लक्ष १२ हजारांवरून ५ लक्ष ४२ हजारांवर गेली. पंचवार्षिक योजना केवळ समाजवादी औद्योगीकरणाकरतांच नव्हत्या तर शिक्षण, आरोग्य, करमणूक वगैरे संस्कृतिवर्धनाच्याही अनेक बाबींचा त्यांत समावेश करण्यांत आला.

समाजवादी क्रांतीचा देश उद्योगधंद्याच्या दृष्टीनें जगाच्या कोणत्याही देशाच्या मागें नाहीं, एवढेंच नव्हे तर संस्कृतीच्या दृष्टीनेंही तो कोणाच्या मागें नाहीं, उलट खरेखुरें जनतेचें सरकार म्हणजे कामगार-शेतकऱ्यांचें राज्य स्थापून एका नवीनच उच्च संस्कृतीची प्रस्थापना सोव्हिएट यूनियनमधील राष्ट्रांतून करण्यांत आली आहे, हें सिद्ध करून दाखवावयाचें व तें अवघ्या दहा वर्षांत करावयाचें अशा उच्च महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन स्टॅलिनप्रभृति बोलशेव्हिक पुढाऱ्यांनीं या योजना ठरलेल्या दहा वर्षांच्याही आंत पूर्ण विजयी करून दाखविल्या होत्या.

स्टॅलिनच्या चरित्रांतील अत्यंत महत्त्वाचा भाग असलेल्या या दोन पंच-वार्षिक योजनांसंबंधीचें हें प्रकरण संपविण्यापूर्वी या योजना यशस्वी करून दाखविण्याच्या कामीं ज्या तुफानी कामगारांनीं अत्यंत प्रशंसनीय व महत्त्वाची कामगिरी केली त्यांना विसरून चालावयाचें नाहीं. या योजना पूर्ण करण्या-करतां देशांतील अखिल जनता अहमहमिकेनें कामाला लागल्या होत्या. आपण किती तास काम करतों, आपण मजुरी किती मिळवतों, आपण खातों काय, राहतों कुठें याचा विचारही या योजनेच्या पाठीमागें लागलेले कामकरी-शेतकरी करीत नव्हते हें मागेंच दिग्दर्शित केलें आहे. योजना पार पाडण्या-करतां हाडाचीं काडें करणें एवढेंच फक्त या कामगार-शेतकऱ्यांना माहीत होतें. बाकीचा विचार करण्यास त्यांना वेळ नव्हता. तो विचार सोव्हिएट सरकार करीत होतें. खरी वस्तुस्थिति अगदीं अशीच होती. आपलें रोजचें नेहमींचें याच योजनेंतील काम संपवून राहिलेला वेळ पुन्हा या कामीं खर्ची

घालण्यास हजारों कामगार तयार झालें होते व नीपरच्या प्रचंड विद्युत्पादक-धरणाच्या कामावर हजारोंनीं हे मजूर कामही करीत होते.

यापेक्षांही आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे थोडक्या वेळांत व थोडक्या यंत्रसामुग्रीनें व शक्तीनें कामाचा प्रचंड उठाव करण्याच्या ईर्षेच्याही मागें हजारों कामगार लागले होते. या योजनांच्या वेळीं असल्या तुफानी वेगानें काम करणाऱ्या कामगारांना "तुफानी कामगार" अशी संज्ञा मिळाली. या कामगारांपैकीं स्टाखानोव्ह नांवाच्या एका कामगारानें जुजबी यंत्रसामुग्रीच्या साह्यानें तितक्याच वेळांत तिप्पट कोळसा खाणींतून काढून दाखविला व कामाच्या तुफानी वेगाच्या व प्रमाणाच्या बाबतींत उच्चांक गांठला. सोव्हिएट सरकारतर्फे खुद्द स्टॅलिननें याबद्दल त्याचा गौरव केला. तेव्हांपासून या तुफानी कामगारांना स्टाखानोव्हिस्ट या नांवानें लोक संबोधूं लागले.

हे कामगार सांगकामे तर कधींच नव्हते. आपल्यापुढें जी यंत्रसामुग्री असेल त्यांतच कांहीं नवीन युक्ति काढून व नवीन सुधारणा करून त्याची उत्पादनशक्ति वाढविण्याचा व थोडक्या वेळांत नेहमींपेक्षां दुपटीतिपटीनें कामाचा उठाव कसा करतां येईल याचा विचार ते करीत असत. याकरितां या तुफानी कामगारांच्या वेळोवेळीं सभा भरून असल्या युक्त्यांचा व शोधांचा त्यांतून सांगोपांग ऊहापोह होत असे. क्रांति यशस्वी करण्याला व अंतर्युद्धांत विजयी झालेल्या लाल सैनिकांना सोव्हिएट यूनियनमध्यें जितकें महत्त्व होतें तितकेंच, किंबहुना जास्त महत्त्व पंचवार्षिक योजनांच्या कालांत या तुफानी कामगारांना देण्यांत येत होतें. लाल फौजेप्रमाणें या तुफानी कामगारांची संघटनाही सोव्हिएट यूनियनमधील जनतेची आवडती संघटना बनली होती. याच कालांत या तुफानी कामगारांची म्हणजे स्टाखानोव्हिस्टांची अखिल यूनियन परिषद भरली. स्टॅलिन या परिषदेला मुद्दाम हजर होता. या परिषदेंत तुफानी कामगारांनीं वेळोवेळीं व निरनिराळ्या उद्योगधंद्यांतून लावलेल्या शोधांचा व कल्पिलेल्या युक्त्यांचा विचार झाला. स्टॅलिननें या अपूर्व कामगिरी-बद्दल त्यांचा गौरव केला. या वेळीं रशियांतील क्रांतीच्या सामर्थ्याचें व अजिंक्यपणाचें रहस्य सांगतांना स्टॅलिननें जे उद्गार काढले ते वाचकांना सादर करून हें प्रकरण संपवितों.

"आमची कामगारक्रांति ही जगांतील अशा प्रकारची एकमेव क्रांति

आहे कीं, जिला केवळ राजकीय दृष्ट्याच नव्हे तर भौतिक सुखसोयींच्या बाबतींत सुद्धां जनतेचा फायदा करून देण्याची संधि मिळाली. कामगारांच्या ज्या सर्व क्रांत्या झाल्या त्यांपैकीं अशी एकच क्रांति आम्हांला माहीत आहे कीं, जिच्या हातीं सत्ता येऊं शकली व ती पॅरिस कम्यून. पण तें पॅरिस कम्यून फार वेळ टिकलें नाहीं. भांडवलशाहीच्या बेड्या तोडण्याचा त्यानें प्रयत्न केला पण त्या पूर्णपणें तोडण्यासाठीं त्याला पुरेसा वेळ मिळाला नाहीं आणि त्यापेक्षांही भौतिक सुखसोयींच्या दृष्टीनें क्रांतीपासून होणारा फायदा जनतेला दाखवून देण्यास त्यास मुळींच वेळ मिळाला नाहीं. आमची क्रांति ही अशी एकच क्रांति आहे कीं, जिनें भांडवलशाहीच्या बेड्या तर तोडल्याच व शिवाय जनतेला स्वातंत्र्य दिलें. आणि याच्या भरतीला जनतेचें जीवन सुबत्तेचें व सुखमय करणारी भौतिक परिस्थिति निर्माण करण्यांत यश मिळविलें. आमच्या क्रांतीच्या सामर्थ्याचें व अजिंक्यपणाचें रहस्य हेंच आहे."

# विजयाचा संदेश १२

१९१७ च्या ऑक्टोबर-क्रांतीनंतर राज्यसत्ता हातीं आल्याबरोबर लेनिन-स्टॅलिनप्रभृति बोलशेव्हिक पुढाऱ्यांनीं पहिली महत्त्वाची कोणती गोष्ट केली असेल तर ती झारच्या साम्राज्यांतील सर्व गुलाम राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा हक्क दिला ही होय. अर्थात् साम्राज्यांतून अलग होण्याचा हक्कही त्यांना या स्वयं-निर्णयाच्या जाहीरनाम्यानें बहाल केला होता. लेखणीच्या एका फटकाऱ्या-सरशीं रशियांतील शेतकरी-कामकरी सरकारनें साम्राज्यशाहीची परंपरा मोडून टाकली. परकी सत्तेच्या जोखडाखालीं असलेल्या राष्ट्रांना स्वतंत्र करून सोडलें. फिनलंड, इस्थोनिया, लटव्हिया, लिथुआनिया, पोलंड इ. राष्ट्रें स्वतंत्र झालीं.

क्रांतीची दृढ पायावर प्रस्थापना करण्याकरतां व समाजवादी रचनात्मक कार्यक्रम पुरा करण्याकरतां क्रांतिवाल्या पुढाऱ्यांना स्वस्थपणा पाहिजे होता पण त्यांना तो लाभला नाहीं. अंतर्युद्धानें त्यांचे सर्व बेत ढांसळून टाकले. समाजवादी औद्योगीकरणाच्या अनेक योजना लेनिननें आंखल्या होत्या पण त्याच्या हयातींत रशियाभोंवतालच्या साम्राज्यवादी राष्ट्रांनीं त्याला चैन पडूं दिलें नाहीं. अंतर्युद्धांत पुन्हा तावूनसुलाखून निघाल्यानंतर माल मिळालेली शांतता कायम टिकविण्याकरतां स्टॅलिननें आपलें शांततेचें परराष्ट्रीय धोरण जाहीर केलें व आपल्याप्रमाणेंच ज्यांना शांततेची व स्वस्थतेची आवश्यकता आहे, अशा राष्ट्रांशीं सलोख्याचे करार करण्याचें त्यानें ठरविलें.

जगांतील भांडवलशाही राष्ट्रांचे दोन प्रकार स्टॅलिननें आपल्या मनाशीं ठरविले होते. एक शांतताप्रिय व दुसरे युद्धाची खुमखुम असलेले. व्हर्सायच्या तहाप्रमाणें ज्यांना वसाहती हबकायला सांपडल्या होत्या त्यांना शांततेची जरूरी होती व १९१४ च्या महायुद्धांत पराभूत होऊन आपलें सर्व कांहीं गमावून बसलेलीं, व्हर्सायचा करार रद्द करण्याची मागणी करणारीं राष्ट्रें जारीनें युद्धाच्या तयारीला लागलीं होतीं. शांततेची इच्छा करणारीं ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका हीं प्रमुख राष्ट्रें होतीं. तसेंच व्हर्सायच्या तहामुळें निर्माण झालेल्या

झेकोस्लाव्हेकिया, जुगोस्लाविया, पोलंड, व बाल्कन संघांतील राष्ट्रांना शांततेची अत्यंत जरूरी होती. यांच्याविरुद्ध जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया, जपान हीं राष्ट्रं युद्धाचा चंग बांधून उभीं होतीं. इटलीची गणना यांत नव्हती. कधीं ब्रिटनला तहाच्या गोड थापा द्याव्या तर कधीं जर्मनीच्या कटांत सामील होण्याची त्याला लालूच दाखवावी, अशा लफंगेगिरीचे डाव इटलीचे मुत्सद्दी खेळत होते. व्हर्साय करार रद्द करण्याची मागणी करणें म्हणजे युद्धाला आव्हान देण्यासारखेंच होतें. तेव्हां शांतता पाहिजे असेल तर जर्मनी, ऑस्ट्रिया इत्यादि राष्ट्रांशीं संगनमत करून चालणार कसें? ही गोष्ट लक्षांत घेऊनच स्टॅलिननें ब्रिटन, फ्रान्स वगैरे शांततेची अपेक्षा करणाऱ्या राष्ट्रांशीं सलोखा करण्याचें ठरविलें. स्टॅलिन आपल्याशीं संगनमत करूं पाहतो तेव्हां त्याच्या मुळाशीं खोल डावपेंचाचें राजकारण असलें पाहिजे असा संशय या राष्ट्रांतील भांडवलवाल्यांकडून प्रकट होऊं लागला त्या वेळीं त्याची संशयनिवृत्ति होण्याकरतां त्यानें प्रथम कम्यूनिस्ट इंटरनॅशनल या सर्व जगांत क्रांति घडवूं इच्छिणाऱ्या कम्यूनिस्टांच्या आंतरराष्ट्रीय संस्थेला वरील शांतताप्रिय राष्ट्रांतून क्रांतीचा प्रचार थोडा सौम्य शब्दांत व सौम्य वेगानें करावा व युद्धाचें ठाण मांडून रशियाच्या रचनात्मक कार्यक्रमांत विघ्न आणूं पाहणाऱ्या जर्मनी, ऑस्ट्रिया वगैरे राष्ट्रांतील भांडवलशाहीवर मात्र जोराचे हल्ले चढवून क्रांतीच्या प्रचाराचा धोशा उडवावा, अशा सूचना दिल्या.

स्टॅलिनच्या या धोरणाबद्दल कम्यूनिस्ट जहाल क्रांतिवाल्यांनीं त्याच्यावर टीकेचा भडिमार केला पण त्यानें तिची पर्वा केली नाहीं. समाजवादी औद्योगीकरणाच्या बाबतींतील वामपक्षीय जहाल कम्यूनिस्टांच्या विरोधाला ज्याप्रमाणें त्यानें दाद दिली नाहीं त्याचप्रमाणें याही बाबतींत कोणत्याही विरोधाला न जुमानतां युरोपांतील शांतताप्रिय राष्ट्रांशीं सलोख्यानें वागण्याचें धोरण त्यानें कायम ठेवलें. फॅसिस्ट राष्ट्रांविरुद्ध सामुदायिक सुरक्षिततेचें धोरण अमलांत आणण्याकरतां आपलें सर्व वजन खर्ची घालण्याचें त्यानें ठरविलें. व १९३२ मध्यें पोलंड व रुमानिया या राष्ट्रांशीं अनतिक्रमणाचा (Non-Aggression) करार करून या नवीन धोरणाचा पाया घातला.

नाझी पक्षानें जर्मनीचीं राज्यसूत्रें १९३३ सालीं हातीं घेतलीं त्या वेळीं रशियाच्या या एकजुटीच्या आघाडीचें महत्त्व शांतताप्रिय राष्ट्रांना कळूं लागलें.

जर्मनींतील नाझी पक्षानें व्हर्साय कराराविरुद्ध व त्याचबरोबर बोलशेव्हिकां-विरुद्धही जोराचा प्रचार सुरू केला. ब्रिटन, फ्रान्स वगैरे दोस्त राष्ट्रांनाहि नाझी जर्मनी युद्धाच्या धमक्या देऊं लागला. यामुळें फ्रान्स तर घाबरूनच गेलें. सोव्हिएट यूनियनची त्यानें मदत मागितली. फ्रँको-सोव्हिएट परस्परसाहाय्यक कराराच्या मुळाशीं फ्रान्सला वाटणारी ही भीतीच होती. फ्रान्सशीं याप्रमाणें करार झाल्यानंतर सोव्हिएट यूनियननें १९३४ मध्यें राष्ट्रसंघांत प्रवेश करून घेतला व त्याच्याद्वारें सामुदायिक सुरक्षिततेच्या चळवळीचा जोरानें पुरस्कार केला. युरोपांतील राष्ट्रसंघ हा एक "चोरांचा संघ" आहे असें लेनिननें एका प्रसंगीं म्हटलें होतें पण नाझी व फॅसिस्ट दरवडेखोरांपेक्षां राष्ट्रसंघांतलि थोड्याशा सभ्य चोरांशीं संगनमत करणें अधिक हिताचें आहे असें स्टॅलिननें जाहीर रीतीनें सांगितलें.

१९२२ सालीं भरलेल्या जागतिक आर्थिक परिषदेंत सोव्हिएट यूनियनचा प्रतिनिधि चिचरेन यानें शस्त्रसामुग्रीवर नियंत्रण घालण्याची सूचना आणली होती. यानंतर मॉस्को येथें अशाच प्रकारची एक परिषद झाली. पण निःशस्त्री-करणाचे हे दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले. कारण कोणतींही राष्ट्रें या धोरणाला अनुकूल नव्हतीं. पुढें १९२७ सालीं लिटव्हिनॉव्हनें खुष्की, नाविक व वैमानिक शस्त्रसामुग्रीवर नियंत्रण घालण्यासंबंधाची एक सुघटित सूचना मांडली पण तिचीही वरीलप्रमाणेंच वाट लागली. १९२९ सालीं सबंध जगावर आलेल्या आर्थिक अरिष्टाच्या वेळीं आंतराष्ट्रीय परिस्थितींत क्रांति घडून आली. इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांना या आर्थिक अरिष्टांपासून संरक्षण करून घेण्याकरतां वसा-हती होत्या पण जर्मनी, जपान व इटली वगैरे राष्ट्रांना तसा कांहीं आधार नव्हता. अशा परिस्थितींत इटलीनें अबिसीनियावर स्वारी केली. जपाननें चीनवर स्वारी केली व जर्मनीनेंही आपलें आक्रमणाचें धोरण जाहीर केलें. या परिस्थितींत शस्त्रनियंत्रणाचें व निःशस्त्रीकरणाचें चिचरेन व लिटव्हिनॉव्ह यांनीं प्रतिपादिलेलें धोरण स्टॅलिननें सोडून देण्याचें ठरविलें.

नाझी जर्मनीचा सोव्हिएट यूनियनवर कित्येक दिवसांचा डोळा होता. "ऊरल पर्वतांतील अपरंपार खनिज द्रव्यें व कच्चा माल, सैबेरियांतील अवाढव्य जंगलें व युक्रेनमधील प्रचंड प्रमाणावर पसरलेलीं गव्हाचीं रानें माझ्याजवळ असतीं तर विपुलतेच्या सागरांत मी पोहत राहिलों असतों" असें हिटलरनें आपल्या

आत्मचरित्रांत लिहिलें आहे. यानंतर जर्मनीनें ऱ्हाइनलँडमधील आपल्या लष्कराची पुनर्रचना केली, ऑस्ट्रियावर कबजा केला, सुडेटन व त्यानंतर सबंध झेकोस्लावेकिया ताब्यांत घेतला. अशा वेळीं नाझी व फॅसिस्ट युद्धोत्सुक राष्ट्रांपासून आपलें रक्षण करावयाचें असल्यास युरोपांतील सर्व लोकशाही राष्ट्रांनीं सामुदायिक सुरक्षिततेचें व एकजुटीच्या अघाडीचें धोरण स्वीकारलें पाहिजे, असें स्टॅलिननें जाहीर केलें. फ्रेंच परराष्ट्रीय प्रधानाला मॉस्को येथें बोलावून आपली योजना त्याच्यापुढें मांडली व एकजुटीच्या अघाडीकरतां फ्रान्सची तयारी असेल तर फ्रान्समधील कम्यूनिस्ट फ्रेंच सरकारशीं या बाबतींत सलोखा करतील, असें आश्वासन दिलें.

सर्व जगांत क्रांत्या घडवून आणण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे कम्यूनिस्ट एकजुटीच्या अघाडींत सामील होण्यास तयार झाले, हें पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटलें व या धोरणाच्या मुळाशीं स्टॅलिन आहे ही गोष्ट अमेरिकेंतील स्क्रिप्स-हॉवर्ड न्यूजपेपर सिंडिकेटचा प्रमुख डायरेक्टर रॉय हावर्ड यानें घेतलेल्या स्टॅलिनच्याच मुलाखतींत बाहेर आली. रशियाच्या या नव्या धोरणाच्या मुळाशीं काय हेतु आहेत हें समजून घेण्याकरतांच केवळ रॉय हावर्ड मॉस्कोला आला होता. स्टॅलिननें त्याचें एकाद्या मित्राप्रमाणें स्वागत केलें व या एकजुटीच्या अघाडीच्या मुळाशीं खरीं कारणें काय आहेत हें त्यानें अगदीं मोकळेपणानें सांगितलें, हें पाहून हावर्ड आश्चर्यानें थक्कच झाला. इतर राष्ट्रांतून क्रांतीची निर्गत करून तिची जोपासना करण्याची आपली जुनी कल्पना रशियानें सोडून दिली म्हणायची! असें या अमेरिकनानें सूचित केलें त्या वेळीं स्टॅलिन हंसला, "आमची अशी कधींच कल्पना नव्हती" तो म्हणाला, "इतर निर्गतमाला-प्रमाणें परदेशांत क्रांतीची निर्गत करण्याची कल्पना मूर्खपणाची आहे. प्रत्येक देश त्याची इच्छा असेल तर स्वतःच क्रांति घडवून आणील. तशी इच्छा नसेल तर क्रांति होणार नाहीं. आपल्याभोंवतालच्या राष्ट्रांतील समाजपद्धतींत सक्तीनें बदल घडवून आणण्याची सोव्हिएट यूनियनची इच्छा आहे, असें तुम्हांला वाटत असेल तर ती तुमची चूक आहे. या मुद्द्यावर दुःखपर्यवसायी गैरसमज बाहेर पसरला आहे, असें आश्चर्यचकित झालेला हॉवर्ड उत्तरला. त्या वेळीं "तो केवळ दुःखपर्यवसायी नाहीं तर आनंद-दुःखपर्यवसायी आहे" असें सांगून स्टॅलिननें फ्रेंच क्रांतिकारक रॉबेस्पेरी याच्या पुढील उद्गाराचा दाखला

दिला. "आपले कायदे व राज्यपद्धति स्वीकारण्यास दुसऱ्या राष्ट्रांना भाग पाडण्याकरतां तेथें शस्त्रास्त्रें घेऊन प्रवेश केला म्हणजे झालें, असें जर कोणा राजकीय मुत्सद्द्याला वाटत असेल तर ती एक अगदीं रानटी कल्पना आहे. सशस्त्र मिशनऱ्यावर कोणीही प्रेम करीत नाहीं."

१९३४ सालीं सोव्हिएट यूनियननें राष्ट्रसंघांत प्रवेश केला तो ब्रिटन व फ्रान्स वगैरे राष्ट्रांनीं तशी इच्छा दर्शविली म्हणूनच केला होता. तेव्हां इटलीनें अबिसीनियावर स्वारी केल्याबरोबर त्याला राष्ट्रसंघांतून तावडतोब काढून टाकण्याबद्दल लिटव्हिनॉव्हनें मागणी केली. राष्ट्रसंघ या बाबतींत टाळाटाळ करूं लागला. तथापि १९३६ मध्यें सामुदायिक सुरक्षिततेच्या व लोक-अघाडी-च्या धोरणाला युरोपांत वाढता पाठिंबा मिळेल असें स्टॅलिनला वाटूं लागलें. या धोरणाचा पुरस्कर्ता म्हणून फ्रान्समध्यें लियों ब्लम अधिकारारूढ होण्याची चिन्हें दिसूं लागलीं. फ्रेंच कम्यूनिस्टांनीं त्याला पाठिंबा दिला. इंग्लंडमधील लहानशा कम्यूनिस्ट पार्टीनें युरोपमधील फॅसिस्ट आक्रमणाविरुद्ध चढाईची उपाययोजना करण्यांत आली पाहिजे, असा प्रचार चालविला होता. स्पेनमधील जिलरोबेल्सचें अर्धवट फॅसिस्ट सरकार नष्ट होऊन त्या ठिकाणीं सोशालिस्ट व कम्यूनिस्ट पार्टीच्या एकजुटीचें सरकार अधिकारारूढ झालें. पण ही परिस्थिति फार दिवस टिकली नाहीं. स्पेनमध्यें जनरल फ्रँकोनें स्पॅनिश सरकारविरुद्ध बंड उभारलें. युरोपांतील लोकशाही राष्ट्रांनीं स्पेनच्या दोन्ही पक्षांना लढण्यास मोकळे सोडून द्यावें कोणालाच मदत करूं नये असलें अलिप्तपणाचें धोरण जाहीर केलें. स्टॅलिनला या धोरणाबद्दल शंकाच वाटत होती तथापि त्यानें या अलिप्तपणाच्या कराराला आपली संमति दिली.

पण हा करार म्हणजे स्पेनपासून सोव्हिएट यूनियनला तेवढेंच अलग राखण्याचें धोरण आहे, असें १९३७ सालीं आढळून आलें. कारण हिटलर व मुसोलिनी करार मोडून उघडपणें जनरल फ्रँकोला मदत करीत होते आणि इंग्लंड व फ्रान्स बाजूला उभे राहून लढाईची मजा चाखीत होते. इतकें झालें तरी स्टॅलिननें राष्ट्रसंघानें ठरविलेल्या धोरणालाच चिकटून राहण्याचें ठरविलें. पण यापुढें आठवड्यामागून आठवडे जाऊं लागले व इंग्लंड व फ्रान्स केवळ सल्ल्या-शिवाय स्पेनच्या एकजुटीच्या संयुक्त सरकारला मदत करण्यास तयार नाहींत असें दिसलें त्या वेळीं स्टॅलिननें या बाबतींत खात्री करून घेऊन स्पेनमधील

एकजुटीच्या सरकारला आपल्या हातून होईल तेवढी मदत करण्याचें जाहीर केलें. पण जवळचीं जवळचीं फॅसिस्ट राष्ट्रें फ्रँकोला जितकी मदत करूं शकलीं तितकी मदत स्पेनपासून दूरवर असलेलें व वाहतुकीच्या साधनांची अडचण असलेलें सोव्हिएट सरकार स्पेनमधील लोकपक्षाला करूं शकलें नाहीं. स्पेनमधील या लोकपक्षांत पुढें फाटाफूट झाली, सोव्हिएट यूनियनकडून जो सल्ला व मदत मिळाली तिचाही उपयोग त्याला करतां आला नाहीं. ज. फ्रँकोच अखेर विजयी झाला व युरोपांतील फॅसिझमच्या राक्षसी पंजानें स्पेनला ग्रासून टाकलें तरी सुद्धां स्टॅलिननें स्पेनच्या बाबतींत जें धोरण स्वीकारलें त्यामुळें युरोपांतील श्रमजीवी वर्गांत स्टॅलिनसंबंधाचा आदर वृद्धिंगत झाला. स्पेनमधील जनतेला तर जें जें कांहीं रशियन त्याबद्दल पूज्यभाव व श्रद्धा वाटूं लागली.

विजयी ज. फ्रँको स्पेनचा सत्ताधीश झाला व त्याबरोबरच युरोपांतील सामुदायिक सुरक्षिततेच्या धोरणाचा अंत झाला. सोव्हिएट यूनियनच्या संमतीशिवाय चेंबरलेनप्रभृति ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं जर्मनीशीं केलेल्या म्यूनिक करारानें तर कळसच चढविला व सामुदायिक सुरक्षिततेच्या तत्त्वाला कायमचें गाडून टाकलें. जर्मनीशीं संगनमत करून युरोपांत शांतता राखण्याच्या या ब्रिटनच्या धोरणाचा स्टॅलिनला वीट तर आलाच होता पण त्यांतल्या त्यांत जमलें तर सोव्हिएट यूनियनचें व जर्मनीचें झुंज लावून स्वतः मजा पाहत बसण्याचें चेंबरलेनवृत्तीच्या ब्रिटनमधील पक्षाचें धोरण जेव्हां स्टॅलिनला दिसून आलें त्या वेळीं सोव्हिएट यूनियननें स्वतःच्या रक्षणाकरतां निराळाच मार्ग स्वीकारण्याचें ठरविलें.

झेकोस्लावेकियावर कबजा करून पोलंडवर चालून जाण्याचें जेव्हां जर्मनीनें ठरविलें त्या वेळीं एक जर्मनीबरोबर एकाकी लढण्यास तयार व्हावें किंवा दुसरें सोव्हिएट यूनियनच्या सरहद्दीला युद्धाचा संपर्क लागूं नये म्हणून आणखी कांहीं उपाय योजावा, असे दोनच मार्ग स्टॅलिनपुढें शिल्लक राहिले. स्वतःच्या अंगाला झळ लागूं न देतां दुसऱ्याच्या हातांचा उपयोग करून होळींतील खोबरें काढूं पाहणाऱ्या राष्ट्रांपासून सावध राहिलें पाहिजे, असें आपल्या बोल्शेव्हिक दोस्तांना वारंवार बजावणाऱ्या स्टॅलिननें अर्थात् दुसऱ्या मार्गाचा अवलंब केला व १९३९ सालीं जर्मनीशीं अनतिक्रमणाचा तह केला.

दोन्ही डगरींवर हात ठेवून वागणारीं इंग्लंड, फ्रान्स वगैरे लोकशाही राष्ट्रें कशींही वागोत त्यांचें नशीब त्यांच्याबरोबर! सोव्हिएट यूनियनचें रक्षण करावयाचें असेल तर त्या दुटप्पी वर्तन ठेवणाऱ्या राष्ट्रांच्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं, असें स्टॅलिननें ठरविलें व तेंच योग्य होतें.

जर्मनीशीं अनतिक्रमणाचा तह केला तरी आज ना उद्यां त्याच्याशीं आपल्याला दोन हात करावे लागणार ही गोष्ट स्टॅलिन पूर्णपणें जाणून होता. आपलें युद्धयंत्र मजबूत करून त्याला अजिंक्य बनविण्याची तयारी करण्याकरतां स्टॅलिनला फुरसत पाहिजे होती व या करारानें ती त्याला थोडी तरी का होईना मिळाली. लोकशाही राष्ट्रांनीं स्टॅलिनच्या या धोरणाबद्दल बराच गवगवा केला पण स्टॅलिन व हिटलर एकमेकांना पूर्णपणें ओळखून होते. पोलंड व बाल्टिक राष्ट्रांवर स्वारी करून व फिनलंडला ताळ्यावर आणून स्टॅलिननें सोव्हिएट यूनियनची सरहद्द मजबूत केली होती. यामुळें १९४१ च्या जून-मध्यें हिटलरनें रशियावर जी एकाएकीं चढाई केली त्याबद्दल स्टॅलिनला मुळींसुद्धां आश्चर्य वाटलें नाहीं किंवा धास्तीही वाटली नाहीं.

पण या सोव्हिएट-नाझी युद्धप्रसंगाचा विचार करण्यापूर्वीं सोव्हिएट यूनियनला फिनलंडशीं दोन हात कां करावें लागले, याबद्दल दोन शब्द सांगणें अगत्याचें आहे. फिनलंड झारच्या रशियांतील एक भाग म्हणून पूर्वींपासून गणला जात होता. बोलशेव्हिकांनीं झारच्या साम्राज्यांतील सर्व लहान-मोठ्या राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा हक्क बहाल केला व १९१८ च्या जानेवारींत फिनलंडला पूर्ण स्वतंत्र केलें. स्वातंत्र्याकरतां युद्ध न करतां पूर्ण स्वतंत्र झालेलें असें जगाच्या इतिहासांतील हें पहिलेंच राष्ट्र होतें.

फिनी लोक खरोखरीच कृतज्ञतेच्या भारानें दबून राहतील अशी लेनिनची कल्पना होती पण ती चुकीची ठरली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर फिन्लंडमध्यें प्रस्थापित झालेलें सोव्हिएट प्रजासत्ताक राज्य फारच थोडे दिवस टिकलें. स्वतःच्या घरांतील अडचणींना व संकटांना तोंड देतां देतां रशियांतील बोलशेव्हिकांना नाकीं नव आले होते. अशा परिस्थितींत फिन्लंडमधील आपल्या दोस्तांना त्यांना मिळालेलें पूर्ण स्वातंत्र्य रक्षण करण्याच्या कामीं मदत करणें त्यांना शक्य झालें नाहीं. फिनिश जमीनदारांनीं फॅसिस्ट जनरल मॅनरहीम याच्या नेतृत्वाखालीं आपली सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठीं जर्मनीची मदत

घेतली. जर्मनीनेंही ती त्यांना आनंदानें दिली. ज. व्हॉन द गोल्ट्झ आपल्या पलटणीसह फिन्लंडमध्यें दाखल झाला व तेथील कामगारसेनेचा पराभव करून पुन्हा जमीनदारांना फिन्लंडमध्यें आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठीं रान मोकळें करून दिलें.

ज. मॅनरहीमनें यानंतर फिन्लंडमधील बोलशेव्हिकांचें संकट पूर्णपणें नष्ट करण्याकरतां तेथील जहाल पक्षाचा पूर्ण निःपात करण्याचें ठरविलें. फिनिश सोव्हिएटांविरुद्ध सुरू केलेल्या मोहिमेंत पाडाव केलेल्या ३०,००० लोकांची त्यानें सरास कत्तल केली. कामगारांच्या घरांवर नांगर फिरविले व त्यांच्या बायकांमुलांना रस्त्यांतून भटकावयास लावलें. थंडीनें व उपासमारीनें हजारों बायकामुलें मरण पावलीं. सत्ताधीश या नात्यानें मॅनरहीमच्या पहिल्या कांहीं महिन्यांतील या कालाला "सफेत दहशतीचा काल" असें नांव मिळालें व खुद्द मॅनरहीमलाही 'कसाब' या नांवानें लोक ओळखूं लागले.

समाजसत्तावाद्यांविरुद्ध मॅनरहीमच्या पोटांत जळत असलेला राग एवढ्यानें शमला नाहीं. मॉस्को येथील लाल सरकार नष्ट केल्याशिवाय फिन्लंडला लागलेल्या लाल रोगापासून बचाव करण्याइतकी ताकद त्याच्या अंगांत येणार नाहीं, अशा जाणीवेनें फिन्लंडची सत्ता उरल पर्वतापर्यंत वाढली पाहिजे, अशी त्यानें घोषणा केली. सोव्हिएटांविरुद्ध लढण्यास तयार झालेल्या राष्ट्रांना तो मिळाला. सोव्हिएट सरहद्दीवर त्यानें मजबूत तटबंदी केली. लेनिनग्राडवर सुलभपणें हमला करतां येईल इतक्या अंतरावर त्यानें वैमानिक ठाणीं उभीं केलीं. फिन्लंडच्या या नीचपणाच्या कृतघ्नतेमुळें स्टॅलिनचा संताप हळूहळू वाढत होता पण आलंड बेटाच्या बाबतींत त्यानें स्वीकारलेलें स्वार्थीपणाचें धोरण पाहून तर त्याचा संताप अनावरच झाला. कारण रशियाला महासागरांत प्रवेश करावयाचा तर तो फक्त बाल्टिक समुद्रांतूनच काय तो करतां येत होता. आणि हीं आलंड बेटें याच्या प्रवेद्वारावर होतीं. या बेटांवर मूळ सत्ता रशियाची होती. १८५६ च्या पॅरिसच्या तहाअन्वयें या बेटांवर तटबंदी न करण्याचें रशियानें कबूल केलें. रशियन राज्यक्रांतीनंतर हीं बेटें फिनिश लोकांच्या हातीं गेलीं व फिन्लंडमध्यें आपली सत्ता प्रस्थापित झाल्याबरोबर सोव्हिएट आरमाराची गळचेपी करण्याकरतां मॅनरहीमनें हीं बेटें आपल्या ताब्यांत ठेवण्याचें ठरविलें. यापुढें या बेटांवर तटबंदी करण्याचा आपला हक्क आहे, असेंही तो

प्रतिपादूं लागला. पूर्व कॅरेलियांतील सोव्हिएट मुलखावरही आपला हक्क तो सांगूं लागला. १९३४ मध्यें त्यानें आपल्या मागण्यांना सुसंघटित स्वरूप दिलें. १९३५ सालीं जर्मनी, पोलंड व हंगेरी या राष्ट्रांशीं त्यानें बोलणीं सुरू केलीं व सोव्हिएट यूनियनविरुद्ध सर्वांनीं मिळून संयुक्त मोहीम करण्याचा त्यांना तो सल्ला देऊं लागला.

जर्मनी व युरोपांतील लोकशाही राष्ट्रें यांच्यांत महायुद्ध सुरू झालें त्या वेळीं आज ना उद्यां आपल्याला या झगड्यांत पडावें लागणार, ही गोष्ट स्टॅलिननें पूर्णपणें जाणली होती. फिन्लंडमधील मॅनरहीम सरकार म्हणजे सोव्हिएट यूनियनच्या मर्मावर घाव घालण्याला योग्य असें मर्मस्थलच बनलें होतें, याची पक्की जाणीव त्याला झाली होती. म्हणून महायुद्ध सुरू झाल्याबरोबर फिन्लंड-शीं मित्रत्वाचा तह करण्याबद्दल त्यानें बोलणें सुरू केलें. फिनी लोकांनीं आलंड बेटांवर तटबंदी करावी, कॅरेलियांतील मोठा हिस्सा आपल्या ताब्यांत घ्यावा व त्याच्या बदला लेनिनग्राड व मुर्मन्स्कच्या सरहद्दीवरील आणखी कांहीं मैलांचा टापू फिन्लंडनें आपल्या स्वाधीन करावा आणि याच्या भरतीला क्रॉन्स्टॅड्टच्या पलीकडील कांहीं लहान बेटें व फिन्लंडच्या सामुद्रधुनीच्या प्रवेशद्वारावर आरमारी ठाणें करण्याची परवानगी द्यावी. स्टॅलिनच्या या मागण्या अगदीं उदारपणाच्या होत्या. फिन्लंडपासून जितक्या मुलखाची त्यानें मागणी केली होती त्याच्या दुप्पट मुलूख फिन्लंडला देण्यास तो तयार झाला होता. युद्धजन्य परिस्थितीमुळें आपण ही मागणी करीत आहों. असेंही त्यानें या मागण्या पुढें मांडतांना सांगितलें होतें. पण मॅनरहीमनें या मागण्या धुडका-वून लावल्या. सोव्हिएट आपल्यावर जबरदस्ती करण्यास तयार आहे, असा कांगावा त्यानें सुरू केला व लवकरच सोव्हिएटांविरुद्ध त्यानें युद्धही पुकारलें. युरोपांतील बहुतेक सर्व देशांनीं व अमेरिकेनेंही फिनलंडला लढाई चालू ठेवण्याच्या कामीं मदत केली.

पहिल्या कांहीं महिन्यांत भांडवलशाही वर्तमानपत्रें फिनलंडच्या विजया-बद्दल स्तुतिस्तोत्रें गात होतीं. लाल फौजांच्या सेनापतीचा पराभव झाला, त्याची बेअब्रू झाली, लाल फौजेजवळ भरपूर सामुग्री नाहीं, ही फौज कुच-कामाची आहे व सोव्हिएटांचें वैमानिक दलही कुचकामाचें आहे, असा डांगोरा त्यांनीं पिटला. पण हें असें किती दिवस चालणार होतें? लाल फौजेनें

मॅनरहीमची तटबंदी ठिकठिकाणीं फोडून टाकली अशा बातम्या येऊं लागल्या व अखेर फिनिश लोकांनीं पराभव पावून आपल्या हातांतील शस्त्रें खालीं ठेवली ही बातमीही या पत्रांना द्यावी लागली. 'जेता' या नात्यानें स्टॅलिननें फिनलंडवर कडक शर्ती मुळींच लादल्या नाहींत. त्यानें प्रथम जेवढ्या मुलखाची मागणी केली होती तेवढाच त्यानें फिनलंडपासून घेतला व त्यांचें स्वातंत्र्य त्यांना पुन्हा बहाल केलें.

पण १९४१ सालीं जर्मनीनें सोव्हिएट यूनियनवर स्वारी केली त्या वेळीं फिनलंड बेइमानपणानें त्याला जाऊन मिळालें. आपला गेलेला मुलूख फिनलंडला मिळाला असला तरी सोव्हिएट यूनियनविरुद्ध त्यानें अद्यापि युद्ध चालू ठेवलेंच आहे.

२२ जून १९४१ रोजीं मध्यरात्रीं हिटलरनें सोव्हिएट यूनियनवर एकाएकीं हल्ला चढविला. दोनच वर्षांपूर्वी अनतिक्रमणाचा स्टॅलिनशीं केलेला करार मोडून हिटलरनें हा हल्ला चढविला होता. हिटलरचें हें कृत्य अत्यंत बेइमानीचें व विश्वासघाताचें होतें. हिटलरची ही स्वारी असामान्य स्वरूपाची होती. या चढाईची अघाडी बाल्टिकपासून काळ्या समुद्रापर्यंत १५०० मैल पसरली होती. फिनलंडशीं झालेल्या युद्धांत सोव्हिएट यूनियनला मिळावा तितका लवकर जय मिळाला नाहीं. या प्रसंगीं लाल फौजेच्या ज्या उणीवा उघडकीस आल्या त्यावरून बोलशेव्हिकांचा बोलतां बोलतां निःपात करूं अशा कल्पनेनें नाझींनीं सोव्हिएट यूनियनवर हा हल्ला चढविला होता. खुद्द सोव्हिएट यूनियनमध्येंही बोलशेविकविरोधी अनेक गुप्त कट आहेत व फाटाफूट आहे तेव्हां या स्टॅलिनविरोधी वातावरणाचाही आपलें उद्दिष्ट साध्य करणाच्या कामीं चांगला उपयोग करून घेतां येईल या कल्पनेनेंही हिटलरनें या चढाईला हात घातला होता. **चाळीस दिवसांत मॉस्को** या ईर्षेनें हिटलरनें हस्तगत युरोपांतील सर्व शक्ति एकवटून अतिशय आवेगानें हा हमला चढविला होता. पण स्टॅलिननें व त्याच्या लाल फौजेनें हिटलरच्या या समजुती चुकीच्या ठरविल्या व चाळीस दिवसच काय तर चाळीस महिने होत आले तरी मॉस्कोला त्याचा पाय लागूं दिला नाहीं व त्याची घमेंड कायमची जिरवली.

युरोपांतील सर्व शक्ति एकवटून सोव्हिएट यूनियनवर हल्ला चढविलेल्या

हिटलरनें एक दोन वर्षें कांहीं सोव्हिएट मुलूख काबीज करून त्यांत हवा तसा धुमाकूळ घालण्यांत यश मिळविलें. प्रत्येक उन्हाळयांत नाझींनीं हल्ल्यावर हल्ले चढवावे, सोव्हिएट प्रदेशांतील गांवामागें गांवें घेऊन चढाई करावी व हिंवाळ्याच्या दिवसांत सोव्हिएटांनीं नाझी फौजांना मागें रेटून हार खावयास लावावें असा प्रकार अवघा दोन वर्षें चालला पण तिसऱ्या वर्षीं म्हणजे १९४३ सालीं सर्व पारडें उलटें पालटें झालें. गेल्या हिंवाळयांत लाल फौजेनें जोराचे प्रतिहल्ले करून नाझींना शेंकडों मैल मागें रेटलें इतकेंच नव्हे तर हिंवाळा संपून उन्हाळा सुरू झाला तरी आपल्या सैन्याची व युद्धसामुग्रीची जमवाजमव करून पुन्हा चढाई करण्याइतकी फुरसतही लाल फौजांनीं नाझींना मिळूं दिली नाहीं. त्यांतल्या त्यांत संधि साधून व आपल्या चढाईच्या अघाडीचा प्रदेश कमी करून सोव्हिएटांवर निकराचा हल्ला चढविण्याचा निर्वाणीचा प्रयत्न हिटलरनें एक दोनदा करून पाहिला, पण त्यांतही त्याला यश आलें नाहीं. हिंवाळयांत तर नाहींच पण उन्हाळयांतही चढाई करण्याची ताकद नाझींच्या अंगीं आतां राहिली नसून या चढाईचा हल्ला लाल फौजा आतां यशस्वी रीतीनें करूं लागल्या आहेत, असें स्टॅलिननें गेल्या जुलैच्या चौथ्या आठवड्यांत जाहीर केलें आहे.

स्टॅलिनचा प्रचंड आत्मविश्वास व सोव्हिएट यूनियनमधील सर्व राष्ट्रांच्या जनतेची एकजुटीची इच्छाशक्ति फॅसिस्टांच्या दहशतवादी व अत्याचारी सैतानी शक्तींना यशस्वी रीतीनें तोंड देत आहेत. समाजसत्तेची पितृभूमि रक्षण करण्याकरतां एकजुटीच्या सामर्थ्यावर लढणाऱ्या सोव्हिएट भूमींतील जनतेला नामोहरम करण्यास नाझीच काय तर जगांतील कोणतीही शक्ति समर्थ राहिलेली नाहीं. गेल्या दोन वर्षांच्या यशस्वी प्रतिकारानें सोव्हिएट जनतेनें आपलें अलौकिक सामर्थ्य सर्व जगाच्या प्रतीतीस आणून सोडलें आहे. स्टॅलिनच्या विवेकपूर्ण, दूरदर्शी व एकनिष्ठ लेनिनवादी पुढारीपणा-खालीं व त्याच्या पोलादी शिस्तीखालीं जोपासलेलें सोव्हिएटांचें समाज-सत्तावादी सामर्थ्य नाझींना मागें हटवीत हटवीत त्यांच्या मुलखांत नेऊन घालील इतकेंच नव्हे, तर या अजिंक्य सामर्थ्यानें निर्माण केलेलें तेज केवळ नाझीहस्तगत युरोपांतीलच नव्हे तर खुद्द जर्मनींतीलही लष्करशाहीची, जुलमाची व पिळणुकीची रक्षा करून पूर्ण समतेच्या तत्त्वावर जगाची नवी उभारणी करण्याकरतां सबल क्रांतीचा उठाव करील, अशीं शुभ चिन्हें आज

दिसत आहेत. सोव्हिएटांच्या या अखेरच्या विजयासंबंधानें गेल्या वर्षी नोव्हेंबर ७ च्या रशियांतील क्रांतिदिनाच्या समारंभाच्या प्रसंगीं स्टॅलिननें जे पुढील महत्त्वाचे व प्रतीतीपूर्ण उद्गार काढले.

"मनुष्यशक्तीचें आमचें राखीव सामर्थ्य कधींसुद्धां खंडित न होणारें असें आहे. लेनिनचा आत्मा आमचा पाठीराखा असतां चढाई करून आलेल्या जर्मन गनीमांवर आम्ही विजय मिळवूं शकतों नव्हे तो आम्ही मिळवणारच, याबद्दल शंका घेणें तरी शक्य आहे काय ? जर्मन दहशतीनें आहाळलेले दुर्बल मनाचे बुद्धिमान् लोक आमच्या शत्रूच्या सामर्थ्याचें जें वर्णन करतात तितका तो मुळींच सामर्थ्यवान् नाहीं. आम्ही ही कल्पना नाकारूं शकतो. जर्मन फौजांची कोणी कितीही भरमसाट स्तुति करो, आमच्या लाल फौजांनीं या जर्मन फौजांना घाबरवून सोडून पळावयास लावलें आहे. जर्मनांची आज प्रत्यक्ष परिस्थिति काय आहे याचा जर कोणी विचार करील तर त्याला हें सहज आढळून येईल कीं, या लोकांना अत्यंत भयंकर संकटांना आज तोंड द्यावें लागत आहे. जर्मनींत आज सर्वत्र उपासमारीची व दैन्याची सत्ता बोकाळली आहे. अखिल जर्मन राष्ट्राचें रक्त आज वाहून चाललें आहे. जर्मनीनें हस्तगत केलेल्या राष्ट्रांतूनच नव्हे तर युद्धाचा शेवट दृष्टिपथांतसुद्धां न दिसल्यामुळें बेहोष झालेल्या जर्मनीच्या जनतेंतही क्रांतीचे वारे फैलावूं लागले आहेत. आणखी थोड्या महिन्यांत, आणखी अर्ध्या सालांत, फार तर आणखी एका सालांत हिटलरचा जर्मनी आपल्या गुन्ह्याच्या दडपणाखालीं चिरडून गेल्याशिवाय राहणार नाहीं."

सोव्हिएटांवर चालून आलेल्या जर्मन चढाईखोरांचा प्रचंड प्रमाणावर प्रतिकार करण्याचें श्रेय मुख्यतः स्टॅलिनलाच आहे. पण तसा अहंकार स्टॅलिनला कधींच शिवला नाहीं. या भाषणाच्या शेवटीं स्टॅलिननें जें एकच वाक्य उच्चारलें त्यांत त्याच्या मनांतली गूढ इच्छा व आपल्या जीवितहेतूसंबंधाची त्याची भावना प्रकट झाली आहे. तें वाक्य असें होतें—

**"लेनिनच्या निशाणाखालीं चला; आपण विजयी होऊं."**

# 'स्टॅलिनकरतां' व 'राष्ट्राकरतां' १३

" जनतेंत रहा नि अमर व्हा " ( Live in the people and be immortal ) हें वचन स्टॅलिनच्या बाबतींत किती सार्थ आहे बरें ! वयाच्या १५ व्या वर्षी स्टॅलिन कम्यूनिस्ट पार्टीला मिळाला व तेव्हांपासून अत्यंत एकनिष्ठपणें या एकाच पार्टींत राहून मार्क्स-लेनिनच्या कट्टर क्रांतिवादी तत्त्वज्ञानानुसार व धोरणानुसार त्यानें रशियांतील जनतेची सेवा केली. जनतेशीं समरस झालेलें किती हें उज्ज्वल जीवन! इतक्या या जवळ जवळ ५० वर्षांच्या जीवनांत स्टॅलिननें जनतेकरतां काय काय केलें नाहीं? या क्रांतिकार्याच्या विजयाकरतां त्यानें कोणते हाल सहन करण्याचे मागें ठेवले? जनतेच्या दैनंदिन किरकोळ मागण्यांकरतांच तो लढला व हे लढे लढतां लढतांच जनतेला योग्य पुढारीपण देऊन त्यानें कामगारक्रांतीची तयारी केली. क्रांतीच्या ऐनलढ्यांत त्याला भाग घेतां आला नाहीं तरी त्यानें घालून दिलेल्या धोरणानुसारच झालेल्या क्रांतींत सामील होऊन लेनिनच्या निशाणाखालीं त्यानें तिची जोपासना केली. लेनिनच्या निधनानंतर 'एका देशांत समाजसत्तावादी औद्योगीकरण' ही सर्वांना अशक्य वाटणारी गोष्ट त्यानें शक्य करून दाखविली. हें प्रचंड कार्य सुद्धां त्यानें अवघ्या दहा वर्षांच्या आंत करून दाखविलें. दहा वर्षांच्या आंत सर्व सामाजिक व औद्योगिक सुधारणांच्या बाबतींत अखिल जगाच्या पुढें धांव मारूं अशी स्टॅलिनची महत्त्वाकांक्षा होती व ती बहुतांशानें पुरीही झाली. उद्योगधंद्यांच्या व शेतीच्या क्षेत्रांत सर्व यूरोपला त्यानें मागें टाकलें व सोव्हिएट यूनियन अमेरिकेच्या तोडीला आणून बसविली. महायुद्ध आडवें आलें नसतें तर त्यानें अमेरिकेलाही मागें टाकलें असतें.

पण या दुसऱ्या महायुद्धांत लाल सेनेच्या क्षात्रतेजाची आणखी एकदां कसोटी लागावयाची होती. या प्रसंगीं सर्व जगाला भारी झालेल्या हिटलरशीं शर्थीचे दोन हात करून सो. यूनियनमधील शुद्ध लोकराज्याचें त्यानें रक्षण केलें इतकेंच नव्हे, तर नेहमीं चढाईची घमेंड मारणाऱ्या नाझींना पीछेहाट

करण्यासही त्यानें भाग पाडलें आहे. लाल फौज आज जी झपाट्यानें चढाई करीत आहे त्यावरून या युद्धांत नाझीशाहीचा पूर्ण निःपात करून सोव्हिएट यूनियन आपल्या दोस्तांसह पूर्ण विजयी होणार यांत शंका राहिलेली नाहीं. याप्रमाणें एकदांच नव्हे तर दोनदां भोंवतालच्या भांडवलशाही राष्ट्रांपासून सोव्हिएट यूनियनचें रक्षण करून व असामान्य औद्योगीकरणाच्या पायावर क्रांतीची दृढ स्थापना करून त्यानें लेनिनचें कार्य पुरें केलें आहे.

उद्योगधंदे व शेती यांच्या सुधारणांशिवाय शिक्षण, आरोग्य, संस्कृति-संवर्धन या बाबतींतही सुधारणा घडवून आणण्याकरतां भव्य व व्यापक प्रमाणावर योजना स्टॅलिननें आंखल्या व त्याही यशस्वी रीतीनें पार पाडून सर्व जगाकडून त्यानें धन्य धन्य म्हणवून घेतलें.

सोव्हिएट यूनियनच्या सामाजिक संसारांतील या सर्व परिवर्तनांमुळें तेथील जनतेच्या जीवनांतही ज्याप्रमाणें अपूर्व परिवर्तन घडून आलें त्याप्रमाणें सोव्हिएट यूनियनच्या राज्यघटनेंतही परिवर्तन होणें साहजिकच जरूर झालें. या नव्या घटनेचा मसुदा तयार करण्याकरतां स्टॅलिनच्याच अध्यक्षतेखालीं एक घटना-सुधारणा-कमिशन नेमण्यांत आलें. या मसुद्यासंबंधानें जनतेचें मत अजमावण्याकरतां तो प्रसिद्ध करण्यांत आला. तब्बल साडे पांच महिनेपर्यंत या मसुद्यावरील चर्चेनें सोव्हिएट यूनियनमधील सर्व राष्ट्रें निनादून गेलीं होतीं. सोव्हिएट यूनियनमधील असा एक कोपरा राहिला नव्हता कीं, जेथें यावर चर्चा झाली नाहीं. अखिल सोव्हिएट यूनियननें हा मसुदा मान्य करून त्याबद्दल आपली पसंती दर्शविली. सोव्हिएटांच्या जादा आठव्या कॉंग्रेसपुढें स्टॅलिननें या नव्या घटनेचें पृथक्करण करून तिचें महत्त्व कॉंग्रेसच्या निदर्शनास आणलें. सोव्हिएट यूनियनमध्यें झालेल्या समाजसत्तावादी विजयामुळेंच सार्वत्रिक समान व प्रत्यक्ष मतदानाच्या लोकशाहीच्या तत्त्वावर निवडणुकीच्या पद्धतीचा अवलंब करणें शक्य झालें आहे, असें स्टॅलिननें या कॉंग्रेसपुढें प्रतिपादन केलें.

समाजसत्तावादाच्या सर्व मुख्य तत्त्वांचा समावेश या घटनेंत केला आहे. **कामगार व शेतकरी जनतेच्या प्रतिनिधींचे सोव्हिएट हे यूनियनचे राजकीय घटक आहेत; उत्पादनसाधनाची समाजसत्तावादी मालकी हाच सोव्हिएट यूनियनचा आर्थिक पाया आहे.**

कामगार व शेतकरी असे परस्परांशीं मित्रत्वानें वागणारे असे दोनच वर्ग सोव्हिएट यूनियनमध्यें आहेत. सोव्हिएट यूनियनमधील सर्व नागरिकांना काम करण्याचा, विश्रांति व फुरसत घेण्याचा, शिक्षण घेण्याचा व म्हातारपण, आजार व शारीरिक दुर्बलता आली असतां त्याच्या पोषणाचा हक्क या घटनेंत मान्य करण्यांत आला आहे. राष्ट्र, वंश व लिंग हा भेदाभेद न मानतां सर्व नागरिकांना समतेनें वागविण्यांत आलें पाहिजे, हा अखंडनीय कायदा या घटनेनें मान्य केला आहे. समाजसत्तावादी समाजाची धारणा सुदृढ राहण्याच्या दृष्टीनें या घटनेनें खालील हक्कांच्या रक्षणाची हमी घेतली आहे:—

**भाषण-स्वातंत्र्य, मुद्रण-स्वातंत्र्य, सभा-स्वातंत्र्य—ज्यांत जनता-सभा भरविण्याचा समावेश होतो, सार्वजनिक संघटनांच्या द्वारा संघ करण्याचें स्वातंत्र्य, वैयक्तिक अनपकार्यता, गृहविषयक अनतिक्रमणता व खासगी पत्रव्यवहारविषयक अनपावित्रीकरणीयता. तसेंच कामगारजनतेच्या हितसंबंधांचें रक्षण करीत असल्याबद्दल, शास्त्रीय-संशोधन करीत असल्याबद्दल व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या झगड्यांत भाग घेतल्याबद्दल ज्यांचा छळ होईल त्यांना आश्रय देण्याचा हक्क या घटनेनें मान्य केला आहे.**

सोव्हिएट यूनियनमधील समाजसत्तावादी आर्थिक पद्धतीनें कामगार-जनतेच्या स्वातंत्र्याचे व इतर प्रशंसनीय व श्रेष्ठ हक्क प्रत्यक्ष व्यवहारांत व आर्थिकदृष्ट्या सुरक्षित राखण्याची हमी घेतली आहे.

इतिहासांतील ही जशी एक अपूर्व गोष्ट आहे. तसेंच सर्व नागरिकांनीं कायद्याचें पालन केलें पाहिजे, काम करण्याच्या बाबतींत शिस्त पाळली पाहिजे, आपली सार्वजनिक कर्तव्यें प्रामाणिकपणें बजावलीं पाहिजेत, समाजसत्तावादी मानवी परस्परसंबंधाचे नियम आदरानें पाळले पाहिजेत, समाजसत्तात्मक मालमत्तेचें संरक्षण केलें पाहिजे. तिच्यासंबंधाची मनांत आवड बाळगली पाहिजे. समाजसत्तावादी पितृभूमीचें रक्षण केलें पाहिजे अशा गंभीर जबाबदाऱ्याही या घटनेनें सोव्हिएट यूनियनमधील सर्व नागरिकांवर टाकल्या आहेत.

ज्या पूर्ण विकसित समाजसत्तावादी लोकशाहीचीं स्वप्नें मानवसमाजांतील थोर व प्रागतिक विचाराच्या पुरुषांनीं मनांत घोळविलीं तीं प्रत्यक्ष व्यवहारांत

आणून तिच्या रक्षणाकरतां या घटनेनें अखंडनीय असे कायदे बनविले आहेत.

५ डिसेंबर १९३६ रोजीं भरलेल्या सोव्हिएटांच्या आठव्या कॉंग्रेसनें ही घटना एकमतानें पास केली व तिचा जनक स्टॅलिन याच्या नांवानेंच सोव्हिएट यूनियनमधील जनतेकडून ती संबोधली गेली. सेंट्रल कमिटीच्या व स्टॅलिनच्या मार्गदर्शत्वाखालीं या घटनेप्रमाणें होणाऱ्या निवडणुकींची तयारी झाली. १७ डिसेंबर १९३७ म्हणजे या घटनेप्रमाणें होणाऱ्या निवडणुकीच्या आदल्याच दिवशीं ज्या जिल्ह्यातर्फें उमेदवार म्हणून स्टॅलिन उभा होता तेथल्या मतदारांना या निवडणुकीचें वैशिष्ट्य त्यानें समजावून दिलें. भांडवलशाही राष्ट्रांतील जनतेप्रमाणें सोव्हिएट यूनियनमधील जनतेवर पिळणाऱ्या वर्गाचें दडपण नाहीं, सोव्हिएट यूनियनमध्यें या वर्गाचें समूळ उच्चाटन केलें असून समाजसत्तावाद हा आपल्या जीवनांतला एक भागच बनला आहे, असें सांगून वरिष्ठ सोव्हिएटमध्यें ज्याची निवड करावयाची तो उमेदवार पूर्ण लेनिनवादी असला पाहिजे असा आग्रह जनतेनें धरला पाहिजे असेंही तो म्हणाला.

दुसऱ्याच दिवशीं म्हणजे १२ डिसेंबर १९३७ रोजीं वरिष्ठ सोव्हिएटची निवडणूक झाली. खरोखरी ही निवडणूक नव्हती तर सोव्हिएट जनतेच्या विजयाच्या सणाचा हा दिवस होता. एकंदर यूनियनमधील ९४०००००० मतदारांपैकीं ९१०००००० मतदारांनीं म्हणजे शें. ९६·८ मतदारांनीं पोलवर येऊन मतें दिलीं. यांपैकीं ८९९४०००० मतदारांनीं म्हणजे शें. ९८·६ मतदारांनीं कम्यूनिस्ट ब्लॉककरतां मतें दिलीं व बाकीचीं मतें नॉन्‌पार्टी ब्लॉकला पडलीं. इतक्या प्रचंड मतांनीं कम्यूनिस्टांची ही निवड म्हणजे समाजसत्तावादाचा व स्टॅलिनच्या लेनिनवादी एकनिष्ठ धोरणाचा पूर्ण विजय होता.

ज्या लेनिनवादाच्या धोरणामुळें बोलशेव्हिक पार्टीला क्रांतिसंघटनेच्या कार्यांत सारखा विजय मिळत गेला, ज्याच्या आधारावर बोलशेव्हिक पार्टीनें साऱ्या मानवजातीच्या इतिहासांत अपूर्व अशी क्रांति घडवून आणली, ती टिकविली, इतकेंच नाहीं तर या क्रांतीची स्थापना दृढतर पायावर करण्याकरतां समाजसत्तावादी औद्योगीकरणाचे व सामुदायिक शेतीचे प्रचंड कार्यक्रम पूर्ण यशस्वी करून दाखविले, त्या वादाला आत्मसात् करा म्हणजेच "बोलशे-

व्हिक वादावर प्रभुत्व मिळवा" ( Master Bolshevism ) असा मंत्र या दिवसांत स्टॅलिननें लाखों सभासदांना दिला.

या वादाला आत्मसात् करण्याकरतां मदत व्हावी म्हणून सोव्हिएट यूनियन कम्यूनिस्ट ( बोल्शेविक ) पार्टीचा इतिहास लिहिण्याचें सेंट्रल कमिटीनें ठरविलें व त्याकरतां स्टॅलिनच्या मार्गदर्शत्वाखालीं एक कमिशनही नेमण्यांत आलें. कम्यूनिस्ट पार्टीच्या या इतिहासांत या पार्टीचा अगदीं साद्यंत इतिहास तर आहेच, शिवाय या पार्टीला आधारभूत असलेल्या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या मूलभूत तत्वांचाही सांगोपांग विचार या इतिहासांत केला आहे. हा इतिहास म्हणजे रशियांत झालेल्या तीन क्रांत्यांचा इतिहास होय. झारशाहीच्या उच्चाटणाचा आणि रशियांतील जमीनदारशाहीच्या व भांडवलशाहीच्या समूळ उच्चाटणाचा इतिहास म्हणजेच या पार्टीचा इतिहास होय. जगांतील साम्राज्यशाही राष्ट्रांच्या रशियावरील हल्ल्यापासून क्रांतीचें रक्षण करण्याकरतां मिळविलेल्या अलौकिक विजयाचा इतिहास म्हणजेच या पार्टीचा इतिहास होय.

ज्या स्टॅलिननें आपल्या आयुष्याचीं पन्नास वर्षे या पार्टीच्या संवर्धनाच्या कार्यांत खर्ची घातलीं, त्याच्या कर्तृत्वाचा इतिहास म्हणजे या पार्टीचा इतिहास होय. कम्यूनिस्ट पार्टीचा इतिहास व स्टॅलिनचें चरित्र हीं इतकीं एकरूप झालीं आहेत कीं, स्टॅलिनच्या कर्तृत्वाशिवाय पार्टी जिवंत राहूं शकली नसती व मार्क्स-लेनिनवादाचा व या पार्टीचा आधार मिळाला नसता तर स्टॅलिनच्या कर्तबगारीलाही वाव मिळाला नसता. स्टॅलिनच्या चरित्रांत तरी दुसरें काय आहे ? अथपासून इतिपर्यंत या पार्टीचा इतिहास त्याच्या चरित्रांत गोंवलेला नाहीं का ? पार्टीच्या इतिहासाचें आणखी एका दृष्टीनें महत्त्व आहे. यांतील विरोधविकासवाद व ऐतिहासिक भौतिकवाद या विषयावरील लेख खुद्द स्टॅलिननें लिहिलेले आहेत. नुसतें एकांतांत बसून हें ग्रंथलेखन झालेलें नाहीं तर ज्यांनीं तत्त्वज्ञान व व्यवहार यांची सांगड प्रत्यक्ष आपल्या जीवनांत घालून दाखविली व अपूर्व क्रांत्या करून या तत्त्वज्ञानाचें तेज जगाच्या निदर्शनास आणलें असल्या अधिकारी पुरुषांच्या हातून हे लेख लिहिले गेले आहेत एवढ्यावरूनच या लेखांचें महत्त्व समजण्याजोगें आहे.

लेनिननें १९१७ च्या ऑगस्टमध्यें "सरकार व क्रांति" ( State and Revolution ) हें पुस्तक लिहून संपविलें. कामगारक्रांतीनंतर समाजवादाचा

विकास होतां होतां सरकारचा म्हणजे शासनसंस्थेचा क्रमशः नाश कसा होतो व पूर्ण समाजसत्तावादाची प्रस्थापना कशी होते हें या पुस्तकांत लेनिननें दाखविलें आहे. लेनिनचा हा ग्रंथ म्हणजे जगाच्या तत्त्वज्ञानविषयक वाङ्मयाला दिलेली एक देणगीच होय. लेनिनचा हा ग्रंथ म्हणजे शतकानुशतकें आपसांत लढत राहिलेल्या मानवसमाजाला **जगत्शांतीचा एकच उपाय** दाखविणारा ज्ञानमय प्रदीप आहे. ऑक्टोबर-क्रांतीमुळें या ग्रंथाचा दुसरा भाग लेनिनला लिहितां आला नाहीं. १९०५ व १९१७ या सालांतून झालेल्या क्रांत्यांचा अनुभव गृहीत धरून आपल्या सिद्धांताचीं प्रमेयें सिद्ध करून दाखविण्याचा लेनिनचा विचार होता. १९१७ च्या क्रांत्यांमुळें व त्यानंतर वाढलेल्या कामाच्या व्यापामुळें लेनिनला हा ग्रंथ पुरा करण्यास वेळच मिळाला नाहीं. लेनिनची राहिलेली अपुरी इच्छाच जणूं काय स्टॅलिननें अठराव्या पार्टीच्या कॉंग्रेसपुढें 'वर्गरहित समाजसत्तावादी समाजरचनेच्या पूर्णत्वाचा कार्यक्रम' मांडून पुरी केली.

१९०५ व १९१७ मधील क्रांत्यांचा व त्यानंतर क्रांतीची दृढ स्थापना करण्याकरतां वीस वर्षें सोव्हिएट यूनियननें केलेल्या प्रयत्नांचा अनुभव जमेस धरून व समाजसत्तावादी सरकारच्या विकासांतील स्थित्यंतरांचें क्रमशः विस्तृत पृथक्करण करून अखेर हें सरकार पूर्ण समाजसत्तावादी समाजरचनेंत कसें विलीन होतें हें या कार्यक्रमांत स्टॅलिननें दाखविलें आहे. "**लेनिनच्या निशाणाखालीं, चला आपण विजयी होऊं**" अशी चालू युद्धाच्या बाबतींत स्टॅलिननें घोषणा केली त्याचप्रमाणें "**लेनिनच्या निशाणाखालीं, चला आपण पूर्ण समाजसत्तावादाची प्रस्थापना करूं**" असाच संदेश जणूं काय स्टॅलिननें या कार्यक्रमाच्या रूपानें सर्व जगांतील श्रमजीवी जनतेला दिला आहे.

याप्रमाणें रशियांतील समाजरचनेंत क्रांति घडवून आणून सोव्हिएट यूनियनमध्यें पूर्ण समाजसत्तावादाच्या प्रस्थापनेची एकेक पायरी गांठण्याच्या प्रयत्नांत ज्या थोर पुरुषानें आपल्या आयुष्याचीं आजवरचीं ५० वर्षें घालविलीं त्याच्या खाजगी जीवनाचा विचार तरी काय करावा? स्टॅलिनला खाजगी जीवन असें राहिलेलेंच नाहीं. क्रेमलिनच्या एका कोपऱ्यांतील दोन लहान खोल्यांत स्टॅलिन आपल्या दोन मुलांसह राहतो. या खोल्यांतून जेवणाकरितां

किंवा विश्रांतीकरतां दिवसांतील कांहीं थोडे तास तो घालवितो. क्रेमलिन-मधील त्याच्या जनरल सेक्रेटरीच्या ऑफिसमध्येंच दिवसाचे १६ तास तो काम करतो. पहिल्या बायकोपासून एक मुलगा व दुसऱ्या बायकोपासून एक मुलगा व एक मुलगी अशीं तीन अपत्यें स्टॅलिनला आहेत. पहिल्या बायको-पासून झालेल्या याशाला स्टॅलिननें कॉलेजांतून काढून एंजिनियरिंग कार-खान्यांत कामास लावलें आहे.

त्याची पहिली बायको स्वानित्झे एका गरीब कॉकेशियन बोल्शेव्हिकाची मुलगी होती. स्टॅलिनच्या जीवनावर तिचा कांहींच परिणाम झालेला दिसत नाहीं व स्टॅलिननें पत्करलेल्या कार्यांतही तिनें कांहीं भाग घेतलेला दिसत नाहीं.

त्याची दुसरी बायको सरजी अलीलुइव्ह नांवाच्या त्याच्या बालमित्राची मुलगी होती. क्रेमलिनच्या कोपऱ्यांतील लहानग्या खोलींत एकाद्या सामान्य कामगार स्त्रीप्रमाणें ती रहात होती. मॉस्कोमधील एका कारखान्यांत इतर हजारों कामगारस्त्रियांप्रमाणें तीही कामाला जात होती. सोव्हिएट सांस्कृतिक विकासाच्या कार्यांत ती आवडीनें भाग घेत असे. मॉस्को येथें या कामाकरतां भरत असलेल्या अभ्यासमंडळांतून ती अगदीं नियमितपणें हजर राहत असे.

हिच्यापासून स्टॅलिनला झालेल्या दोन मुलांपैकीं व्हासिली हा पंचवीस वर्षांचा असून स्वाटलाना एकोणीस वर्षांची आहे. शहरांतील इतर सामान्य कुटुंबांतील मुलांप्रमाणेंच हायस्कुलांतून या मुलांचें शिक्षण झालें आहे.

नादेजडा अलीलुइव्ह १९३२ च्या नोव्हेंबरांत आंत्रवेष्टनदाहाच्या विकारानें एकाएकीं मरण पावली. भावनांच्या स्वाधीन होणें हें दुर्बलतेचें लक्षण आहे, असें स्टॅलिन मानतो व असल्या भावनावश लोकांबद्दल त्याला तिटकाराही वाटतो. तथापि नादेजडाच्या मरणानें स्टॅलिनच्या पोलादी हृदयांवरही आघात झाला यांत शंका नाहीं. तिच्या स्मरणार्थ तिच्या नेहमींच्या योजनेप्रमाणें सर्व गृहव्यवस्था अद्याप तशीच कायम ठेवण्यांत आली आहे.

तिच्या स्मरणार्थ एक संगमरवरी चौथरा उभारण्यांत आला असून मधून मधून तिच्या कुटुंबांतील मंडळी या तिच्या स्मारकास भेट देत असतात.

स्टॅलिनचा पोषाख साधा असतो. त्याचें जेवण अगदीं साधें असतें. फक्त जॉर्जियांतील लाल मधुर मद्य जेवणानंतर तो घेत असतो. त्याला दुसरें कोणतेंही

व्यसन नाहीं. त्याच्या तोंडची तंबाखूची चिलीम मात्र सारखी तेवत असते. जेवतांना तो फारसें बोलत नाहीं व राजकीय चर्चा तर मुळींच करीत नाहीं. जेवणाच्या वेळीं पाहुणे अगदीं क्वचितच असतात. स्टॅलिन अत्यंत एकांतप्रिय आहे. घरीं असतांना तेथें कुणाला येण्याची मोकळीक नाहींच. पण क्रेमलिन-मध्यें आपल्या ऑफिसांत असतांनाही तो क्वचितच कोणाच्या भेटी घेतो. टेलिफोनवर बोलावून त्याला त्रास देण्याची तर कोणाचीच छाती नाहीं.

त्याच्या मुलाखतीकरतां वेळप्रसंगीं आठवडाभरसुद्धां रखडत राहावें लागतें. पण एकदां मुलाखत ठरल्यावर तें एक आपलें जरूरीचें कर्तव्य या दृष्टीनें ज्या कोणाची मुलाखत घ्यावयाची असेल तशा प्रकारची पूर्ण तयारी करून तो मुलाखत घेतो. असली एखादी मुलाखत सुरू झाली म्हणजे किती तास तींत गेले तरी त्याची तो पर्वा करीत नाहीं. मुलाखतवाल्याला पाहिजे असलेली भरपूर माहिती तो देतो व प्रश्नांची झोड उठवून त्याच्याकडूनही तो हवी ती माहिती काढून घेतो.

एका अमेरिकन वार्ताहरानें चार तासपर्यंत प्रश्नावर प्रश्न विचारले व स्टॅलिननें अगदीं न कंटाळतां त्यांना उत्तरें दिलीं. उलट दीड तासभर स्टॅलिननें या प्रसिद्ध वार्ताहराला इतके महत्त्वाचे व मार्मिक प्रश्न विचारले कीं, अमेरिकन जीवनासंबंधानें अगदीं बारीकसारीक सर्वांगीण माहिती स्टॅलिनला असलेली पाहून तो थक्कच झाला.

मुलाखतीचें मुख्य काम संपल्याबरोबर एक क्षणभरही आपला वेळ मोडावयास तो तयार नसतो. स्टॅलिन उगाच कोणाशीं कांहीं तरी गप्पा मारीत असलेला कधींच आढळायचा नाहीं. पण त्याची ही एकांतप्रियता व रुक्षता एकाद्या कॉम्रेडच्या आजाराची बातमी कळल्याबरोबर अगदीं विघडून जाते. त्याच्याकडे तो ताबडतोब मध व फळें पाठवितो. "अरे भाई, हें खा व लवकर बरा हो, तुझी आम्हांला फार गरज आहे" असा तो त्याला निरोप पाठवितो. इतका रुक्ष वृत्तीचा व एकलकोंडा स्टॅलिन गोष्टी सांगणारा आहे, असें ऐकल्यावर कोणालाही आश्चर्य वाटेल. रशियांतील राजकीय पुढाऱ्यांत व मुत्सद्द्यांत स्टॅलिनचें हें उदाहरण अपवादात्मक आहे.

स्टॅलिनचें शिक्षण व्यापक स्वरूपाचें आहे. त्याचें वाचन अखंडितपणें अद्याप चालू आहे. बाकू येथील तुरुंगांत असतांना तो एस्पेरेन्टो भाषा

शिकला. इंग्रजी भाषेचाही त्यानें चांगला अभ्यास केला आहे. रशियन व इतर भाषांतील कादंबऱ्या वाचण्याचाही त्याला नाद आहे. सिंक्लेअर लीवीची बॅबिट कादंबरी त्यानें वाचल्यावर योग्य प्रसंगीं आपल्या भाषणांतून 'बॅबिट' या शब्दाचा तो उपयोग करीत असतो. शेकोव्ह, गोगोल, हीन हे त्याचे आवडते ग्रंथकार आहेत. पिलनियाक व इहरेनबुर्ग यासारख्या व्यंग्य लेखकांचा त्यानें परिचय करून घेतला असून आपल्या मुद्द्यांचें विवरण करतांना त्यांच्या चुटक्यांचा तो आधार घेत असतो. स्टॅलिन कधीं कधीं नाटक पहायलाही जातो. अर्वाचीन सभ्य गृहस्थ नाटक पाहूं लागला कीं, कथानकापेक्षां नटनटींच्या अभिनयाची चिकित्सा तो आपल्या मनाशीं करीत असतो. स्टॅलिनचें अगदीं उलट आहे. तो नाटकांतील कथानकाशीं एकरूप होतो. इतका कीं एका क्रांतिकारी क्षोभप्रधान नाटकांत त्याच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागल्याचेंही सांगतात.

स्टॅलिनच्या जीवनांत त्याच्या दोन खोल्यांच्या घराला किंवा त्याच्या मातृहीन दोन मुलांच्या कुटुंबाला कांहींच महत्त्व नाहीं. सहज निसर्गतः पदरीं पडलेला त्याचा हा छोटासा संसार आहे. त्याच्या खऱ्या संसाराच्या घडामोडी मॉस्को येथील जुन्या स्क्वेअरमधील सहा मजली भव्य इमारतींतील पार्टीच्या जनरल सेक्रेटरीच्या कचेरींत चालतात. पुस्तकांचीं कपाटें, मार्क्स व लेनिन यांचे दोन फोटो याशिवाय या कचेरींत दुसरें कांहीं सामानही नाहीं. त्याच्या हाताखालीं फक्त दोन सेक्रेटरी आहेत. आपलें नेहमींचें काम तो कधींही या सेक्रेटरींवर सोपवीत नाहीं. जनरल सेक्रेटरीशीं संबंध असलेलीं सर्व कामें त्याच्या हातांतून जातात. या बाबतींत करावयाच्या बहुतेक सर्व सूचना तो स्वतः लिहितो व नंतर त्या टाईप करण्याकरितां दिल्या जातात. स्टाफमधील त्याचे नोकर त्याची केव्हांही भेट घेऊं शकतात. हांजी हांजी केलेली त्याला मुळींच आवडत नाहीं पण एकादी महत्त्वाची दुरुस्ती कोणी सुचविली किंवा स्वतःच्या प्रेरणेनें एकादी महत्त्वाची सूचना कोणी केली तर तिचा स्वीकार करून त्याला तो ताबडतोब प्रमोशन देतो. याच्या उलट एकादी चूक करून ऑफिसच्या कामांत कोणी घोंटाळा उत्पन्न केला कीं, त्याची मग तो कितीही वरिष्ठ अधिकारी कां असेना, ताबडतोब हकालपट्टी करण्याचा स्टॅलिनचा हुकूम होतो.

एक थोर पुरुष म्हणून आजच्या जगांत स्टॅलिनची गणना करण्यांत येते. पण त्याच्या साध्या राहणींत मुळींच फरक पडलेला नाहीं. त्याच्या आचरणांत व राहणींत आंत एक व बाहेर एक असें कांहीं नसतें.

लेनिनप्रमाणें स्टॅलिनचेही आज सोव्हिएट यूनियनमध्यें सर्वत्र पुतळे उभारले जात आहेत. त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत येत आहेत व वेळोवेळीं त्याचीं अभिनंदनें करण्यांत येत आहेत. खुद्द स्टॅलिनला लोकांचें हें करणें मुळींच पसंत पडत नाहीं. वीरपूजेचा लोकांत पसरत असलेला हा प्रकार त्याला आवडत नाहीं. एकाद्या अभिनंदनाच्या वेळीं तो स्वतः हजर असला म्हणजे हें अभिनंदन आपल्या व्यक्तीचें नसून आपण ज्या तत्त्वाकरतां झगडत आहों त्याचें हें अभिनंदन आहे असें समजून तो या अभिनंदनांत भाग घेतो. इतरांप्रमाणें तोही टाळ्या वाजवितो व जयजयकार करतो. स्टॅलिनचें हें आचरण किती उघड्या दिलाचें द्योतक आहे बरें! असल्या अभिनंदनप्रसंगीं आपल्या अंतःकरणांतल्या खोल भावना जेव्हां तो प्रकट करतो तेव्हां या समारंभास असलेल्या सर्व श्रोत्यांचीं हृदयें तो हलवून सोडतो.

१९२९ सालीं असाच एक प्रसंग घडून आला. या सालीं त्याचा पन्नासावा वाढदिवस साजरा करून देशांतील अनेक लहान-मोठ्या व्यक्तींनीं व सार्वजनिक संस्थांनीं त्याच्यावर अभिनंदनांचा वर्षाव केला. त्याला त्यानें पुढील-प्रमाणें जाहीर उत्तर दिलें : "तुम्हीं सर्वांनीं माझें जें अभिनंदन केलें आहे तें तुम्हीं माझें व्यक्तिशः अभिनंदन केलें असें मी मानावयास तयार नाहीं. हें माझें अभिनंदन म्हणजे कामगार-वर्गाच्या त्या थोर पार्टीचें अभिनंदन होय असें मी समजतों. या पार्टीनेंच मला जन्म दिला, माझी जोपासना केली व मला आपलें प्रतीक बनविलें....भाईहो, कामगारवर्गाच्या उद्धाराकरतां, कामगारक्रांतीकरतां व जागतिक समाजसत्तावादाच्या प्रस्थापनेकरतां यापुढेंही मी आपली सर्व शक्ति, सर्व बुद्धि व अगदीं शेवटच्या थेंबापर्यंत माझें सर्व रक्त खर्ची घालण्यास तयार राहीन याबद्दल तुम्ही निर्धास्त रहा."

या उत्तरांतील अक्षरन् अक्षर खरें आहे म्हणूनच स्टॅलिनचें नांव म्हणजे सोव्हिएट यूनियनच्या स्वातंत्र्याचें, त्याच्या कीर्तीचें, त्याच्या उत्साहाचें, प्रतीक बनलें आहे. म्हणूनच "**स्टॅलिनकरतां, आमच्या राष्ट्राकरतां**"

अशी घोषणा करून लाल फौजेंतील सैनिकांनीं शत्रूची धूळधाण उडवून हसान सरोवराजवळील पर्वतशिखरांवर सोव्हिएटांचें लाल निशाण फडकावलें आणि हीच घोषणा करीत आजही लाल फौजा सोव्हिएट यूनियनवर चालून आलेल्या नाझी-शत्रूंची धूळधाण उडवीत आहेत.

लेनिन व स्टॅलिन यांचीं नांवें जगांतील प्रत्येक कोपऱ्यांत आशेचे उज्ज्वल किरण निर्माण करीत आहेत व जगांतील सर्व राष्ट्रांच्या सुखांकरतां, शांतीकरतां व भांडवलशाही गुलामींतून पूर्णपणें मुक्त होण्याकरतां लढा सुरू करण्याबद्दल हीं दोन नांवें रणशिंग फुंकून आव्हान देत आहेत" असें मोलोटोव्हनें म्हटलें आहे तें सर्वथैव खरें आहे

# अद्य यावत् १४

होय, "स्टॅलिनकरतां, आमच्या राष्ट्राकरतां" असा जयघोष करीत स्टॅलिनच्या लाल फौजेंतील सैनिक आजकाल रशियन अघाडीवरील नाझी फौजेची धूळधाण उडवीत आहेत आणि आपल्या सोव्हिएट लोकशाहीच्या पितृभूमींत घुसलेल्या नाझी राक्षसांना ते पुन्हा झपाट्यानें पिटाळून लावीत आहेत.

सोव्हिएट लाल फौजा आज चढाईच्या फौजा झाल्या आहेत. गेल्या कांहीं महिन्यांच्या लढाईच्या बातम्या आपल्याला याच गोष्टी सांगत आहेत.

अनाक्रमणाचा करार मोडून हिटलरनें ता. २२ जून १९४१ रोजीं विश्वासघातानें सोव्हिएट यूनियनवर चोहोंबाजूंनीं अत्यंत सपाट्याचा हल्ला चढविला. ही गोष्ट अगदींच आकस्मिक अशी नव्हती. अनाक्रमणाचा करार झाला असला तरी हिटलरशीं आपल्याला दोन हात करावे लागणार, अशी सोव्हिएट सरकारला खात्री वाटत होती. या चढाईला तोंड देण्याच्या तयारींतही तें होतें. पण अपेक्षेपेक्षां अगोदर व अगदीं जोरानें हा हल्ला सुरू झाल्यामुळें लाल फौजांना हा हल्ला परतवितां आला नाहीं. उलट या हल्ल्यानंतर जवळ जवळ कमजास्त प्रमाणांत त्यांना पीछेहाटीचेंच धोरण स्वीकारावें लागलें.

नाझी फौजा विजयोत्साहानें पहिले कांहीं महिने सोव्हिएट यूनियनमधील शहरांमागून शहरें काबीज करीत चालल्या होत्या व लाल फौजांना सारखी माघार घ्यावी लागत होती, हें तर उघडच दिसत होतें. पण त्यांतल्या त्यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे सोव्हिएट सेनापतींच्या या माघार घेण्याच्या धोरणांतही एक विशिष्ट पद्धति होती. नाहिंमत व नामोहरम होऊन पळपुट्या बनलेल्या सैनिकांप्रमाणें लाल सैनिक पीछेहाट करीत नव्हते. एक एक फूट जागेकरतां शौर्यानें लढत लढत ते आपल्या जागा सोडून शिस्तीनें मागें हटत होते. फ्रेंच सेनापतींनीं व मुत्सद्द्यांनीं घाबरटपणानें पॅरिस शहर 'ओपन सिटी' म्हणून जाहीर करून नाझींना सर्व फ्रान्सभर धुमाकूळ घालण्यास मोकळें रान

करून दिलें. आपसांतील फुटीनें पोकळ वासा झालेल्या फ्रेंच लोकशाही इमारतीचा नाझींनीं धुव्वा उडविला. अर्धा अधिक फ्रान्स काबीज करून एके काळीं प्रसिद्ध क्रांतिकारक म्हणून कीर्ति संपादन केलेल्या फ्रान्सची हिटलरनें जगांत नाचक्की करून सोडली. सोव्हिएट यूनियनपुढें फ्रान्सचें हें उदाहरण ताजें होतें. त्यावरून त्यांनीं चोख धडा घेतला होता. म्हणूनच आपल्या यूनियनमध्यें आपसांतील फुटीला मुळींसुद्धां वाव न देतां आपलें सर्व सामर्थ्य एकीकृत करून नाझींच्या प्रचंड राक्षसी शक्तीला लाल फौजांनीं यशस्वी रीतीनें तोंड दिलें.

"फलानुमेयाः प्रारंभाः" लाल फौजांची पीछेहाट होत होती. १९४१ तील पहिल्या दीड वर्षांत असाच प्रकार सोव्हिएट रणभूमीवर दिसून येत होता, हें खरें आहे. पण ही पीछेहाट यशस्वी व विजयी पीछेहाट होती. मागें कांहीं पावलें हटत जाऊन व कांहीं वेळ दबून राहून मोका येतांच सावजावर झडप घालणाऱ्या वाघाप्रमाणें स्वीकारलेली ही पीछेहाट होती. या पीछेहाटींत आणखी एक महत्त्वाचें धोरण दडून राहिलेलें होतें. शत्रूला विजयाच्या भरीं पाडून त्याच्या मनुष्यबलाची व युद्धसामुग्रीची धूळधाण उडवावयाची व त्याचप्रमाणें आपलें मनुष्यबल व युद्धसामुग्री तितक्याच प्रमाणांत वांचवावयाची इतकेंच नव्हे, तर ती आणखी मोठ्या प्रमाणावर वाढविण्याची देशांतील अयुद्धमान जनतेला मुबलक सवड द्यावयाची. सो. यूनियनच्या लाल फौजेला आज जे विजय मिळत आहेत, आपला गेलेला मुलूख एकामागून एक झपाट्यानें कबजांत घेण्याच्या कामीं लाल सेनापतींना जें यश मिळत आहे, त्याच्या मुळाशीं हेंच धोरण होतें.

१९४१ च्या हिंवाळ्यांत नाझी फौजांना त्यांनीं आक्रमण केलेल्या प्रदेशांतून मागें हटाविण्याचा लाल फौजांनी पहिल्यांदा प्रयत्न केला. पण तो तितकासा यशस्वी झाला नाहीं. दमछाट होऊं न देतां शिस्तीनें शत्रूच्या मर्मस्थानावर घाव घालून त्याला नामोहरम करून सोडण्याच्या डावांपैकींच तो एक डाव होता. लाल फौजांचा हा डाव १९४२ च्या हिंवाळ्यांत मात्र झपाट्यानें यशस्वी होत चालला. १९४१ व ४२ च्या दोन्ही हिंवाळ्यांत नाझी फौजांवर लाल फौजा तुटून पडत, तरीसुद्धां त्यांचें धोरण बचावाचेंच होतें. अद्यापि चढाईच्या डावाला त्यांनीं हात घातला नव्हता. १९४२ च्या जुलैमध्यें नाझी फौजा स्टॅलिनग्राड (पूर्वीचें झारित्सान) शहराला येऊन भिडल्या व हें शहर

शिकस्तीनें लढविण्याचें लाल सेनापतींनीं ठरविलें. तेव्हांपासून आजच्या रूसो-जर्मन युद्धाला उलट कलाटणी मिळाली.

१९४२ च्या ऑगस्टअखेर स्टॅलिनग्राडवर खुष्कीच्या मार्गानें, जलमार्गानें व आकाशांतूनही प्रचंड हल्ले चालू होते त्या वेळीं 'आतां या हिंवाळ्यांत नाझी फौजा स्टॅलिनग्राडमध्यें सुखानें दिवस काढतील' असे जाहीर उद्‌गार हिटलरनें काढले होते. यापूर्वींच थोडे दिवस स्टॅलिनग्राडच्या सीमाप्रांत गांठल्यावर "स्टॅलिनग्राड तीन दिवसांत" अशी घमेंडही त्यानें मारली होती. १९४१ सालीं सोव्हिएट यूनियनवर हिटलरनें हल्ला चढविला त्या वेळीं सोव्हिएटांच्या युद्ध-सामर्थ्यासंबंधानें त्याचा ज्याप्रमाणें अंदाज चुकला त्याचप्रमाणें या वेळींही त्याचा अंदाज सपशेल चुकला.

केवळ लाल सैनिकच नव्हे तर स्टॅलिनग्राडमधील हजारों कामगार व शहरांतील नागरिक स्त्री-पुरुष, साधारण समजूं लागलेलीं मुलेंसुद्धां आपल्या प्रिय शहराच्या संरक्षणाकरतां रस्तोरस्तीं लढत आहेत, शहरांतल्या इमारतींना त्यांनीं किल्ल्यांचें स्वरूप दिलें आहे, आपल्या सैनिकांचे शेंकडों मुडदे पडलेले पाहिल्यावरच इमारतीच्या दादराची एक पायरी आपल्याला हस्तगत होते, असा अनुभव नाझी सेनापतींना येऊं लागला. शहराच्या कांहीं इमारतींतून नाझी सैनिकांनीं ठाणीं दिलीं होतीं. या इमारती लाल सैनिकांनीं त्यांच्याखालीं गुप्त सुरुंग लावून उडवून दिल्या व उध्वस्त झालेल्या असल्या इमारतींच्या गळाठ्यांत शेंकडों नाझी सैनिक गडप झाले, हा प्रकार पाहून त्यांच्या भाईच्या अंगांतून कांपरें भरत असे. याप्रमाणें खुद्द स्टॅलिनग्राड शहरच एक भयानक रणक्षेत्र बनलें.

नोवेंबर १९४२ च्या दुसऱ्या आठवड्यापासून या रणक्षेत्राचें स्वरूप अजीबात पालटलें. स्टॅलिनग्राडच्या रक्षणाकरतां हजारों लाल सैनिक चोहोंकडून धांवून आले. लाल फौजांच्या सेनापतींनीं अत्यंत कुशलतेनें डाव-पेंच लढवून स्टॅलिनग्राडला सर्व बाजूंनीं वेढा दिला. स्टॅलिनग्राड लढविण्याकरितां सव्वा-दोन लाखांवर नाझी सैन्य जमा झालें होतें आणि खुद्द स्टॅलिनग्राडला लाल फौजांनीं यशस्वी वेढा दिला त्या वेळीं त्यांत ऐंशी हजारांवर जर्मन सैन्य अडकून पडलेलें आढळून आलें. उगाच नाहक रक्तपात होऊं नये म्हणून या वेढ्यांत सांपडलेल्या नाझी फौजेला सोव्हिएट तोफखान्याचे कर्नल जनरल व्होरोनोफ

व डॉन फ्रंटचे कमांडर इन चीफ रोकोसोव्हस्की यांनीं खालील आशयाचा खलिता पाठविला.

वेढ्यांत सांपडलेल्या जर्मन सैन्यानें आपली अगतिक परिस्थिति लक्षांत घेऊन लाल फौजेला प्रतिकार करण्याचें बंद करावें. आपलीं सर्व शस्त्रास्त्रें व युद्धसामुग्री स्वतःसह शिस्तीनें आमच्या स्वाधीन करावीं. ,

या अटी जे पाळतील त्यांच्या जीवितरक्षणाची, सुरक्षिततेची व युद्ध थांब-ल्यावर जर्मनीला किंवा ते सांगतील त्या देशाला परत पाठविण्याची हमी आम्ही घेत आहों.

ज्या त्या हफीसरांचीं व सैनिकांचीं लष्करी पदकें त्यांच्या जवळच राहतील.

शरण आलेल्या सर्व सैनिकांची व अधिकाऱ्यांची जेवणाची व औषधांची ताबडतोब व्यवस्था होईल.

ता. ९ जानेवारी १९४३ रोजीं सकाळीं १० चे आंत या खलित्याचें उत्तर परत मागण्यांत आलें होतें.

आणि ही सूचना नाकारण्यांत आल्यास लाल फौजेला व लाल विमानी लष्कराला आपलें कटु कर्तव्य बजावावें लागेल, असेंही या खलित्यांत बजा-वण्यांत आलें होतें.

या निर्वाणीच्या खलित्याला जर्मन सेनापतींनीं व सैनिकांनीं संमति दिली नाहीं. आपल्याला वेढा घातलेल्या लाल फौजेशीं ते शौर्यानें लढले. पण त्याचा अर्थातच कांहीं उपयोग झाला नाहीं, शेंकडों जर्मन हपिसर व हजारों सैनिक लाल फौजेनें पाडाव केले. याप्रमाणें स्टॅलिनग्राडच्या बचावाचें हें युद्ध अत्यंत यशस्वीपणें लाल फौजेनें चालविलें व तें गेल्या जानेवारी ३० रोजीं समाप्त झालें. ज. व्होरोनोफ व ज. रोकोसोव्हस्की यांनीं आपल्या या विजयाची हकीकत लाल फौजेचे सर सेनापति कॉ. स्टॅलिन याला कळविली व स्टॅलिननेंही डॉन अघाडीवरील या लाल लष्कराचें व त्याच्या सेनानींचें अभिनंदन केलें.

स्टॅलिनग्राडच्या बचावाचें हें युद्ध म्हणजे इतिहासांतील एक अभूतपूर्व घटना होती यांत शंका नाहीं. सोव्हिएट लाल फौजेचा सर सेनापति ( Supreme Commandar ) या नात्यानें कॉ. स्टॅलिन हाच मुख्य सूत्र-धार होता, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

१९१८ च्या क्रांतीनंतर युरोपांतील सर्वच साम्राज्यवादी राष्ट्रें रशियावर तुटून

पडलीं होतीं. रशियांत झालेली शेतकरी-कामकरी क्रांति हाणून पाडावयाची व त्या राष्ट्राला पुन्हा आपल्याप्रमाणें साम्राज्यवादी बनवावयाचें या हेतूनें प्रेरित होऊन इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे राष्ट्रांनीं सोव्हिएट सरकारला आपसांतील युद्धांत गोंविलें व त्याचा नायनाट करण्याकरतां आपलें शक्तिसर्वस्व खर्ची घातलें. पण सोव्हिएट यूनियनमधील लाल फौजेनें व जनतेनें एकजुटीनें या साम्राज्यवादी राक्षसी हल्ल्याचा प्रतिकार करून आपली क्रांति जिवंत ठेविली व तिची दृढ पायावर पुन्हा प्रस्थापनाही केली.

२० वर्षांपूर्वी झालेल्या या आपसांतील युद्धांत झारिस्तानचें संरक्षण ही एक महत्त्वाची घटना होती. आणि हें कार्य कॉ. स्टॅलिननेंच यशस्वी रीतीनें पार पाडलें होतें. या अंतर्युद्धानंतर पुन्हा वीस वर्षांनीं सोव्हिएट यूनियनवर बरोबर हाच प्रसंग आला. त्या वेळच्या युद्धांत लढलेले लाल सैनिक व त्या वेळचे तरुण सेनानी आतां वीस वर्षांनीं वयानें व अनुभवानें वृद्ध झाले होते. वीस वर्षांपूर्वी ज्या कॉ. स्टॅलिनच्या सूत्रचालकत्वाखालीं साम्राज्यशाही हल्ल्याचा त्यांनीं यशस्वी रीतीनें प्रतिकार करून झारिस्तान राखलें, तोच कॉ. स्टॅलिन आतांही सोव्हिएट यूनियनच्या अखिल लाल फौजेचा एकमेव सेनानी बनला होता. असा अपूर्व योग जमल्यावर लाल फौजेनें स्टॅलिनग्राडचा बचाव केला व या दुसऱ्या महायुद्धाला क्रांतिकारक कलाटणी दिली, यांत आश्चर्य मानण्याजोगें काय आहे? असें झालें नसतें तरच तें एक आश्चर्य झालें असतें. क्रांतीनंतर लगेच झालेल्या अंतर्युद्धाच्या प्रसंगीं रशियांतील बोलशेव्हिकांची कांहींच तयारी नव्हती. सोव्हिएट पितृभूमीचें संरक्षण हें एकच एक पवित्र ध्येय त्यांच्यापुढें होतें. या ध्येयानें सर्व रशियन जनता भारून गेली होती. या ध्येयानें तिची एकजूट भक्कम केली होती. पवित्र व शुद्ध ध्येय व एकजूट हेंच त्या वेळीं सोव्हिएट लाल फौजेचें भांडवल होतें. पण आज वीस वर्षांनंतर!

सोव्हिएट यूनियनची सर्वतोपरी प्रगति झाली होती. दोन पंचवार्षिक योजना पूर्ण यशस्वी करून औद्योगिक दृष्ट्या सर्व जगांतील साम्राज्यशाही राष्ट्रांना स्टॅलिननें मागें टाकलें होतें. या वीस वर्षांत त्यानें सर्व आधुनिक युद्धसामुग्री व शस्त्रास्त्रें यांसह आपलें प्रचंड लष्करी सामर्थ्य आपल्या पाठीशीं तयार ठेवलें होतें. झारिस्तान-संरक्षणाच्या वेळच्या आध्यात्मिक सामर्थ्याला आतां आधिभौतिक सामर्थ्याची जोड मिळाली होती. म्हणूनच लाल फौजेनें केवळ स्टॅलिन-

ग्राडचेंच रक्षण केलें असें नाहीं तर या बचावाच्या युद्धापासून चढाईचें धोरण स्वीकारून गेल्या आठ-दहा महिन्यांत नाझी सैन्याच्या कबजांतील शहरें व लष्करी ठाणीं एकामागून एक पाडाव केलीं व त्यांची ससेहोलपट करून सोडली.

१९४१ जूननंतर नाझी फौजेनें लेनिनग्राडकडे धांव मारली. मिन्स, स्मालेन्स्क तुला वगैरे घेऊन मॉस्को गांठण्याचा प्रयत्न केला. या दोन्ही ठिकाणीं हिटलरला पराभवच खावा लागला. दाक्षिण अघाडीवर हिटलरनें आपलें शक्तिसर्वस्व खर्च करून रोस्टोव्ह, कीव्ह, खारकोव्ह, किरोव्होग्राड, निप्रो-पेट्रोव्हस्ट वगैरे ठाणीं काबीज करून प्रत्यक्ष स्टॅलिनग्राडच्या नगरीला पाय लावीपर्यंत यश संपादन केलें पण या ठिकाणीं मात्र त्याचा पायच तोडण्यांत आला व कॉकेशस ओलांडून आशियांत शिरण्याचें व हिंदुस्थानवर स्वारी करण्याचे त्याचे बेत ढांसळून पाडले. स्टॅलिनग्राडच्या या संरक्षणयुद्धानें स्टॅलिन-ग्राडबरोबर खुद्द सोव्हिएट यूनियनचें जसें रक्षण केलें त्याचप्रमाणें हिटलरचे जागतिक मोहिमेचे बेतही हाणून पाडून नाझी राक्षसशाहीपासून अखिल विश्वाचेंही रक्षण केलें आहे. अशा रीतीनें कामगार-शेतकऱ्यांची सोव्हिएट यूनिअन व तिची लाल फौज जगाची रक्षणकर्ती बनली असून, या सर्वांचा सूत्रचालक सर सेनापति स्टॅलिन अखिल विश्वाचा तारणहार बनला आहे.

१९४३ जानेवारी-फेब्रुवारींत स्टॅलिनग्राड येथें नाझी फौजेची जी पीछेहाट सुरू झाली ती अद्यापि तशीच चालू आहे. १९४१ पासून एक दीड वर्षांत हिटलरनें काबीज केलेल्या सोव्हिएट यूनियनच्या मुलुखापैकीं दोनतृतीयांशावर मुलूख पुन्हा लाल फौजांनीं काबीज केला आहे. कीव्ह, खारकोव्ह, स्मॉलेन्स्क, गोमेल वगैरे सर्व लहानमोठीं शहरें व महत्त्वाचीं रेल्वे जंक्शनें काबीज करून सोव्हिएट लाल फौजा आतां जुन्या पोलंडमध्यें घुसत आहेत. आणि त्यांची अशीच प्रगति चालू राहिल्यास व ती राहणारच, लवकरच आपला गेलेला सर्व मुलूख परत मिळविल्याशिवाय त्या विश्रांति घेणार नाहींत, अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत.

१९४१ सालीं हिटलरनें सो. यूनियनवर हल्ला चढविला त्या वेळीं आपल्या हस्तगत झालेल्या अखिल युरोपचें सामर्थ्य पाठीशीं घेऊन त्यानें हा हल्ला चढविला होता. बहुतेक सर्व युरोप पादाक्रांत केल्यामुळें युरोपमध्यें हिटलरला कोणीच शत्रु राहिला नव्हता व त्यामुळेंच अगदीं निर्वेधपणें सोव्हिएट यूनियनवर हल्ला

करण्यास व आक्रमणशील पद्धतीनें तो जोरानें चालू ठेवण्यास त्याला सवड सांपडली. गेल्या आठ दहा महिन्यांतील पीछेहाटीनें जर्मनीचें बल कमी झालें आहे, तो केवळ विनाशाच्या पंथास लागला आहे अशी कोणाची कल्पना असल्यास ती चुकीची आहे. हिटलरचें सामर्थ्य अद्याप कमी झालेलें नाहीं ही गोष्ट झिटोमीरसारखी महत्त्वाचीं ठाणीं पुन्हा परत घेऊन आपल्या सामर्थ्याची चमक हिटलर अद्याप जगाला दाखवीत आहे.

नाझीशाहीला हाणून पाडावयाचें असेल तर सामुदायिक सुरक्षिततेचें तत्त्व अमलांत आणून संयुक्त अघाडी निर्माण करण्यांत आली पाहिजे, हें सोव्हिएट यूनियनचें धोरण चालू महायुद्धापूर्वींच जाहीर झालें होतें व त्याच्या सिद्धीकरतां स्टॅलिनचा प्रयत्नही चालू होता. मध्यंतरीं हिटलरनें युरोपवर हल्ला चढविला व त्यानंतर खुद्द सोव्हिएट यूनियनवरही तो चालून आला त्या वेळीं या धोरणाच्या अंमलबजावणीकरतां प्रयत्न करण्यास स्टॅलिनला वेळच मिळाला नाहीं.

स्टॅलिनग्राडच्या वेढ्यांत यश मिळवून व नाझींना झपाट्यानें मागें हटवून आपलें युद्धसामर्थ्य जगाला पटवून दिल्यावर झेकोस्लावाकियाशीं संयुक्त अघाडीच्या तत्त्वावर करार करून स्टॅलिननें सामुदायिक सुरक्षिततेच्या तत्त्वाचा पुन्हा पुरस्कार केला आहे. या धोरणाच्या यशस्वितेकरतांच स्टॅलिननें 'थर्ड इंटरनॅशनल' ही कम्यूनिस्टांची जगव्यापी कामगार-संस्था यापूर्वींच बंद केली असून आतां तर कामगारांचें "कम्यूनिस्ट इंटरनॅशनल" हें कामगार-गीत सोव्हिएट यूनिअनचें सरकारी गीत राहणार नाहीं, असेंही त्यानें जाहीर केलें आहे.

नाझीशाहीचा समूळ नाश हेंच स्टॅलिनचें आजचें ब्रीदवाक्य आहे. नाझी-शाहीच्या नाशाकरतां जगांतील सर्व कम्यूनिस्टांनीं एकजुटीच्या अघाडीचा प्रयत्न करण्यांतच कम्यूनिझमचा विजय आहे, असाच जणूं काय स्टॅलिननें कम्यूनिस्ट इंटरनॅशनल रद्द करून जगांतील कामगारांना संदेश दिला आहे.

हिटलरच्या या सामर्थ्याची पूर्ण जाणीव असल्यामुळेंच सोव्हिएट यूनियनवरील नाझी हल्ल्यानंतर कांहीं महिन्यांनीं दुसरी अघाडी उघडण्यासंबंधानें युद्धमान राष्ट्रांतील जनतेनें आपापल्या कामगार संस्थांतर्फे व इतर मार्गांनीं ब्रिटिश व अमेरिका या दोस्त राष्ट्रांच्या मागें सारखा लकडा लावला आहे. सोव्हिएट यूनियनमधील प्रमुख वर्तमानपत्रांनींही वेळोवेळीं अशा सूचना केल्या व खुद्द

स्टॅलिननेंही या बाबतींत आपले विचार प्रकट करून या अघाडीचें महत्त्व पटवून दिलें.

पण दुसरी अघाडी उघडण्याचा दिरंगाईवर पडलेला हा प्रश्न आतां कोठें मॉस्को-परिषदेपासून व त्यानंतरच्या तेहरान-परिषदेपासून चांगला धसास लागला आहे. ब्रिटन, अमेरिका व सोव्हिएट यूनियन या दोस्त राष्ट्रांच्या परराष्ट्रीय प्रधानांची व प्रसिद्ध सेनानींची परिषद मॉस्को येथें भरून या प्रश्नाचाच मुख्यतः खल करण्यांत आला. त्यानंतर लगेच एक दोन महिन्यांत तेहरान येथें दोस्त राष्ट्रांचे मुख्य युद्धसूत्रचालक चर्चिल, रूझवेल्ट व स्टॅलिन यांची बैठक झाली. तब्बल चार दिवस या जगप्रसिद्ध राष्ट्रपुरुषांनीं चालू युद्धांत विजय कसा मिळवितां येईल याचा व विजयानंतर जगावर पुन्हा असल्या आपत्ति येऊं नयेत म्हणून युरोपियन राष्ट्रांच्या व अखिल विश्वांतील गुलाम राष्ट्रांच्या पुनर्घटनेचा विचार केला. जगांतील परतंत्र राष्ट्रांना स्वातंत्र्य प्राप्त झालें पाहिजे व त्याबरोबरच त्या त्या राष्ट्रांतील जनतेच्या मतानुसारच तेथील राज्यघटना आंखण्यांत आली पाहिजे, हें स्टॅलिनचें स्वाभाविक असलेलें मतच या परिषदेंत प्रभावी झालें. या परिषदेनंतर आतां लवकरच दुसरी अघाडी उघडण्यांत येईल, ही गोष्ट तर संशयातीत झाली आहे.

आज चालू असलेल्या नाझीविरोधी युद्धांत जीं जीं राष्ट्रं आपल्याला मदत करतील त्यांना स्वतंत्र करण्यांत येईल, हें जाहीर आश्वासन चर्चिल-रूझवेल्ट यांच्याबरोबर स्टॅलिनच्या सहीनेंही प्रसिद्ध झालें आहे. या आश्वासनाप्रमाणें इराणला पूर्ण स्वतंत्र करून तेहरान-परिषदेंत स्वातंत्र्यप्रदानाची नांदी करण्यांत आली आहे.

परतंत्रांना स्वतंत्र करण्याच्या व सामान्य जनतेच्या मताप्रमाणें राज्यघटना ठरविण्याच्या या अत्युदात्त व उदार धोरणाच्या मुळाशीं प्रमुखत्वानें कॉ. स्टॅलिनचाच हात आहे, ही गोष्ट दृष्टीआड करून चालावयाचें नाहीं. अखिल विश्वाला भारी झालेल्या हिटलरला हात दाखवून व त्याच्या प्रचंड सामर्थ्यवान् सैन्याला दे माय धरणी ठाय करून सोडून सोव्हिएट यूनियनच्या लाल फौजेनें आपल्या सामर्थ्याचा पुरावा जगापुढें मांडला आहे व या सामर्थ्याच्या बळावरच स्टॅलिननें आपलें स्वयंनिर्णयाचें लोकशाही धोरण या बैठकींत जोरानें मांडलें आहे.

अद्य यावत

१९४३ च्या आरंभीं सुरुवात झालेल्या जर्मन पीछेहाटीला आतां चांगलेंच मूर्त स्वरूप आलें आहे. आपलें शक्तिसर्वस्व खर्ची घालून हिटलरनें मध्यंतरीं घेतलेलें झिटोमीरचें ठाणें आतां पुन्हा लाल फौजेनें हस्तगत केलें आहे. मार्शल स्टॅलिननें झिटोमीर घेतल्याबद्दल लाल फौजेचें नुकतेंच अभिनंदन केलें व त्याकरितां मॉस्को येथें चोवीस तोफांची सलामी देण्यांत यावी असा हुकूमही जाहीर केला. झिटोमीर घेतल्यामुळें नाझींचा मध्य अघाडीवरचा दळण-वळणाचा मार्ग अजीबात बंद झाला असून, लाल फौजा आतां रशियाच्या ताब्यांतील खुद्द पोलंडमध्यें सात मैल घुसल्या आहेत. लाल फौजेनें संपादिलेल्या या यशानें हिटलरचें आज पेकाटच मोडलें आहे व या वर्षीच्या हिंवाळ्यांत चालू झालेली ही चढाई लवकरच नाझींना रशियांतून पूर्णपणें हांकून दिल्या-शिवाय राहणार नाहीं अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत.

दुसरीकडे नाझी-हस्तगत युरोपांतील सर्व लहान मोठ्या राष्ट्रांतून लोकशाही क्रांतीनें जोरानें डोकें वर काढलें आहे. ग्रीसच्या जनतेनें तर जॉर्ज राजास पुन्हा ग्रीसमध्यें पाय न ठेवण्याबद्दल विनंति केली आहे. अर्थात् या लोकशाही क्रांतिवाल्यांना मार्शल स्टॅलिनचा पूर्ण पाठिंबा आहे हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

कम्यूनिस्ट इंटरनॅशनल रद्द करण्यांत आली त्याचें एक कारण जगांतील कम्यूनिस्ट संस्था आपल्या पायावर उभ्या राहून आपापल्या देशांतील क्रांतिकार्य चालविण्यास समर्थ झाल्या आहेत, हें एक होतें. या कारणाची सत्यता आतां नाझी-हस्तगत युरोपांत तर प्रत्यक्षच अनुभवास येत आहे. विजयी सोव्हियट यूनियनची या सर्व क्रांतिकारकांना त्यांच्या कार्यांत अर्थातच मदत मिळेल व युरोपमधीलच नव्हे तर सर्व जगांतील परतंत्र राष्ट्रांतून स्वयंनिर्णययुक्त शुद्ध लोकशाहीचीं लोकराज्यें निर्माण होतील, अशी आशा कोणी केल्यास ती अगदींच वावगी नाहीं.

युद्धोत्तर जागतिक पुनर्घटनेचा हाच अर्थ असून कॉ. मार्शल स्टॅलिन याच्या पुढील आयुष्यांत याच ऐतिहासिक घडामोडी आपणांस खात्रीनें पाहावयास मिळतील. कारण स्टॅलिन याचा आजवरचा सर्व आयुष्यक्रम या अनुमानाला पोषक असाच आहे.

---

REFBK-0006504